UNIVERSAL LIBRARY
OU_192329
UNIVERSAL LIBRARY

# विचाराशिल्प

## तर्कतीर्थ जोशी यांची ग्रंथसंपदा

शुद्धिसर्वस्वम् ( संस्कृत ) १९३४

आनंदमीमांसा, १९३८

हिंदुधर्माची समीक्षा, १९४१

जडवाद, १९४१

ज्योतिनिबंध, १९४७

वैदिक संस्कृतीचा विकास, १९५१, १९७२

आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा
व रससिद्धान्त, १९७३

विचारशिल्प, १९७५

### संपादित

राजवाडे लेखसंग्रह, १९५८

टिळक लेखसंग्रह, १९६९

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
यांचे निवडक निबंध

---

# विचारशिल्प

संपादक

**प्रा. रा. ग. जाधव**

प्रकाशक : अनंत अंबादास कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर कॉलनी, पुणे ३०

मुद्रक : चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती टिळक रस्ता पुणे ३०

सर्व हक्क सुरक्षित

प्रथमावृत्ती : १९७५


किंमत सात रुपये

प्रस्तुत आवृत्तीसाठी मिळालेल्या
सवलतीच्या दरातील कागदाबाबत
महाराष्ट्र सरकारचे आभार

## ऋणनिर्देश

अवघ्या महाराष्ट्राला ज्यांचा रास्तपणे अभिमान वाटतो, त्या विद्वत्श्रेष्ठ तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसाच्या अमृतमहोत्सवी वर्षात हा लेखसंग्रह प्रसिद्ध होत आहे, हा एक शुभ असा योगायोग आहे. याचे मुख्य श्रेय माझे मित्र कॉन्टिनेन्टल प्रकाशनाचे श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांनाच द्यावे लागेल. लेखसंग्रहाच्या संपादनात खुद्द मा. शास्त्रीजी यांनी खूपच मार्गदर्शन केले. तसेच माझे मित्र श्री. रामभाऊ कोल्हटकर यांचीही खूप मदत झाली. शास्त्रीजींविषयी चर्चा करण्याची संधी महाराष्ट्राचे श्रेष्ठ विचारवंत प्रा. मे. पुं. रेगे यांनीही मला दिली. कॉन्टिनेन्टलचे माननीय श्री. अनतराव कुलकर्णी यांनी तर या लेखसंग्रहाचा सतत पाठपुरावा केला. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. 'विचारशिल्प' हे प्रेरक साहित्य आजउद्याच्या समाजाच्या शिल्पकारांसाठी आहे. त्यांना हे आवडेल, अशी आशा वाटते.

**रा. ग. जाधव**



# विचारशिल्पकाराची प्रतिमा

महाराष्ट्रातील एक थोर विद्वान आणि विचारवंत तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या काही निवडक लेखनाचा हा संग्रह मराठी वाचकांपुढे ठेवताना मला आनंद होत आहे. शास्त्रीजींच्या नित्य व्यासंगाचे अनेक विषय त्यात अंतर्भूत असले, तरी तो एक प्रातिनिधिक विचारसंग्रह आहे, असे नाही. त्यांच्या साहित्याचा 'विशाल भूधर' समोर उभा आहे नि त्याच्या उत्तुंगतेने मन भारावून जात आहे; अशा अवस्थेत त्या भूधराच्या एका कातळावर त्याचेच एक लघुशिल्प खोदण्याचा हा प्रयत्न आहे. ज्ञानाला पर्याय नसतो हे खरे; पण तिकडे जाण्यासाठी एखादी पायवाट काढता येते. शास्त्रीजींच्या मूळ लेखनाचा खरा परिचय करून घेण्यास ही पायवाट कदाचित उपयोगी पडेल, असा विश्वास वाटतो.

शास्त्रीजींची प्रतिमा नजरेसमोर असली, की विद्वान आणि विचारवंत या दोहोंची व्याख्या नव्याने करावीशी वाटते; आणि यापुढच्या भारतीय समाजात ज्या प्रकारच्या विद्वानांची व विचारवंतांची खरी गरज आहे, त्या विद्वान-विचारवंतांची कल्पना स्पष्ट होत जाते. लोकहितवादींनी आपल्या शतपत्रांतील पन्नासाव्या पत्रात 'स्वराज्यातील विद्वानां'विषयी अत्यंत परखडपणे आपली नापसंती व्यक्त केली आहे. राजेरजवाड्यांच्या आश्रयाने जगणाऱ्या त्या विद्वानांनी

जुनी विद्या वाढविलीही नाही व तिचा समाजाला उपयोगही होऊ दिला नाही. विद्वानाने ज्ञानधनाचे पूर्वसंचित केवळ सांभाळून भागत नाही; तर ते त्याला वर्धिष्णू करावे लागते; म्हणजे पूर्वसंचिताचे जिवंतपण मीमांसापूर्वक टिकवून ठेवावे लागते. खरा विद्वान ज्ञानसंचिताचा संरक्षक व समीक्षक असतो. शास्त्रीजींनी जीवनभर हे कार्य केले. धर्मकोशाची संपादणी, ' हिंदुधर्माची समीक्षा ' व ' वैदिक संस्कृतीचा विकास ' ह्या ग्रंथराजांची निर्मिती हे त्याचे फलित होय. लोकहित-वादींना जो कर्मयोगी विद्वान अभिप्रेत होता, तोही शास्त्रीजीत आहे. राजदरबारी व पाठशाळांत बंदिस्त झालेले, ' अटकावलेले ', ज्ञान त्यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात व्याख्यानरूपाने विखरून दिले. महाराष्ट्राला शास्त्रीजींचा खरा परिचय एक प्रभावी वक्ते म्हणूनच अधिक आहे. जीवनातील फार मोठा काळ त्यांनी व्याख्यानांपायी खर्ची घातला आहे. शास्त्रीजींना, खरे तर, लेखनापेक्षा बोलण्याचीच अधिक महती वाटते. ' हिंदुधर्माची समीक्षा ' ( १९४० ) व ' वैदिक संस्कृतीचा विकास ' ( १९४९ ) हे त्यांचे दोन ग्रंथ मुळातील व्याख्यानेच आहेत. आपल्या शेकडो भाषणांमधून शास्त्रीजींनी महाराष्ट्रातील लहानमोठ्या गावांतील विचारभुकेल्यांना ज्ञानाचे सकस अन्न पुरविले आहे. ज्ञानाला त्यांनी हस्तिदंती मनोऱ्याबाहेर आणले व समाजाच्या भर प्रांगणात खडे केले. खाजगी चर्चा हे तर शास्त्रीजींचे विद्वानप्रिय असे विद्यापीठच. या विद्यापीठात ज्यांना ज्यांना प्रवेश लाभला, ते ते नव्या विचारांनी उजळून निघाले. हे विद्यापीठ मुक्तद्वार विद्यापीठ आहे व तेथे सामान्यातल्या सामान्य माणसाला केव्हाही प्रवेश असतो.

शास्त्रीजींच्या सर्व लेखनाला एक प्रकारचे सामाजिक निमित्त आहे. एखादी शाळा, संस्था, महाविद्यालय, व्यक्तींचे वाढदिवस वा वर्धापनदिनप्रसंग व्याख्यान-माला, ग्रंथप्रकाशन, ग्रंथप्रस्तावना, यांसारख्या नाना कारणांस्तव ते आजवर भाषणे देत आले व लेखन करीत आले. यामागे सामाजिक जबाबदारीची एक निष्ठा आहे. केवळ स्वतःचे विद्वत्त्व मिरविण्यासाठी त्यांनी लेखनही केले नाही व भाषणही दिले नाही. जिथे जिथे व ज्यांना ज्यांना ज्ञानविचारांची गरज जाणवली, तिथे तिथे ते गेले व त्यांना त्यांना त्यांनी ज्ञानविचार ऐकवले. घराबाहेर पडलेला हा विद्वान म्हणूनच कर्मयोगी विद्वान ठरतो. स्वतंत्रपणे फार मोठे ग्रंथकर्तृत्व करून दाखविण्याची क्षमता असूनही शास्त्रीजींनी ते केले नाही,

सामाजिक उद्बोधन हीच त्यांच्या लेखनाची प्रेरणा राहिली.

पण शास्त्रीजी केवळ कर्मयोगी विद्वान नाहीत; तर ते आधुनिक विचारवंतही आहेत. विद्यासंपन्न वैदिक पंडित एवढ्याच भूमिकेत ते मर्यादित राहिले नाहीत. आधुनिक पश्चिमी ज्ञानविज्ञानांच्या ज्ञानसागरात परिश्रमपूर्वक विहार करून त्यांनी भारतीय ज्ञानपरंपरेला आधुनिक अन्वर्थकता आणण्याचा प्रयत्न केला. परंपरा व आधुनिकता या दोहोंनाही आपल्या अगाध व्यासंगाने खराखुरा डोळसपणा दिला. मराठी विश्वकोशाची निर्मितिप्रेरणा यातूनच त्यांना लाभली. सामाजिक प्रगतीचे लक्ष्य ठेवणाऱ्या विचारवंताला पारंपरिक विद्वत्ता व आधुनिक ज्ञान यांचा मेळ घालावाच लागतो. हा मेळ कसा घालावयाचा, याचा आदर्श शास्त्रीजींनी घालून दिला. मानवेंद्रनाथ रॉयसारख्या प्रतिभावंत तत्त्वज्ञाला शास्त्रीजींविषयी, ‘ दी बेस्ट प्रॉडक्ट ऑफ द इंडियन रेनेसान्स ’ असे उद्गार काढावे लागले, त्याचे मर्म या वस्तुस्थितीतच आहे.

म्हणूनच आज-उद्याच्या विद्वान-विचारवंतांना शास्त्रीजींच्या आदर्शापासून पुष्कळ काही शिकण्यासारखे वाटेल. जो जाणतो तो विद्वान व जो विचार करतो तो विचारवंत, या सूत्रानुसार आधुनिक समाजाला जे प्रेरक ठरेल, ते जाणून घेणे व तेच विचारान्ती प्रकट करणे, या नव्या विचारकार्याचा वस्तुपाठ शास्त्रीजींनी घालून दिला. आपले प्राचीन विचारधन आणि पश्चिमी आधुनिकता यांची स्वच्छ-पणे चिकित्सा करून उद्याच्या समाजरचनेची घडण कशी करता येईल, हा भारतीय प्रज्ञेपुढे अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. आंधळी परंपराभक्ती व बेंधळी पश्चिम-पूजा यांचे धोके टाळून हा प्रश्न सोडवावा लागेल. यासाठी समाजात सातत्याने विचारमंथन चालू राहणे आवश्यक आहे. आणि अशा विचारमंथनासाठी महाराष्ट्रात तरी एक ‘ लक्ष्मणशास्त्रीय ’ परंपरा टिकून राहणे इष्ट आहे.

पण कोणत्याही समाजात विचारकार्याला अडथळ्यांच्या शर्यतीतून धावावे लागते. विचाराने मने घडविण्याचे कार्य फार संथपणे चालते. संथपणाबरोबरच ते प्रतिभेप्रमाणेच ‘ असंलक्ष्यक्रम ’ असते. विचाराने मनोदीप कसे लागतात, हे सांगता येत नाही. ज्ञानविचाराचा परिणाम एकदम दृश्य स्वरूपात पहावयास मिळत नाही. ज्ञानाने मनाच्या खोल गाभाऱ्यात निरांजन तेवते, झगमगीत विद्युत्दीप लागत नाहीत. यामुळेच समाजातील विचारकार्याची बूज अधिक दक्षपणे राखावी लागते. आपल्या शिक्षणसंस्था या बाबतीत असमाधानकारक

वाटतात. मराठी निबंधांच्या पाठ्यपुस्तकात त्याच त्या जुन्या लेखकांचे तेच ते निबंध वर्षानुवर्षे पहावयास मिळतात. नव्या ज्ञानाची व विचारकार्याची योग्य ती दखल घेतली जात नाही. त्यामुळे नव्या पिढीला नव्या विचारांची ओळख करून देण्याची संधी हुकते. इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान यांसारख्या विषयांच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांत आधुनिक विचारवंतांचे ग्रंथ समाविष्ट होत नाहीत. शास्त्रीजींसारख्या कितीतरी विद्वानांचे विचारप्रवर्तक लेखन आधुनिक मराठी विद्यापीठांत प्रवेशू नये, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. श्रेष्ठ विचारवंतांचे लेखन नाना प्रकारे व नाना घाटांतून समाजापुढे येत राहिले पाहिजे. पण या बाबतीत आपली सामाजिक जाणीव बोथट आहे. 'विचारशिल्प' सादर करण्यामागे एका श्रेष्ठ विचारवंताचे महत्त्वाचे लेखन नमुना म्हणून तरी घरोघर पोहोचावे, अशी तळमळ आहे. एका मोठ्या ज्ञानगंगेचे हे पाटाचे पाणी आहे, ते सुलभपणे दारी यावे असे मनापासून वाटते.

या पाण्याचा रंग महत्त्वाचा नाही; तर त्याची चव जीवनदायी आहे हे महत्त्वाचे आहे. शास्त्रीजींच्या लेखनाचे सौंदर्य विचारांत आहे, शैलीत नाही. याचे कारण शास्त्रीजींची विचार करण्याची पद्धतीच शुद्ध तर्कसंगतीवर भर देऊन शुद्धविचार घडविणारी आहे. तिला लालित्याची गरज जाणवत नाही. मुद्दाम विचार खुलवावा, असे त्यांना वाटत नाही. पंडिती विचाररीतीमध्ये लालित्याला वाव नसतो असे नाही; पण त्याची आवश्यकता असतेच असेही नाही. "पात्र सोन्याचे असो मृत्तिकेचे! वेड मजला आतल्या अमृताचे," अशी काहीशी बाह्य शैलीविषयी शास्त्रीजींची कल्पना असावी. महत्त्व अमृताला आहे; ते सुवर्णपात्रात आहे की मृत्पात्रात आहे याला नाही. पण याचा अर्थ शास्त्रीजींच्या लेखनांत रसिक विवेचनाची स्थळे नाहीत, असे नाही. शास्त्रीजी माणूस म्हणून विलक्षण रसिकसंपन्न आहेत. ऐंद्रिय संवेदनांची श्रीमंती ते अनुभवू शकतात व व्यक्तही करू शकतात. पण यासाठी विचारप्रतिपादनाला लालित्याचा संकर ते उठसूट करीत नाहीत.

'शैली म्हणजे व्यक्ती' ('स्टाइल इज दी मॅन') असे म्हटले जाते, ते शास्त्रीजींच्या लेखनशैलीला पूर्णपणे लागू पडते. शास्त्रीजी कोणत्याही गोष्टीकडे विचारदृष्टीने पाह्यचे म्हटले, की एक प्रकारच्या तर्कशुद्ध गांभीर्याने पाहतात. विचारांकडे क्रीडादृष्टीने पाहण्याची त्यांची वृत्ती नाही. त्यामुळे वरवरच्या

विचारांचा वरवर विचार करणे वा एखाद्याच चमकदार विचाराचा पाठपुरावा करणे, त्यांना जमत नाही. सर्वांगीण व सम्यक् विचारबोध हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे लक्षण असल्याने 'मिया मूठभर व दाढी हातभर' अशी मांडणी त्यांच्या लेखनात अवतरत नाही. पण याचा अर्थ एवढाच की, एखाद्या विचाराचे लालित्यपूर्ण प्रकटीकरण ते विचाराच्या अंगोपांगांनीच करतात. म्हणूनच त्यांचे लेखन विचारसौंदर्याचा नमुना ठरते. त्यात माहितीची नुसती परिपूर्णताच नसते; तर ती माहिती विचारनाट्याने थरथरत असते. तिच्यात सखोल दृष्टीची व मार्मिक निरीक्षणाची रुपेरी चमक असते. बुद्धीला खडबडून जागे करणारी दीप्ती असते. युक्तिवादांचे चातुर्य तिच्यात असते. दृष्टान्ताचे नेमकेपण असते. यामुळेच सुजाण वाचकाला शास्त्रीजींच्या लेखनात एक प्रकारचे जिवंत स्पंदन ('थ्रिल') जाणवत राहते.

शास्त्रीजींच्या विचारकार्याचा मागोवा अनेक प्रकारे घेता येणे शक्य आहे. वयाच्या चौदाव्या वर्षी ते वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत आले व त्यांना 'आचार्यदर्शन' घडले. 'आपला जन्म त्याच आचार्यकुळात झाला आहे', असा साक्षात्कार त्यांना घडला. पण पारंपरिक आचार्यपरंपरेत शोभण्यासारखे अध्ययन-अध्यापन करूनही ते त्या परंपरेतून लवकरच बाहेर पडले. महात्माजींच्या चळवळीत ते सामील झाले व जुन्या शास्त्राधारे नव्या सुधारणा साधू लागले. पण भारतीय सुधारणावादातूनही ते बाहेर पडले व मार्क्सवादी व रॉयवादी विचारप्रणालीने भारावून गेले. भारतापुरताच मर्यादित असलेला त्यांचा ध्येयवाद त्यामुळे अखिल मानवजातीच्या ध्येयवादात परिणत झाला. अध्यात्मकेंद्रित विशाल मानवतावादाचा ध्रुवतारा आता शास्त्रीजींच्या वैचारिक वाटचालीचा मार्गदर्शक आहे.

नव्या ध्येयवादाने सतत बदलणारा हा प्रवाही विचारवंत म्हणूनच नेमक्या शब्दांत पकडणे सोपे नाही. मोठमोठ्या नेत्यांच्या व विचारवंतांच्या प्रभावळीत व प्रभावाखाली येऊनही शास्त्रीजींनी आपले विचारस्वातंत्र्य अबाधित राखले. एक प्रकारच्या गंभीर सारग्राही ('इक्लेक्टिक') वृत्तीने त्यांनी सर्व विचारधारांचे सार तेवढे आत्मसात केले व त्याज्य वाटले ते निर्भयपणे अव्हेरले. योग्यायोग्याचा हा साक्षेपी विवेक हे शास्त्रीजींच्या विचारकार्याचे खरे रहस्य असावे, असे म्हणूनच वाटते. कोणती एकच एक वैचारिक भूमिका अंधपणाने त्यांनी स्वीकारली

नाही. कोणत्याच तत्त्वप्रणालीची बांधीलकी पतकरली नाही. म्हणूनच सनातन्यांना कधी ते जवळचे भासले; तर कधी आधुनिकांना ते आपलेसे वाटले. या दोहोंचेही समाधान करण्याची कुवत जशी त्यांच्यात आहे, तशीच कुवत या दोहोंनाही अस्वस्थ करण्याचीही आहे. म. गांधी, मार्क्स, मानवेंद्रनाथ रॉय यांच्याविषयी त्यांनी प्रबंधलेखन केले नाही; याचा अर्थ, त्यांच्या विचारां-विषयीही व्यापक विधायक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने काहीतरी अपुरेपणा त्यांना जाणवत असावा. अपूर्णाला लेखनरूप गवसणी घालण्याचा प्रयत्न शास्त्रीजींनी कधी केला नाही. वैदिक संस्कृतीविषयी त्यांची भूमिका सर्वथा निश्चित झाली; म्हणून तिच्या विकासाचा आलेख रेखाटण्यास ते प्रवृत्त झाले. म. गांधी, मार्क्स, व मानवेंद्रनाथ रॉय यांसंबंधी जेव्हा ते तोंडी चर्चा करतात, तेव्हा या श्रेष्ठांच्या काही दुबळ्या जागा सहजपणे लक्षात येतात. स्वतंत्र विचार व विचारस्वातंत्र्य यासंबंधीच्या अत्यंत प्रगल्भ व आदर्शवत अशा कल्पना शास्त्रीजींनी जोपासलेल्या आहेत. या कल्पना त्यांनी कोठून मिळविल्या ? असे वाटते, की ज्या पारंपरिक अध्ययनपद्धतीत शास्त्रीजींची वैचारिक घडण झाली, त्या पद्धतीतच स्वतंत्र विचाराचे व विचारस्वातंत्र्याचे आदर्श लपलेले होते. भारतीय विचारपरंपरा सर्वसमावेशक असली, तरी ती अतिशय काटेकोरपणे चिकित्सा करणारी परंपरा आहे. तिला शाब्दिक, भावनात्मक व वक्तृत्वपूर्ण लटपटपंची सहन होत नाही. विचारशुद्ध मोत्येच ती निवडते. या परंपरेला शास्त्रीजींनी आपल्या स्वतंत्र विचारकार्याने पुनरपि उजळा दिला. बुद्धीचे पूर्णपणे समाधान न करणारी कोणतीही गोष्ट भारतीय दर्शनांनी स्वीकारलेली नाही. अशा दर्शनांच्या सखोल व सम्यक् परिशीलनाने ज्यांची विवेकशक्ती घडली, त्या शास्त्रीजींना म्हणूनच आपले स्वातंत्र्य अबाधित राखता आले. वाईच्या अमृत-महोत्सवी सोहळ्यात बोलताना ते म्हणाले होते की, " उच्च, नैतिक व बौद्धिक सत्याच्या ध्रुवताऱ्याकडे लक्ष देऊनच मी वाहत राहिलो आहे, " हे खरे आहे. पण भारतीय विचारपरंपरेत अशी उच्च बुद्धिनिष्ठा निर्माण करण्याची ताकद आहे, हेही शास्त्रीजींनी सिद्ध करून दाखविले. म्हणूनच सतत परिवर्तनशीलता हा त्यांच्या विचारकार्याचा स्थायीभाव ठरला.

या स्थायीभावाला परिपोषक ठरणारी परिस्थितीही शास्त्रीजींच्या विचार-यात्रेला लाभली, असे वाटते. ' वैदिक संस्कृतीच्या विकासा 'ची समीक्षा आपण

का केली, याची मीमांसा या ग्रंथाच्या उपसंहारात त्यांनी केली आहे. : " हे राष्ट्र तत्त्वज्ञानशून्य बनण्याची शक्यता वाढत आहे. केवळ बौद्धिक विचारसंपत्ती म्हणून तत्त्वदर्शनाची आवश्यकता नाही; तर अस्तित्वाच्या सर्व भागांवर प्रकाश टाकून मार्गक्रमणास उत्साहित करणारे तत्त्वदर्शन आवश्यक आहे. संस्कृती ही अनुभवांचे आणि विचारांचे संचयस्थान असते. तत्त्वज्ञान अनुभवांच्या आणि विचारांच्या समग्र संकलनाने निर्माण होत असते. म्हणून ही वैदिक संस्कृतीच्या विकासाची समीक्षा आम्ही केली आहे. परंपरेने प्राप्त झालेली परलोकपरायण विचारसरणी जशीच्या तशी स्वीकारून या जगात जगण्याचे सामर्थ्य मिळणार नाही. या जगाचा अर्थ समजला, तरच जगात यशस्वीपणे जगता येते. हे जग अधिक चांगले कसे बनविता येईल, हा खरा प्रश्न आहे..." या अत्यंत मननीय व अर्थगर्भ प्रतिपादनात भारतीय विचारवंतांपुढील खऱ्या कार्याची रेखीव मांडणी आहे.

हे कार्य दुहेरी होते व आहे. प्रदीर्घ भूतकाळ हे भारतीय समाजाच्या परिवर्तनातील फार मोठे आव्हान आहे. चीनचा अपवाद वगळता कोणत्याही आधुनिक समाजाला एवढ्या प्रदीर्घ भूतकाळाचा गुंता सोडवावा लागलेला नाही. म्हणूनच भारताच्या पूर्वपरंपरेची वस्तुनिष्ठ चिकित्सा केल्याशिवाय नव्या संकल्पित परिवर्तनाची दिशा गवसणार नाही. सांस्कृतिक वडण जडवादी साधनसामग्रीने होत नाही; म्हणून जुन्यानव्याचा मेळ घालणारे कार्यक्षम तत्त्वज्ञान समाजाला आवश्यक असते. पण नेमके याचेच दुर्भिक्ष्य भारतात आहे, याची विदारक जाणीव शास्त्रीजींनी वरील उपसंहारात व इतरत्रही अनेकदा व्यक्त केली आहे. कोणत्याही सुजाण भारतीयाला विलक्षण अस्वस्थ करणारी ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती केवळ १९४० च्या आसपासची नाही. आजही या वस्तुस्थितीमध्ये काही फरक झालेला नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील सार्वजनिक जीवनाचा जो अधःपात आपण पाहत आलो, तो याच वस्तुस्थितीचा निर्विवाद पुरावा आहे.

— असे का झाले ? कालोचित असे नवे जीवनदर्शन हजारो वर्षांचे दार्शनिक जीवन जगणाऱ्या आम्हा भारतीयांना का निर्माण करता आले नाही ? या भूमीत जीवनदर्शने केवळ निर्माणच झाली नाहीत, तर ती जन्मली व जगलीही. शास्त्रीजी म्हणतात त्याप्रमाणे, केवळ ' बौद्धिक विचारसंपत्ती ' म्हणून येथे तत्त्व-

दर्शन अवतरले नाही; तर "अस्तित्वाच्या सर्व भागांवर प्रकाश टाकून मार्गक्रमणास उत्साहित करणारे तत्वदर्शन" येथे निर्माण झाले होते. अगदी मध्ययुगीन भक्तिमार्गाच्या तत्त्वज्ञानापर्यंत हे एक निखळ सत्य होते. या सत्याची शास्त्रीजीसारख्यांना आठवण होती. मग ही आठवण वांझोटी का ठरली? प्राचीनाची सर्वंकष समीक्षा व आधुनिकाची उभारणी हे कार्य तत्त्वज्ञानाच्या पातळींवर नवे भारतीय दार्शनिक का करू शकले नाहीत?

या 'का' व 'कसे' यांना सहजासहजी उत्तर सापडणार नाही. शास्त्रीजींच्याच विचारविकासाचा नमुना अभ्यासून त्यांचे काहीएक उत्तर शोधण्याचा आपणास प्रयत्न करता येईल.

शास्त्रीजी हे विसाव्या शतकाच्या प्रथमार्धाचे एक नमुनेदार (टिपिकल) भारतीय विचारवंत होत. हा भारतीय विचारवंत एका प्रचंड भोवऱ्यात गरगरत होता. शास्त्रीजींनी स्वतःबद्दल म्हटले आहे कीं, "मी सतत वाहत आलो; पाय टेकायला कुठे जागाच सापडली नाही," हे खरे होते. या विचारवंतापुढे विचारांची नवी नवी क्षितिजे येत होती व त्याची सतत धावपळ चालू होती. एका डोंगराच्या शिखरावर चढून क्षितिज हाती लागेलसे वाटते न वाटते, तोच पुढचा डोंगर व त्याच्या माथ्यावरचे क्षितिज अवचित समोर अवतरत होते. कोणत्याही जागृत विचारवंताला आत्मवंचना टाळायची असेल, तर या नव्या क्षितिजाची दखल घेणे भागच होते. कुठे थांबावे याची कुणालाच खात्री वाटत नव्हती. मंझिले बदलत होती, मुक्काम बदलत होते. भारतीय प्रज्ञा जणू वातचक्रात सापडून भिरभिरत होती. फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती, मार्क्सवाद, गांधीवाद आणि या जोडीला प्रचंड परंपरेचे बहुजिनसी ओझे आणि पारतंत्र्याच्या शृंखला यांतून समाज कोणत्या वाटेने पुढे न्यावयाचा, याचा संभ्रम भारतीय विचारवंताच्या मनात दाटलेला होता. कुठल्यातरी टेकूच्या आधारे एखादी भव्य झेप (बिग लीप) घ्यावी, तर असा टेकूही लाभत नव्हता. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात राजा राममोहन रॉय यांनी सुरू केलेल्या तथाकथित भारतीय प्रबोधनाला टेकू देण्याइतपत सर्वंकष तत्त्वदर्शनाचा कणाच नव्हता. पश्चिमी अर्थाने आपल्या देशात १८ व्या-१९ व्या शतकांत खरेखुरे प्रबोधन खरोखरच सुरू झाले किंवा नाही, याची पुन्हा एकदा तपासणी केली पाहिजे. मुख्य म्हणजे राजकीय दृष्ट्या परतंत्र असलेल्या समाजातील प्रबोधन-चळवळ

आणि राजकीय दृष्टया स्वतंत्र असलेल्या समाजातील तशी चळवळ यांत फरक असतो व तो केलाही पाहिजे. याशिवाय बहुभाषी, बहुसांप्रदायिक व अनेकात्म स्वरूपाच्या नि दीर्घ भूतकाळ असलेल्या समाजात प्रबोधनाची चळवळ तिच्या पहिल्या पर्वात कच्चे स्वरूप धारण करते. ती तपशिलांवर भर देऊन समग्र तत्त्वज्ञानाकडे दुर्लक्ष करण्याचा संभव असतो. भारतीय प्रबोधनाची चळवळ या सर्व दृष्टींनी पुन्हा न्याहाळली पाहिजे.

भारताच्या दुर्दैवाने येथे राजकीय पारतंत्र्य आणि सांस्कृतिक परिवर्तनाची ऐतिहासिक गरज यांची एकाच कालखंडात गाठ पडली. याचा स्वाभाविक परिणाम सांस्कृतिक परिवर्तनप्रक्रियेची पीछेहाट होण्यात झाला. आधी राजकीय वातंत्र्य की सामाजिक सुधारणा, यासारखे विलक्षण गुंतागुंतीचे प्रश्न ऐतिहासिक नियतीने भारतीयांसमोर उपस्थित केले.

शास्त्रीजींची वैचारिक घडण या शतकाच्या आरंभापासून होत गेली व वरील सर्व प्रश्न या घडणीत प्रभावी ठरले. भारतीय पारंपरिक तत्त्वज्ञान अभ्यासूनही नव्या काळात ते कुचकामी आहे, याचा साक्षात्कार त्यांना झाला. ‘ हिंदुधर्माची समीक्षा ’ या प्रेरक प्रबंधात पारंपरिक धर्ममूल्यांची परखड चिकित्सा करून आधुनिक काळातील विज्ञानमूल्यांचा व सामाजिक मूल्यांचा पुरस्कार केला पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादन केले. पण पर्याय सुचवून समग्र जीवनाची तत्त्वप्रणाली सिद्ध होत नाही. बौद्धिक विचारसंपत्तीचाच तो एक भाग होतो. टिळकवादात नवे प्रणाली-सामर्थ्य नव्हते. गांधीवाद हा गांधींच्या हयातीत प्रक्रियागत होता. पुन्हा राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीशी तो घट्ट बांधलेला होता; त्यामुळे गांधीवादाची तत्त्वदर्शन म्हणून मांडणी करण्यास स्वातंत्र्यपूर्व काळात कुणालाच फुरसत नव्हती. मार्क्सवाद, रॉयप्रणीत रॅडिकल ह्यूमनिझम, समाजवाद यांच्या उलटसुलट आघातांनी व राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीच्या लगतच्या उद्दिष्टामुळे विचारवंत ही भूमिकाच टिकवून ठेवणे कठीण झाले होते. मध्ययुगीन संत चळवळीत ज्याप्रमाणे संतत्व व कवित्व यांची सांगड निरजली होती, तद्वतच या शतकाच्या प्रथमार्धात राजकीय कार्यकर्ता व विचारवंत यांची सांगड जुळल्याचे दिसून येते. कॉंग्रेस पक्ष हे सर्व प्रकारच्या कार्यांचे व विचारांचे मध्यवर्ती व्यासपीठ होते. ते या दोन्ही बाबतींत संकीर्ण स्वरूपाचे होते. या व्यासपीठावर सनातनी व सुधारक, साम्य-वादी व समाजवादी, अहिंसावादी व क्रांतिवादी, पुरोगामी व पुनरुज्जीवनवादी

अशा सर्वांचीच वर्दळ होती मुख्य लक्ष्य नव्या भारतीय राज्यतंत्राची (पॉलिटीची) निर्मिती करून राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेणे, हे होते. या लक्ष्यापायी सर्व प्रकारचे मनुष्यबळ व विचारबळ राबविणे इष्ट होते. स्वातंत्र्य मिळेपर्यंत सगळी भारतीय प्रज्ञा व बळ एका प्रचंड चळवळीच्या प्रवाहात वाहत राहिली. त्यांना पाय टेकायला उसंतच लाभली नाही.

म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सांस्कृतिक प्रबोधनाचे मधल्या काळात सुटले-तुटलेले धागे एकत्र करून त्यांची नवी वीण गुंफणे अत्यावश्यक होते. वैदिक संस्कृतीची व हिंदुधर्माची समग्र चिकित्सा पुनरपि करून तिच्याधारे नवी तत्त्वप्रणाली समाजापुढे ठेवणे आवश्यक होते. खरे भारतीय प्रबोधन, खरे तर, १५ ऑगस्ट १९४७ च्याच सुमुहूर्तावर सुरू करणे इष्ट होते. स्वतंत्र समाजालाच जुन्याची समीक्षा व नव्याची रचना करण्यास अनुकूल मनःस्थिती असते. अधिक जबाबदारीने या गोष्टी करण्याची गरज त्याला जाणवते. या कार्यात त्याच्या भवितव्याचे प्रश्न गुंतलेले आहेत, त्यात आपले 'हित' आहे, याची कल्पना त्यास असते. गांधीवादाची खरी मांडणी, चिकित्सा व तत्त्वप्रणालीय संश्लेषण करण्याची खरी वेळ स्वातंत्र्योत्तर काळातच होती. मार्क्सवादाची आभाळे येत जात होती. येथील परंपरेशी त्याचे नाते शोधण्याची खरी संधी स्वतंत्रता हीच होती. स्वतःकडे एक प्रकारच्या स्वच्छ वस्तुनिष्ठतेने पाहण्यास अनुकूलता राजकीय स्वातंत्र्याने निर्माण केली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात आपला भारतीय विवेक सतत पश्चिमसापेक्ष राहिला; त्यामुळे त्याची श्रेष्ठता सिद्ध केल्याचे वांझोटे समाधान आपणास लाभले, तरी नव्या सांस्कृतिक घडणीच्या दृष्टीने तो उपयुक्त ठरला नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी फार पूर्वी आत्मज्ञानाची, स्वतःचे स्वतःबद्दलचे ज्ञान जाणून घेण्याची, महत्त्वाची गरज बोलून दाखविली होती. ती गरज पूर्ण भागविण्याची जबाबदारी भारतीय विचारवंतांवर होती व आहे.

असे असले, तरी शास्त्रीजींसारख्या विचारवंताची घडण ज्या काळात झाली, त्या काळात गांधीवादी तत्वज्ञानाचे कार्यक्रम समाजाच्या सर्व क्षेत्रांत कमीअधिक प्रमाणात राबविण्यात आले. हे तत्त्वज्ञान अंगविणारे काही नमुने येथे निर्माण होत राहिले. त्यांतील एक आचार्यनमुना समाजाच्या, विशेषतः स्वातंत्र्योत्तर समाजाच्या, आशाआकांक्षेचे नेतृत्व करण्यात यशस्वी झाला नाही. तथापि

शास्त्रीजींसारखा दुसरा एक नमुनाही गांधीयुगाने आपणास दिला. हा आचार-शुद्ध विचारवंतांचा एक जागृत नमुना होता. प्रत्यक्ष सत्ताक्षेत्रापासून तो अलिप्त होता, पण सत्ताक्षेत्राचा चिकित्सक निरीक्षक होता. छत्रपती शिवाजी व रामदास यांच्यातील नात्याप्रमाणे सत्ताधारी व हा विचारवंत याचे दूरजवळचे नाते होते. हा विचारवंत नवी पश्चिमी तत्त्वज्ञाने पचवून भारतीय परंपरेची आध्यात्मिकता कशी जोपासता येईल, याची चिकित्सा करणारा होता; नवी विज्ञानमूल्ये व समाजमूल्ये यांना येथील मातीत रुजविता येण्यासाठी जी एक सांस्कृतिक अधः-संरचना ( इन्फ्रा–स्ट्रक्चर ) हवी, तिचा अभिकल्प मांडू पाहणारा हा विद्वान होता. केवळ वैज्ञानिक-तांत्रिक प्रगतीने व औद्योगिकीकरणाने नव्या समाजाचे नवेपण आपोआप तयार होणे शक्य नाही; तर या भौतिक आर्थिक प्रक्रियेला एक अनुकूल अशी मानसिक घडण समाजात तयार केली पाहिजे, असे या दुसऱ्या गांधीयुगीन विवेकनमुन्याचे धोरण होते. प्रयोगशाळेत असताना सात तासांचा शास्त्रज्ञ प्रयोगशाळेबाहेर पडला, की ग्रहग्रहणांच्या पारंपारिक कल्पनांचे सोवळे नेसून सनातनी बनतो, ही आमच्या वैज्ञानिक आधुनिकीकरणातील विसंगती आहे. या विसंगतीमुळे नव्या भारतीय समाजात खरेखुरे सांस्कृतिक परिवर्तन शक्य होणार नाही. यासाठी जुनी परंपरा अभ्यासून तिच्यातूनच नव्या समाजाची प्रयोगशाळा कोठे, कशी व कोणत्या अग्रक्रमाने बांधावयाची, याचा विचार करणे आवश्यक होते व आहे. शास्त्रीजींसारख्यांनी असाच विचार करण्याचा प्रयत्न केला. पण हे काम प्रचंड होते. त्यासाठी नव्या प्रबोधनाचा घणाघाती विचार समाजात अहोरात्र होणे आवश्यक होते. आपण हे केले काय ?

स्वातंत्र्योत्तर काळात आपण राज्य हाती घेतले; पण आपल्या शासनाचा रथ आंधळ्या अश्वांनी आजवर ओढत आणला आहे. शास्त्रीजी हे मी वर म्हटल्या-प्रमाणे गांधीयुगातील एक नमुनेदार विचारवंत. या विचारवंताला ज्या ऐतिहासिक परिस्थितीतून वाट काढावी लागली, तिचे मला उमगलेले स्वरूप मांडण्याचा वर प्रयत्न केला आहे. हा विचारवंत खऱ्या अर्थाने आपली विचारवंताची भूमिका वठवू शकला नाही व याची कारणे परिस्थितीत आहेत. या विचारवंताजवळ बौद्धिक साधने व साधना होती; पण त्यास बौद्धिक उसंत नव्हती. म्हणूनच या विचारवंताने ' अस्तित्वाच्या सर्व भागांवर प्रकाश टाकून मार्गक्रमणास उत्साहित करणारे तत्त्वदर्शन ' निर्माण केले नाही. आणि स्वतंत्र भारतात राजसत्तेच्या

कैफात सगळाच समाज गुंगून पडल्याने हे कार्य करण्यास कुणीच प्रवृत्त झाला नाही. म्हणजे भारतीय विचारवंत एकाकी पडला असे नाही; तर भारतीय विचारच अपुरा पडला.

म्हणून भारतीय स्वातंत्र्य हा भारतीय विचारवंतांचा पराभव ठरला. त्यामुळेच स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजात सार्वजनिक नीतिमत्तेचे अधःपतन झाले. समाज एक वेळ गरिबीवर जगतो; पण तत्त्वशून्यतेवर जगू शकत नाही. म्हणूनच शास्त्रीजीसारख्यांनी जे विचारधन निर्माण केले व जे विचारधन निर्मिण्याची आकांक्षा बाळगली, त्याची आठवण ठेवून आजउद्याच्या भारतीय विचारवंताने विचारकार्य करणे इष्टच नव्हे, तर आवश्यकही आहे. परंपरेची सम्यक् समीक्षा व नव्या सामाजिक वैज्ञानिक मूल्यांचा साक्षेप यांच्या अधिष्ठानावर नव्या तत्त्वदर्शनाची उभारणी करणे, हे त्या कार्याचे सूत्र राहील. अखिल मानव्याचा विचार करणारा मानवतावाद हे त्याचे लक्ष्य राहील व प्रत्यक्ष आचारक्षमता, कार्यक्षमता व नीतिप्रवर्तन या गुणांनी ते संपन्न असेल. याचा ध्यास घेणारे विचारवंत निर्माण होणे, यातच शास्त्रीजींच्या विचारकार्याचे सार्थक आहे.

विश्वकोश कार्यालय,
१५ ऑगस्ट, १९७५.

**रा. ग. जाधव**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | माझी घडण | १ |
| २ | आचार्यदर्शन | ८ |
| ३ | अलौकिक सृष्टी | १३ |
| ४ | संस्कृतीच्या दोन व्याख्या | १७ |
| ५ | धर्माचे इतिहासातील स्थान | ३० |
| ६ | वैज्ञानिक दृष्टी आणि भारतीय संस्कृती | ५० |
| ७ | विज्ञानांची मराठी परिभाषा | ६८ |
| ८ | महाराष्ट्रातील धर्मसुधारणेचे आंदोलन | ७४ |
| ९ | आधुनिक मराठी वाङ्मयाची पार्श्वभूमी | ९८ |
| १० | दास कॅपिटलची जन्मकथा | ११२ |
| ११ | गांधीवाद | १२० |
| १२ | आधुनिक भारतीयांतील तत्त्वज्ञानाचे दारिद्रय | १२९ |
| १३ | धर्ममूल्याची चर्चा | १३६ |

# १

# माझी घडण

तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वांचा व विचारांचा वेध घेण्यासाठी काही प्रश्न त्यांच्यापुढे ठेवले होते. हे प्रश्न त्यांना शास्त्रीजींनी दिलेली उत्तरे पुढे देत आहे. शास्त्रीजींच्या जीवनाची घडण कशी होत गेली, याची काहीशी कल्पना या प्रश्नोत्तरांवरून येईल असे वाटते.

संपादक

**प्रश्न १ :** वयाच्या १४ व्या वर्षी आपण वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत अध्ययनार्थ दाखल झाला. आज या संस्थेचे आपण अध्यक्ष आहात. म्हणजे गेली साठाहून अधिक वर्षे आपला या संस्थेशी अतूट संबंध आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत व विचारविकासात या संस्थेचा प्रभाव कशा प्रकारचा आहे, असे आपणास वाटते ?

**उत्तर :** शहरापासून दूर असलेल्या पिंपळनेर नामक एका तीन हजार वस्तीच्या गावात माझे बालपण गेले. जुन्या रूढींना अत्यंत पवित्र मानून त्या रूढींच्या बंधनात समाधान मानणाऱ्या, जातपातीचे निर्बंध कडक रीतीने पाळणे, हे अत्यंत प्रशस्त मानणाऱ्या आणि सोवळ्या-ओवळयाचे निर्बंध अत्यंत पवित्र मानणाऱ्या एका संकुचित जगात ते खेडेगाव वसलेले. नव्या जगाचा संपर्क खेड्यात मधूनमधून येणाऱ्या कोट-पाटलुणी पोषाख केलेल्या फौजदार, जमादार व तहसिलदार ह्यांच्यातर्फेच व्हायचा. मॅट्रिकपर्यंत शिकलेला तेथे तेव्हा कोणीच

नव्हता. महिना-पंधरा दिवसांत केव्हा तरी वरील सरकारी अधिकाऱ्यांची 'बायसिकल' दृष्टोत्पत्तीस यायची. आठवड्याचा 'केसरी' आमच्या घराच्या ओटीवर सामुदायिक रीतीने वाचला जायचा; तो वाचल्यानंतर ज्या गप्पागोष्टी व्हावयाच्या त्यावरून देशभक्त व सुधारक यांची नावे कानावर पडायची. गावास शास्त्री, पुराणिक, कीर्तनकार यांच्या वारंवार भेटी व्हावयाच्या. त्यांची राहणी व विचारसरणी यांचा मात्र माझ्यावर खूप खोल प्रभाव पडत असे.

वाईस चौदाव्या वर्षी आलो, तो खरोखरच अगदी वेगळ्या जगात प्रवेश केल्यासारखे वाटले. परंतु माझे लहानपणचे जग व येथील जग यांच्यात एक प्रकारची क्रमवार सलगता होती. जीवनपद्धती सनातनी; परंतु विचारांचा संसार म्हणजे नव्याजुन्या विचारांचा एकत्रित येऊन होणारा संघर्ष होता. केवलानंद सरस्वती म्हणजे पूर्वाश्रमीचे नारायणशास्त्री मराठे वयाने पस्तीस ते चाळीसच्या घरात होते. उंच व भव्य शरीरबांधा, अत्यंत तेजस्वी पुरुष, नैष्ठिक ब्रह्मचारी, वेदज्ञ व षट्शास्त्रज्ञ, प्राज्ञ पाठशाळेचे प्रमुख होते. त्यांच्या सान्निध्यात वाईस येऊन राहिलो. त्यांच्यापाशी तीस-पस्तीस तरुण विद्यार्थी वेदशास्त्रांचे शिक्षण घेत होते; परंतु पाठशाळेचे वातावरण जुन्या पठडीतील, रूढीनिष्ठ, देशकालपरिस्थितीशी विमुख अशा परंपरावादी शास्त्री-पंडितांचे नव्हते. येथे मराठेशाही का बुडाली व ब्रिटिश सत्ता का स्थापन झाली, याची चर्चा विवेकानंद, रामतीर्थ यांच्या विचारांचे परिशीलन आणि टिळक व अरविंद घोष यांच्या जीवन निष्ठेचीचर्चा सतत चालावयाची. स्वामी दयानंदांच्या 'सत्यार्थप्रकाशा'ची आलोचना चालावयाची. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जप्त झालेले 'मॅझिनीचे चरित्र' गुप्त रीतीने विद्यार्थ्यांच्या मध्ये एकाच्या हातातून दुसऱ्याच्या हातात वाचनार्थ दिले जात होते. आपला देश पश्चिमी राष्ट्रांच्या मागे का राहिला या एका मुख्य सूत्राभोवती, आठवड्याच्या सुट्टीच्या दिवशी होणाऱ्या विद्यार्थी व शिक्षक यांच्या सभेत अनेक विषयांची साधकबाधक चर्चा होत असे. इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान, रामायण-महाभारतादी प्राचीन साहित्य, धर्मशास्त्रग्रंथ या सर्वांचा ऊहापोह या आठवड्याच्या सभेमध्ये चालत असे. तळेगाव-दाभाडे येथे 'समर्थ विद्यालय' नावाची राष्ट्रीय शिक्षणाची संस्था होती. त्या संस्थेतील शिक्षक आणि विद्यार्थी हे ब्रिटिश राज्य उलथवून पाडण्याचा कट करीत आहेत, अशा संशयाच्या निमित्ताने ब्रिटिश सरकारने ती संस्था १९१० साली बंद पाडली. त्यातीलच अनेक प्रौढ विद्यार्थी व शिक्षक येथे वेदान्त आणि

धर्मशास्त्र शिकण्याकरिता येऊन राहिले होते व त्यांच्याच प्रभावाखाली प्राज्ञ पाठशाळा ही संस्था काम करीत होती.

मी व्यक्तिशः जुन्या शास्त्री-पंडितांच्या परंपरेतील शिक्षण घेतलेला असूनही अगदी आधुनिक, सर्वांत पुरोगामी अशा विचारांचा पुरस्कर्ता कसा झालो, असा प्रश्न मला युरोपात व अमेरिकेत गेलो असता अनेक विद्वानांनी विचारला; त्याचे उत्तर वरील प्राज्ञ पाठशाळेचे विशिष्ट वातावरण व वळण हे होय. जुने जग व नवे जग ही येथे विचारांच्या क्षेत्रात एकमेकांशी संघर्ष व सुसंवाद करीत एकत्र नांदत होती.

**प्रश्न २ :** आपले बालपणातील कौटुंबिक संस्कार व मोठेपणीचे कुटुंबजीवन यांचा आपल्या सामाजिक, राजकीय जीवनाशी कशा प्रकारचा संबंध आहे? या दोहोंतील समतोल आपण साधलेला आहे, असे जे दिसते, ते बरोबर आहे काय? तसे असल्यास याचे रहस्य कशात असावे?

**उत्तर :** लहानपणीच मला मातृवियोग झाला. बालपणी कौटुंबिक संस्कार मिळाले ते पिताजींपासून आणि माहेरी कायम परत आलेल्या वडील बहिणीपासून. तरुणपणाचा प्रारंभीचा विवाहपूर्व काळ वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत गेला. येथे कुटुंबजीवन नव्हतेच. हे विद्यार्थी वसतिगृह होते. गुरुजनांची सक्त देखरेख होती. बारा वर्षे विद्यार्थी वसतिगृहात काढल्यानंतर माझा गृहस्थाश्रम सुरू झाला. त्यामुळे पतिपत्नी हे नाते जुन्या जमान्याच्या आकृतिबंधाचे राहिले नाही; कारण तो आकृतिबंध मला माहीतच नव्हता. म्हणजे अगदी बरोबरीचे नाते. हे नाते माझ्या सामाजिक सुधारणेच्या ध्येयवादाशी मिळतेजुळते असेच निर्माण झाले. जुन्या पद्धतीचे संस्कार व व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली सुधारकी जीवनपद्धती, असा विरोध माझ्या कौटुंबिक जीवनात उत्पन्नच झाला नाही. कारण वडील विधुर होऊन माझ्या विवाहापर्यंत चोवीस वर्षे लोटली होती. मी वडिलांच्या मिळकतीत माझ्या प्रपंचाची मांडणी केलीच नाही. सगळेच मुळापासून नवे कुटुंब उभे राहिले. माझ्या वडील बंधूंचा प्रपंच जुन्या कुटुंबपद्धतीचा होता; परंतु आम्ही दोघांनी प्रथमपासून वेगळेच प्रपंच मांडले, त्यामुळे अंतर्गत विसंगती कशी ती मला माहीतच नाही. माझी पत्नी विश्वविद्यालयीन शिक्षित नसल्यामुळे तिचे व्यक्तिमत्त्व हे माझ्याशी मिळतेजुळते असेच विकसित झाले. तिचा विवाह लहानपणी म्हणजे वयाच्या चौदाव्या वर्षीच झाला; त्यामुळे तिच्या

व्यक्तिमत्त्वाची वाढ माझ्या छायेखालीच झाली. ती जुने सनातनी संस्कार घेऊन माझ्याशी प्रपंच करू लागली हे खरे; परंतु त्या जुन्या संस्कारांच्या बंधनात, म्हणजे व्रतवैकल्ये, सोवळ्या-ओवळ्याचा घोळ यात, ती कधीच सापडली नाही. सर्व जातींचे व सर्व धर्मांचे मित्र, स्त्रीपुरुष आले; तर त्यांना माझ्या घरात धर्मभेद आणि जातिभेद या संस्कारांचा वास यत्किंचितही कधी आला नाही. कारण माझ्या नव्या सुधारकी विचारांचा स्वीकार माझ्या कुटुंबामध्ये विनासायासे होत गेला; म्हणून कुटुंबजीवनामध्ये जुन्या-नव्यांचा वैचारिक संघर्ष म्हणून ज्याला म्हणतात, त्याचा मला कधीच त्रास झाला नाही. जो संघर्ष झाला तो केवळ माझ्याच मनातील जुन्या-नव्यांचा.

**प्रश्न ३ :** वैचारिक लेखन करण्याची प्रेरणा आपणास कशी लाभली ? या संदर्भात कोणकोणते मराठी व इतर परदेशी लेखक आपणास प्रेरक वाटले ?

**उत्तर :** 'निबंधमाला'कार चिपळूणकर, 'गीतारहस्य'कार टिळक, 'सुधारका'चे संपादक आगरकर व इतिहाससंशोधक राजवाडे या मराठी निबंधकारांचे वाचन माझ्या वयाच्या पंधराव्या वर्षापासून केवळ बौद्धिक विकास साधण्याच्या हेतूने मी करू लागलो; म्हणजे त्यांचे विचार समजावून घेण्याच्या दृष्टीने करू लागलो. या वेळी माझे संस्कृतचे अध्ययन बरेच प्रगत झाले होते. न्याय, मीमांसा, वेदान्त, सांख्य, बौद्ध इत्यादी दर्शनांच्या अध्ययनात माझी अनिर्बंध प्रगती होत गेली. ही सर्व शास्त्रे चर्चात्मक शास्त्रे आहेत. म्हणजे त्यांची मांडणी पूर्वोत्तर पक्षपद्धतीची आहे. या पद्धतीमध्ये सिद्धांतपक्षही पूर्वपक्ष बनतो व पूर्वपक्ष कित्येक वेळा सिद्धांतपक्षाचे रूप घेऊन अवतरतो; त्यामुळे प्रत्येक विचार साधकबाधक पद्धतीने तपासला जातो. या माझ्या अध्ययनाला मराठीमध्ये भाषांतरित झालेल्या जॉन स्टुअर्ट मिल, हर्बर्ट स्पेन्सर, सिज्विक इत्यादिकांच्या मौलिक ग्रंथांच्या वाचनाचीही चांगली जोड मिळाली. माझ्या वैचारिक लेखनाची अशी ही पार्श्वभूमी आहे. मी पहिला निबंध 'आनंदमीमांसा' हा लिहिला. या निबंधात सामाजिक जीवन व तत्त्वज्ञान यांचा एकमेकांत गुंतलेला म्हणजे वेदकालीन समाजजीवनाचा ऐतिहासिक संबंध मी दाखविला आहे. म्हणजे माझा पहिलाच निबंध हा माझ्या ऐतिहासिक दृष्टिकोनाचा निदर्शक आहे.

**प्रश्न ४ :** काव्य, कथा, नाटक यांसारख्या ललित साहित्यनिर्मितीकडे कधी आपण आकृष्ट झाला होता काय ? साहित्यसमीक्षेकडे आपण कसे वळला ?

**उत्तर :** ललित साहित्यनिर्मितीकडे मी कधीच आकृष्ट झालो नाही. ललित साहित्यातील एक उत्कृष्ट दालन म्हणजे संस्कृतमधील व्यास, वाल्मीकी, कालिदास, भवभूती इत्यादिकांचे साहित्य होय. ते मी माझ्या पहिल्या उमेदीतच वाचले; पण स्वतःहून संस्कृत कविता करण्याची इच्छा मला केव्हाच झाली नाही. ललित साहित्याची मला नितांत आवड आहे, त्याबद्दल विलक्षण प्रेम आहे; परंतु त्याच्या सर्जनाची प्रवृत्ती माझ्यात नाही. त्याची खूप आवड असल्यामुळे त्याची निवडही मी मोठ्या साक्षेपाने करतो. मोठमोठ्या समीक्षकांची समीक्षणे वाचल्यानंतरही माझा ' पण ', ' परंतु ' कधी संपायचा नाही. लोकप्रियता हा माझा कलेचा निकष असूच शकत नाही; परंतु लोकप्रियतेबद्दल मला अनादरही नाही. मी आवर्जून समीक्षालेखनाकडे कधीच प्रवृत्त झालो नाही; परंतु वेळोवेळी सभासंमेलनामध्ये किंवा आयोजित व्याख्यानमालांमध्ये साहित्यसमीक्षेला किंवा कलासमीक्षेला धरून भाषणे केली आहेत. अशी भाषणे करण्याचे प्रसंगही खूप वेळा आले आहेत. समीक्षेकडे मी केव्हा वळलो, याचे मला नेमके उत्तर देता येणार नाही; परंतु वा. म. जोशी यांची ' रागिणी ' प्रसिद्ध झाली, तिच्यावरील समीक्षा प्रसिद्ध झाल्या, त्यानंतर मी ती वाचली व माझीही विशिष्ट समीक्षा वाचतानाच तयार झाली. कोणतीही साहित्यकृती किंवा कलाकृती ही मी वाचली किंवा पाहिली, तर वाचताना किंवा पाहतानाच माझी समीक्षाही तयार होत असते. अधिक साफसफाई त्यानंतर केली जाते.

**प्रश्न ५ :** आपल्या वैचारिक घडणीत कोणकोणत्या विचारप्रणालींचा व विचारवंतांचा प्रभाव विशेषत्वाने आहे, असे आपणास वाटते ?

**उत्तर :** माझ्या विचारप्रणालीची साधारणपणे आंतरराष्ट्रीय ऐहिक मानवतावाद आणि उदारमतवाद ही दोन सूत्रे मुख्यतः सांगता येतील. परलोकवादी वा वेदान्ती वा धार्मिक दृष्टिकोन माझ्या विचारांची बैठक नव्हे. अमुक एका विचारप्रणालीच्या विद्वानांचा माझ्यावर विशेष प्रभाव पडला, असे म्हणता येत नाही. मानवी ज्ञानाच्या क्षेत्रात आधुनिक युगात अत्यंत महत्त्वाची अशी वैशिष्ट्यपूर्ण विचारसरणी सांगणारे फार मोठमोठे विचारवंत झाले आहेत; त्यांपैकी मी ज्यांचे ज्यांचे चिंतनपूर्वक वाचन केले त्यांची त्यांची विचारसरणी मी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु त्यांच्यापैकी मला जास्त जवळचे कोणते व कोणते नाहीत, हे सांगणे अत्यंत कठीण आहे. निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या

जागतिक कीर्तीच्या विचारवंतांचा माझ्यावर प्रभाव पडला आहे. उदा०, नामनिर्देशच करायचा झाला, तर कार्ल मार्क्स, हर्बर्ट स्पेन्सर, व्हाइटहेड, बर्ट्रांड रसेल, मॅक्स वेबर, मॅरिनोस्की, फ्रॉइड, कासिरर इत्यादी कितीतरी नावे सांगता येतात.

**प्रश्न ६ :** म. गांधी, नेहरू व रॉय या भारतीय विचारवंतांशी आपला संबंध आला. त्यांच्याविषयी आपल्याला काय वाटते ?

**उत्तर :** म. गांधी व मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशी माझा दीर्घ निकटचा संबंध आला. पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्या जवळ मी कधीच गेलो नाही, कारण तशी संधी प्राप्त झाली नाही. या दोन्ही व्यक्तिमत्त्वांच्या गंभीर विशालतेचा वारंवार प्रत्यय मला आलेला आहे. त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचे विलक्षण तेजस्वी पैलू पाहून वारंवार मी विस्मित झालो आहे; परंतु मी माझे वैचारिक स्वातंत्र्य गमावून त्यांच्याशी पूर्ण ऐकमत्य झाले आहे, असे माझ्या अनुभवात कधीही आले नाही. याचे कारण माझे भारतीय तत्त्ववेत्त्यांचे दर्शन हे होय. या तत्त्वदर्शनात गौतम मुनीचे विचार कपिल मुनी खंडित करतो; कपिल मुनीचे विचार द्वैपायन व्यास मुनी खंडित करतो आणि या सर्वांचे विचार बौद्ध तत्त्वज्ञानी नागार्जुन अमान्य करतो; अशी ही उच्च विचारांची मीमांसा माझ्या विचारपद्धतीचा अविभाज्य भाग बनली आहे.

**प्रश्न ७ :** आधुनिक मराठीतील वैचारिक साहित्याबद्दल आपणास काय वाटते ? वैचारिक निबंधाचा आजचा घाट कसा आहे, असावा, असे आपणास वाटते ? त्यात लालित्याला कितपत वाव आहे ?

**उत्तर :** विद्यमान मराठी साहित्यामध्ये वैचारिक साहित्याला फारसे महत्त्वाचे स्थानच राहिलेले नाही. राजनीती, अर्थशास्त्र, सामाजिक संस्था, समाजरचना, धर्म, सामाजिक मानसशास्त्र इत्यादी विषयांच्यावर स्वतंत्र रीतीने सतत लेखन करण्याची प्रथाच मराठीमध्ये राहिली नाही. ललित साहित्य व ललित साहित्याची चर्चा यालाच सध्या प्राधान्य आहे. वैचारिक निबंध हा साहित्यप्रकार मराठीमध्ये अपवादात्मकच दिसतो. दोन-तीन मासिके किंवा नियतकालिके– उदा०, 'नवभारत,' 'समाज प्रबोधन पत्रिका' अशासारखी प्रकाशने – अपवादादाखलच आहेत.

वैचारिक निबंधात लालित्याला वाव आहेच; कारण विचारांचा आविष्कार करण्याची ललित शैली असू शकते. ललित शैली आणि तार्किक संगती ही एक-

रूपाने राहू शकते.

**प्रश्न ८** : मराठी लेखनशैलीच्या बाबतीत आपल्यापुढे काही आदर्श होते काय? कोणते?

**उत्तर** : माझ्यापुढे लेखनशैलीच्या बाबतीत कोणीही मराठी लेखक आदर्श म्हणून माझ्या मनात कधीही नव्हता.

**प्रश्न ९** : धर्मकोश व विश्वकोश हे आपल्या जिव्हाळ्याचे प्रकल्प आहेत. सांस्कृतिक दृष्टीने त्यांचे महत्त्व कोणते?

**उत्तर** : धर्मकोश व विश्वकोश ही माझ्या आयुष्याच्या अखेरच्या चौथ्या भागातील महत्त्वाची कार्ये आहेत. धर्मकोश पूर्ण झाल्यास हिंदुधर्मासंबंधी लहान मोठ्या विषयांवरील प्रश्नांचे तपशीलवार उत्तर संशोधकाला मिळू शकेल. प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभ्यासाचे ते एक महत्त्वाचे साधन आहे. विश्वकोशाच्या योगाने मराठी भाषेला आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या आविष्काराचे महत्त्वाचे साधन उपलब्ध होणार आहे. या मोठ्या प्रकल्पाची पूर्णता झाल्यावर सामाजिक व भौतिक विज्ञानवेत्ते व तंत्रज्ञ यांना मराठीमध्ये आपले लेखन करण्यास आवश्यक अशी भाषेची अनुकूलता लाभणार आहे.

**प्रश्न १०** : एक आदर्श विचारवंत म्हणून आपणाकडे पाहिले जाते. आदर्श विचारवंत कसा असतो, याबद्दल आपली कल्पना सांगाल काय?

**उत्तर** : आदर्श विचारवंत म्हणजे जो विचारांची उपासना पूर्ण झाली असे मानत नाही आणि विचारांच्या नव्या कक्षांकडे सतत ओढला जातो, तो होय.

# २

# आचार्यदर्शन

कृष्णा पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. वाई हा गाव उगमापासून पंधरा मैलांचे अंतरावर कृष्णेच्या काठी पश्चिमेकडून पूर्वेकडे असा लांबट, मुख्यतः उत्तर तीरावर वसला आहे. दक्षिण तीरावरील बरीचशी वस्ती नवी आहे; वाड्या मात्र जुन्या आहेत. कृष्णा नदी वाईमधून सरळ रेषेत पश्चिमेकडून पूर्वेस वाहत आहे. येथे कृष्णेच्या उत्तर तीरावर सात आळींचे मजबूत बांधलेले चिरेबंदी घाट एका ओळीत लागले आहेत. गुरुवर्यांचे वसतिस्थान गंगापुरीच्या घाटावर आहे. ते येथे गेली पन्नास वर्षे निरंतर वास करीत आहेत. हा घाट रुंद व कातीव दगडांचा बांधला आहे. याला चौदा पायऱ्यांची सुगम, सुरेख व सम उतरंड आहे. या सरळ, मजबूत व विस्तृत घाटावरून पावसाळ्यातील प्रवाह तुफानी वेगाने वाहत असतो. या घाटाच्या दोन्ही टोकांना पिंपळ व वड यांचे मोठे वृक्ष चिरेबंदी पाराच्या पक्क्या अधिष्ठानावर उभे आहेत. वाईच्या भोवताली सर्व बाजूंनी वेढणारे लांब-लचक पसरलेले सह्याद्रीचे फाटे नभोमंडळाला भिडलेले दिसतात. उत्तर व दक्षिण बाजूचे पर्वत दीडदोन मैलांच्या अंतरावर आहेत. पूर्व व पश्चिम बाजूच्या पर्वतांचे अंतर यापेक्षा पुष्कळ आहे. पूर्वेस चंदन व वंदन किल्ल्यांचे दुरून दर्शन घडते. या किल्ल्यांच्या पाठीमागूनच उषा मंगलरूप धारण करून प्रकट होत असते. उंच पर्वतांच्या परिसरातच उषा, संध्या, मध्यान्ह इत्यादी दिवसरात्रीचे विभाग छाया-प्रकाशांची वैचित्र्यपूर्ण वैभवे अधिक चांगल्या रीतीने प्रकट करतात; एकाच वेळी देखील भिन्न स्थलांवरून भोवताली पसरलेले एकाच प्रकारचे विश्व भिन्न प्रकारचे

दिसते. सपाट प्रदेशात स्थलकालांचे हे मायामय विविध स्वरूप अनुभवास येत नाही. वाईच्या परिसरातील निसर्गदेवता वैदिक मंत्रांच्या प्रतिभेने उत्तेजित झाल्यासारख्या दिसतात. शाश्वत वेदमंत्रांनी हा भाग भारून टाकला आहे; असा पुष्कळ वेळा भास होतो. आकाश, प्रकाश, वायू, जल व पृथ्वी या देवता आपल्या अनंत शक्तींना दृष्टीच्या व प्रत्यक्ष अनुभवाच्या मर्यादेत येथे आविष्कृत करतात. येथे समुद्र नसला, तरी पर्वतांच्या रांगा उल्लंघून येणारे प्रचंड मेघ अनंत जलदेवतेचे वैभव दाखविल्याशिवाय राहात नाहीत. पूर्वेच्या व पश्चिमेच्या पर्वतांचे उंच माथे तर सूर्यकिरणांच्या सप्तरंगी क्रीडेचे रंगमहालच बनतात; पूर्वेस व पश्चिमेस सकाळी व संध्याकाळी मेघ व किरण संगत होऊन गंधर्वनगरे येथेच घडविनात; सूर्य पूर्ण उगवला किंवा पूर्ण अस्ताला गेला म्हणजे ही गंधर्वनगरे गडप होतात; हे सर्व निसर्गदर्शन वाईच्या घाटावरून नित्य होत असते. येथील हवापाणी जोमदार; येथील माणूस कणखर पण रुक्ष स्वभावाचा आहे. निसर्गलक्ष्मी माणसाला केवळ दर्शन देते; अर्थसंपादनाकरिता येथून पाय काढावा लागतो. येथेच राहिलेली माणसे तुसडी, मत्सरी व भांडखोर बनण्याचा संभव असतो. सुसंस्कृतपणामुळेच प्रत्यक्ष मारामारी क्वचित होते.

संस्कृत विद्येचे शिक्षणकेंद्र म्हणून वाई कित्येक शतके प्रसिद्ध आहे. विद्यावंतांची घरे याच येथील मुख्यतः पाठशाळा होत. स्वतंत्र पाठशाळा म्हणून थोड्याच. गुरुकुल पद्धतीचे शिक्षण घ्यावे अशी माझी बालपणी मनीषा होती. हरिद्वार येथील कांगडीच्या गुरुकुलाचा मार्ग धरण्याचे प्रथम मनात होते. परंतु योगायोगाने वाईस आलो. पूर्वाश्रमी, श्री. नारायणशास्त्री मराठे म्हणून, स्वामीजी ओळखले जात होते. प्राचीन ब्रह्मचर्यसंपन्न ऋषींचा वर्तमानकाळातील अवतार म्हणून त्यांची कीर्ती त्यांच्या मित्राने गाइलेली मी ऐकली होती. माझ्या मनावर धार्मिक ग्रंथांचा खोल संस्कार असल्यामुळे या कीर्तीच्या श्रवणाने प्रथम त्यांच्याच चरणांपाशी विद्याग्रहण करावे, अशी उत्कट इच्छा उत्पन्न झाली. सन १९१८ साली २ फेब्रुवारीस मी वाईस आलो. सकाळी अकरा वाजता वाठार मार्गे बैलगाडीतून वाईस येऊन पोचलो. माझ्या वडिलांच्या मित्राकडे गंगापुरीत उतरलो. कृष्णेवर स्नानाकरिता आलो. दिवसा बारा वाजण्याची वेळ होती. थंडीचे दिवस, त्यामुळे वातावरण शांत व स्वच्छ होते. आकाश निळेनिळे दिसत होते. मध्यान्हीचा सूर्य तळपत होता. सूर्याची दीप्ती चित्तास उत्तेजित करीत होती

कृष्णेच्या प्रवाहात तीनदा बुडी देऊन आदित्याकडे पाहिले. याज्ञवल्क्यास आदित्याकडून दिवसा बारा वाजता वेद प्राप्त झाले, याची आठवण झाली. तप, तेज व त्याग यांचे विश्वातील प्रतीक म्हणजे आदित्य होय; आदित्यासारखा आचार्य; अशा आचार्यांची परंपरा अस्ताला जाऊन युगे लोटली आहेत; असा एखादा अजून असेल काय, अशी कल्पना मनाला उत्सुक व साशंक करीत होती. घाटावर स्नान करणाऱ्या दुसऱ्या एका गृहस्थांनी त्याच वेळी चौकशी केली आणि म्हटले की, ज्या गुरुजींच्यापाशी तू शिकण्याकरता आला आहेस, ते येथेच जवळ राहतात. मी माझ्या वडिलांना सांगितले की, आताच संध्या व अग्निकार्य झाल्याबरोबर गुरूंचे प्रथम दर्शन घ्यावे. ते म्हणाले, उद्या प्रातःकाळी दर्शनास नेईन.

गंगापुरीच्या घाटावर उंच अश्वत्थ वृक्षाच्या छायेत लहानसे टुमदार दुमजली घर आहे. त्याच्या तळमजल्यात मारुतीची मूर्ती आहे. त्या घरकुलाला बाहेरून वरच्या मजल्यावर नेणारा बारीकसा जिना आहे. हा मजला म्हणजे लहानसे दालन. या लहानशा दालनातच गेली पन्नास वर्षे स्वामीजींनी काढली आहेत. हीच त्यांची तपोभूमी. येथेच त्यांचे सद्‌गुरू ब्रह्मीभूत स्वामी प्रज्ञानंद सरस्वती हे अखेरीस मुनिवृत्तीने तप आचरीत होते. या वरच्या दालनात सूर्यप्रकाश किंवा त्याची प्रभा दिवसभर असते. सर्व बाजूंनी खिडक्या आहेत. घाटावर डोकावणाऱ्या खिडक्या काचेच्या तावदानाच्या असून त्या कायम बंद असतात. फक्त प्रकाश यावा, परंतु आवाज येऊ नये म्हणून अशी तरतूद केलेली आहे. येथून कृष्णेचे सतत दर्शन होत असते आणि नदीपलीकडचा सोनजाईचा डोंगर दृष्टीस पडतो. प्रातःकाळी प्रथम मी या ठिकाणी आलो. संध्या इ. ब्रह्मकर्म समाप्त करून प्रसन्न व समचित्त झालेले आचार्य आपल्या ऊर्णासनावर सिद्धासन मांडून विराजमान झाले होते. भव्य, गौरकाय, आरोग्याचे निधान असलेली मंगलमूर्ती पाहून आपोआपच दंडवत प्रणाम घडला. त्यांच्यासमोर एक लहानसे फलक होते. त्यावर निवडक पुस्तके व लेखनसाहित्य होते. वेद, षडंगे व षट्‌दर्शने यांचे निवडक ग्रंथ डाव्या उजव्या हातास रचलेले होते. किंचित अंतरावर भिंतींना लागून पुस्तक-संग्रह असलेल्या उघड्या शिड्या होत्या. डाव्या बाजूस किंचित अंतरावर मृगासन मांडलेले होते. संध्यावंदनाची आणि ब्रह्मयज्ञतर्पणाची ती जागा आहे, असे तेथील सामग्रीवरून सहज लक्षात भरले. तांब्याचा स्वच्छ चमकणारा कृष्णेच्या पाण्याने

भरलेला गडवा, संध्येचे ताम्हन, पळीं, पंचपात्री, कुश आणि भस्म ही ती सामग्री. स्वतः आचार्यांकडे पाहिल्याबरोबर आंतरबाह्य शुचित्व दृष्टोत्पत्तीस आले. अंगावर एक शुभ्र व स्वच्छ उत्तरीय आणि अत्यंत शुभ्र व स्वच्छ नेसलेले धोतर, एवढाच कायमचा पोषाख असल्यामुळे ती अपरिग्रहवृत्तीची महत्त्वाची खूण दिसून आली. त्यांनी मला दोनतीन साधे प्रश्न विचारले, आणि जवळच असलेल्या मठात राहण्याची आज्ञा केली. प्रथमदर्शनीच माझे मन प्रसन्न झाले. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मी बरोबर दिली किंवा नाही हे आठवत नाही. परंतु जिना परत उतरत असताना मनाला समाधान वाटत होते. कदाचित प्रश्नांची उत्तरे चुकली असली, तरी त्याची कसलीही ग्लोचक जाणीव क्षमावृत्तीमुळे त्यांनी दिली नसेल. जिना उतरल्याबरोबर अंगणात एक बेलाचे झाड लागते, त्याच्या भोवताली अनेक संन्याशांच्या समाधीचे चबुतरे पसरलेले होते; तेथे जरासा थांबलो. कारण त्याच वेळी आचार्यांच्याकडे अध्ययनार्थ प्रौढ विद्यार्थी आले. उंच बांध्याचे, दृढ-शरीराचे, धूत वस्त्र नेसलेले, उत्तरीय व धोतर एवढेच परिधान केलेले, तेजस्वी आणि आत्मविश्वाससंपन्न असे ते दिसत होते. काखेस एक मोठा जाडा ग्रंथ प्रत्येकाच्या जवळ होता. डोक्यास लांब पण गाठ दिलेली शेंडी, हातात पळीपंच-पात्री, मस्तकास व अंगास त्रिपुंड्र भस्म चर्चिले होते. त्यातील काही हसरे, काही साधे, काही रुक्ष व काही गंभीर दिसत होते. त्यात कोण कोण होते हे आता नक्की आठवत नाही. परंतु श्री. दिनकरशास्त्री कानडे, श्री. महादेवशास्त्री दिवेकर, कै. गंगाधरशास्त्री सोहोनी, श्री. विष्णुशास्त्री परांजपे, श्री. भालचंद्रशास्त्री नेने इत्यादी मंडळी असावीत. बेलाच्या झाडाखाली मुद्दाम काही वेळ कानोसा घेण्याकरिता थांबलो. अध्ययनाच्या प्रारंभी मध्यम स्वरात सर्वांनी म्हटलेला वैदिक शांतिपाठ कानी पडला. त्यातील एका श्लोकात आचार्यपरंपरा सांगितलेली होती. नारायण, ब्रह्मा, वसिष्ठ, शक्ती, पराशर, व्यास, शुक्र, गौडपाद, गोविंदयोगींद्र, श्रीशंकराचार्य आणि त्यांचे चार शिष्य, असा हा आचार्यवंश त्यात वर्णिलेला होता. मी नंतर फार वेळ थांबलो नाही. मनात आले की, आपलाही ह्याच वंशात जन्म होणार आहे.

आचार्य वंश हा पितृ–मातृ वंशापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. पितृ-मातृ-वंशाचे महत्त्वसुद्धा संपादित संस्कृतीची परंपरा राखण्याकरिताच आहे. अनंत नैतिक इच्छाशक्ती माणसात सुप्त आहे. ही अनंत इच्छाशक्ती प्रबुद्ध व प्रदीप्त करणारी परंपरा टिकविणे, हेच संस्कृतीचे मुख्य कार्य आहे. इच्छाशक्तीचा प्रबोध

न झालेली अगणित माणसे जनावरांप्रमाणे ओझी वाहून वाया जात असतात. आचार्यवंश ज्यांना लाभतो; त्यांची माणुसकी प्रकट होते. केवळ शरीर आणि बीज यांचे महत्त्व दर्शित करणे असाच मातृ-पितृवंशाचा अर्थ असेल, तर रानटी माणसेदेखील थोर ठरतील. वंशाचे महत्त्व मानसिक संस्कृतीच्या रक्षणातच आहे. आचार्यवंश हा मानसवंश असतो. संस्कृतीचे दिग्विजय सांगणारे इतिहास सुप्त इच्छाशक्ती प्रदीप्त करणाऱ्या आचार्यांच्या मानसिक वंशप्रसाराचा इतिहास आहे. अतिप्राचीन काळी ब्राह्मण्याच्या दीक्षेने दिग्विजय केले; नंतर बुद्ध भिक्षूंनी केले; तदनंतर ख्रिश्चन धर्मोपदेशकांनी धार्मिक दिग्विजय केले. मानसिक संस्कृतीचा विजय हेच आचार्यवंशाचे कार्य असते.

संदर्भ : "श्री. गु. स्वामी केवलानन्द सरस्वती अभिनंदन ग्रंथ," १९५२ पृष्ठे ५ ते ८.

# ३

# अलौकिक सृष्टी

ज्याचा कार्यकारणभाव व स्वरूप ही यथार्थपणे वस्तुनिष्ठ दृष्टीने, इंद्रियांद्वारा व बुद्धिवादाने नीट कळतात व भाषेने प्रमाणपूर्वक व्यक्त करून समजावून सांगता येतात, ते लौकिक होय. उदा०, बी आणि झाड, विस्तव व जळणारे पदार्थ, वारा व श्वासोच्छ्वास, पाऊस, सूर्य व पिके, नौका व तीमधून तरून जाणे, अन्न व शरीरधारणा, हत्यार व त्याने होणारी कारागिरी, सुपीक जमीन व झाडे इत्यादिकांचे संबंध, हे इंद्रियांनी व बुद्धीने माणसांना निश्चितपणे कळतात. बी, झाड, विस्तव, सूर्य, पाऊस, वारा, नौका इत्यादींची सृष्टी ही लौकिक सृष्टी होय. परंतु ज्यांचे स्वरूप व कार्यकारणभाव इंद्रिय व बुद्धी यांच्या साहाय्याने निश्चित झालेले नसतात व केवळ स्वैर कल्पनांच्या योगानेच ज्यांचे स्वरूप व कार्यकारण-भाव ठरविलेले असतात, अशा सृष्टीस अलौकिक सृष्टी म्हणतात. उदा०, भुते, पिशाच्च; चंद्र, वरुण, झ्यूस, अहुरमज्द ह्या देवदेवता, राक्षस, दैत्य-दानव, अंग्रो मइन्यू, सैतान, गंधर्व, यक्ष, अप्सरा इत्यादी.

शुद्ध व्यावहारिक, ऐहिक व वस्तुनिष्ठ अशा मानवी वर्तनाच्या बाहेरील जादूटोणा, विधिनिषेध, मंत्र-तंत्र, यज्ञ, होमहवन, पूजाप्रकार अशा प्रकारच्या गोष्टींचा संबंध माणसाने स्वैरपणे कल्पिलेल्या, वस्तुनिष्ठ पुरावा नसलेल्या अशा सृष्टीशी जोडलेला असतो. मृतांचे आत्मे अथवा भुते वा पिशाच्चे ह्यांच्याशी मानवाच्या काही आचारसंस्थांचा संबंध असतो. हे आचार अंत्यसंस्कारापासून सुरू होतात. इंद्रियगोचर अशा पदार्थांच्या व वस्तूंच्या ठिकाणी किंवा त्यांच्या

अंतरंगात सचेतवत् अशाही शुभकारक अथवा अशुभकारक शक्ती असतात; त्यांना जड, भौतिक पदार्थाचे नियम लागू नसतात, असेही माणसाने कल्पिले आहे. उदा०, प्रेतांचे आत्मे, भुते, पिशाच्च, अथवा वृक्ष, नदी पर्वत इत्यादिकांमधील देवता किंवा अद्‌भुत सृष्टी यांना अंधार, भिंत इत्यादी कसलेही अडथळे येत नसतात. त्यांना माणसांचे चांगलेवाईट करण्याची शक्ती असते; परंतु माणसांत, प्राण्यांत, वनस्पतींत वा इतर जडपदार्थात चांगले-वाईट करण्याची जी शक्ती असते, त्या शक्तीचे कार्यकारणभाव बुद्धिगम्य असतात; तसे या अद्‌भुत भूत, पिशाच्च, देवता यांच्या शक्तीचे कार्यकारणभाव बुद्धीने निश्चित करता येत नाहीत. मनुष्यांना व प्राण्यांना रोगराई होते, संकटे व दुःखे कोसळतात, त्यांच्या जीवनात हितकारक असेही अनपेक्षित प्रसंग घडून येतात. याच्या पाठीमागे वरील कल्पनाशक्ती किंवा सृष्टी कारणभूत असते, असे माणसे कल्पितात. मानव, प्राणी, वनस्पती किंवा अन्य भौतिक सृष्टी यातील घडामोडींचा संबंध या कल्पित सृष्टीशी मनुष्य जोडतो.

ही कल्पित सृष्टी दोन प्रकारची मानलेली असते. एक प्रकार म्हणजे ह्या सृष्टीतील शक्ती साकार, सावयव, सुरूप, कुरूप किंवा विरूप असतात, अशी मानवाची धारणा असते. दुसरा प्रकार म्हणजे त्यांचा काय आकार आहे वा त्यांचे काय रूप आहे, यासंबंधाने मानवाने काहीच निश्चित कल्पना केलेली नसते. आदिम अवस्थेतील मानवसमाजाच्या जादूटोणा, मंत्र-तंत्र, विधिनिषेध, पूजाप्रकार यांच्यामध्ये हे दोन्हीही प्रकार आढळतात. जादूच्या मंत्रामध्ये किंवा तंत्रामध्ये जी शक्ती कल्पिलेली असते, ती शक्ती मंत्र आणि तंत्र यांच्यापेक्षा निराळी म्हणून कल्पिलेली नसते. ती त्यांच्यातच असते. तिचे हितरूप किंवा अहितरूप कार्य तेवढे तिच्याशी निगडित असते. हेच तिचे रूप होय. विशिष्ट झाड, दगड, व्यक्ती वा प्राणी इत्यादिकांमध्ये अलौकिक शक्ती वसत असते. ही शक्ती शुभकारक व अशुभकारक असते. ही शक्ती अंगी असलेल्या वस्तू वा व्यक्ती ताबू असतात, असे आदिम समाज मानतात. म्हणजे त्यांना स्पर्श करण्यासंबंधी अथवा त्यांच्या संपर्कात येण्यासंबंधी निषेध असतात; तर विशिष्ट प्रसंगी पवित्र असलेल्या ताबूंना स्पर्श करणे व त्यांच्याशी अन्य प्रकारे संसर्ग साधणे याबाबत विधीही असतात.

आदिम स्थितीतील समाजाच्या जादू, मंत्र-तंत्र, विधिनिषेध, पूजा इत्यादी

प्रकारचे कर्मकांड अशा कल्पित, अद्‌भुत म्हणजेच अलौकिक सृष्टीच्या कल्पनेवर आधारलेले असते. ह्या अलौकिक सृष्टीच्या कल्पनांच्या मुळाशी जीवनात व सृष्टीत घडणाऱ्या हितरूप किंवा अहितरूप घटनांचे अज्ञान असते. केवळ अज्ञानामुळे ह्या कल्पना निर्माण होत नाहीत. अरिष्टाचे भय व इष्टाची तीव्र कामना कल्पना-शक्तीला चाळविते, उद्दीपित करते, ज्ञात वास्तव सृष्टीतील पदार्थ व त्यांचा कार्य-कारणभाव फार अल्प प्रमाणात समजलेला असतो.

कशाने काय घडते, याची जिज्ञासा माणसाला जन्मापासूनच असते. ज्ञात असलेल्या गोष्टींमुळे मनुष्यास जेव्हा उलगडा होत नाही, तेव्हा तो स्वैर कल्पनाशक्तीचा आश्रय घेतो. या कल्पनाशक्तीला भयनिवारणाची व कामना-तृप्तीची आत्यंतिक निकड उत्तेजित करते. मनुष्यप्राणी हा स्वप्नशील आहे. मन स्वप्नामध्ये नवीन नवीन घटनांची चित्रे निर्माण करीत असते. ही स्वप्नशीलताही कल्पनाशक्तीला उत्तेजन देते. या स्वप्नशीलतेबरोबरच कल्पनाशक्तीला अनिर्बंध-पणे उत्तेजन देण्याचे कार्य भाषा करते. भाषांच्या साहाय्याने आलेल्या इंद्रियजन्य अनुभवांना व मनाच्या स्मरणशक्तीला जबरदस्त साहाय्य मिळते. वास्तवसृष्टीचे रूप-रस-गंध-स्पर्श, सुख-दुःख, द्वेष, भय इत्यादी विविध रंगांनी भरलेले अनुभव, शब्दांत व वाक्यांत साठवण्याची कला माणसाला प्राप्त झाल्यामुळे, क्षणोक्षणी बदलणाऱ्या, जवळून दूर जाणाऱ्या व दुरून जवळ येणाऱ्या वैचित्र्यपूर्ण, अगणित व अनंत पदार्थांची सामान्य व विशेष रूपे, स्मरणाच्या मानसिक भांडारात दाखल होऊन स्थिरावतात. ही सगळी कल्पनेला आकार देणारी घटकसामग्री होय. तात्पर्य ( १ ) अज्ञान, ( २ ) भयकामनादी भावना, ( ३ ) स्वप्नशीलता, ( ४ ) स्मरणशक्ती आणि, ( ५ ) स्मरणशक्तीस संपुष्ट करणारी भाषा, यांच्या योगाने माणसाने अलौकिक सृष्टी निर्माण केली आहे.

ही कल्पित अलौकिक सृष्टी स्पष्ट स्वरूपात मिथ्यकथेच्या ( मिथ ) किंवा पुराणकथेच्या ( मायथॉलॉजी ) रूपाने प्रगट होते. मेलेल्या बाळंतिणीचे भूत जन्मलेल्या बालकाच्या भोवताली घोटाळत असते; किंवा गणांचा मेलेला अधिपती गणसमाजाच्या स्वास्थ्याला किंवा अस्वास्थ्याला, जयाला किंवा पराजयाला कारण होतो; जंगलात राहणाऱ्या जमातीची नौका नीट न बुडता, इष्ट स्थळी सुखरूपपणे पोचविण्याचे कार्य जंगलाची देवता किंवा नदीदेवता करते, इत्यादी अलौकिक शक्तींच्या साध्या कथा आदिम समाजांमध्ये प्रचलित असतात.

सुसंघटित रीतीने शेतीव्यवसाय करणाऱ्या संस्कृतीच्या म्हणजेच समाजाच्या अवस्थेत पदार्पण केलेल्या व राज्यसंस्था अस्तित्वात असलेल्या समाजांमध्ये, पुराणकथा ह्या विश्वोत्पत्ती कशी झाली व विश्वव्यवस्था कशी चालते, याचे वर्णन करणाऱ्या पुराणकथा म्हणून प्रचलित असतात. ॲसिरिया, बॅबिलोनिया, ईजिप्त, इराण, प्राचीन इस्रायल, स्कँडिनेव्हिया, क्रीट, भारत, ग्रीक, रोम, चीन इत्यादी कृषिप्रधान प्राचीन समाजांच्या पुराणकथा या विश्वोत्पत्तीच्या व विश्वव्यवस्थे-बाबतच्या कथा आहेत. या कथांमध्ये त्या समाजाच्या वन्य किंवा प्राथमिक अवस्थेतील लघुपुराणकथांचाही समावेश गर्भित किंवा स्पष्ट रूपाने झालेला असतो विश्वोत्पत्तीच्या व विश्वव्यवस्थेच्या पुराणकथांत माणूस प्रथम कसा निर्माण झाला ह्याचीही कथा प्रामुख्याने अंतर्भूत होत असते. ग्रह, नक्षत्रे किंवा तारे, आकाश, पृथ्वी, समुद्र, वायू इत्यादिकांच्या ठिकाणी विशिष्ट अलौकिक देवता असतात, अशा प्रकारच्याही कल्पना या पुराणकथांमध्ये समाविष्ट केलेल्या असतात.

हितकारक असणाऱ्या लहानथोर देवता व केवळ अहितकारक असे दुष्ट दैत्य-राक्षसादी गण, असे दोन मुख्य वर्ग या अलौकिक शक्तीचे पडतात. त्यांबरोबरच यक्ष, गंधर्व, अप्सरा, किन्नर अशांसारख्या देवशक्ती व दैत्यशक्ती या दोन प्रकारांमध्ये कोठेच समाविष्ट न होणाऱ्या शक्तीही अलौकिक सृष्टीत अंतर्भूत होतात. सत्‌शक्ती व असत्‌शक्ती यांचा विरोध वा संग्राम पुराणकथां-मध्ये सांगितलेला असतो. दैवतशक्तींमध्ये कोणती तरी एक देवता प्रधान असते. तसेच हीच गोष्ट दुष्ट दैत्यशक्तींनाही लागू आहे. देवगण व दैत्यगण असा विभाग सर्वच पुराणकथांत दिसतो. हिंदू व इराणी ( पर्शियन ) लोकांच्या पुराण-कथांमध्ये दोन विरुद्ध शक्तींचा विभाग स्पष्ट दिसतो. कालांतराने जागतिक महत्त्वाच्या पुराणकथांनी कल्याणकारी देवशक्ती ही हिंसक, अकल्याणकारी, दैत्यशक्तीपेक्षाही अधिक सामर्थ्यशाली व अखेरीस दैत्यशक्तीचा वा शक्तींचा पराभव करणारी मानलेली आहे. हिंदुधर्मातील विष्णूचे अवतार दैत्यांचा किंवा असुरांचा पराभव करतात. इराण्यांचा अहुरमज्द हा विध्वंसक व अंधकारक अशा अंग्रोमइन्यूवर विजय मिळवितो. ‘बायबल’मधील अथवा ‘कुराणा’तील परमेश्वर सैतानावर किंवा त्यांच्या परिवारावर आपली अधिसत्ता गाजवितो.

संदर्भ : मराठी विश्वकोशासाठी लिहिलेला हा लेख.

# ४

# संस्कृतीच्या दोन व्याख्या

मानवजातिशास्त्रज्ञांत मानवसमाजांच्या सर्व अंगांचा अभ्यास करण्याची पद्धती पडली आहे; त्यांच्या दृष्टीने संस्कृतीची व्याख्या प्रथम सांगतो. संस्कृतीच्या दोन व्याख्या येथे सांगावयाच्या आहेत; एक विस्तृत अर्थाची व दुसरी अधिक मर्यादित अर्थाची. कारण संस्कृती हा शब्द दोन अर्थांनी भिन्न प्रसंगी वापरलेला असतो. मनुष्याने निर्मिलेले आध्यात्मिक व आधिभौतिक विश्व एका अर्थात समाविष्ट होते; दुसऱ्या अर्थात माणसाच्या मानसिक उन्नतीचाच समावेश होतो.

विस्तृत अर्थाने संस्कृतीची व्याख्या अशी आहे : मनुष्य व्यक्तिशः व समुदायशः जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवनसाफल्यार्थ स्वतःवर व बाह्यविश्वावर संस्कार करून जे आविष्कार करतो, ती पद्धती वा तो आविष्कार संस्कृती होय. मनुष्य व भोवतालचे विश्व मिळून निसर्ग होय. या निसर्गामध्ये बदल करून किंवा संस्कार करून मनुष्याची जीवितयात्रा चालत असते. निसर्गावर विजय मिळविण्याचा क्रम म्हणजेच संस्कृती होय. मनुष्य आत्म्यावर व बाह्य विश्वावर विजय मिळवूनच जीवन सफल करू शकतो. त्याला जीवन यशस्वी करण्याकरिता आत्म्यातील सामर्थ्याचा विकास व विश्वातील शक्तीवरील स्वामित्वाची प्राप्ती करून घ्यावी लागते. मनुष्य व त्याच्या भोवतालचे विश्व असे दोन विभाग विचाराच्या सोयीकरिता कल्पिले आहेत; वस्तुतः मनुष्य स्वतः विश्वापासून अलग नाही. आत्मा म्हणजे मनुष्य होय. वैदिक रूढीप्रमाणे आत्म शब्दाने स्थूल शरीर, इंद्रिये, मन व ज्ञानशक्ती यांचा बोध होतो. आत्म्याच्या भोवतालचे विश्व हे बाह्य

विश्व होय. बाह्य म्हणजे इंद्रियविषय.

मनुष्यजीवनार्थ बाह्य विश्वावर संस्कार करून त्यात बदल घडवून आणतो. या दोन्ही क्रिया एकसमयावच्छेदेकरून सुरू असतात. संगमरवरी दगड फोडून तोडून आणि त्याला आकार देऊन मनुष्य त्याची मूर्ती घडवितो. दगडाची मूर्ती बनविणे म्हणजे बाह्य जगावर संस्कार करणे होय; संस्कृतीचा हा भौतिक भाग होय. या संस्कृतीच्या अनुषंगाने मनुष्यावरही म्हणजे त्याच्या मनावर संस्कार घडत असतो. हा संस्कार म्हणजे प्रस्तुत उदाहरणात मूर्तिकलेतील प्रावीण्य होय. हा संस्कृतीचा आध्यात्मिक भाग होय. आधिभौतिक व आध्यात्मिक ह्या संस्कृतीच्या दोन बाजू आहेत, त्यांच्यात पूर्ण पृथक्त्व नाही. परंतु ज्या मानवी क्रियेने बाह्य विश्वात बदल करण्यास प्राधान्य असते, तिला भौतिक संस्कृती म्हणण्याची प्रथा पडली आहे; आणि ज्या मानवी क्रियेत मानवी निसर्गावर म्हणजे आत्म्यावर संस्कार करून बदल करण्यास प्राधान्य येते, त्यास आध्यात्मिक संस्कृती म्हणण्याची प्रथा पडली आहे. या प्रथेप्रमाणे शेती, पशुपालन, स्थापत्य, धातुकाम, यंत्रनिर्मिती किंवा अर्थोत्पादन यांस भौतिक संस्कृती म्हणतात. बाह्य विश्वाचा उपभोग घेणे किंवा भौतिक प्रगतीस प्राधान्य देणे यास भौतिक संस्कृती म्हणतात. याच अर्थाने आधुनिक पाश्चात्त्य संस्कृती भौतिक आहे, असे म्हणतात. तिच्यात बाह्य विश्वावर विजय मिळविण्याच्या प्रवृत्तीला महत्त्व असते. परंतु वर सांगितलेल्या संस्कृतीच्या पृथक्करणास अनुसरून आधुनिक पाश्चात्त्य संस्कृतीतसुद्धा आध्यात्मिक व आधिभौतिक असे दोन्ही भाग आहेत.

संस्कृतीच्या आध्यात्मिक भागात धर्म, नीती, कायदा, विद्या, कलाप्रावीण्य, वाङ्मय, सर्व प्रकारचे मानवी सद्‌गुण आणि शिष्टाचार यांचा अंतर्भाव होतो. निसर्गावर विजय मिळविण्याची क्रिया यातही असते. उदाहरणार्थ, मनुष्यास युवतीचा व धनाचा अभिलाष उत्पन्न होणे, ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. मनुष्याने अनेक पिढ्यांच्या अनुभवाने विवाहसंस्था आणि आर्थिक जीवनाचे नियम निर्माण केले. त्याकरिता मनुष्याला आपल्या नैसर्गिक स्वभावावर विजय मिळविण्याचे मूल्य स्थापन करावे लागले. स्वश्रमार्जित धनावर स्वत्वाची कल्पना आणि पतिपत्नीच्या मधली दृढ प्रीतीची प्रशंसनीयता ही मूल्ये मनुष्याने निर्मिली. अशाच प्रकारची सर्व आध्यात्मिक मूल्ये माणसाने शोधून काढली किंवा निर्मिली. मनुष्याच्या स्वभावात निसर्गतःच अधोगतीला व प्रगतीला नेणाऱ्या प्रवृत्ती भरलेल्या

आहेत. श्रद्धा, सत्यनिष्ठा, मैत्री, सहानुभूती, परिश्रमाची आवड, दया, औदार्य, ज्ञानलालसा, तार्किक चिकित्सा, न्यायबुद्धी इत्यादी सद्गुण आणि अश्रद्धा, मिथ्यावाद, मत्सर, द्वेष, आलस्य, क्रौर्य, ढोपाळूपणा, विद्याविमुखता इत्यादी दुर्गुण मनुष्याच्या स्वभावात बीजरूपाने राहतात. मनुष्याला अनुभवाने, विचाराने आणि रूढीच्या साहाय्याने सत्प्रवृत्तीची निवड करून वाढ करावी लागते. म्हणून उच्च व आध्यात्मिक मूल्ये एका अर्थाने चिरंतन आहेत व दुसऱ्या अर्थाने मानवनिर्मित आहेत. निष्ठायुक्त स्त्रीपुरुषांची जोडपी जीवनसंग्रामात यशस्वी झालेली पाहिल्यावर माणसास विवाहसंस्थेचा शोध लागला; ती त्याने संघटित केली. धर्म, नीती व कला यांतील उच्चतम मूल्ये शाश्वत असूनही माणसास शोध करून निर्माण करावी लागली आहेत. या शोधात त्याला यश व अपयश ही दोन्ही प्राप्त झाली आहेत. वारंवार बदल करावा लागला आहे. हा मूल्यस्थापनाचा इतिहास म्हणजे मानवजातीचा इतिहास होय. कामक्रोधादी विकारांचा संयम करून चित्ताची समता साध्य करणे, हा उच्चतम सद्गुण शोधण्यासही माणसास युगे घालवावी लागली. तात्पर्य, आध्यात्मिक संस्कृतीलासुद्धा इतिहास आहे. आध्यात्मिक संस्कृतीचे आविष्करण मुख्यतः आत्मकेंद्रित असते. या दृष्टीने गणित व भौतिक विज्ञानेसुद्धा आध्यात्मिक संस्कृतीचे भाग होत. बुद्धीवर संस्कार केल्याशिवाय भौतिक विज्ञान प्राप्त होत नाही. संख्या आणि परिमाण यांच्या-संबंधी मूलभूत शुद्ध कल्पना बुद्धीने घडविलेल्या असतात आणि त्यांचीच वाढ व विवरण म्हणजे गणितविज्ञान होय. गणित आत्मशक्तीचे अत्यंत विशुद्ध आविष्करण होय. ललित कलासुद्धा प्राधान्याने आत्मनिष्ठ असतात. त्यांचे माध्यम तेवढे भौतिक अथवा बाह्य असते. शब्द, ध्वनी, रंग, मृत्तिका इत्यादी ललित कलेची माध्यमे होत. माध्यम म्हणजे कलेचे संकेतन धारण करणारे साधन होय. शब्द, ध्वनी, रंग, मृत्तिका इत्यादी माध्यमांच्या द्वारे मानवी मनातील संचित अनुभव कलाकारात जागृत होतात. कलेच्या अनुभूतीची मुख्य सामग्री रसिकाच्या हृदयात असते, माध्यम हे विजेच्या बटनासारखे असते. ते हृदयाच्या महालात चैतन्याच्या प्रकाशाचा झोत मोकळा करण्यास उपयोगी पडते. स्थूल पाषाणावर मूर्तिकार अंतःकरणाचे सूक्ष्म भाव व्यक्त करतो; लहानशा टीचभर कागदावर चित्रकार महान सागराचे व विशाल आकाशाचे दर्शन घडवितो. पाषाण, कागद व रंग ही माध्यमे होत; ती माध्यमे मनुष्याच्या चित्तातील संस्काररूपाने सुप्त

असलेल्या अनुभवांना चेतित करून विशिष्ट पद्धतीने त्यांची संघटना करतात. ललितकला आध्यात्मिक संस्कृतीचे एक उच्च स्वरूप आहे.

वर सांगितलेली संस्कृतीची व्याख्या मानवजातिशास्त्रज्ञांच्या संस्कृतिविषयक विवरणावरून आम्ही तयार केली आहे. अमेरिकन मानवजातिशास्त्रज्ञ फ्रांझ बोस याने संस्कृतीचे विवरण पुढीलप्रमाणे केले आहे. त्यात त्याने संस्कृतीच्या तीन बाजू ( आस्पेक्टस ) सांगितल्या आहेत : " संस्कृतीला पुष्कळ बाजू आहेत. ( १ ) माणूस आणि निसर्ग यांच्यातील विविध संबंध. अन्नाचे अर्जन आणि रक्षण, आसरा तयार करणे, हत्यारे आणि भांडीकुंडी या स्वरूपात निसर्गातील वस्तू परिवर्तित करून वापरणे; पशू, वनस्पती, निरिंद्रिय व सेंद्रिय पदार्थ, ऋतुचक्र, वातावरण इत्यादी प्रकारच्या परिस्थितीचा उपयोग व नियंत्रण करणे किंवा त्यांच्या योगाने नियंत्रित होण्याचे विविध मार्ग काढणे. ( २ ) माणसामाणसांमधले संबंध, एकाच समाजातील व्यक्तीचे आपसातील संबंध आणि भिन्न समाजातील व्यक्तींचे एकमेकांशी होणारे संबंध यांचा सांस्कृतिक आविष्कार महत्त्वाचा असतो. कुटुंब, गण, जाती आणि अनेक सामाजिक गट यांची बंधने यात समाविष्ट होतात. दर्जा आणि वजन यांच्यामुळे उत्पन्न होणारी उच्चनीचतेची परंपरा यात येते. लैंगिक व वयोजन्य संबंध यात येतात. राजकीय व धार्मिक संघटना, युद्धकाळ व शांतिकाल यातील सामाजिक गटांचे संबंधही यात येतात. ( ३ ) माणूस व निसर्ग यांचे संबंध आणि माणसामाणसांतील संबंध यांच्या योगाने मनुष्याच्या मनात विशिष्ट प्रकारच्या प्रतिक्रिया उत्पन्न होतात. यांचे स्वरूप बौद्धिक व भावनाप्रधान असते. विचार, भावना व क्रिया या रूपांनी ही प्रतिक्रिया प्रकट होते. नैतिक, सौंदर्यविषयक आणि धार्मिक मूल्ये यात येतात. या सगळ्यांचा समुच्चितपणे विचार केला, तर संस्कृती व जीवन यांचा संबंध कळून येतो. "

कोणी संस्कृतीची यापेक्षा मर्यादित व्याख्या करतात. ' सुसंस्कृत मनुष्य ' या शब्दप्रयोगात ही मर्यादित व्याख्या गृहीत धरलेली असते. मानसिक उन्नतीचा दर्शक जीवनक्रम किंवा वर्तनपद्धती अशी संस्कृतीची ही दुसरी व्याख्या आहे. ज्याची सदसद्विवेकबुद्धी वाढली आहे, नागरिक या नात्याने प्राप्त होणारी कर्तव्ये जो जाणतो व पाळतो, अशा माणसास या व्याख्येच्या अनुसारे ' सुसंस्कृत ' म्हणतात. विद्या व सद्गुण असलेल्या मनुष्यास याच व्याख्येच्या आधाराने सुसंस्कृत समजतात. उच्च ध्येयवाद व तदनुसाराने आवश्यक असलेली

जीवनपद्धती असे वरील व्याख्येचे सार सांगता येईल. परंतु इतिहास व समाजशास्त्र यांच्यातील तात्त्विक विवेचनात संस्कृती शब्द प्रथम सांगितलेल्या व्याख्येच्या अनुरोधाने वापरलेला असतो. सर्वसाधारण व्यवहारात मात्र दुसरीच व्याख्या गृहीत धरलेली असते.

## संस्कृतीच्या रचनेची व विकासाची मीमांसा -

इतिहासशास्त्राप्रमाणे संस्कृतीच्या दोन अवस्था मुख्यतः सांगितलेल्या असतात. एक प्राथमिक व दुसरी सुधारलेली. प्राथमिक अवस्थेस कित्येकदा 'रानटी' हे विशेषण सल अर्थाने लावलेले असते. प्राथमिक अवस्थेतील संस्कृतीमध्येसुद्धा तरतमभावाने अनेक श्रेणी समाविष्ट होतात. सुधारलेल्या संस्कृतीची सामान्य लक्षणे ज्या संस्कृतीत प्रकट झालेली नसतात, तिला प्राथमिक अवस्था असे म्हणतात. या प्राथमिक अवस्थेत शिकार, पशुपालन, कृषी, पुरोहितवर्ग, नौकानयन इत्यादी संस्था उत्पन्न झालेल्या असतात. परंतु त्यात राज्यव्यवस्था, पुस्तकनिविष्ट भाषा, गणितादी शास्त्रांचे अव्यक्त कल्पनांचे संकेत व त्यांवर आधारलेले विज्ञान, चलनावर आधारलेला व्यापार इत्यादी संस्था उत्पन्न झालेल्या नसतात. सर्व मनुष्यजातीला समानतेने लागू केलेली नीतितत्त्वे मानणे, हेसुद्धा सुधारलेल्या संस्कृतीचे महत्त्वाचे लक्षण आहे. काम करण्याची हत्यारे कोणत्या प्रकारची आहेत, यावरूनही संस्कृतीचे सुधारलेले किंवा प्राथमिक स्वरूप कोणते हे ठरवितात. उदाहरणार्थ; लोखंडाचा शोध होण्याच्या पूर्वी किंवा धातूंचा मोठ्या प्रमाणात आर्थिक उत्पादनात उपयोग करण्याच्या पूर्वी झालेल्या संस्कृतीस प्राथमिक हे विशेषण इतिहासज्ञ लावतात. वस्तुतः संस्कृतीची सुधारलेली अवस्था ही तिच्यात अंतर्भूत होणाऱ्या मानसिक, भौतिक व सामाजिक उन्नतीच्या दर्शक अशा अनेक प्रकारच्या संस्था यांच्या समुच्चित रूपावरून ठरविली पाहिजे.

प्रत्येक संस्कृतीची विशिष्ट रचना असते. त्या विशिष्ट रचनेत सर्व सामाजिक संस्था अंगप्रत्यंगाप्रमाणे एकमेकांत ओवलेल्या असतात. धर्म, नीती, शिष्टाचार, कर्मकांड, कायदा, विवाहसंस्था, आर्थिक उत्पादनपद्धती इत्यादी सामाजिक संस्था व सामाजिक प्रवृत्ती एकमेकांत गुंतलेल्या असतात. त्या एकमेकांवर अवलंबून असतात. त्यांच्यात सहकार्य व विरोध सुरू असतो. त्यांच्यापैकी एकात बदल झाला, की त्याचा परिणाम इतरांवर होतो. संस्कृती ही अंगप्रत्यंगांनी युक्त अशी

रचना किंवा आकार आहे. प्राथमिक स्थितीतल्या किंवा समान अवस्थेमध्ये असलेल्या भिन्न संस्कृतींमध्ये देवाणघेवाण, झगडा व संगम–प्रवृत्ती असू शकते. भिन्न संस्कृती परस्परांच्या सान्निध्यात आल्यावर झगडतात, देवघेव करतात आणि एकमेकांत मीलनही पावतात; असा इतिहासाचा निष्कर्ष आहे. प्राचीनकालीन ग्रीक लोकांचा भारतीयांशी संबंध आल्यावर भारतीयांनी ज्योतिष व मूर्तिकला ग्रीकांकडून घेतली. अरबांनी हिंदुस्थानापासून मध्ययुगात बीजगणित व वैद्यक घेतले. मध्ययुगीन युरोपने रोमन लोकांची कायदेसंस्था स्वीकारली. एका संस्कृतीतील माणसे दुसऱ्या संस्कृतीच्या समाजात गेल्यास त्या संस्कृतीशी तद्रूप होतात, मग ती माणसे कोणत्याही वंशाची असोत. उदाहरणार्थ, भारतीय मुसलमान.

प्रत्येक संस्कृतीची विशिष्ट भौगोलिक व वांशिक वातावरणात वाढ होत असल्यामुळे त्यांची स्वरूपे भिन्न प्रकारची होतात; संस्कृतीची भिन्न स्वरूपे घडण्यास संस्कृती धारण करणाऱ्या त्या त्या मानववंशाची विशिष्ट बीजशक्ती कारण असते; म्हणून एका संस्कृतीचे रहस्य किंवा सार दुसऱ्या संस्कृतीच्या मानवगटात आत्मसात् करता येणे शक्य नाही, असा काही इतिहास-तत्त्ववेत्त्यांचा आग्रह आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, त्या त्या संस्कृतीची जीवनशक्ती म्हणजे तो तो मानववंश होय. अन्य मानववंश आपल्याहून पृथक् असलेल्या वंशाच्या संस्कृतीचे अनुकरण केवळ वरपांगीपणेच करू शकतो. दुसऱ्या संस्कृतीतील ध्येये, भावना, प्रेरणा व संस्था उचलत असता स्वतःच्या बीजस्वभावास अनुरूप परिवर्तन करून तो उचलू शकतो. या वंशवाद्यांचे दुसरे म्हणणे असे की, सर्व मानववंश सारख्याच स्वभावाचे व सामर्थ्याचे नसतात. जन्मतःच त्यांच्या स्वभावांत व सामर्थ्यांत तारतम्य असते. काही दास्याकरिता जन्माला आलेले असतात व काही स्वभावतःच प्रभुत्वशक्तिसंपन्न असतात.

संस्कृतीची ही वंशवादी उपपत्ती निर्दोष नाही. विशेषतः जगातील प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक संस्कृतीचे मोठे मोठे प्रसिद्ध समाज एकमेकांच्या संस्कृतीचे सहज लीलेने आदानप्रदान करीत असताना दिसतात. अरबांनी बगदाद शहरात साम्राज्य स्थापल्यानंतर ग्रीकांची सांस्कृतिक प्रेरणा आत्मसात करून घेऊन त्यात भर घातली. गेल्या अवघ्या दोनशे वर्षांच्या इतिहासात आधुनिक वैज्ञानिक संस्कृतीचा प्रसार सगळ्या जगात झाला. मूलतः ही संस्कृती पाश्चात्त्य आहे. परंतु हिंदी, चिनी व जपानी विद्यापीठांनी पाश्चात्त्यांच्या विद्या व कला तितक्याच

सामर्थ्याने आत्मसात् करून वाढीस लावल्या आहेत. परंतु युरोपियन लोक, चिनी लोक, हिंदी लोक व जपानी लोक यांची वांशिक एकता सिद्ध करण्यास काहीही प्रमाण नाही. यांपैकी प्रत्येकात भिन्न वंशाची मिश्रणे झाली आहेत. दुसरे असे की, विद्यमान रानटी जमाती हिशेबातून सोडल्यास, आजच्या मानव-समाजात असा कोणताही मोठा मानवगट किंवा राष्ट्र सापडत नाही की, ज्याच्यात दुसऱ्या संस्कृतीचे जोमदार अनुकरण करण्याचे सामर्थ्य कमी आहे. आजची पाश्चात्त्य संस्कृतीसुद्धा अनेक सहस्र वर्षांच्या भिन्न मानववंशांनी आधारलेल्या भिन्न संस्कृतीचे परिणत झालेले स्वरूप आहे. यहुदी, ग्रीक व रोमन अशा तीन संस्कृतींचा वारसा या संस्कृतीला प्राप्त झाला आहे. आता ही संस्कृती जगातील सगळ्याच मानवकुलांच्या संस्कृतीतील उपयुक्त अंशांचा संग्रह करू लागली आहे. निग्रो व तांबडे इंडियन ( मूळ अमेरिकन ) यांच्यापासून नृत्यकलेचे अनेक प्रकार पाश्चात्त्यांनी स्वीकारले आहेत. चिनी लोकांच्या मातीच्या भांड्यांनी केलेली सजावट त्यांना आवडू लागली आहे. हिंदुस्थानचा इतिहासदेखील विविध संस्कृतीच्या संग्रहाचा इतिहास आहे, असे निश्चित सांगता येते.

संस्कृतीमध्ये परिवर्तन दोन पद्धतींनी होत असते. पहिली पद्धती म्हणजे त्या त्या समाजातील अंतःशक्तींचा स्वाभाविकपणे होणारा विकास होय; आणि दुसरी पद्धती म्हणजे एकमेकांवर क्रिया-प्रतिक्रिया घडून होणारा बदल होय. या दोन्ही पद्धतींनी होणाऱ्या विकासाच्या पाठीशी असलेले तत्त्व एकच आहे. मनुष्याचा आणि परिस्थितीचा संघर्ष सतत सुरू असतो. भोवतालच्या परिस्थितीत विशेष बदल न झाल्यास मनुष्य आपली जीवनपद्धती बदलत नाही. परंतु परिस्थितीत महत्त्वाचा बदल झाल्यास त्या बदललेल्या परिस्थितीवर विजय मिळविण्याकरिता मनुष्य प्रयत्न करू लागतो. त्याकरिता आपली जीवनपद्धती टाकतो. नव्या जीवनपद्धतीने प्राप्त परिस्थितीवर विजय मिळविण्यात त्याला यश लाभले, म्हणजे ती नवी पद्धती संस्कृतिविकास या सदरात येते.

संस्कृतीचा विकास म्हणजे तिच्या घटक संस्थांचा, ध्येयांचा व पद्धतींचा विकास होय. संस्कृतीतील प्रत्येक पद्धतीच्या आकारात काहीएक उच्चनीचक्रम असतो किंवा तारतम्य असते. अर्थपद्धतीत विकासाच्या भिन्न भिन्न उच्चनीच पायऱ्या स्पष्ट रीतीने दाखविता येतात. डार्विनने ज्याप्रमाणे जीवनसृष्टीतील उच्चनीचत्वाच्या दर्शक विकासश्रेणी सांगितल्या, त्याप्रमाणे काही अर्थशास्त्रज्ञांनी,

विशेषतः कार्ल मार्क्सने, मानवजातीच्या आर्थिक पद्धतीमध्ये उच्चनीचतेच्या दर्शक विकासश्रेणी सांगितल्या. उत्पादनसाधनांच्या सामर्थ्याची प्रतवारी अर्थशास्त्रज्ञांना भिन्न आर्थिक श्रेणीतील विकासक्रम ठरविण्यास उपयोगी पडली. विविध प्रकारचे उत्पादन करण्याची शक्ती तारतम्य निश्चित करण्यास उपयोगी पडते. उत्पादनसाधनांचे तंत्र बदलले म्हणजे आर्थिक पद्धती बदलते.

साधारणपणे सामान्य स्वरूपात आर्थिक विकासाच्या चार पायऱ्या दाखविता येतात. समाजातील वयात आलेल्या सर्व व्यक्तींच्या श्रमावर उत्पन्न झालेली व जगण्यास जेमतेम पुरणारी अशी समान वाटणीची आर्थिक व्यवस्था, ही प्राथमिक स्थिती होय. यात संचय किंवा शिल्लक फार थोडी असते. दुसरी अवस्था म्हणजे खाजगी मालकी असलेली संपत्ती. ती गुलामांच्या व जनावरांच्या साहाय्याने उत्पन्न होऊन तिची विषम वाटणी समाजात होते. गुलाम आणि स्वतंत्र असे दोन प्रकारचे सामाजिक वर्ग या व्यवस्थेच्या समाजात असतात. ज्या अवस्थेत गुलामगिरीची संस्था नष्ट झालेली असते, ती तिसरी अवस्था. या अवस्थेत जमिनीची मालकी नसलेला श्रमिक वर्ग शेतीच्या धंद्यात सक्तीने काम करीत असतो. या अवस्थेच्या नंतर चौथी अवस्था येते. या अवस्थेत यांत्रिक कारखान्यांतील उत्पादनास प्रामुख्य असते. मनुष्याचा विज्ञानाच्या साहाय्याने निसर्गावर ताबा उत्पन्न होतो. या चौथ्या अवस्थेच्या पुढची उच्चतम आर्थिक व्यवस्था कार्ल मार्क्सने अधिक सांगितली. या अवस्थेत खाजगी संपत्तीवरील मालकीची आर्थिक व्यवस्था लयाला जाते व सर्व उत्पादनसाधने सामाजिक मालकीची होतात. यात सामाजिक समता व सर्वांना उपभोगावयास मिळणारी समृद्धी प्राप्त होते. या पाच अवस्था ठोकळ मानाने विचार करता बरोबर ठरतात. परंतु भूतकाळातील व वर्तमानकाळातील सर्व तऱ्हेच्या आर्थिक व्यवस्थांचा या पाच प्रकारांत योग्य प्रकारे समावेश होईलच असे नाही.

विवाहसंस्था, धर्म, विद्या, कला, राज्य इत्यादिकांतसुद्धा विकासक्रम सूचित करणारा रचनाक्रम सांगता येतो. बहुपत्नीकत्व, एकपत्नीकत्व आणि समान अधिकार असलेल्या पतिपत्नींचा विवाहसंबंध अशा तीन अवस्था गुणांच्या तारतम्याने दिसून येतात. बालविवाहापेक्षा स्वयंवर उच्चतर अवस्था होय, असे एका अर्थी म्हणता येते. धर्मसंस्थेतही हीनोच्च स्वरूपे सूचित करणाऱ्या भिन्न अवस्था सापडतात. ( १ ) जादू, कर्मकांड, मनुष्येतर प्राण्यांची, वनस्पतींची व

जडवस्तूंची पूजा इत्यादींना प्राधान्य ज्या स्थितीत असते, ती हीन स्थितीतली धर्मसंस्था होय. ( २ ) एकेश्वराची तत्त्वचिंतनात्मक भक्तिप्रधान असलेली धर्मसंस्था उच्चतर स्वरूपाची धर्मसंस्था होय. कोणत्याही विशिष्ट धर्मोपदेशकांना, पवित्र ग्रंथांना व धर्मसंस्थापकांनाच नितांत श्रद्धेने प्रमाण मानणे, हे या दुसऱ्या अवस्थेतील धर्मसंस्थेचे महत्त्वाचे अंग असते; यामुळे सर्व मानवजातीबद्दलची बंधुत्वाची कल्पना विस्तार पावण्यास बंधन उत्पन्न होते. ( ३ ) शब्दप्रामाण्याची व परंपरेवरील श्रद्धेची मर्यादा न जुमानणारी मनोभूमिका ज्या धर्माने तयार होते, ज्या धर्माने धर्मसंप्रदायांचा संकुचित भेदभावाचा लय होतो, सर्व मानवजातीबद्दल आत्मीयता निर्माण होते व मर्यादित श्रद्धेपेक्षा व्यापक सत्यशोधनास ज्यात महत्त्व येते, तो धर्म; ही धर्मसंस्थेची तिसरी व उच्चतम अवस्था होय.

विद्या आणि कला यांच्या क्षेत्रातही विकासक्रम निश्चित करता येतो. ज्या सामाजिक स्थितीत ज्ञान व कला केवळ ‘ अनुभवांचा संग्रह ’ येवढ्याच स्वरूपात अस्तित्वात असते, त्यास विद्येची व कलेची प्राथमिक अवस्था म्हणतात. विषयांचा परंपरेने साठवलेला अनुभवसंग्रह जेव्हा सामान्य नियम व विचारसंगती यांच्या स्वरूपात मांडला जातो, तेव्हा त्यास शास्त्र ही पदवी येते. ही विद्येची प्रगतीची दुसरी अवस्था होय. सर्व प्रकारच्या अनुभवांचे क्षेत्र व्यापणाऱ्या शुद्ध व अव्यक्त कल्पना सांगणारे विज्ञान ही विद्येची तिसरी व उच्चतर अवस्था होय. यात गणित, तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान यांचा अंतर्भाव होतो. जेव्हा गणित व तर्कशास्त्र यांच्या साह्याने वस्तुस्थितीचे निरीक्षण व पदार्थांच्या कार्यकारणभावाच्या व घटकांच्या शोधाकरिता प्रयोग करणे, याच्या योगे विद्या किंवा कला अव्याहत विस्तार पावू लागते; तेव्हा ती विकासाच्या चौथ्या उच्चतम अवस्थेत पोचते.

## ऐतिहासिक प्रगतीच्या नियमाची चर्चा

संस्कृतीच्या भिन्न भिन्न अंगांच्यामध्ये विकासक्रमाच्या श्रेणी असतात, हे दिग्दर्शित करण्याकरिता ही उदाहरणे दिली. प्रत्येक संस्कृतीतील सर्व संस्था व प्रवृत्ती विकास पावतातच, असा नियम नाही. प्रगती कुंठित झाल्याचीही उदाहरणे पुष्कळ सापडतात. काही संस्कृती पृथ्वीच्या पाठीवरून नष्ट झाल्या आहेत. सुमेर, ईजिप्त, बाबिलोन, क्रीट, ग्रीक व रोमन या संस्कृती विनाशाला गेल्याची साक्ष इतिहास देतो. हिंदुस्थान, चीन व मध्यपूर्वेतील मुसलमानी राष्ट्रे

यांच्यात आतापर्यंत अनेक शतके प्रगती स्थगित झाली होती. प्राप्त परिस्थितीवर विजय मिळविण्यात अपयश आले, म्हणजे प्रगती स्थगित होते किंवा विनाशही होतो. स्वतःमध्ये आणि परिस्थितीमध्ये बदल करून जी संस्कृती विजय मिळविते तीच विकासक्षम आहे, असे म्हणता येते. या विकासक्रमात परंपरेने प्राप्त झालेल्या सांस्कृतिक मूल्यांचा नाश होतोच, असे नाही. त्या मूल्यांची तपासणी करून टिकाऊ व श्रेयस्कर जे असेल, ते जपून ठेवण्याची देखील वासना माणसात असते. जी मूल्ये शाश्वत असतात व विश्वव्यापी असतात, त्यांच्याच सामर्थ्याने कोणतीही राष्ट्रीय संस्कृती प्रगती करीत असते.

कोणत्याही राष्ट्रीय संस्कृतीचे अधिष्ठान असलेली शक्ती एकच असते. वस्तुतः विश्वसंस्कृती-बीजच राष्ट्रीय संस्कृतीच्या रूपाने प्रकट होत असते. ऋतू बदलला म्हणजे जीवनक्रम बदलतो. उन्हाळ्यात लोकरीचा कपडा नको असतो. थंडीच्या दिवसात छत्री वापरण्याची गरज नसते. उन्हाळ्यात बर्फ व शीत पेये यांचे सेवन मनुष्य करतो. भिन्न प्रकारच्या देशकालातील व परिस्थितीतील माणसांनी त्या स्थितीस अनुसरून जीवनक्रम विशिष्ट प्रकारचा बनविलेला असतो. परंतु या भिन्न स्थितीतील भिन्न जीवनक्रमाला निर्मित करणारी जीवनशक्ती वा प्रेरणा सामान्य अर्थाने एकच असते; तिचे भिन्न पार्श्वभूमीत भिन्न आविष्कार होतात. होमरचे काव्य, एस्किलस्‌ची नाटके, सॉक्रेटिसाचे संवाद, व्हीनस आणि अपोलो यांच्या ग्रीक कलाकारांनी तयार केलेल्या रम्य मूर्ती आणि युक्लिडची भूमिती यांचे जगातील भिन्न युगातील माणसांना महत्त्व वाटते. याचे कारण ग्रीक राष्ट्रीय संस्कृती विश्वसंस्कृतीचाच एक विशिष्ट आविष्कार होय. नलदमयंतीचे अत्यंत प्राचीन आख्यान जगातील वाङ्मयात प्रतिष्ठा पावले आहे. बुद्धचरित्रापुढे आजचा एखादा पाश्चात्त्य शिक्षित श्रद्धेने मान नमवितो. याचे कारण, भारतीय संस्कृती-सुद्धा विश्वसंस्कृतीचेच एक रूप होय. प्रत्येक संस्कृतीत काही लक्षणे व अंगे केवळ संकुचित व सदोष परिस्थितीमुळे निर्माण झालेली असतात. एका विशिष्ट परिस्थितीत काही संस्था व आचार आवश्यक असतात. प्रगतीच्या खालच्या पायरीवर असताना उपयुक्त होणाऱ्या संस्था, भावना व आचारपद्धती कालांतराने बंधनभूत ठरतात व अवनतीला नेणाऱ्या शक्तींची साधने बनतात. याकरिता कोणत्याही संस्कृतीतील शाश्वत उच्चतम मूल्यांचे आविष्कार कोणते, आणि परिस्थितिजन्य संकुचित अंश कोणते, यांचे विवेकबुद्धीने परीक्षण करावे लागते.

कोणत्याही संस्कृतीत प्रगतीच्या कालखंडात जे जे काही असते, ते मर्यादित मूल्यांचेच असते. सर्व मूल्ये युगसापेक्ष असतात. युग बदलले की मूल्ये बदलतात, असा एक सर्वंकष प्रगतिवाद मांडण्यात येतो. या प्रगतिवादाचा मुख्य पुरस्कर्ता कार्ल मार्क्स होय. त्याने प्रगतीचा अर्थमूलक कार्यकारणभाव प्रतिपादिला आहे. कोणत्याही समाजाची उत्पादनपद्धती ज्या प्रमाणात मागासलेली किंवा पुढारलेली असते, त्या प्रमाणात त्या समाजाची ऐतिहासिक प्रगतीची पायरी ठरविता येते. सर्व प्रगतीचा पाया व समाजाचे अधिष्ठान उत्पादनपद्धती होय. उत्पादनपद्धतीने सामाजिक संबंध निर्माण होतात, वर्गभेदाचे विशिष्ट स्वरूप तयार होते. उत्पादन-साधनांच्यावर ज्या वर्गाची मालकी असते, त्याच्या ध्येयवादाची छाप सर्व संस्कृतीवर पडत असते. उत्पादनपद्धती व त्या पद्धतीने निर्माण केलेले सामाजिक संबंध त्या समाजाच्या मानसिक संस्कृतीचा आधार असतो. मानसिक संस्कृतीचा महाल त्या आधारावर प्रकट होतो. तो आधार बदलला म्हणजे त्यावरील महाल बदलतो. तात्पर्य, आर्थिक पद्धती हा संस्कृतीचा प्राण आहे, असे मार्क्सचे म्हणणे आहे. संस्कृतीच्या इतर अंगांची प्रगती आर्थिक प्रगतीचे आनुषंगिक पर्यवसान होय, असे त्याच्या म्हणण्याचे तात्पर्य आहे.

"प्रत्येक आर्थिक युग म्हणजेच सामाजिक युग होय; युगभेद झाला म्हणजे सर्व मूल्ये भिन्न होतात; उच्चतर आर्थिक युगाची मानसिक मूल्येसुद्धा उच्चतर असतात; त्यांचे उच्चत्व युगसापेक्ष असते; चिरंतन मूल्ये नसतात," हा मार्क्स-वादी दृष्टिकोन दिसण्यात फार सुसंबद्ध दिसतो; परंतु इतिहासाची साक्ष आणि तात्त्विक पृथक्करण याचा यास पूर्ण पाठिंबा मिळत नाही. प्राचीन ग्रीक संस्कृतीतील आर्थिक व्यवस्था किंवा उत्पादनपद्धती मध्ययुगीन युरोपच्या व मोगल साम्राज्याच्या उत्पादनपद्धतीपेक्षा मागासलेली होती. परंतु मूर्तिकला, काव्य व तत्त्वज्ञान या क्षेत्रांत मध्ययुगीन युरोप व मोगल साम्राज्य यांच्यापेक्षा प्राचीन ग्रीक समाज अधिक प्रगति-संपन्न होता. हिंदुस्थानातील गुप्तकालीन आर्थिक रचना पूर्वकालापेक्षा पुढारलेली होती; परंतु पूर्वकालीन महाभारत व रामायण यांचे प्रतिभासामर्थ्य गुप्तकाळात आढळत नाही. कायद्याच्या शास्त्रात रोमन लोक प्राचीन हिंदुस्थानापेक्षा प्रगत होते; परंतु प्राचीन हिंदुस्थानाने निर्माण केलेला बौद्धधर्मासारखा धर्म व षड्-दर्शनासारखे तत्त्वज्ञान त्यात निर्माण झाले नाही. आधुनिक मानवसंस्कृती आर्थिक उत्पादनपद्धतीच्या क्षेत्रात अभूतपूर्व उंचीवर गेली आहे; परंतु बौद्धकालीन

हिंदुस्थानच्या माणसांतील नैतिक जबाबदारीची भावना यांच्यात विशेषसे अंतर पडले नाही. म्हणून अर्थमूलक सर्वांगीण प्रगतीची कल्पना तपशीलवार तपासली असता निर्दोष ठरत नाही. संस्कृतीच्या काही अंगांत प्रगती झाली, तरी दुसऱ्या काही अंगात प्रगती होतेच असे नाही. आर्थिक सामर्थ्याचा पुरवठा असल्याशिवाय समाज व संस्कृती यांच्यात स्वास्थ्य राहू शकत नाही, एवढे मात्र सामान्यपणे मान्य केलेच पाहिजे. कौटिल्याने अर्थशास्त्रात म्हटले आहे की, धर्म व काम हे पुरुषार्थ अर्थमूलक आहेत; यात भरपूर तथ्य आहे. त्याचप्रमाणे आर्थिक क्रांतीच्या योगाने सामाजिक क्रांती होते, यातसुद्धा पुष्कळ सत्यांश आहे. एवढेच तपासावे लागते की, क्रांतीच्या योगाने पूर्वार्जित उच्चतम मूल्यांत काही फरक पडला आहे काय? त्याचप्रमाणे काही नवीन उच्चतम मूल्यांचा आविष्कार झाला आहे काय? परंपरेने प्राप्त झालेल्या उच्चतम मूल्यांच्या संरक्षणाने आणि नवीन उच्चतम मूल्यांच्या आविष्कारानेच संस्कृतीची प्रगती होत असते.

## व्यक्ती व संस्कृती

कोणत्याही संस्कृतीच्या स्वरूपाचे प्रत्यंतर त्या संस्कृतीतील व्यक्तींच्या जीवनात मिळत असते. संस्कृती म्हणजे विकसित मानव्य होय. व्यक्तित्व आणि मानव्य या गोष्टी एकच आहेत. सर्व सांस्कृतिक मूल्यांचा अंतिम अर्थ व्यक्तित्वाचा विकास हाच प्रगतीचा मुख्य मानदंड होय. समाजात राहणाऱ्या व्यक्तींना पुरुषार्थ साधण्यात किती स्वातंत्र्य लाभते, यावर समाजाची प्रगती अवलंबून असते. व्यापकता ही विकासाची शक्ती होय. व्यापकतेमुळे मानवी सहकार्य वाढत जाते. सहकार्याशिवाय व्यक्तित्व हे गुणसंपन्न होऊ शकत नाही. मागच्या पिढ्यांच्या सांस्कृतिक वैभवानेच पुढच्या पिढ्या अधिक वैभवसंपन्न होतात. पाणिनीचे व्याकरण व भास्कराचार्यांचे गणित पुढच्या पिढ्यांना शुद्ध भाषा व शुद्ध विचार करण्यास समर्थ करते. समाजातील भूत व वर्तमान कालातील व्यक्तींचे सहकार्य यामुळे व्यक्तीचे व्यक्तित्व वाढीस लागते. श्रमविभाजनाने समाजातील सांपत्तिक उत्पादन विविध प्रकारांनी संपन्न होते. त्यामुळे एकेक व्यक्ती बहुतांच्या श्रमफलाची भागीदार बनते. अनंत व्यक्तींच्या श्रमफलाची एकेक व्यक्ती भागीदार बनते. व्यक्तीस वैभवशाली जीवनपद्धती अर्पण करणे, हेच संस्कृतीचे ध्येय होय. संस्कृती सर्वमानवव्यापक करणे, हे नीतीच्या शाश्वत तत्त्वांचे प्रयोजन होय.

नीतीच्या किंवा नयाच्या क्षेत्रात सर्व मानव समान आहेत. याचे कारण अगाध मानवी सामर्थ्य सहकार्याच्या व सौहार्दाच्या भावनेने प्रेरित झाल्याने माणसाचे जीवित अधिक सफल व श्रेयस्कर बनते. म्हणून संस्कृतीच्या उच्चतम स्वरूपास मानवधर्म अशी संज्ञा आहे.

संदर्भ : “ वैदिक संस्कृतीचा विकास ” १९७२ पृष्ठे २ ते १६.

# ५

# धर्माचे इतिहासातील स्थान

## वेदकालीन धर्मकल्पना

हिंदुस्थानात अतिपुरातन काली असुर राष्ट्रांप्रमाणे एक संस्कृतियुक्त राष्ट्र सिंधुतीरावर वसले होते, असे अलीकडच्या उत्खननांवरून दिसते. परंतु त्यांतील इष्टका लेखांचा अर्थ अजून लागला नाही; म्हणून ऋग्वेदरूपी वाङ्मय हेच प्राचीनतम साधन अजून तरी मानले पाहिजे. ऋग्वेदापासून उपनिषदापर्यंतच्या काळात जी आर्यसंस्कृती नांदली, तिने शाश्वत मूल्यांचे तत्त्वज्ञान निर्माण केले. ईजिप्त व असुर राष्ट्रे यांच्यापेक्षा भिन्न असे हे नितांत महत्त्वाचे वैशिष्ट्य आर्य संस्कृतीचे आहे. तत्त्वज्ञान हे सर्व विद्यांचे सार होय आणि ते मार्गदर्शक म्हणून ज्ञानसाधनेत राहते. अत्यंत मूलभूत आणि वरिष्ठ अशा विचारांचा आणि प्रश्नांचा परामर्श घेणे, हे तत्त्वज्ञानाचे एक मुख्य कार्य असते. वैदिक तत्त्वज्ञानाने असे कार्य निश्चितपणे केले आहे. आजच्या पाश्चात्त्य विद्येच्या परिसीमेला पोचलेल्या शिक्षितासही जे विचार आणि प्रश्न गूढ वाटतात आणि ते सोडविण्यात व त्यांचे मनन करण्यात परमार्थसाधनेचा आनंद होतो, असे विचार आणि प्रश्न वैदिक तत्त्वज्ञानाने उपस्थित केले आहेत. त्यांनी विश्वाचा आणि जीवनाचा तळापासून ठाव घेऊन त्यात जो अर्थ निश्चितपणे पाहिला, तो आज जरी त्यावर अधिक वैचारिक संस्कार केल्याशिवाय ग्राह्य वाटला नाही; तरी त्याची उंची आणि खोली ही मानसिक गांभीर्य निर्माण केल्याशिवाय राहत नाही. ज्ञानाची निष्काम उपासना करण्यात मोक्ष आहे, ज्ञानानंद हाच परमार्थ आहे, तत्त्वचिंतन

हे एक स्वतःसिद्ध मूल्य आहे, या गोष्टींची शिकवण वैदिक तत्त्वज्ञान देते. हे तत्त्व ज्या संस्कृतीला लाभते, ती संस्कृतीच मनुष्याला अमरत्वाचे आश्वासन देऊन ते पूर्ण करू शकते.

वैदिक तत्त्वज्ञानाने त्या काळात यूरोपपासून तो चीनपर्यंत आणि पामीरपासून सिलोनपर्यंत पसरलेल्या धर्मसंस्थेला नष्ट न करता उदात्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. जलचर प्राणी, वृषभ, अश्व, गो, वराह, अर्धपशू, अर्धमनुष्य, आकाशस्थ गोल, भूमी, नदी, पर्वत, वृक्ष, सरोवर इत्यादी मूर्त वस्तूंची आणि प्राण्यांची पूजा करणारे, त्यांचे ठायी देवत्व स्थापून तदर्थ यज्ञ, बलिदान इत्यादी प्रकारची अर्चा करणारे जे संप्रदाय जगात पसरले होते; त्यांना हीन धर्मकल्पनांच्या बंधनांतून मुक्त करणारा विचार वेदांनी प्रथम सांगितला. सर्व चराचर विश्व हे एकच ईश्वराचे स्वरूप आहे, हा संदेश वेदांनी दिला. वृषभपूजक आर्यांना आणि असुरांना सांगितले की, तो वृषभ विश्वरूप विराट स्वरूपाचा आहे. असेच गोपूजक, अश्व-पूजक आणि मनुष्यपूजक ईजिप्तमधील धर्म-संप्रदायासारख्या संप्रदायांना सांगितले. गोपूजकास सांगितले की, ती पूजार्ह गो म्हणजे विश्वात्मक अदिती देवता आहे. ती त्रैलोक्यरूप आहे, सूर्य, समुद्र, नक्षत्रे, पृथ्वी इत्यादी तिच्याच विभूती आहेत. जे मानवमूर्तिधारी ईश्वराचे पूजक संप्रदाय होते; त्यांना सांगितले की, हा विश्वाचा शास्ता म्हणजे विराट पुरुष होय. अशा रीतीने जगातील ईश्वरी प्रतीकांच्या सर्व उपासकांना ‘ती प्रतीके एकाच विश्वात्मक परमात्म्याचे आविर्भाव आहेत’ असे आश्वासन दिले आणि विश्वधर्म-समन्वयाचा मार्ग सांगितला. हे तत्त्व हिंदुस्थानातील अगणित परस्परविरोधी धर्मसंप्रदायांना एकत्र गुंफण्यास समर्थ झाले. या तत्त्वामुळे हीन, भोळसट, अक्राळविक्राळ, मौर्ख्यपूर्ण धर्मविचारांना काहीसा पायबंद बसला. मात्र ते मानवी मनाला तज्जन्य अज्ञान, दौर्जन्य आणि हृदयदौर्बल्य यांतून मुक्त करू शकले नाही व अडाणी कर्मकांड मारू शकले नाही. विरोधाचे दुर्धर विष मात्र त्याने हिंदुस्थानातील धर्मसंप्रदायांतून नष्ट केले.

वैदिक तत्त्वज्ञानाने, विश्व ही एक महान् शरीरवत् संघटना (organism) आहे, तिच्यामध्ये एक प्रकारचे इंद्रियसंस्थेप्रमाणे संवादित्व आहे, हे तत्त्व वारंवार सांगितले आहे; आणि त्याची रूपकात्मक तुलना मत्स्य, वृषभ, अश्व, गो, अज, मनुष्य इत्यादिकांच्या शरीररचनेशी केलेली आहे. अधिक तात्त्विक भाषेत तर असे म्हटले आहे की, विश्वतत्त्व प्राणरूपच आहे. त्याचप्रमाणे शरीरव्यापाराशी

आणि जीवनतत्त्वाशी साम्य दाखवून विश्वाचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. प्लेटोपासून तो विद्यमान प्रो. व्हाइटहेडपर्यंत झालेल्या अनेक पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांना या तत्त्वाचे महत्त्व वाटले आहे. अशा स्थितीत यापुढेही विश्वाचा अर्थ समजून घेण्याला या वैदिक तत्त्वांचा उपयोग होणारच नाही, असे कसे म्हणता येईल ?

दुसऱ्या एका पद्धतीने विश्वरहस्य सांगण्याचा प्रयत्न वेदांनी केला आहे. त्या प्रयत्नांचे भौतिकवादाशी बरेच साम्य आहे. विश्व हे एकाच तत्त्वाचे बनले आहे, अशी श्रद्धा दृढ धरून त्या तत्त्वाचे अनेक अर्थ विकल्पाने सांगितले आहेत. एक अर्थ असा की, विश्व हा वैश्वानर म्हणजे अग्नितत्त्व आहे. आकाशात जे चमकते ते अग्निरूपच असले पाहिजे; सगळे प्राणी जगतात ते जठराग्नीमुळे, म्हणजे जीवनतत्त्वही अग्निरूपच मानले पाहिजे. मेघांत वीज दिसते, म्हणून जलाचे अंतरंगही अग्नीच असले पाहिजे; अशा रीतीने सर्वव्यापी अग्नितत्त्व हाच परमेश्वर होय, असा वैदिक अग्निपूजकांनी निष्कर्ष काढला. काहींनी दुसऱ्या एका पद्धतीने, जल हेच जगाचे मूलतत्त्व ठरविले. काहींनी वायू हेच मूळ स्वरूप ठरविले. काहींनी त्याहीपुढे जाऊन आकाश हेच आदितत्त्व ठरविले. उपनिषदांत विचारांची मजल यापुढे गेली. विश्वाचा मूळ आधार शुद्ध, सत् असे तत्त्व आहे, या कल्पनेपर्यंत ते पोचले. या सत् तत्त्वाची सर्वांगीण भूमिका छांदोग्य उपनिषदाच्या सहाव्या अध्यायात मांडली आहे. या उपनिषदाचा काळ भारतीय युद्धाच्या पूर्वी मानतात. गौतम बुद्धापूर्वी पाचशे वर्षे तरी ही प्राचीन उपनिषदे झाली होती; छांदोग्य उपनिषदाचा सहावा अध्याय हा जगाच्या वाङ्मयातील तार्किक विचारांचा प्रथम नमुना होय. इतक्या पुरातन काळातील वाङ्मयात बुद्धिवादाची पद्धती व्यक्त रीतीने स्वीकारलेला हाच वाङ्मयाचा पहिला अवतार होय. यात विश्वाचे आदिकारण, स्वरूप आणि पर्यवसान शुद्ध सत् हेच होय, असा सिद्धान्त केला आहे. आधुनिक प्रसिद्ध जडवादाची सूचना यात आहे आणि प्राचीन सांख्यांची जडप्रकृती आणि वैशेषिकांचा परमाणुवाद यातून जन्मला. कदाचित आयोनिया आणि अथेन्समधील ग्रीक तत्त्वज्ञाने तसेच अलेक्झांड्रियातील दर्शने यांना या विचारांचा वारा लागला असण्याचा फारच संभव आहे. कारण ईजिप्त आणि भूमध्य समुद्राजवळील राष्ट्रे यांच्याशी भारतीयांचा संबंध सिकंदरापूर्वी कैक शतके आला होता, असे ऐतिहासिक साधने सांगतात. उपनिषदात वरील दोन प्रकारां-

शिवाय सर्वांत मुख्य ब्रह्मवाद होय. ब्रह्मवादी तत्त्वज्ञानाचे सिद्धान्त सांगण्याचे हे स्थळ नाही. त्यांची व्याप्ती विशाल आहे. त्यांची महती सगळे ज्ञानी गातात. ते तत्त्वज्ञान मान्य केले नाही, तरी ज्ञानाच्या मंदिरात त्याचे उच्चतम स्थान कोणीही नाकारीत नाही. वैदिक तत्त्वज्ञानानंतर अनेक परस्परविरोधी तत्त्वज्ञाने भारतीयांनी निर्माण केली. त्या तत्त्वदर्शनांची अंगभूत तर्कशास्त्रे निर्माण केली. या तत्त्वज्ञानांची आणि तर्कशास्त्रांची महती केवळ पुरातन ज्ञानेतिहासातील काही पायऱ्या आणि कालखंड म्हणून इतिहासशास्त्र मान्य करतेच. परंतु त्यांची विचारप्रवर्तकतेची शक्ती अजून खुटली नाही, हेही त्यांचे मननान्ती सिद्ध होते. मात्र त्यांची पुन्हा तपासणी करून, तथ्यातथ्य विभाग करून, नवी मांडणी केली पाहिजे. ही तत्त्वज्ञाने धार्मिक चिंतनातून प्रादुर्भूत झाली आहेत.

तत्त्वज्ञान आणि तर्कविद्या यांच्याइतकीच महती भारतीयांच्या भाषाज्ञानाला आहे. आधुनिक भाषाविषयक शास्त्रे प्राचीन भारतीयांच्या भाषाभ्यासाचेच फळ आहे. तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्र हे पाणिनीय व्याकरणामुळेच शक्य झाले आहे. युरोपातील भाषांच्या मूळ स्वरूपाची कल्पना प्राचीन भारतीयांनी केलेल्या भाषाविषयक परिश्रमांशिवाय युरोपियांना आली नसती. भाषेचे चिंतनही प्राचीन भारतीयांनी ते एक वेदांग आहे, अशा धार्मिक भावनेनेच केले. सर्व भौतिक विज्ञानाचा पाया असलेली गणितविद्या भारतवर्षात काही बाबतींत सगळ्या जगाच्या पुढे गेली होती. विशेषतः अंकगणित आणि बीजगणित या दोन शास्त्रांतील मूलभूत तत्त्वे प्राचीन भारतीयांनीच शोधून काढली. दशांकपद्धती आणि शून्य यांचा शोध यज्ञविद्येचे परिशीलन करतानाच झाला. शतपथ ब्राह्मणात शून्याची बेरीज व शून्याची वजाबाकी याचे रूपक ब्रह्माच्या सृष्टिव्यापाराला लागू केले आहे. बाराव्या शतकातील भास्कराचार्य अठराव्या शतकातील फ्रेंच गणिती आणि ज्योतिषी लाग्रांज यांच्याबरोबर होता.

वरील शुद्ध बुद्धीच्या क्षेत्रांतील पराक्रमाची स्फूर्ती जशी वैदिकधर्माने दिली, त्याचप्रमाणे कलेच्या क्षेत्रातही दिली. रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये जन्माला येण्याच्या अगोदर राजसूय आणि अश्वमेध या यज्ञांमध्ये वीरकथांचे काव्यमय गान होत होते. त्यालाच विस्तार आणि संघटना प्राप्त होऊन वरील महाकाव्ये जन्मली. त्यांतूनच भास, कालिदास, बुद्धघोष आणि तदुत्तर कवींची परंपरा अस्तित्वात आली. नाटक आणि संगीत यांचे प्रयोग यज्ञांत होत. आणि

त्यांचीच परंपरा उत्कर्षाला पोचली आणि देवतांच्या यात्रा आणि उत्सव यांत त्या कलांना प्रौढत्व आणि वैविध्यपूर्ण रम्यत्व प्राप्त झाले.

असुर राष्ट्रांत जगातील प्राचीनतम शासनविधान म्हणजे कायदा अथवा राजधर्मशास्त्र हे अस्तित्वात आले, असे म्हणतात. परंतु हिंदुस्थानातही तसे राजधर्मशास्त्र अस्तित्वात आले असले पाहिजे. परंतु सध्या उपलब्ध राजधर्मशास्त्र हे असुर राष्ट्रांच्या उत्तरकालातील आहे. धर्मसूत्रे हा प्रामुख्याने राजधर्मच आहे. परंतु धर्मसूत्रानंतर अर्थशास्त्रे इ. सनापूर्वी निर्माण झाली. त्यांचा उत्कृष्ट आदर्श म्हणजे कौटिलीय अर्थशास्त्र होय. कौटिलीय अर्थशास्त्र हा ग्रंथ जर खरोखर मौर्य चंद्रगुप्ताच्या अमात्यानेच लिहिला असेल, तर त्या वेळच्या राज्यव्यवहाराच्या जागतिक ग्रंथांमध्ये त्याचे अद्वितीयत्व मान्यच करावे लागेल. परंतु युरोपियन विद्वान या ग्रंथास इ. सनाच्या तिसऱ्या-चौथ्या शतकात आणून ठेवतात. आणि म्हणतात की, चंद्रगुप्ताच्या दरबारात असा विद्यावैभवशाली माणूस असता, तर तो ग्रीक प्रवासी मेगॅस्थिनीस यास दिसलाच असता.

हिंदुधर्माने सर्व हीनोच्च धर्मांचा विभूतिवादाच्या तत्त्वाने संग्रह करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अनायासानेच हीनोच्च गुणांच्या बहुविध तारतम्याच्या संस्कृतीचे रक्षण केले आणि तद्द्वारा संस्कृतीच्या विविध थरांत कायम रुतून बसलेल्या मानवगटांची भली मोठी उतरंड निर्माण केली आणि त्यातून जातिसंस्था जन्मली. हीनधर्मसंप्रदायांचे वैशिष्ट्य आणि हीन संस्कृतीचा वारसा या जातिसंस्थेने कायम ठेवला. व्यवसायभेद हे नैसर्गिक भेद ठरले व वनस्पती आणि प्राणी या सृष्टीतील वैचित्र्यांच्या मर्यादा जशा अबाधित आणि अनुल्लंघनीय असतात, त्याप्रमाणे व्यवसायपरंपरा, धार्मिक चालीरीतींच्या परंपरा, सामाजिक रीतिभातींच्या परंपरा अबाधित आणि अनुल्लंघनीय ठरविल्या. त्यामुळे मनुष्याचे मन आणि व्यवहार अत्यंत संकुचित, कृत्रिम, पोकळ, व्यर्थ, अडगळीवजा असलेल्या संप्रदायाच्या बंधनात बंदिस्त झाले. मनुष्याच्या विकासप्रवण शक्तीची पूर्ण कुचंबणा झाली. बंधनांच्या उंच, खडबडीत, काळ्या, अगणित भिंतींच्या बनलेल्या हिंदुसमाजसंस्थेच्या जुनाट वाड्यात मोकळा वारा आणि सूर्यप्रकाश यांचा मागमूसही राहिला नाही. कोंदट, अंधाऱ्या हजारो खोल्या बांधलेल्या किल्लेवजा असलेल्या भयाण वाड्यासारखे भारतीय हिंदूंचे सामाजिक जीवन झाले. मनुष्याने निर्माण केलेल्या आणि कल्पिलेल्या बंधनांना आणि भेदांना

निसर्गातील नियमांचे आणि भेदांचे स्वरूप देणारा धर्म हा दीर्घकालीन, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अवनतीला कारण होणारच. त्यामुळे व्यापक कायदा लागू पडेल असा समाज अस्तित्वात आला नाही; आणि त्याच कारणास्तव दीर्घ-काल टिकणारे विशाल हिंदुसाम्राज्य निर्माण झाले नाही. मानवी व्यवहाराला अधिकाधिक स्वातंत्र्य ज्या समाजसंस्थेच्या कायद्यात नसते, तेथे मनुष्य हा त्या समाजसंस्थेतील राज्यसंस्थेचा रक्षक बनू शकत नाही. ज्या घरात मोकळेपणा नाही, ते घर आपलेसे वाटत नाही. जे राज्य आणि जी समाजघटना त्यातील अधिका-धिक व्यक्तींना स्वातंत्र्य देते, तीच अधिक टिकते आणि प्रभावी होते, असा इतिहासाचा इत्यर्थ आहे. कायदा हा जितका व्यापक स्वरूप धारण करतो, तितका तो प्रजाजनांना अधिक व्यवहारस्वातंत्र्य देतो. हिंदू समाजाच्या प्राचीन रचनेत राजाने अथवा राज्यसंस्थेने केलेल्या कायद्यापेक्षा त्या त्या वंशाच्या, जातीच्या-उपजातीच्या, धर्मसंप्रदायाच्या, उपधर्मसंप्रदायांच्या, प्रांताच्या, उपप्रातांच्या चाली, रीतींनाच कायद्याचे सामर्थ्य होते. राज्यसंस्थेचा कायदा अगदी तांत्रिक अंमल गाजवी. खरा अंमल शेकडो प्रकारच्या विरुद्ध रूढींचाच होता. म्हणून चिरस्थायी आणि मोठ्या प्रदेशात स्थिर झालेली राजवट हिंदू समाजात उत्पन्न झाली नाही.

## बुद्धाचा अवतार

इ. सनापूर्वी सहाव्या शतकात हिंदुस्थानात बनारसपासून पावणेदोनशे मैलांवर एक महान् धर्मक्रांतिकारक झाला. त्याने त्याच्या अगोदर झालेल्या धर्मातील मूलभूत तत्त्वांवरसुद्धा मूलाघात केला. तो धर्मक्रांतिकारक सिद्धार्थ गौतमबुद्ध होय. जगातील पहिला विश्वव्यापक धर्म गौतमबुद्धाने स्थापला. वंश, जाती, राष्ट्र इत्यादी मर्यादा ओलांडून मनुष्यमात्रास शांतीचा आणि सत्यमार्गाचा संदेश देण्याची प्रेरणा ही ज्या धर्मात असते, तो विश्वधर्म होय. गौतमबुद्धाने सर्व धर्मांच्या मूलभूत प्रश्नांना अगदी बाजूला सारले. अमरत्व, ईश्वराचे आणि देवांचे स्वरूप, परलोकगती, सृष्टीची उत्पत्ती इत्यादी विचारांची पूर्ण उपेक्षा करून त्याने संसार-दुःखाच्या प्रश्नाला वरिष्ठ स्थान दिले आणि अष्टविध आर्य मार्ग सगळ्या आर्य आणि अनार्य मानवांना सांगितला. वैदिक धर्माची आणि तत्समकालीन इतर धर्मांची संपूर्ण प्रतिक्रिया म्हणजे बौद्ध धर्म होय. वैदिक धर्मातील यज्ञ, जातिभेद व आत्म्याचे अमरत्व यांचा विरोध त्यात होता. कर्मकांडापेक्षा नैतिक वर्तन हे

श्रेष्ठ होय आणि तोच मुक्तीचा मार्ग होय, असे त्या धर्माने सांगितले. जप, तप, उपवास, व्रत, तीर्थयात्रा इत्यादी नियम व्यर्थ होत; आणि तृष्णाविजय हाच एक मोक्षाचा उपाय होय, असे त्याने सांगितले. अहिंसा, सत्य इत्यादी नीतिधर्म निरपवादपणे पालन करण्यातच मनुष्याची जीवन-सफलता आहे, हे त्याच्या उपदेशाचे सार होय.

बुद्धधर्माच्या अवताराची सर्व पूर्वतयारी उपनिषदांतील आणि सांख्ययोगातील तत्त्वचिंतनात झाली होती. राधा, गंधर्व, देव, इंद्र, ब्रह्मा इत्यादिकांच्या भूलोकातील आणि स्वर्गातील आनंदापेक्षा अकामहत श्रोत्रियांचा आनंद शतपटीने मोठा आहे, असे तैत्तिरीय उपनिषदात म्हटले आहे. वक्रता, अनृत आणि कपट ज्यांच्या ठायी नाही, तेच ब्रह्म–लोकांचे स्वामी होत, असे प्रश्नोपनिषदात म्हटले आहे. कपिल महामुनीने आणि उपनिषदांनी यज्ञ आणि कर्मकांड यांच्यासंबंधी त्यात शेवटी धोका आहे असा इषारा दिला आहे. परंतु सगळ्या जुन्या वैदिक परंपरेशी फटकून निराळे उभे राहून परंपरेचा पुन्हा आडमार्गाने प्रवेश होऊ नये, म्हणून गौतमबुद्धाने भिन्न मार्गाची रचना केली. गौतमबुद्धाच्या धर्माला, जुन्या वैदिक धर्माला समाधी देण्यात यश आले; परंतु त्या धर्माला हिंदुस्थानात कायम रुजून राहता आले नाही.

बुद्धधर्मानेच विश्वव्यापनशील धर्म प्रथम मानवी इतिहासात स्थापन केला. त्यानंतर खिश्चन धर्म आणि इस्लाम हे विश्वव्यापनशील धर्म झाले. बुद्धधर्मापूर्वीचे सर्वच धर्म हे विशिष्ट समाजपरंपरेच्या, विशिष्ट संस्कृतीच्या मर्यादेतच रहात होते. त्या संकुचितपणाला रजा प्रथम बुद्धधर्माने दिली. बुद्धधर्म जंगलातील वणव्याप्रमाणे जगात पसरला. त्याच्या प्रसाराच्या मर्यादा पहावयाच्या, तर पृथ्वीचा नकाशा पुढे ठेवावा लागतो. होल्गा नदीपासून जपानपर्यंत आणि पामीरपासून सिलोनपर्यंत त्या धर्माच्या प्रसाराचा प्रयत्न दिसतो. आज जगातील तृतीयांश लोकसंख्या बौद्धधर्मीय आहे. भटक्या तुराणी, तुर्क, मोगल लोकांपासून तो अत्यंत सुधारलेल्या चिनी आणि जपानी लोकांपर्यंत सगळ्या संस्कृतींच्या थरांत हा धर्म शिरला.

बुद्धधर्म, हिंदुधर्म आणि पूर्वेकडील इतर धर्मसंप्रदाय यांचे सामाजिक वैशिष्ट्य हे की, ते पश्चिमेकडील यहुदी, खिश्चन आणि इस्लाम या धर्मासारखे असहिष्णुतेची पराकाष्ठा करीत नाहीत. बुद्धधर्माने ही सहिष्णुता पूर्व दिशेकडील धर्मसंस्थांमध्ये आणली, हे श्रेय बुद्धधर्माचे आहे. हिंदुधर्मात जी सहिष्णुता आहे, तिचे तात्त्विक

स्वरूप संदिग्ध आहे; तशी बुद्धधर्माची गोष्ट नाही. बुद्धधर्माचा पहिला महान् सम्राट अशोक याने सर्व-धर्म-सहिष्णुतेचे तत्त्व स्वतः जाहीर केले आहे. म्हणूनच बुद्धधर्माच्या सहिष्णुतेचे दुसरे प्रत्यंतर चीन देशातील लोकांत सापडते. तेथे एकाच घराण्यात काफ्युशस, ताओत्से आणि बुद्ध यांचे धर्म पाळले जातात. हे तिन्ही धर्म एकमेकांच्या शेजारी गुण्यागोविंदाने चीन देशात दोन हजारांपेक्षा अधिक वर्षे नांदत आहेत. बुद्धधर्मातील हा समंजसपणा पश्चिमेच्या ख्यामासारख्या प्रखर धर्मांमध्ये प्रतिबिंबित झाला असता तर जुन्या जगाच्या इतिहासाने मनुष्यजातीला चिरशांतीचा आशीर्वाद दिला असता, आणि तो सफलतेच्याही मार्गाला आज लागला असता. हिंदुधर्मात सहिष्णुता आहे, परंतु तो विश्व-व्यापनशील नव्हता. अत्यंत संकुचित, क्षुद्र, अनुदार आणि भिकार असे विविध धर्मसंप्रदाय जसेच्या तसे शतकानुशतके त्याने जपून ठेवले. म्हणून तो मनुष्य-जातीच्या उद्धारास बुद्धधर्माइतका समर्थ झाला नाही आणि त्या हिंदुस्थानात इस्लामासारख्या अत्यंत असहिष्णू धर्मास वाढण्यास अनुकूल अशी सामाजिक व्यवस्था निर्माण केली. मनुष्यजमातीच्या लहानमोठ्या सांस्कृतिक भेदांना विरघळून टाकून एकजीव करण्याऐवजी ते भेद दृढमूल केले. ह्यालाच आत्मनिरीक्षणाची न्यायनिष्ठुरता आणि धैर्य नसलेले आधुनिक हिंदू विद्वान सहिष्णुता असे गोंडस नाव देतात. हे भेद जिरविणे आणि एकजीवपणा उत्पन्न करणे हे कार्य जर हिंदु-धर्माने केले असते, तर इस्लाम असहिष्णुरूपाने या देशात वाढलाच नसता. हीन आणि भ्रांतिमय भारभूत पुराण-परंपरेला जतन करून आणि महत्त्व देऊन तिची पूजा हिंदुधर्माने केली; आणि समाजसंस्थेची मजबूत आणि संवादी बांधणी होऊ दिली नाही; म्हणून इस्लाम या देशात वाढला.

हिंदुस्थानात बुद्धधर्मापूर्वीचा कोणताही स्थापत्यकलेचा अवशेष सापडत नाही. सिंधू नदीच्या खोऱ्यातील अवशेष मात्र त्यास अपवाद होत. बुद्धधर्माने आणि बुद्धधर्मोत्तर हिंदुधर्माने स्थापत्यकलेत जी प्रगती केली, त्याचे स्वतंत्र वैशिष्ट्य आहे. ईजिप्तमधील पिरॅमिडचा विशालपणा असलेले परंतु दुसरीकडे न सापडणारे रचनाकौशल्य भारतीय स्थापत्यात दिसते. ओरिसा प्रांतातील मुक्तेश्वराचे मंदिर फर्ग्युसनच्या मताप्रमाणे एक अमोल रत्न होय. मद्रास प्रांतातील सबंध अखंड पाषाणात कोरलेली मंदिरे स्थापत्यकलेतील पराक्रमाची मोठीचे निदर्शने होत. त्याला दुसरीकडे कोठेच जोड नाही. डोंगरात पोखरून निर्माण केलेली अजंठा,

वेरूळ, कार्ला इत्यादी ठिकाणची लेणी स्थापत्यातील विस्मयजनक विक्रम होत. त्यांची परंपरा मात्र आता पूर्ण लुप्त झाली आहे.

भूमध्यसमुद्राच्या सन्निध वाढलेल्या धर्मांची ऐतिहासिक कामगिरी तपासल्यावर हिंदुस्थानातील दोन आर्य धर्मांच्या ऐतिहासिक कार्याचे समालोचन आतापर्यंत केले. इराणमधील आर्यांच्या धर्माने इतिहासात आजपर्यंत चिरस्थायी राहील, असे अत्यंत अल्प वैशिष्ट्य दाखविले आहे. तेथील आर्यांनी इ. सनापूर्वी पाचव्या शतकाच्या सुमारास असुर राष्ट्राच्या म्हणजे बाबिलोनियाच्या अधःपातानंतर इतिहासातील इतके मोठे पहिले साम्राज्य स्थापन केले. परंतु चिरंतन कालपर्यंत टिकेल आणि कोणत्याही मानवांना आदरणीय होईल, असे फारच थोडे कार्य केले. काही महत्त्वपूर्ण धर्मकल्पना मात्र इराणी आर्य-धर्माने यहुदी आणि खिश्चन धर्मांना दिल्या. म्हणून इराणी आर्यांच्या संस्कृतीपेक्षा आणि धर्मापेक्षा युरोपातील आर्यांच्या धर्मांचे ऐतिहासिक क्रमास अनुसरून समालोचन करतो.

## ग्रीक कल्पना

युरोपियन आर्यातील ग्रीसमधील आर्य वसाहतीने मानवेतिहासात अखंड टिकणारे चैतन्य उत्पन्न केले. इ. सनपूर्व आठव्या शतकापासून तो इ. सन तिसऱ्या शतकापर्यंत ग्रीक संस्कृती तेजस्वी रूपाने जगली. त्या संस्कृतीच्या राष्ट्राचा नंतर लोप झाला, तरी एक हजार वर्षांच्या जीवनात तिने जी आध्यात्मिक संपत्ती निर्माण केली, ती मनुष्यजातीचा एक श्रेष्ठ वारसा म्हणून नित्य समजला जाईल. हिरोडोटस हा इ. सनपूर्व पाचव्या शतकातील ग्रीक इतिहासकार होय. तो ग्रीक लोकांच्या बहुदेवतावादी धर्माच्या प्रथम व व्यवस्थित आविष्कारासंबंधी म्हणतो की, ‘ होमर आणि हेसियड या कवींनी ग्रीक लोकांच्या देवतांचे आकार प्रथम नीट रीतीने वर्णिले; त्यांच्यातील लहानमोठेपणा योग्य तारतम्याची पारख करून दाखविला; त्यांची नामे, कार्ये आणि सामर्थ्यांचे निरूपण केले. ’ ग्रीक लोकांना देव होते; परंतु दिव्य प्रामाण्य असलेले पवित्र ग्रंथ नव्हते. त्यांच्या महाकवीने त्यांचे देव वर्णिले. झ्यूस हा त्यांचा श्रेष्ठ देव होय. वेदांतील ‘ दयौस ’ आणि हा देव एकच होय. अपोलो, अथेना, पोसीडन, हेरा, हर्मेस इत्यादी देवता त्याच्या खालोखाल येतात. या देवतांचे मूळ स्वरूप काहीही असले, तरी सुसंस्कृत स्थितीत त्यांचे स्वरूप मानवी गुणांनी युक्त असेच ग्रीकांनी मानले. त्यांची मंदिरे त्यांनी

बांधली. मानवी गुणांचे उत्कर्ष म्हणजेच या देवता होत, अशा स्वरूपात त्यांची कल्पना केल्यामुळे ग्रीक लोकांच्या सौंदर्यकल्पनेचा अद्भुत असा विकास झाला. त्यांच्या देवतोपासनेतून भव्य, रेखीव आणि प्रशस्त स्थापत्य जन्मले आणि अनुपम मूर्तिकला अवतरली. ईजिप्त, क्रीट आणि ॲसीरिया येथील धार्मिक स्थापत्याची आणि शिल्पाची पूर्वपरंपरा त्यांना लाभली होती; परंतु ते लोक स्वभावतःच गतानुगतिक नसल्यामुळे आणि नवनवोन्मेषशाली प्रतिभा त्यांच्या प्रांगणात क्रीडा करीत असल्यामुळे त्यांनी नवे स्थापत्य, नवे शिल्प, नवी मूर्तिकला, नवे नाट्य, नवी रंगभूमी आणि नवी चित्रकला निर्माण केली. त्यांचे देव मानव बनले, त्यामुळे धर्माने सदाचरणाचे रूप घेतले; देऊळ आणि घर यांच्यातल्या स्थापत्यातले अंतर कमी कमी झाले व धर्मविचारातून तत्त्वज्ञान निर्माण झाले. सुसंघटित धर्म-संस्था मात्र ग्रीक लोकांना निर्माण करता आली नाही. त्यामुळे मोठ्या चिरस्थायी ग्रीक राष्ट्राची स्थापना होऊ शकली नाही. त्यांची बौद्धिक संस्कृती मात्र सगळ्या जगाच्या पुढे गेली. इतकी बौद्धिक परिपक्वता कोणत्याच प्राचीन संस्कृतीला लाभली नाही. याची कारणे अनेक आहेत. परंतु त्यातील एकच अत्यंत ठळकपणे सांगता येईल. ते असे की, धर्मविचारात श्रद्धा, भावना, गूढ अनुभूती अशा कल्पनांचा फाजील पगडा त्यांनी बसू दिला नाही. त्रिकालज्ञ आणि सर्वज्ञ अशा ऋषींचे अवतारांचे अथवा प्रेषितांचे अबाधित प्रामाण्य त्यांनी स्वीकारले नव्हते. बुद्धि-वादाच्या दृष्टीने धर्ममूल्ये त्यांनी मानली होती. स्वर्ग किंवा देव बुद्धिवादाच्या शिफारशीने ग्रीक माणसांशी सलगी करीत असे. आज ते पुरातन ग्रीक राष्ट्र नाममात्र झाले आहे. परंतु त्याच्या बौद्धिक संस्कृतीचे साम्राज्य जगावर अबाधित-पणे वाढतच आहे. त्याच्या वाढीतच जगाला श्रेष्ठ जीवन जगण्याची अधिक आशा बाळगता येईल.

## जीझसचा धर्म

आर्य लोकांत पूर्व दिशेला सगळ्या मनुष्यजातीला पावन करणाऱ्या आत्म-शुद्धीचा आणि नीतीचा आदेश देऊन एका शाश्वत धर्मचक्राभोवती एकत्रित करणारा धर्म जसा बुद्धाने स्थापिला, त्याचप्रमाणे त्याच उद्देशाने प्रेरित झालेला धर्म आशियाच्या पश्चिमेला जीझसने स्थापला. जीझस ख्राइस्ट हा यहुदी होता. म्हणून त्याच्या धर्मविचाराचे सूत्र यहुदी धर्मातून निर्माण झाले. यहुदी धर्माचा

एकेश्वरवाद त्याने घेतला. मात्र त्या ईश्वराला संपूर्ण उदार आणि दयाघन बनविले. यहुदी ईश्वर जोह्वा याची यहुदी जमातीवर अधिक मेहेरबानी होती. यहुदी लोक त्यांच्या ईश्वराचे अधिक लाडके होते. खिस्ताने सगळी मानवजात त्या देवाची सारखीच लाडकी आहे, असे अधिक सांगितले. यहुदी धर्मावर इराणी आर्यांच्या आणि असुर राष्ट्रांच्या धर्मकल्पनांचा मोठा संस्कार झाला होता. इराणी आर्यांत मित्रपूजेचा म्हणजे सूर्यपूजेचा संप्रदाय होता. त्याचा यहुदी आणि ख्रिश्चन धर्मावर परिणाम खूप झाला. रविवार हा विश्रांतीचा आणि प्रार्थनेचा दिवस मित्रपूजा-धर्मातूनच त्यांच्यात आला. ख्रिश्चन धर्मात ईजिप्तमधील धर्माचारांनी आणि देवतांनीही प्रवेश केला. जुन्या करारातील सृष्टीची कथा असुर राष्ट्रांकडून यहुदी लोकांनी मिळविली आणि ती ख्रिश्चन धर्मानेही मान्य केली. प्रत्यक्ष जीझस ख्राइस्टचा धर्मोपदेश फार साधा, उदात्त आणि कर्मकांडरहित असा होता. मंदिर, पूजाविधी, उत्सव, दीक्षा, गुरू, धर्मपीठ इत्यादी काहीही त्यात नव्हते. इंद्रियसंयम, नीतिनियम आणि निष्काम भक्ती एवढेच त्यात होते. अनेक प्रादेशिक देव आणि भिन्न धर्मसंप्रदाय यांच्या विरोधामध्ये विभक्त व विरोधी झालेल्या आणि चिरकाल कलहात सापडलेल्या, भौतिक ऐश्वर्याच्या पाठीमागे लागलेल्या आणि दैन्यपूर्ण जीवन कंठणाऱ्या असंख्य दीन जनांनी गजबजलेल्या जगाला शुद्ध करून संपूर्ण भ्रातृभावात एकसूत्र करणारा खिस्ताचा आदेश होता. खिस्ताची अनन्यभक्ती, आत्मत्याग आणि मानवतेच्या जिव्हाळ्याने भरलेले हृदय यामुळे ख्रिश्चन धर्म अत्यंत बुद्धिवादाच्या शिखरावर पोहोचलेल्या पाश्चात्त्य मनुष्याचेही मस्तक नम्र करतो.

सेंट पॉलने या धर्माची युरोपात रोमन साम्राज्यात स्थापना केली आणि धर्मसंस्थेचा परंपरागत असा सगळा साज त्या धर्मावर चढविला. खिस्ताने झिडकारलेले सांसारिक वैभव आणि पुराण्या जमान्यातील कर्मकांडाचा, मंदिराचा, दीक्षेचा, धर्मपीठाचा आणि गुरुसंप्रदायाचा लवाजमा जमा केला. युरोपात इसवी सनाच्या पहिल्या तीन शतकांत ख्रिश्चन धर्माच्या उपदेशकांनी आपल्या धर्मसंस्थेची मुळे खोलवर पसरविली; तेव्हाच ईजिप्त आणि आशियामायनरमध्येही त्यांचा प्रसार चांगला झाला होता. आशियापर्यंतसुद्धा या धर्माने तेव्हाच मजल मारली होती. रोमन सम्राटांशी दोन शतके झगडा करून शेवटी रोमन साम्राज्याचे सिंहासनही काबीज केले. रोमन लोक जुन्या निसर्ग-देवतापूजक अशा आर्य धर्माचे अनुयायी

होते. त्यांच्या लोकराज्याचेच शेवटी हुकूमशाही साम्राज्यात रूपांतर झाले. ते साम्राज्य चौथ्या शतकात जीर्ण होऊन विदीर्ण होण्याच्या मार्गाला लागले. ख्रिश्चन धर्माने आपल्या प्रभावाने या जीर्ण साम्राज्याची जागा भरून काढली. प्रथम कॉन्स्टन्टाइन द ग्रेट या सम्राटाने इ. सन तीनशे बाराच्या सुमाराला लोकमान्य झालेल्या ख्रिश्चन धर्माला उचलून धरले. त्यामुळे ख्रिश्चन धर्मात उत्पन्न झालेल्या उपसंप्रदायांच्या झगड्यांना पायबंद बसला आणि धार्मिक रोमन साम्राज्याचा उदय होण्यास मदत केली. हे पवित्र साम्राज्य अकराशे वर्षे म्हणजे पंधराव्या शतकापर्यंत नांदले.

आशियातून आलेल्या ख्रिश्चन धर्माच्या एकेश्वरी, मानवताव्यापी कल्पनेने युरोपियन समाजातील जुन्या, शतशः खंडित धार्मिक संप्रदायांना नष्ट केले आणि एका बंधुत्वाखाली संघटित केले. त्यामुळे तद्देशीय रूढींचे आणि चालीरीतींचे पवित्रत्व नष्ट झाले; त्यामुळे धार्मिक पावित्र्य आणि कायदा यांची विभिन्नता लक्षात येईल, अशी प्रजेची भूमिका तयार झाली. राजसंस्थेचे व्यवहार म्हणजे धर्म नव्हे, अशी विचारसरणी परदेशातून आलेल्या मानवताव्यापक धर्माने लवकर आली. कारण कायदा हा सर्व देशांचा सारखा असत नाही; परंतु धर्म मात्र सगळ्या देशांचा एक असू शकतो, असे या मानवताव्यापक धर्मामुळे समजून आले. त्या काळात सामाजिक संस्थांची प्रत्येक देशात अत्यंत भिन्न रूपे होती, त्यामुळे कायदाही भिन्न रूपाचा होता. ख्रिश्चन धर्माची स्थापना झाल्यावर धर्माहून वेगळी अशी कायद्याची संस्था निर्माण झाली. जस्टिनियन या सहाव्या शतकातील राज्यकर्त्याने कायदा प्रथम सूत्रबद्ध केला. आजच्या पुढारलेल्या राष्ट्रांच्या कायदासंस्थेचा पाया बांधण्याचे पहिले श्रेय जस्टिनियनकडे जाते. रोमन लोकांचे हेच महत्त्वाचे ऋण सुधारलेल्या जगाला आहे, असे कायद्याचे इतिहासकार म्हणतात. धर्माची आणि कायद्याची फारकत करावयास अनुकूल भूमिका ख्रिश्चन धर्माने निर्माण केली. त्यामुळे स्वतंत्र कायदेसंस्था जन्मली. ख्रिश्चन धर्म युरोपात गेला नसता, तरी रोमन लोकांची कायदेसंस्था जस्टिनियनच्या काळात उन्नत स्थितीला पोचली असतीच. परंतु तिची धार्मिकतेपासून फारकत झाली असती की नाही, हे सांगता येत नाही. कारण त्यापूर्वी अडीच हजार वर्षे असुर राष्ट्रांच्या सम्राटाने बाबिलोनमध्ये धर्मभिन्न असा, पारलौकिक कल्याणाशी संबंध नसलेला लौकिक व्यवहाराचा कायदा निर्माण केलाच. म्हणून एवढेच म्हणता येईल की, रोमन लोकांच्या

राज्यव्यवस्थेचा आधारभूत असा कायदा त्यांच्या परंपरागत धर्मनाशाबरोबर नष्ट होऊ नये, म्हणून नवा परका धर्म प्रजेने स्वीकारल्याबरोबर शहाण्या जस्टिनियनने लोकव्यवहाराचा आधार असलेली कायदेसंस्था उद्धरली. ती ख्रिश्चन धर्माच्या लोंढ्याखाली वाहू दिली नाही. ख्रिश्चन धर्म हा परका असल्यामुळे तद्देशीय परंपरागत सामाजिक संस्थेचा अंगभूत कायदा त्याहून अगदी पृथकपणे चमकला आणि त्याचे समाजधारक मूल्य ओळखून शहाण्या राज्यकर्त्याने त्याला उचलून धरले. तात्पर्य असे की, ख्रिश्चन धर्माला रोमन कायदेसंस्था जगविण्याचे वास्तविक श्रेय नाही, तर ते ख्रिश्चन धर्माची अपरिहार्यता ओळखणाऱ्या राज्यकर्त्याला आहे.

रोमन साम्राज्यात ख्रिश्चन धर्माला राजमान्यता प्राप्त होण्याच्या काळातच आशियामायनर आणि ईजिप्त या भागात ख्रिश्चन संप्रदायाचे झगडे आपापसात सुरू झाले आणि त्याला तीव्र स्वरूप प्राप्त झाले. त्याची परिणती अखेरीस आशियामायनरमधून आणि ईजिप्तमधून ख्रिश्चन धर्माच्या हकालपट्टीत झाली. ख्रिश्चन धर्माने सेंट पॉलच्या कारकीर्दीपासूनच जुन्या धर्मातील तत्त्वे, कर्मकांड आणि देवताविचार स्वीकारण्यास सुरुवात केली आणि तदुत्तरकाली ख्रिश्चन धर्माचार्यांनी त्यांत मूर्तिपूजाही आणली; माता, पिता आणि पुत्र अशी त्रिमूर्ती त्यात शिरली. या तीन देवता एक की भिन्न, त्याचप्रमाणे पुत्र हा मानव की देव इत्यादी वाद उत्पन्न होऊन त्यावर रणे माजली. ज्या संप्रदायास राजाश्रय प्राप्त झाला, तो इतर संप्रदायांची अधिक मुस्कटदाबी करू लागला. असे देवताविषयक वाद ईजिप्तची आणि असुर राष्ट्रांची अनेक दैवते ख्रिश्चन धर्माने स्वीकारल्यामुळे झाला. ईजिप्तने विश्वदेववाद ( Pantheism ) मान्य केला होता; म्हणून माता, पिता आणि पुत्र हे भिन्न असूनही एक आहेत, ही गोष्ट स्वीकारणे त्यांत विसंगत नव्हते. कारण विभूती भिन्न आहेत, शुद्ध देवता एकच आहे, अशी कल्पना विश्वदेववाद मानतो. ख्रिश्चन धर्मास अनेक देवता अशा रीतीने पचविणे अशक्य होते. कारण विश्व आणि देव भिन्न आहेत, त्याचप्रमाणे देव हा एकच आहे, अशी एकेश्वरवादी विचारसरणी हा त्याच धर्माचा आधार होय. त्यामुळे तीन देवतांची संगती एकेश्वरवादाशी लावण्याच्या प्रयत्नात कित्येक शतके गेली आणि विसंगती तशीच कायम राहिली.

जीझस ख्राइस्टचा ख्रिश्चन धर्म मूळ स्वरूपात युरोपात रूढ होऊ शकला नाही. मानवी समानता आणि भ्रातृत्व यांस सेंट पॉलनेच प्रथम मर्यादा घातली.

युरोपातील ख्रिस्तपूर्व गुलामगिरी त्याने मान्य केली. त्याने गुलामांना सांगितले की, ‘स्वामिनिष्ठेस अंतर देऊ नका’. विनय, नम्रता आणि सहिष्णुता यांचा उत्कर्ष न होता, दुसऱ्याच टोकास ख्रिश्चन राज्यकर्ते आणि धर्माचार्य गेले. शैक्षणिक दृष्टीनेसुद्धा : ख्रिश्चन धर्मगुरू आणि ख्रिश्चन राजे फार संकुचित मनाचे झाले. ख्रिश्चन धर्माने ग्रीस आणि रोममधील अनेकेश्वरवादी आर्यधर्म नष्ट केला, हे काही वाईट केले नाही. परंतु इ. स. च्या सहाव्या शतकातील ग्रीस व रोम आणि इ. सन पूर्व चार शतकांतील ग्रीस आणि रोम यांची तुलना केल्यास दिसून येते की, ख्रिश्चन धर्माने त्या आर्यसंस्कृतीतील बौद्धिक स्वातंत्र्य, सौंदर्यप्रीती आणि टापटिपीची राहणी यांचा लोप केला. जीवनश्रद्धा जड बनून युरोप अंधारयुगात लुप्तप्राय झाला. त्यानंतर एक हजार वर्षे युरोप तसाच घोर निद्रेत पडून राहिला. त्याला बुद्धिवाद आणि नवजीवनाची चळवळ यांनी जागे केले.

एकेश्वरवादी ख्रिश्चन धर्म बहुदेवतावादाने पहिल्या शतकात भ्रष्ट झाला. मूर्तिपूजेने त्यांचे बौद्धिक सामर्थ्य आणि श्रद्धेचा खंबीरपणा ढासळू लागला. पुरोहितवर्गाचे वर्चस्व, राज्यकर्त्यांचा लोभ आणि संन्यासवादाचे मानसिक दौर्बल्य यांनी त्याची नैतिक शक्ती आणि दीनांना आणि पतितांना वाटणारा त्याबद्दलचा आत्मविश्वास लोपू लागला. आशियामायनर आणि ईजिप्त येथील ख्रिश्चन धर्मसंस्था अंतःस्थ यादवीने जर्जर झाली. ग्रीक चर्च आणि आशियातील व आफ्रिकेतील ख्रिश्चन धर्मपीठे यांच्यातील चिरंतन विरोधाने धार्मिक श्रद्धेचा पाया खिळखिळा झाला. त्यात राजकीय कारणांची भर पडली. आफ्रिकेतील बायझंटाइन साम्राज्यात पिळवणुकीने प्रजा हवालदिल झाली होती; पर्शियन साम्राज्यात तर प्रजारक्षणाची कुवत राहिली नव्हती. धर्मसंस्था आणि राज्यसंस्था यांचा अधःपात झाल्यामुळे पश्चिम आशिया आणि उत्तर आफ्रिका येथील समाजसंस्था दुबळी झाली. ख्रिस्ताचा ज्या पश्चिमेकडील मानवी जगात अवतार झाला, ते जग त्याच्या दिव्य आदेशाने स्फूर्तियुक्त होऊन जीवनशक्तींच्या संचाराने भरभराटीस येण्याच्या ऐवजी त्याच्या आदेशाचा विपर्यास होऊन सामाजिक दुःस्थितीच्या पंकात पापविद्ध होऊन खोल रुतून बसले. पश्चिम आशियात धर्मक्रांतीचे प्रयत्न अशा रीतीने दोनदा विफल झाले. एकेश्वरीवादाचा संदेश प्रथम मोझेसने दिला; परंतु त्यात विशिष्ट जमातीचा अहंगंड प्रथमपासूनच शिरून, त्याला संकुचित व टणक संप्रदायाचे स्वरूप आले. त्यामुळे तो मानवधर्म होऊ शकला नाही. ख्रिस्ताच्या

संप्रदायाला तर जीर्ण रोमन साम्राज्याच्या अधोगतीचा संपर्क होऊन अधोगतीला कारण होणारी अधोगतीची लक्षणे व पापे त्यात शिरली, म्हणून एकेश्वरवादाने पुन्हा तृतीय जन्म इ. स. ६२२ मध्ये घेतला. त्याच्या या तृतीय जन्माचे स्थान अरबस्तान होय.

## इस्लामचा उदय—

अरबस्तानात इस्लामचा उदय हा एकेश्वरवादाचा तिसरा जन्म होय. मागील दोन जन्मांपेक्षा या जन्मात एकेश्वरवादाचे स्वरूप अधिक शुद्ध तेजस्वी राहिले, हे त्याचे वैशिष्ट्य होय. मानवी सुधारणेच्या उदयकालापासून म्हणजे ईजिप्त आणि सुमेर येथील संस्कृतीच्या स्थापनेच्या काळापासून सुमारे सात हजार वर्षे जी समाजसंस्था नांदली; ती कृतीने, धर्मदृष्ट्या व उपासनादृष्ट्या बहुदेवतावादी होती. त्या बहुदेवतावादाने मनुष्यसमाजात मानवामानवांमध्ये द्वैताची भावना खोल रुजविली; पुरोहितवर्ग निर्माण करून त्याचे सामाजिक स्वामित्व निर्माण केले; मूर्तिपूजा वाढवून नीतीपेक्षा आणि ऐहिक व्यवहारापेक्षा कर्मकांडाचे स्तोम माजविले. एकेश्वरवादास तत्त्वतः बहुदेवतावादामुळे उत्पन्न झालेल्या पुरातन संस्कृतींच्या या वैगुण्यांचा परिहार करावयाचा होता. परंतु यहुदी आणि ख्रिश्चन एकेश्वरवादास या बाबतीत पूर्ण अपयश आले. मानवी द्वैत, पुरोहिताचे वर्चस्व, मूर्तिपूजा आणि कर्मकांड यांचा समूळ नाश करण्यात प्रथम इस्लामला बरेच यश आले. त्या यशास कारणीभूत होणारी ताकद त्यात महंमदाने प्रथमपासून भरली. त्याने स्वतः ‘ शेवटचा ईश्वरप्रेषित मीच आहे ’ असे हिंमतीने बजावून सांगितले आणि एकेश्वर–कल्पनेला अनेक फाटे फुटणार नाहीत, असा बंदोबस्त केला.

महंमदाच्या अगोदर अरबस्तानात कोणताही सुसंस्कृत धर्म अस्तित्वात नव्हता. ख्रिश्चन, यहुदी, झरथुष्ट्री, मणी आणि हिंदू या धर्मांशी अरबांचा संबंध व्यापाराच्या निमित्ताने येत असे. परंतु बहुतांशाने अरब लोक यांपैकी कोणत्याच धर्माचे अनुयायी व उपासक बनले नाहीत. बहुदेवतामय असा हीन धर्मप्रकार त्यांच्यात रूढ होता. अरबांचे संघटित व सुसंस्कृत असे राज्य नव्हते आणि तसे राष्ट्रही नव्हते. अरबांच्या भिन्न भिन्न टोळ्या होत्या. प्रत्येक टोळीचा निराळा देव असे. उंटावरचा व्यापार व वाटमारी हा त्यांचा महत्त्वाचा धंदा होता. ते चांगले लढवय्ये होते. त्यांच्या महंमदापूर्वीच्या सव्वाशे लढायांचा इतिहास पहिल्या खलिफांच्या वेळेस

लिहिला आहे. महंमदाच्या वेळी या व्यापारी लढाऊ अरबांची अनेक शहरे व्यापाराच्या कारणाने अस्तित्वात आली होती. परंतु अरबांचे संघटित राष्ट्र मात्र अस्तित्वात आले नव्हते. अरबांच्या टोळ्या या व्यापारी शहरांना वेळोवेळी भेटी देत. मक्का शहर त्यांच्या टोळ्यांचे केंद्रस्थान झाले होते आणि त्याबरोबरच त्यांच्या देवतांचेही केंद्रस्थान बनून काबाचे मंदिर हे साडेतीनशे देवांचे वसतिस्थान झाले. महंमदाचे घराणे या मंदिराचे पुजारी होते. त्यामुळे महंमदाला देशोदेशी उंटांचे तांडे घेऊन फिरणाऱ्या अरब जमातींना भेटण्याचा योग येऊन त्याला पश्चिमेकडील जगातील परिस्थितीची आणि धार्मिक चळवळीची माहिती मिळाली. त्यामुळे विसंघटित, निरंतर युद्धात सापडून विस्कळित राहिलेल्या फुटीर अरबांचे एक राष्ट्र निर्माण करून शेवटी आंतरविरोधाने विघटित आणि विपन्न झालेल्या मानवजातीला एक करण्याची दिव्य स्फूर्ती झाली. ज्या तत्त्वाने आपसात झगडणाऱ्या अर्धरानटी स्थितीत गुरफटलेल्या अरबांना एकत्वाच्या भावनेने एकजीव करण्याची प्रेरणा त्याला झाली, तेच तत्त्व सगळ्या मानवजातीला तारील अशीही श्रद्धा त्याच्या हृदयात शिरली. अरबस्तानच्या वाळवंटाचे वातावरण निराकार एकेश्वराच्या ध्यानाला आणि दर्शनाला फार अनुकूल असल्यामुळे त्याला तेथे एकेश्वराचा आदेश मिळाला. त्याला गूढ आवाज त्या घुमटासारख्या निरभ्र आणि स्तब्ध आकाशात ऐकू येऊ लागले. त्यात एकच एक निर्मळ अर्थ होता. "ईश्वर एकच आहे, तोच सर्वांचा मालक, जनक आहे. तो सर्वशक्तिमान् आणि दयाळू आहे, त्या निराकाराची आराधनाच पावन करते." या संदेशाची ताकद सगळ्या अरबी टोळ्यांना जाणवली. देवाचा संदेश तलवार उचलून महंमदाने सर्व माणसांकडे पोहोचविण्याचे ठरविले आणि त्याने आपला निश्चय पुरा केला. अरबांचे बाकी सगळे देव अल्प काळात विराम पावले आणि एकाच देवाच्या सार्वभौम छत्राखाली ते एकत्र झाले. महंमदाच्या नेतृत्वाखाली ते जमा झाले. त्यांनी त्या संदेशाचे राजकीय आणि धार्मिक असे महत्त्व जाणले. इस्लाम हा ख्रिस्ती धर्माप्रमाणे केवळ धार्मिक नव्हता; त्यात राजकीय अर्थही भरला होता. कारण अरब राष्ट्रांची संघटना करून जेव्हा देवाची तलवार दिग्विजयाकरिता बाहेर पडली, तेव्हा ती तलवार असे सांगू लागली की, एक तर इस्लामचा स्वीकार करा नाही, तर खंडणी तरी द्या.

महंमदाच्या अरब अनुयायांनी पहिल्यांदा (इ. स. ६३४) सिरियाची

राजधानी दमास्कस काबीज केली. नंतर युफ्राटिस आणि तैग्रिस ओलांडून पर्शियावर चाल केली आणि त्याला शरण आणले. पश्चिमेकडे आक्रमण करून ईजिप्त, उत्तर आफ्रिका आणि स्पेन यांना आपले आधिपत्य मान्य करावयास लावले आणि दक्षिण फ्रान्समध्ये लॉयरपर्यंत घुसले (इ. स. ७३२). मात्र चार्लेस मार्तेलने त्यांची मात्रा पुढे चालू दिली नाही. इतका लांब पल्ला अरबांच्या पराक्रमाने एका शतकात गाठला. पूर्वेकडे इराण आणि समरकंद यांना आपल्या छत्राखाली आणले आणि आशियामायनरची नैर्ऋत्यही त्यांच्या स्वाधीन झाली. विलक्षण वेगाने इस्लामचे राज्य आणि धर्म त्यांचा प्रसार झाला. द्रुत गतीने जाणाऱ्या सांडणीस्वारांस या राज्यात एका टोकापासून दुसऱ्या टोकास जावयास पाच महिनेही पुरत नसत. जो जो कोणी इस्लामला कवटाळी, त्याला त्याला इस्लामने पूर्ण समानतेचे हक्क बहाल केले. इस्लामच्या तिखट तलवारीच्या बरोबर इस्लामच्या यशात या मानवी समानतेच्या तत्त्वाने तितकाच समान वाटा मिळविला. रोमन, बायझंटाइन, पर्शियन आणि हिंदू साम्राज्यापेक्षा हेच अरबांच्या सारासेन साम्राज्याचे वैशिष्ट्य दिसते. त्या जुन्या साम्राज्यामध्ये उलट वरिष्ठ आणि कनिष्ठ असे प्रजाजनांमधील भेदभाव पराकोटीला पोचून व त्यांचे हिडिस स्वरूप जुलमी कायद्यांच्या अंमलबजावणीत प्रतीत होत होते. गिबन म्हणतो की, झरथुष्ट्राच्या धर्मापेक्षा अधिक शुद्ध आणि मोझेसच्या धर्मापेक्षा अधिक उदार आणि ख्राइस्टच्या धर्मापेक्षा अधिक सुसंगत असा महंमदाचा धर्म अरबांच्या यशाला कारण झाला. फिनले हा बायझंटाइन साम्राज्याच्या इतिहासात सांगतो की, ख्रिश्चन लोकच ख्रिश्चन राज्यकर्त्यांना कंटाळले होते. अरब नेत्यांपेक्षा ते अधिक जुलमी होते. ख्रिस्ती बर्बर लोकांनी आपण होऊन आफ्रिका जिंकावयास अरबांना साहाय्य केले. सगळ्या प्रजेला कॉंस्टॅंटिनोपलच्या सरकारचा वीट आला होता. प्रजा उदासीन झाली आणि सरदारांनी फितुरी केली म्हणून स्पेन आणि दक्षिण फ्रान्स अरबांच्या आधीन झाला. वंश, कुल, अधिकार, संपत्ती इत्यादी भेदांना इस्लामने डावलून ईश्वरापुढे माणसाचे पूर्ण समानत्व केवळ श्रद्धा एवढ्याच गुणाची कदर करून मान्य केले. त्यामुळे जुन्या धर्मसंस्थांपेक्षा त्यांच्यात सामाजिक बंधमुक्तीला अधिक वाव मिळाला. ख्रिश्चन राजांनी ख्रिश्चन प्रजेत गुलामगिरीची पद्धत चालू ठेविली. परंतु अरबांनी जो जो गुलाम मुसलमान होईल, त्यास गुलागिरीतून मुक्त केले. कारण अल्लापुढे शरण गेलेला प्रत्येक जण सारखाच

भाग्यवान् ठरतो. लढाईच्या नियमांतही पहिल्या खलिफांनी औदार्याचे तत्त्व दाखल केले होते. अबूबकर याने लष्कराला फर्मान काढले होते की, न्यायाशिवाय अंतिम यश नाही. शूराने मरावे, पण शरण जाऊ नये. दयाशील बना. वृद्ध पुरुष, संन्यासी, स्त्रिया, मुले यांचा वध करू नका. फळांचे वृक्ष, धान्य आणि जनावरे यांचा नाश करू नका. शत्रूचाही वचनभंग करू नका. तात्पर्य, इस्लामच्या पहिल्या पराक्रमात साम्राज्यस्थापनेच्या मुळाशी नैतिक प्रेरणाही होती.

अरबांचे साम्राज्य स्थापन झाल्यावर त्यांच्यात पूर्वी कधीही नसलेली आणि लष्करी दिग्विजयाच्या वेळीं प्रत्ययास न आलेली विद्याभिरूची निर्माण झाली. कला आणि विद्या यांची साधना आणि प्रसार यांत जगाचे एक पाऊल पुढे नेले. अलमनसर आणि हरुन अलरशीद या खलिफांच्या काळात राजमहाल, शहरे, शिक्षणसंस्था यांची वाढ झाली. अमोल रत्नांच्या वैभवाचा दिमाख आणि काव्ये व शास्त्रे यांच्या यशाची प्रभा एकमेकींशी स्पर्धा करीत होती. प्रयोगात्मक आधुनिक विज्ञानांचा पाया सारासेन साम्राज्यातील पंडितांनी रचला. रॉजर बेकन हा युरोपातला पहिला बुद्धिवादी तर्कशास्त्रज्ञ अरबी विद्यांचा अभ्यास करूनच शहाणा झाला होता. तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांची वाढ अरबांनी ग्रीक विद्यांच्या आधारे केली आणि युरोपियनांची ही बौद्धिक संपत्ती त्यांनीच कित्येक शतके जतन करून ठेविली. श्रद्धाजड व मूर्ख खिश्चन धर्मकल्पनांना वश झालेल्या युरोपने या ग्रीक विद्यांना निर्वासित केले होते. अरबांनी त्यांना आश्रय दिला व वाढविले आणि कालांतराने युरोपला त्या विद्या सव्याज बहाल केल्या. अलकिंदी, अलहसन-अलफरबी, अलगझली, अवरोवस इत्यादी संशोधक आणि तत्त्ववेत्ते अरब लोकांत जन्मले. इ. स. च्या बाराव्या शतकात झालेल्या अवरोवसबद्दल रॉजर बेकन म्हणतो की, निसर्गाचा अर्थ ॲरिस्टॉटलने सांगितला. ॲरिस्टॉटलचा अर्थ अवरोवसने सांगितला. अरबी लोकांनी युरोपात विज्ञान आणि तर्कशास्त्र तलवारी-बरोबर नेले आणि आधुनिक विज्ञानशाली, महान्, संस्कृतिसंपन्न युरोपाच्या जन्माला मदत केली.

इस्लामची तलवार तुर्क, मोंगल इत्यादी रानटी जमातींच्या हातात जाऊन जगावर गाजू लागण्यापूर्वी इस्लाम जेथे जेथे गेला, तेथे तेथे त्याने शांतता आणि परधर्मसहिष्णुता यांचाच वर्षाव केला. ईजिप्त आणि पॅलेस्टाइनमध्ये खिश्चन राज्यात परधर्मीयांचा छळ होई. ज्यू लोकांची मंदिरे आणि सभागृहेसुद्धा जाळली

जात. ख्रिश्चन धर्माच्या राजमान्य नसलेल्या संप्रदायांनाही भिऊन राहावे लागे. अरबांचे राज्य झाल्यावर निर्भयपणाचे आश्वासन सर्व धर्मांना लाभले. टॉयन्बी या आधुनिक इतिहासपंडिताने या मुद्द्याची चर्चा करून असे म्हटले आहे की, इस्लाममध्येही परधर्मसहिष्णुता प्रारंभी व्यापक प्रमाणात होती. अलेक्झांड्रियातील ग्रंथालय जाळणारा मूर्ख आणि माथेफिरू एखादाच अपवाद म्हणून सांगता येतो. असहिष्णुता व माथेफिरूपणा हा नंतरच्या तुर्क, मोगल, अफगाणी इत्यादी मागासलेल्या रानटी मुसलमानांत शिरला. त्यांनीच जगामध्ये इस्लामचा धर्म बदनाम केला. हिंदुस्थानासारख्या वैभवशाली देशावर या लोकांनी स्वाऱ्या करून त्या देशाची धूळदाण केली; त्याचप्रमाणे बाबरच्या कारकीर्दीस सुरुवात होईपर्यंत अनेक शतके राज्यस्थापना करून स्वास्थ्य आणि सुधारणा होईल अशी परिस्थितीच निर्माण केली नाही. कारण अरबांच्याप्रमाणे त्यांच्यात सुधारणाप्रिय वृत्ती नव्हती.

हिंदुस्थानात मुसलमानांनी तलवारीच्या जोरावर जबरदस्तीने इस्लामचा प्रचार केला. परंतु तलवारीबरोबर मुसलमान झालेल्या एतद्देशीय हीन वर्णातील लोकांना त्यांच्या हिंदू समाजातील स्थानापेक्षा वरचे सामाजिक स्थान प्राप्त झाले. उच्चवर्णीयांच्या बरोबरचे सामाजिक हक्क त्यांना इस्लाममुळे लाभले. उदाहरणार्थ, शूद्र किंवा अस्पृश्य मानलेला माणूस मुसलमान झाल्यानंतर इष्ट तो उद्योगधंदा करण्यास पात्र होई. पूर्वीचा अस्पृश्य असेल, तर स्पृश्यांच्या वस्तीत मुसलमान झाल्यामुळे त्यास मोकळेपणाने सर्व व्यवहार करण्याचा हक्क लाभत असे. धार्मिक बाबतीत तर प्रार्थनामंदिरात वजीर आणि गरीब हे एकाच पातळीत धंदा, मान, पैसा, इत्यादी कसल्याही भेदभावाची जाणीव विसरून बसत असत. त्यामुळे हिंदुसमाजातील तीव्र विषमता, घृणा आणि वंशपरंपरागत दडपशाही यांतून मुक्त होऊन बंधमुक्त पक्ष्याप्रमाणे मोकळी हवा आणि विस्तृत आकाश लाभल्यामुळे हीनवर्णीयांस आनंद वाटे. मुसलमान सत्ताधीश असल्यामुळे राजदरबारी ब्राह्मण आणि पूर्वास्पृश्य मुसलमान हे एकाच दर्जाचे होत. किंबहुना मुसलमान धर्मामुळे त्याला राजकीय स्वामित्वाचीही योग्यता लाभे. पुराण हिंदुसमाजरचनेची आणि इस्लामी सामाजिक व्यवस्थेची तुलना केल्यास अरबांपेक्षा मागासलेल्या व अनुदार मुसलमान राज्यकर्त्यांच्या काळात हिंदुस्थानात येथील लोक बाटवून मोठा प्रतिस्पर्धी मुसलमान समाज का निर्माण झाला, याची अधिक चांगली कारणमीमांसा

करता येते. हिंदू आणि मुसलमान असे दोन समाज एकाच राष्ट्रात निर्माण झाले. एकमेकांत त्यांचे व्यवहार गुंतले. कित्येक शतके एका शहरात आणि एका गावात नांदले; परंतु त्यांच्यात समरसता उत्पन्न होऊ शकली नाही. म्हणूनच इंग्रजी राज्यकर्त्यांस त्यांच्या विरोधी सामाजिक व्यवस्थांचा फायदा घेऊन फूट पाडता आली.

संदर्भ : "दत्तोपंत आपटे स्मारक ग्रंथ," १९४७, पृष्ठे २४६ ते २६४.

# ६

# वैज्ञानिक दृष्टी आणि भारतीय संस्कृती

निरीक्षणाने व प्रयोगजन्य अनुभवानेच निसर्गाचे ज्ञान प्राप्त होऊ शकते, अशा श्रद्धेतून निर्माण होणारी निसर्गाच्या अन्वेषणाची प्रेरणा म्हणजे वैज्ञानिक दृष्टी होय. वैज्ञानिक दृष्टीला संपूर्ण विचारस्वातंत्र्याचे अधिष्ठान असावे लागते. युरोपला मध्ययुगीन धर्मसंस्थांचे व अंधश्रद्धेचे भयंकर बंधन होते. शौर्याने त्या बंधनांच्या बाहेर पडण्याचा प्रयत्न अंतिम स्वार्थत्याग करून किंवा आत्मबलिदान देऊन विज्ञान-संशोधकांना करावा लागला. भारताचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास पाहिला, तर त्यात संपूर्ण धर्मस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य होते. प्राचीन जगात कोठेही नव्हते, इतके व्यापक वैचारिक स्वातंत्र्य व विचारप्रसाराचे स्वातंत्र्य भारतातील विचारवंतांना प्राप्त झाले होते, असे गेल्या दीडशे वर्षांतील आधुनिक भारतीय विचारवंतांनी वारंवार सांगितले आहे. असे असता इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंत भारतात विज्ञानाची वाढ झाली; परंतु पुढे ती का थांबली, याचे उत्तर आमचे विचारवंत देत नाहीत. याचे उत्तर शोधले पाहिजे. आज शुद्ध विज्ञान आणि अनुप्रयुक्त तंत्रविज्ञान या बाबतींत भारताला पश्चिमी जगाचेच संपूर्ण ऋण घेण्याची पाळी आली आहे. भारत आज शुद्ध विज्ञान आणि तंत्रविद्या या बाबतींत केवळ अनुकरणावस्थेतच आहे. भारतात आधुनिक विज्ञान व तंत्रविद्या वेगाने प्रसृत व्हावी याकरिता आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. परंतु ही अनुकरणाची अवस्था संपून जागतिक विज्ञानात व तंत्रविद्यांमध्ये लक्षणीय अशी स्वतःची भर भारत टाकावयास लागेल व पश्चिमी वैज्ञानिकांच्या बरोबरीचे संशोधनकार्य नव्या

नव्या क्षेत्रांत करून त्यांच्याबरोबर नेतृत्वात सहभागी होईल, असा काळ जवळ आहे, असे दिसत नाही. हे संपूर्ण परावलंबित्व नाहीसे कसे होईल, याचे उत्तर प्राप्त होण्याकरिता भारतात गेल्या बाराशे वर्षांत वैज्ञानिक प्रगती का थांबली व वैज्ञानिक दृष्टी का कुंठित झाली, याची मीमांसा केली पाहिजे. ही मीमांसा करण्याच्या अगोदर भारताने प्राचीन काळीं विज्ञानोपासना करून जगाच्या ज्ञानात कशी भर घातली, हे प्रथम थोडक्यात पाहू या. या बाबतीतच डॉ. प्रफुल्लचंद्र रे, ब्रजेंद्रनाथ सील इत्यादी भारतीय व अन्य पश्चिमी संशोधकांनी प्राचीन भारतीयांच्या वैज्ञानिक प्रगतीचा जो आढावा घेतला आहे, त्याचे थोडक्यात सार असे आहे :

ऋग्वेदापासून ब्राह्मणकालापर्यंत किंवा उपनिषदकालापर्यंत भारतीयांनी गणित-ज्योतिष, सृष्टिरचनाशास्त्र, इंद्रियविज्ञान किंवा शरीरविज्ञान, वैद्यक, भाषाशास्त्र, अंकगणित, त्रिमिती, वनस्पतिविज्ञान, प्राणिविज्ञान, धातुविद्या यांचा पाया घातला. ऋग्वेदाच्या नासदीय सूक्तात ( १०/१२९ ) म्हटले आहे, की ही सृष्टी कशी उत्पन्न झाली हे एक विलक्षण कोडे आहे, ते उलगडणे फार कठीण आहे; देवांनाही ते उलगडणे शक्य नाही. कारण देवांचा जन्मच सृष्टीच्या उत्पत्तीबरोबर झाला आहे; सर्व विश्व ज्याच्या दृष्टिपथात आहे, अशा अध्यक्षालाही हे कोडे उलगडले आहे की नाही हे कसे सांगता येणार ? हे कोडे उलगडण्याचा प्रयत्न सुरू झाला. ऋग्वेदकाली आकाशातील तेजस्वी गोलांचे दैनंदिन निरीक्षण करून नक्षत्र-चक्र निश्चित केले व २७ नक्षत्रपुजांचा क्रम ठरविला आणि प्रत्येक पुंजास आश्विनी, भरणी इत्यादी पृथक् नावे दिली. सूर्य अस्ताला जातो, तेव्हा पृथ्वीच्या दुसऱ्या बाजूला उदय पावतो; याचे ज्ञान वैदिकांना होते हे ऐतरेय ब्राह्मणातील ( ३/४४ ) एका वचनावरून निश्चित होते. पौर्णिमेस सूर्य व चंद्र यांच्यामध्ये जास्तीत जास्त अंतर असते व अमावास्येस कमीत कमी अंतर असते, हेही वेदकालीन भारतीयांना माहीत होते. नक्षत्रचक्रातील सूर्य-चंद्रांच्या गतीचे मोजमाप करून दिवसमान, मासमान व संवत्सरमान यांचे गणितही त्यांनी केले

सूर्यचंद्रांचे नक्षत्रांतून परिभ्रमण व नक्षत्रचक्र यांचे ज्ञान चीन, बाबीलोन, ग्रीस इत्यादी प्राचीन देशांना होते. त्यांच्यापासून भारतीयांनी ते ज्ञान घेतले, असे काही विज्ञानेतिहासज्ञ म्हणतात. परंतु वेदांच्या इतका त्यांचा प्राचीन लिखित पुरावा सापडत नाही. सगळे इतर पुरावे वेदोत्तरकालीन आहेत. पायथॅगोरस व

प्लेटो यांच्या मते गणित किंवा संख्या हे विश्वतत्त्व, विश्वाचे मूळतत्त्व आहे, विश्वरचना ही निश्चित संख्यांकित आहे, हा सिद्धांत विज्ञानाचा मूलभूत सिद्धांत होय. गणिताशिवाय विज्ञानाला अर्थ नाही. परंतु या सिद्धांताचाही उगम वेदकालीन सृष्टिशास्त्रात मिळतो. शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे, की एका संवत्सराचे १०,८०० कालविभाग ( मुहूर्त ) पडतात; ऋग्वेदाच्या ऋचाही १०,८०० आहेत. चयननामक अग्नीची वेदी १०,८०० विटांची बनवावी लागते. म्हणजे ही वेदी संवत्सररूप प्रजापतीचे प्रतीक होय. ही वेदी विश्वरचनेचेही प्रतीक होय. १०,८०० मुहूर्त ( २ घटिका = १ मुहूर्त ) म्हणजे लहानात लहान सौर संवत्सर होय. नक्षत्रांच्या अवलोकनावरून हे ठरविले आहे. वेदकालीन ज्योतिषी व सृष्टिशास्त्रज्ञ यांनी याच संख्येच्या आधारे ४३,२०,००० ( किंवा ४,३२,००,००,००० ) वर्षे म्हणजे विश्वाचे कल्पमान होय असे ठरविले. हा ब्रह्मदेवाचा दिवस होय व इतकीच ब्रह्मदेवाची रात्र होय. ब्रह्मदेवाचा दिवस म्हणजे सृष्टिकाल, ब्रह्मदेवाची रात्र म्हणजे सृष्टीचा प्रलयकाल होय. भगवद्गीतेत ब्रह्मदेवाचा दिवस म्हणजे युगसहस्र व रात्रही तितकीच असे म्हटले आहे. तेथे युग म्हणजे चार युगांचा एक गट असे भाष्यकार म्हणतात. वरील सृष्टीच्या कालमानाचा प्राचीन ग्रीस व बाबीलोन येथे ओझरता निर्देश सापडतो. हे संपूर्ण कालगणित प्राचीन पुराणामध्ये व आर्यभट्टाच्या सिद्धांतग्रंथामध्ये तपशीलवार सांगितले आहे. बाबीलोनमध्ये ४,३२,००० वर्षे म्हणजे १ कल्प गृहीत धरत असत. इ. स. पूर्व आठव्या शतकापूर्वीचे हे विश्वकालगणनेचे विवरण भारतीयांपासून जगाला मिळाले.

शरीरविज्ञान किंवा इंद्रियविज्ञान वेदकालीच तयार होऊ लागले. इ. स. पूर्व दहाव्या शतकापर्यंत झालेल्या वेदग्रंथांमध्ये म्हटले आहे, की मानवी देहाचे व्यापार वायुतत्त्वामुळे होतात, वायुतत्त्व हेच देहात व्यापार करते, त्यासच प्राण ही संज्ञा आहे. वायू हीच विश्वाची प्रेरक शक्ती होय, असा विचार वेदांमध्ये अनेक ठिकाणी सांगितला आहे. देहातील विविध क्रिया लक्षात घेऊन प्राण, अपान, व्यान, उदान व समान हे प्राणाचे पाच प्रकार दर्शित केले. त्याच वेळी शरीरातील पित्ताचे कार्य आणि मस्तिष्कातील 'इंद्रयोनि' स्तनाकार मांसपिंड ( Pituitary gland ) याचे कफकार्य ज्ञात झाले होते. वात, पित्त व कफ ही तीन तत्त्वे आधारास धरूनच वेदांच्या अंतिम कालखंडात वैद्यक किंवा आयुर्वेद हे शास्त्र तयार झाले. वात हा सर्व शरीरभर फिरत असतो, फुफ्फुसांच्या योगाने

त्याला गती मिळते, असा विचार प्राचीन जगाला माहीत होता. भारतातूनच तो ईजिप्त व ग्रीसमध्ये गेला. हिपॉक्रिटसचा ग्रंथ 'वायुविज्ञान' प्रसिद्ध आहे. जवळ जवळ भारतीयांनी सांगितल्याप्रमाणे वातकार्याचे ते विवरण आहे.

प्लेटोने Timaeus या पुस्तकात सांगितलेले रोगविज्ञान भारतीय रोगविज्ञानाशी जुळते असे आहे. त्यात वात, कफ व पित्त यांच्यावर आधारलेली उपपत्ती सांगितली आहे. रुग्णपरीक्षेचे ग्रीकांच्या ग्रंथांतील निदान हे भारतीयांच्या वैद्यकाशी समान आहे. ग्रहबाधेची कल्पना भारत, बाबीलोन व ग्रीस यांमध्ये सारखीच होती. शल्यकर्म वा शस्त्रक्रिया-कौशल्यात प्राचीन भारतीयांनी पुष्कळ प्रगती केली होती. सुश्रुतसंहितेत शल्यकर्मास प्राधान्य दिले आहे. आयुर्वेदाने बरेचसे रोग शस्त्रक्रियेवाचून बरे करण्यावर भर दिला आहे; परंतु तसे करणे अशक्य झाले तर शस्त्रक्रिया अवलंबिली जात असे. माणसाचे किंवा इतर प्राण्यांचे निखळलेले हाड बसविणे व हाड मोडले असता सांधणे, अंतर्गळ बरे करणे, युद्धात वा अन्यथा शरीरात घुसलेले पदार्थ बाहेर काढणे, देवीच्या रोगावर सूचिभरण, युद्धात झालेल्या जखमा बऱ्या करणे, अबुर्द ( गाठ ) फोडून बरी करणे, तुटलेला अवयव सांधणे, विद्रूपता नष्ट करणे, औषधांचा द्रव शरीरात सूचीने भरून रोग बरे करणे इत्यादी गोष्टी शल्यकर्मात अंतर्भूत होतात. २० शस्त्रे धरून शस्त्रक्रियेच्या १२५ उपकरणांचे विवरण सुश्रुताने केले आहे. आहरण ( उपसणे ), संदन ( फोडणे ), छेदन ( कापणे ), एषण ( शरीरातील रोग शोधणे ), लेखन ( खरवडणे ), सीवन ( शिवणे ), वेधन ( टोचणे ) व विस्त्रवण ( निचरा करणे ) असे शस्त्रक्रियेचे प्रकार त्याने सांगितले आहेत. डोळे, तोंड, गुद, उदर इत्यादिकांवर शस्त्रक्रिया कशा कराव्या, हे तपशिलवार सांगितले आहे. विद्रूपता नष्ट करण्याच्या शस्त्रक्रियेचे ज्ञान जगाला प्रथम भारतीय वैद्यकापासून प्राप्त झाले आहे. जखमा बिघडू नयेत व भरून निघाव्यात याकरिता आवश्यक अशी ओषधीयुक्त घृते व तेले तयार ठेवीत. १० वर्षांपेक्षा जुने असे गायीचे तूप वापरून युद्धात तुटलेला हातही शरीराला जोडून बसवीत व तो नीट बसत असे. हिपॉक्रिटसच्या पूर्वीच हे शास्त्र भारतात विकसित झाले होते. परंतु आधुनिक शस्त्रक्रिया ही त्याच्या अत्यंत पुढे गेली आहे यात शंका नाही. अलेक्झांडरच्या स्वारीनंतर सुमारे चारशे वर्षे ग्रीस, रोम यांचा भारताशी सतत संबंध होता. त्या कालखंडात एकमेकांच्या विद्यांचे काही प्रमाणात आदान-प्रदान सुरू होते. या काळातील

ज्योतिष, शारीर व वैद्यक या विद्यांवर या आदान-प्रदानाचा ठसा उमटलेला दिसतो. भारतातील वैद्यकाचा ग्रीकांना परिचय होण्याचे कारण इराणी साम्राज्य हे होय. या साम्राज्याने भारताचा ग्रीसशी आयातनिर्यातीचा सांधा जोडला होता.

अंकगणित व बीजगणित यांना शास्त्रीय स्वरूप प्रथम भारतीयांनी दिले. दशांक पद्धती व शून्याची कल्पना ही जगाला मिळालेली भारतीय ऋणे होत. भारत हे अतिप्राचीन संस्कृतीतील विज्ञानाचे एक महत्त्वाचे केंद्र होते. आदान-प्रदान कोणीकडून कोणाकडे झाले याबद्दल वाद असला, तरी वैज्ञानिक दृष्टीने संशोधन करण्याची कल्पना प्राचीन भारतीयांमध्ये दृढमूल झाली होती, याबद्दल वाद नाही. वनस्पतिविज्ञान व प्राणिविज्ञान ही अस्सल मूळची भारतीय होत. कारण मुख्यतः भारतीय वनस्पती व प्राणी यांची परिगणना आयुर्वेदात केली आहे, हीच गोष्ट हे सूचित करते.

प्राचीन जगाच्या विज्ञानाचा पाया भारताने घातला हे गृहीत धरले; तरी भारतात विज्ञानाची वाढ इ. सनाच्या आठव्या शतकापासून का खुंटली, यांचे उत्तर शोधणे आवश्यक आहे. विचारस्वातंत्र्य होते व धर्मस्वातंत्र्य होते, तरी विज्ञानाची वाढ का होऊ शकली नाही ? याचे उत्तर मानवतावादी दृष्टिकोणातून मिळते. मानवतावादाचे मुख्य ध्येय प्रत्येक मानवाच्या नैसर्गिक योग्यतेचा संपूर्ण विकास करणे हे होय. मानवतावाद ही विज्ञानाची मुख्य प्रेरक शक्ती आहे. मानवतावादी ध्येयाच्या साधनेस सामाजिक व धार्मिक संस्थांची संघटना अनुकूल असावी लागते. त्यात व्यक्तीस कृतिस्वातंत्र्य प्राप्त होत असले, तर विचारस्वातंत्र्यावरची बंधने नष्ट होतात. निसर्गाचे प्रत्यक्ष ज्ञान निसर्गपदार्थांवर चालणाऱ्या मानवी कृतींतून निर्माण होते. निसर्गपदार्थांवर घडणारी कृती व वैज्ञानिक विचार ह्या गोष्टी परस्परावलंबी आहेत. कृतिस्वातंत्र्य नष्ट केले ते जातिसंस्थेने. वेदकालाच्या अंतिम कालखंडात जातिसंस्था निर्माण झाली. बुद्धकालापासून भारतीय जातिसंस्था दृढ होऊ लागली. जातिसंस्था आर्थिक दृष्ट्या समाजातील खालच्या, वरच्या भिन्न-भिन्न जमातींना उपजीविकेच्या साधनांची निश्चित हमी देत होती, म्हणून ती हजारो वर्षे टिकली. एका जातीतील व्यक्तीला दुसऱ्या जातीतील उद्योग व व्यवसाय करण्यास मनाई केली होती. विशेषतः खालच्या जातीच्या लोकांना वरच्या जातीचे व्यवसाय नाकारले होते. खालच्या जातीचे व्यवसाय हे क्रमाने कमी पवित्र मानले गेले याचा अर्थ असा निघतो, की

खालच्या जातीचे व्यवसाय म्हणजे शारीरकर्मे होत; त्या शारीरकर्मांना जातिसंस्थेने अपावित्र्य दिले. लोहार, कासार, कुंभार, रंगारी, तेली, शिंपी, विणकर, धनगर, गवंडी, सुतार, मूर्तिकार, चित्रकार, मंदिरकार आणि त्याचप्रमाणे व्याध, कोळी इत्यादी शिकारी जमाती आणि खाटीक, नावाडी इत्यादिकांचे धंदे शूद्र व्यवसाय ठरले. चांभार, ढोर, महार, बुरूड, मांग, भंगी इत्यादिकांचे व्यवसाय अतिशूद्रांचे ठरले. मळ, प्राण्याचे मृतशरीर व रक्त यांच्याशी म्हणजे घाणीशी ह्या अतिशुद्रांच्या व्यवसायांचा संबंध येत असल्यामुळे ते सर्वांत अपवित्र मानले. वर निर्दिष्ट केलेले शूद्रांचे व अतिशूद्रांचे व्यवसाय म्हणजे नैसर्गिक पदार्थांवरील प्रत्यक्ष क्रिया होत, भौतिक विद्या व तंत्र ही, निसर्गपदार्थांशी ज्या मानवी क्रियांचा प्रत्यक्ष संबंध येतो, त्या क्रियांतून जन्मतात. वरील जीवनोपयुक्त शारीरकर्मांचा महिमा अवमानिला. त्यामुळे माणसांच्या कर्मस्वातंत्र्यावर बंधन आपोआप आले. शूद्रांचा व सुसंस्कृत, बौद्धिक जीवन जगणाऱ्या उच्च जातींचा संबंध या बंधनामुळे तुटला. ज्याचा बौद्धिक विचाराशी संबंध, तो प्रत्यक्ष नैसर्गिक वस्तूंच्या स्वभावज्ञानापासून वंचित झाला. त्यामुळे त्याच्याही विद्या कुंठित झाल्या. खनिज पदार्थ, वनस्पतिवर्ग, प्राणिवर्ग इत्यादी भौतिक वस्तूंशी ज्या व्यवसायांचा नित्य संबंध, तेच अपवित्र, सामाजिक दर्जा खाली आणणारे व जन्मजात ठरले. त्यामुळे समाजघटक व्यक्तींच्या प्रयोगशीलतेवर जन्मजात बंधने पडली. व्यक्तित्व हे जातिभेदाच्या उंच, अनुल्लंघनीय व अभेद्य तटबंदीच्या कारागृहात बंदिस्त होऊन पडले.

धातुविद्या, प्राणिविद्या, रंगांचे रसायन, वनस्पतिविद्या, स्थापत्य ह्यांचा संबंध लोहार, रंगारी, सुतार, गवंडी, शिकारी, नावाडी इत्यादी व्यवसायांशी असतो. लोहार, सुतार, गवंडी, शिकारी, रंगारी इत्यादी जाती, म्हणजे एकंदर क्षूद्र जाती, ह्या वाङ्मयीन विद्यांपासून दूर ठेवल्या, त्यामुळे व्यवसायविषयक ज्ञानाला पुस्तकी विद्येचा आकार विशेषसा आला नाही. व्यक्तींच्या मस्तकातून पुस्तक निघते व पुस्तक हे संस्कृतीचे मस्तक बनते. एकंदर पुस्तकी विद्या ब्राह्मणांच्याच हातात राहिल्या. त्या क्षूद्रांच्या हाती कधी गेल्या नाहीत व जाऊ दिल्या नाहीत.

जातिभेदामुळे माणसांचे दूरदूरच्या प्रदेशांशी संबंध केवळ तीर्थयात्रेमुळे येत असत. एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात कायम वस्ती करण्यास माणसे कचरत असत. कारण प्रदेशभेद जातिभेदास कारण झाले. त्यामुळे उपजाती बनल्या.

एकमेकांत मिसळून राहण्याला जातिबंधनामुळे पायबंद पडला. मोकळ्या मनाने एकमेकांचे व्यवसायकौशल्य प्राप्त होण्यास व कौशल्याचा विनिमय होण्यास अडथळे निर्माण झाले.

इ. सनाच्या प्रारंभापासूनच परदेशगमन हे सदोष मानले जाऊ लागले. त्यामुळे देशोदेशी पर्यटनामुळे प्राप्त होणाऱ्या जगाच्या प्रत्यक्ष ज्ञानास भारतीय पारखे होऊ लागले. परदेशातील भिन्न मानवजाती, त्यांच्या संस्कृती, त्यातील ऋतुमान, वनस्पती, प्राणी, खनिजे यांचे ज्ञान त्यामुळे प्राप्त होऊ शकले नाही. दृष्टी संकुचित झाली. परंपरागत जुन्या विद्यांमध्ये सर्व ज्ञान साठलेले आहे व तेच सत्य आहे, अशी भावना दृढ झाली. मूळ ग्रंथांवर भाष्ये, भाष्यांवर टीका, टीकांवर विवरणे व उपटीका यांचाच सुकाळ आठव्या शतकानंतर होऊ लागला. भारताच्या बाहेरील मानवी जग किती मोठे व विविध आहे याची जाणीव राहिली नाही. भारत ही सुवर्णभूमी व पवित्र भूमी, इतर भूमी म्लेंच्छ भूमी व अपवित्र भूमी मानली गेली; त्यामुळे बाहेरचे शत्रू की मित्र याचाही विचार आला नाही. बाहेरून या सुवर्णभूमीवर अपहार करणाऱ्या जेत्यांच्या जमाती लागोपाट हल्ला करू लागल्या, लुटू लागल्या, येथे सत्ता स्थापू लागल्या; अशी हजार वर्षे लोटली. जातिभेदामुळे सामाजिक अभिसरण कुंठित झाले; व्यवसाय-स्वातंत्र्य नष्ट झाले. व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला सामाजिक अभिसरण आवश्यक असते. संस्कृतीच्या व ज्ञानाच्या विकासाला सामाजिक अभिसरणामुळे जीवन मिळते. जातिभेदामुळे समाज हा शिलीभूत ( दगडासारखा ) झाला.

युरोपात आधुनिक विज्ञानाचा व तंत्रविद्येचा इ. स. सतराव्या शतकात उदय होऊन आतापर्यंत सतत विकास होत राहिला आहे. वैज्ञानिक दृष्टी रूढिबद्ध सत्ताधारी खिश्चन धर्मसंस्थेच्या बंधनातून सतराव्या शतकात मुक्त झाली. वैज्ञा-निक दृष्टीने संशोधन करणाऱ्या व्यक्ती, युरोपातील मध्यमवर्गात मुख्यतः निर्माण झाल्या. युरोपीय समाजात सामाजिक अभिसरण म्हणजे एका व्यवसायातून खालच्या, वरच्या कोणत्याही व्यवसायात जाण्याची मुभा सरसहा होती. बौद्धिक पुस्तकी जीवन जगणाऱ्या कुटुंबातील माणसे हस्तव्यवसायातही शिरत व हस्त-व्यवसायी कुटुंबातील माणसे बौद्धिक व्यवसायातही शिरत; त्यामुळे हस्तकर्म व पुस्तककर्म यांचा सांधा जुळलेला होता. भारतात धर्मसंस्था विरुद्ध वैज्ञानिक संशोधन, असा संघर्ष कधी झाला नाही, तो युरोपात झाला. याचे कारण

हस्तव्यवसायी आणि बौद्धिक व्यवसायी यांच्यामध्ये एक प्रकारची एकात्मता होती; त्यामुळे निसर्गाचा नवा अर्थ हेच सत्य होय, अशी जाणीव बळावत चालली. त्यामुळे पवित्र धर्मग्रंथांतील निसर्गविषयक विचार श्रद्धेने दृढ झाले होते, तरी त्यांची मुळे खिळखिळी होऊ लागली. ग्रीस देशात प्राचीन काळी परंपरागत धर्मश्रद्धेवर आघात करणारे पंडित पुढे आले. त्यांना देहान्त शिक्षा झाल्या किंवा निर्वासित व्हावे लागले, तरी ग्रीक तत्त्वज्ञान विकासच पावत राहिले. मध्ययुगाच्या शेवटी युरोपात विज्ञानाच्या बाबतीत असेच घडले. प्लेटो, ॲरिस्टॉटल व इतर ग्रीक तत्त्वज्ञांनी यांच्या ग्रंथांचा ख्रिश्चन धर्माशी सुसंगत असा अर्थ लावण्याची पद्धत मध्ययुगात दृढ झाली होती. परंतु वैज्ञानिक दृष्टीचा उदय झाल्यानंतर प्लेटो, ॲरिस्टॉटल यांचे अधिक संशोधन सुरू झाले. हाच पुनरुज्जीवनाचा म्हणजे 'रेनासान्स'चा काळ होय. त्यामुळे पुनरुज्जीवनाबरोबरच नवजीवनाचा उदय झाला. विज्ञानदृष्टी स्पष्ट झाली.

निसर्गाचे आश्चर्यमय दर्शन व ते आश्चर्य उलगडण्याची मनीषा वैज्ञानिक दृष्टीला प्रसवते. आश्चर्य कधीच संपत नसते. म्हणून वैज्ञानिक शोधालाही कधीही अंत नसतो. निसर्गाचे प्रेम आणि निसर्गाचे आश्चर्य यांची नेहमीच संगत असते. विज्ञानप्राप्तीने हे आश्चर्य मावळते व प्रेम सफल होते. या निसर्गप्रेमामुळेच निसर्गाचे विज्ञान हेही स्वतः प्रिय होते; तेच साध्य बनते. प्राणिविज्ञान, निसर्गविज्ञान, खगोलविज्ञान यांची मांडणी ही निव्वळ उपयुक्ततावादातून झाली नाही. कारण विज्ञानाला उपयुक्तता त्या त्या विज्ञानाच्या विशिष्ट प्रगतीनंतरच येते.

वैज्ञानिक दृष्टीच्या मूलभूत, प्राथमिक अशा काही निश्चित धारणा आहेत. त्यांतील पहिली धारणा अशी, की माणूस व निसर्ग ह्यांचा अन्योन्य निकटचा संबंध आहे, माणूस हा निसर्गाचाच भाग आहे, त्याचे अपत्य आहे, माणूस स्वतःच एक विशिष्ट नैसर्गिक वस्तू आहे, त्यामुळे निसर्गाचे रहस्य माणसाला अवगत होऊ शकते; मानवाच्या इंद्रियांस व मनास निसर्ग हा आकलनीय आहे. दुसरी धारणा अशी, की निसर्गात लहरीपणा नाही. दैवी शक्तींनी निसर्गाच्या सुनियंत्रित व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप केला जात नाही. निसर्गाची रचना कार्यकारणभावाच्या नियमाने व गणितपद्धतीने निबद्ध झाली आहे. दैवी चमत्कार हा भ्रम आहे. जे जे चमत्कार म्हणून वाटतात, त्यांचा उलगडा कार्यकारणभावाच्या ज्ञानाने

होऊ शकतो. तिसरी धारणा अशी, की निसर्गाचे निरीक्षण व विविध प्रकारचे प्रयोग करून मिळवलेले अनुभव निसर्गनियमांच्या ज्ञानाचा आधार होय. अवलोकन व प्रयोग करीत असता नवेनवे ज्ञान प्राप्त होते व पूर्वप्राप्त ज्ञानात सुधारणा करता येते. चौथी धारणा अशी, की विश्वाची रचना ही बौद्धिक वा युक्त रचना आहे. त्या रचनेचे सिद्धांत म्हणजे सत्य होय. जगातील पवित्र धर्मग्रंथ जे ज्ञान देतात, त्या ज्ञानापेक्षा अधिक ज्ञान किंवा सत्य निसर्गाच्या अध्ययनातून मिळते.

युरोपातील धर्मसुधारणेच्या आंदोलनाचा प्रवर्तक, प्रॉटेस्टंट संप्रदायाचा एक प्रवर्तक कॅल्व्हिन ह्याने म्हटले आहे, की मनुष्याला आपल्या विशाल भव्य कृतीच्या द्वारे आपले अनंत ज्ञानाचे वैभव शिकविणारे, ईश्वराने निर्मिलेले निसर्ग हे पुस्तक आहे. बाह्य सृष्टीचे चिंतन हे एका अर्थाने ईश्वरचिंतनच आहे. विज्ञानाची आराधना युरोपात वाढू लागली, तेव्हा अनेक धर्माचार्यदेखील या आराधनेस अशा प्रकारे पाठिंबा देऊ लागले. या ईश्वरप्रणीत निसर्गग्रंथाच्या अवलोकनाने ॲरिस्टॉटलसारख्या मोठमोठ्या पंडितांच्या ग्रंथांतील सिद्धांतही खोटे पडतात, असे उघडकीस येऊ लागले. पाचवी धारणा अशी, की विज्ञानाने जे प्रयोगसिद्ध व बुद्धिसिद्ध ज्ञान मिळते, त्यातसुद्धा सुधारणा करण्याची शक्यता असते. कारण अनुभवांचे मंथन बुद्धी करते, अनुभवांमध्ये सुसूत्रता बुद्धिद्वारा निर्माण होते. विज्ञानदृष्टी म्हणजे अनुभवाश्रित बुद्धिवाद. अनुभव वाढत जातो, त्या प्रमाणात विज्ञान समृद्ध होत जाते. म्हणून विज्ञान कितीही पुढे गेले, तरी साहसी संशोधक त्याच्यापुढे धावत असतात. निश्चय व शंका यांचे द्वंद्व उच्च वैज्ञानिकाच्या मनास सतत अस्वस्थ करीत असते. सत्य सापडले, तरी त्याचा अपुरेपणा या द्वंद्वामुळे ध्यानात येतो व त्यामुळे ज्ञानाची प्रगती चालूच राहाते. सहावी धारणा अशी, की माणसाच्या जीवनास आवश्यक असलेल्या साधनांची जी वाण आहे, माणसाच्या जीवनास ज्ञात व अज्ञात असे जे धोके प्राप्त होतात, ती वाण भरून काढत राहणे व ते धोके टाळत जाणे, यांचे साधन विज्ञान होय. विज्ञानातून अनुप्रयुक्त विज्ञान व तंत्र विज्ञान प्रगत होते व ते जीवनातील वाण भरून काढते व धोके नष्ट करते. या संदर्भात शुद्ध विज्ञान हे केवळ साध्य राहात नाही; जिज्ञासातृप्ती हे त्याचे प्रयोजन राहात नाही; ते मानवी जीवनाचे साधन बनते. म्हणूनच लॉर्ड बेकन याने म्हटले आहे, की ज्ञान

ही माणसाची शक्ती आहे. निसर्गावर विजय मिळवून देणारे विज्ञान हे अद्वितीय साधन आहे. या संदर्भात विज्ञानाला उपयुक्ततावादी मूल्य येते. श्रमजीवी गरीब बहुजनसमाज अनादिकालापासून श्रम करीत आहे; दारिद्र्य, त्रास व थकवा त्याचा पिच्छा पुरवीत आहे; दैन्य हे त्याच्या जीवनाला सतत घेरून राहिले आहे. काबाडकष्ट व निराशा यांच्यातून बहुजनसमाजाला मुक्त करणारे सामर्थ्य विज्ञान व विज्ञानावर आधारलेले तंत्रज्ञान हेच होय.

परंतु विज्ञान व तंत्रज्ञान यांची इतकी वाढ आतापर्यंत झालेली आहे, तरी जगातील बहुजनसमाज अजून बंधनातच का राहिला आहे ? याचे उत्तर शोधले पाहिजे. त्याचे उत्तर राज्यसत्तेचे प्राबल्य व वैज्ञानिकांचे दौर्बल्य हे होय. धर्मसत्तेच्या बंधनातून मुक्त झालेला वैज्ञानिक व तंत्रज्ञ हा अलीकडे या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अधिकच प्रबळ बनलेल्या राज्यसत्तेच्या बंधनात सापडला आहे. वैज्ञानिक संशोधनाला लागणाऱ्या प्रयोगशाळा व साधनसामग्री फार खर्चाची असते. हा खर्च इतका प्रचंड असतो, की तो भागविण्याचे सामर्थ्य राज्यसत्तेतच असते. राज्यसत्ता वैज्ञानिकाला प्रयोगाकरिता प्रचंड धनराशी उपलब्ध करून देते; परंतु त्याबरोबरच आपली सत्ता स्थिरावण्याकरता, सामर्थ्यशाली करण्याकरता व आक्रमक शक्ती वाढवण्याकरता वैज्ञानिकांना व तंत्रज्ञांना स्वतःच्या इष्ट दिशेने काम करवून घेण्याकरता राबवते. त्यामुळे वैज्ञानिकांच्या प्रयोगस्वातंत्र्याला बंधन पडले आहे. सांप्रतच्या अणुयुगात वैज्ञानिक हा राज्यसत्तेच्या हिंसक कारवायांना मदत करणारे उपकरण बनला आहे. त्यामुळे वैज्ञानिक वा तंत्रज्ञ आपले नैतिक स्वातंत्र्य गमावून बसला आहे. मानवसमाजाची शांती व प्रगती यांस नितांत पोषक असे त्याचे संशोधनकार्य व्हावयास पाहिजे. त्याकरता त्याला खरेखुरे विवेकस्वातंत्र्य प्राप्त झाले पाहिजे. राज्यसत्तेच्या बंधनातून वैज्ञानिकवर्ग मुक्त झाला; तरच तो जनतेला राज्यसत्तेच्या बंधनाची किंवा अस्तित्वाची ज्यात गरज राहणार नाही, अशा स्वतंत्र मानवी समाजाच्या विश्वाची निर्मिती करू शकेल.

इ. सनाच्या अठराव्या शतकात युरोपमध्ये लोकशाही क्रांतियुगास आरंभ झाला. त्याची पार्श्वभूमी वैज्ञानिक क्रांती होय. तत्पूर्वी सतराव्या शतकाच्या वैज्ञानिक क्रांतीस सुरुवात झाली. त्यापूर्वी हजारो वर्षे विज्ञान घडत होते, वाढत होते, तसे ते मधूनमधून कुंठितही होत होते. कोपर्निकस व गॅलिलिओ यांनी गणितनिष्ठ वैज्ञानिक संशोधनपद्धती निर्माण केली. त्यामुळे विज्ञानाच्या प्रगतीला

सातत्य आले. पूर्वी पद्धती निश्चित झाली नसल्यामुळे विज्ञानप्रगतीला सातत्य नव्हते. ज्योतिषशास्त्र फार पूर्वीचे, ते प्रथमपासून गणितनिष्ठ आहे. सतराव्या शतकापासून इतर विज्ञानांना—विशेषत: भौतिकी व रसायन या विज्ञानांना—गणिताचा पाया मिळाला. ज्या ज्या विज्ञानांना गणिताचा पाया लाभतो, ते ते विज्ञान हे खऱ्याखुऱ्या विज्ञानपदवीस प्राप्त होते. वस्तूचे गुणधर्म व गणिती मोजमाप यांचा सांधा नीट जुळला, म्हणजे कार्यकारणभावाची निश्चिती होते. गणितनिष्ठ कार्यकारणभावाच्या निश्चयाच्या योगाने विज्ञान हे भविष्यवादी बनते. उदाहरणार्थ, चंद्र-सूर्यांची ग्रहणे निश्चितपणे वर्तविता येतात याचे कारण, चंद्र, सूर्य व पृथ्वी यांच्या गतीचे तुलनात्मक गणिती मोजमाप सूक्ष्मपणे करता येते. भौतिकी व रसायन ही विज्ञाने गणितबद्ध पद्धतीने विकास पावू लागल्यामुळे अनुप्रयुक्त तंत्रविज्ञान वेगाने प्रगती करू लागले. त्यामुळे युरोपात औद्योगिक क्रांती अठराव्या व एकोणिसाव्या शतकात वेगाने सुरू झाली. भांडवलशाही समाजरचना अस्तित्वात आली. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मूलभूत मानवी नैतिक अधिकारांवर आधारलेली लोकशाही क्रांती घडू लागली.

हाच क्रांतियुगाचा प्रारंभ. याच वेळी उत्पादनाची साधने व उत्पादनपद्धती बदलली म्हणजे समाजरचना बदलते व मानवी प्रयत्नांनी समाजरचना बदलताही येते, असा इतिहासाचा एक अर्थ लक्षात येऊ लागला. त्यापुढे स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूलभूत मानवी अधिकारांच्या स्थापनेकरिता आवश्यक अशी समाजरचना स्थापणे आवश्यक आहे, अशी समाजरचनाच शुद्ध व न्याय्य होय, अशी विचारसरणी उदयास आली. यासच साधारणपणे समाजवाद असे म्हणतात. माणसाची माणसाने चालविलेल्या पिळवणुकीच्या पद्धतीवर आधारलेल्या, उच्चनीच वर्गवारी असलेल्या समाजरचनेचा अंत करणे युक्त होय, असा विचार समाजवादी विचारसरणीच्या मुळाशी आहे. समाजवादी क्रांती घडवून आणणे आवश्यक आहे, असे मानणाऱ्या विचारवंतांनी, समाजनेत्यांनी समाजवादाच्या स्थापनेकरिता सिद्ध व्हावे; असा विचार पश्चिम युरोपात प्रसृत होऊ लागला. त्यांतील काही समाजवादी असेही म्हणू लागले, की समाजरचनेचा केवळ आर्थिक पाया बदलून मानवी पिळवणूक थांबणार नाही, त्याकरिता राज्यसंस्थेचेही विसर्जन करणे आवश्यक आहे. यास तात्त्विक अराजकवाद म्हणतात.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात कार्ल मार्क्सने लोकशाही क्रांती, समाजवाद

व तात्त्विक अराजकवाद यांची समीक्षा केली. त्याचे म्हणणे असे, की समाजवाद हा नैतिक दृष्ट्या युक्त असला, तरी समाजवादी क्रांती केवळ सदिच्छेने व विचारपरिवर्तनाने घडू शकत नाही. त्याला अनुकूल अशी सामाजिक परिस्थिती उत्पन्न व्हावी लागते. मध्ययुगीन सरंजामशाहीतून समाजवाद जसा उत्पन्न होऊ शकत नाही; तसा भांडवलशाही समाजरचना जोपर्यंत उत्कर्ष पावत असते, तोपर्यंत समाजवादी क्रांती निर्माण होऊ शकत नाही. सामाजिक कार्यकारणभावाचा नियम उल्लंघून काहीही करता येणे माणसास अशक्य आहे. कार्यकारणभावाची नियती उल्लंघनीय असते. नियतीचे ज्ञानच स्वातंत्र्यास जन्म देते. तो म्हणतो, की आतापर्यंतचे समाजवाद हे युरोपिअन म्हणजे अवास्तव कल्पनारंजित आहेत. वैज्ञानिक समाजवाद आणि युरोपिअन समाजवाद असे समाजवादी विचारसरणीचे दोन भाग त्याने सांगितले. त्याच्या तथाकथित वैज्ञानिक समाजवादाची उपपत्ती अशी :

विशिष्ट आर्थिक उत्पादनपद्धती हा विशिष्ट समाजरचनेचा पाया असतो. त्या पायावर सामाजिक वर्गसंबंध आधारलेले असतात. सत्ताधारी वर्ग व सत्ताहीन वर्ग हे वर्गीय समाजसंस्थेचे वैशिष्ट्य असते. उत्पादनाच्या साधनांवर सत्ताधारी वर्गाचे स्वामित्व असते. अशी विषम समाजरचना टिकविण्याकरिता सत्ताधारी वर्ग राज्यसंस्था निर्माण करतो, राज्यसंस्था म्हणजे दंडसंस्था; जबरदस्ती करणारी संस्था. आर्थिक उत्पादनपद्धती बदलली म्हणजे समाजाचे वर्गसंबंध बदलतात; सत्ताधारी वर्ग बदलतात. एक विशिष्ट आर्थिक उत्पादनपद्धती जोपर्यंत उत्कर्ष पावते; तोपर्यंत व त्यामुळे तिच्यावर आधारलेली समाजपद्धती स्थिर राहते, सत्ताधारी वर्गही उत्कर्ष पावतो. ही विशिष्ट आर्थिक पद्धती ढासळू लागली, म्हणजे पिळला जाणारा वर्ग सत्ताधारी वर्गाच्या हातातील सत्ता हिसकतो व समाजक्रांती होते. वर्तमान भांडवलशाही समाजसंस्थेच्या अर्थोत्पादनपद्धतीचा पाया ढासळू लागेपर्यंत समाजवादी क्रांती होणार नाही. भांडवलशाहीतील कामगार वर्ग हा क्रांतिकारक वर्ग होय. या वर्गाच्या नेतृत्वानेच समाजवादी क्रांती जन्माला येईल. भांडवलशाही समाजव्यवस्थेत समाजाची विभागणी सत्ताधारी भांडवलशाही वर्ग आणि पिळला जाणारा कामगार वर्ग अशीच राहणार. याच कामगार वर्गात समाजातील बहुसंख्य व्यक्ती अधिकाधिक समाविष्ट होत राहणार; श्रीमंत अधिक श्रीमंत होत जाईल, गरीब अधिक गरीब होत जाईल,

त्यामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा एका बिंदूपर्यंत उत्कर्ष होऊन ती अपकर्षास जाऊ लागेल. त्यामुळे कामगारवर्ग भांडवलशाही वर्गाच्या हातातील सत्ता काबीज करून बहुजनसमाजाची म्हणजे कामगारवर्गाची हुकूमशाही स्थापन करील. भांडवलशाही वर्ग नष्ट होईपर्यंत ही हुकूमशाही राहील, या हुकूमशाहीत आर्थिक उत्पादनसाधने ही सामाजिक मालकीची होतील. हीच समाजवादी क्रांती होय. खाजगी मालकी असलेली आर्थिक उत्पादनसाधने समाजाच्या मालकीची होणे म्हणजेच समाजवाद होय. भांडवलशाही नष्ट झाल्यावर हळूहळू राज्यसत्ताही आपोआप पिकल्या पानाप्रमाणे गळून पडेल व राज्यसत्ताविहीन समाजवादी समाजरचना म्हणजे साम्यवादी समाजसंस्था ( कम्युनिझम ) उदयास येईल.

कार्ल मार्क्सचा हा वैज्ञानिक समाजवाद एका अर्थी युटोपियनच आहे. समाजपरिवर्तनाचा कार्यकारणभाव त्याने सांगितला. हा कार्यकारणभाव गणिती मोजमापावर आधारलेला नाही. जोपर्यंत गणिती मोजमापाच्या सूत्रात कार्यकारणभावाचे सिद्धांत सिद्ध करण्यापर्यंत विज्ञान प्रगत होत नसते, तोपर्यंत त्याला विकसित किंवा खरेखुरे विज्ञान ही पदवी प्राप्त होत असते. सामाजिक शक्तींचे गणितागत कार्यकारणभाव अजून तरी माणसास सिद्ध करता आले नाहीत. त्यामुळे सामाजिक शास्त्रे आजच्या प्रगत भौतिक विज्ञानाच्या दर्जास प्राप्त होऊ शकली नाहीत. समाजवाद व साम्यवाद वा कम्युनिझम हे ध्येयवाद सामाजिक जीवनाचे उच्चतम नैतिक ध्येयवाद आहेत. त्या ध्येयवादांच्या अद्भुतरम्य स्वरूपाकडे समाजातील पिडीत व त्रस्त माणसे आकर्षित होतात. आदर्शवादी विचारवंतही त्याने मोहित होतात. ही मोहिनी उदात्त व पवित्र आहे. विद्यमान विज्ञाने सर्व मानवांच्या हितार्थ वापरली, तर जगातील दारिद्र्य व दैन्य यांचा संपूर्ण अंत त्वरित होईल, हे सत्य आहे. त्याचे गणितही मांडता येते. परंतु ह्या समृद्धीच्या ध्येयाकडे, समतेच्या क्रांतीकडे मानवसमाज जाईल की नाही याचे गणित मात्र मांडता येत नाही. म्हणजे वैज्ञानिक समाजवाद अजून वैज्ञानिक पद्धतीने मांडता येत नाही.

युटोपियन आदर्शवाद मानवसमाजातील सामाजिक गटांना कार्यप्रवृत्त करतो, हे खरे आहे. बुद्धिवादाने किंवा वैज्ञानिक पद्धतीने असिद्ध किंवा सिद्ध होण्यास अशक्य आदर्श माणसांची क्रियाशक्ती संघटित करतात; त्या शक्तींना वारंवार

उत्साहाचे भरते येते; युगानुयुगे ही क्रियाशक्ती समाजांना प्रेरणा देत राहिली आहे. असे आदर्श म्हणजे पुराणकथांसारख्या मिथ्यकथा ( Myths ) असतात. युटोपियन आदर्श हे जेव्हा सामाजिक आंदोलनांची प्रेरणा देतात, तेव्हा त्यांना मिथ्यकथेचेच रूप येते. ते खरेच आहेत, अशी श्रद्धा उत्पन्न होते. धर्मसंस्थांचे इतिहास याचे उत्कृष्ट उदाहरण होय. मिथ्यकथा मानवाच्या उत्पत्तीपासून आजपर्यंत मानवी मनाची जबर पकड धरून बसलेली शक्ती आहे. गेल्या ५५ वर्षांचा फॅसिझम व कम्युनिझम यांचा इतिहास हेच सिद्ध करतो.

स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या नैतिक आदर्शांचेच आविष्कार समाजवाद, कम्युनिझम किंवा तात्त्विक अराजकतावाद होत. गेल्या ५५ वर्षांमध्ये अनेक समाजवादी राष्ट्रे उदयास आली आहेत. त्या ठिकाणी अस्तित्वात आलेल्या राज्यसंस्था अत्यंत बलिष्ठ बनल्या आहेत. आधुनिक वैज्ञानिक तंत्रावर आधारलेल्या लष्करी सामर्थ्यावर जगातील सर्वच सुधारणेच्या पथावर असलेल्या राष्ट्रांमध्ये राज्यसत्ता सर्वंकष व बलिष्ठ झाली आहे. आधुनिक माणूस या राज्यसत्तांच्या बंदिवासात जखडला गेला आहे. त्यातील बहुजनसमाज त्या बंदिवासाचा प्रतिकार करण्यास उत्सुक नाही; कारण त्याला स्वातंत्र्याचे मूल्य मान्य नाही. कारण स्वातंत्र्य व स्वत:वरची जबाबदारी या दोन्ही एकत्र असतात. सत्ताधारी वर्ग योगक्षेमाची काळजी घेण्याचे आश्वासन देतो; स्वातंत्र्य म्हणजे कर्तृत्वाची अनिर्बंध संधी व स्वतःच्या योगक्षेमाची जबाबदारी स्वतःवरच. अशा प्रकारचे स्वातंत्र्य बहुतेक माणसे नाकारतात; स्वातंत्र्याचे भय वाटते. कारण आत्मविश्वास गमावलेला असतो. त्यामुळे हुकूमशाही राज्यव्यवस्था सुसह्य वाटते. परंतु हे स्वातंत्र्याचे भय पश्चिमी सुसपन्न समाजातील व्यक्तींना वाटेनासे झाले आहे. राज्यसत्तेचे ओझे फेकण्याची प्रवृत्ती उत्पन्न होऊ लागली आहे. राज्यसत्तेच्या बंधनातून मुक्त होऊन समतेकडे व स्वातंत्र्याकडे जाणारा निरंतर क्रांतिवाद या बलनिष्ठ राज्यसत्तांना आव्हान देत आहे परंतु मुख्य प्रश्न असा आहे, की आधुनिक युगातील समाजनियंत्रक राज्यसत्ता नष्ट करून स्वातंत्र्याचे मानवी जग निर्माण करता येईल काय ?

मनोविश्लेषणशास्त्रज्ञ सिग्मंड फ्रॉइड यांच्या मते मूलतः मानवी संस्कृती ही स्वातंत्र्याच्या नकारावर म्हणजे निर्बंधावर आधारलेली आहे. त्याने मानवी संस्कृतीच्या अस्वास्थ्याची मीमांसा केली आहे. ही मीमांसा त्याने मानवी

मनाच्या वैयक्तिक व सामाजिक मूलभूत प्रेरणांच्या [illegible] आहे. तो म्हणतो, की कामदेवतत्त्व ( Eros ) व यमतत्त्व ( Thanatos ) म्हणजे क्रमाने इच्छापूर्तीची व सुखप्राप्तीची प्रेरणा व मरणप्रेरणा या मूलभूत प्रेरणा होत. मरण-प्रेरणा म्हणजे जीवनातून सुटका करून घेणारी प्रवृत्ती. या दोन प्रेरणा एकमेकांच्या विरोधी व एकमेकांच्या पूरक व एकार्थी एकात्मक प्रेरणा आहेत. कामतत्त्वाला अडथळा करणारे वस्तुतत्त्व ( Reality Principle ) होय. उदाहरणार्थ, भूक शमविण्याची प्रेरणा कितीही प्रबळ असली, तरी प्राण्याजवळ अन्न नसेल तर भूक दाबावी लागते. अन्नाचा अभाव हे वस्तुतत्त्व होय. पुरुषाला कामवासना झाली, परंतु स्त्री नकार देत असेल, तर कामवासना आवरावी लागते. नकार देणारी स्त्री हे वस्तुतत्त्व होय. माणसाला श्रम नको असतात, आळस असतो. आळसा-मुळे इच्छातृप्ती करणे कठीण जाते, माणसे निराश होऊन स्तब्ध बसतात, पण काम करत नाहीत; रोग झाले तरी फिकीर करीत नाहीत, आत्महत्याही करतात, या प्रवृती मानवी मनातील यमतत्त्वाच्या निदर्शक आहेत. कारण त्यामुळे मरणही जवळ येते. माणसे मोक्षमार्गी बनतात, हे यमतत्त्वाचेच निदर्शक होय. या यम-तत्त्वास फ्रॉइडने ' निर्वाणतत्त्वे ' अशी संज्ञा दिली आहे. प्रवृत्तिमार्ग व निवृत्ति-मार्ग हे क्रमाने कामदेवतत्त्व व निर्वाणतत्त्व यांचे सांस्कृतिक आविष्कार होत.

फ्रॉइडने मानवी संस्कृतीची मीमांसा सांगताना कामप्रेरणेचे दमन हे संस्कृतीचे विधायक तत्त्व सांगितले आहे. कामपूर्तीचे दमन करणे हे वस्तुतत्त्वाधारे आवश्यक ठरते. श्रमद्वारा इष्ट वस्तू संपादन करूनच कामपूर्ती कालांतराने करून घेणे माणसास शक्य असल्यामुळे दमनाची आवश्यकता ठरते. हे दमन प्रथम पित्याच्या जबरदस्तीने करावे लागते. पिता हा पहिला सत्ताधारी होय. आदिम स्थितीतील समाजाच्या अवस्थेत पुत्र पित्यांचा वध करतात; परंतु नंतर पुत्रांच्या लक्षात येते, की सामुदायिक रीतीने जीवन जगण्याकरिता दमनाची आवश्यकता आहे. समुदायाने पकडलेली शिकार समुदायाने वाटून घेतली, तरच पुढील शिकार साधता येते. अशा रीतीने सामुदायिक दमनाचे नियम तयार होतात. म्हणजे नियमांच्या पद्धतीच्या रूपाने पित्याचा पुन्हा अवतार होतो. राज्यसंस्थेचे व सामाजिक कायद्यांचे किंवा नितिनियमांचे मूळ अशा रीतीने सांगता येते. हेच दमनाचे नियम किंवा नीतिशास्त्र मानवी मनात विवेकबुद्धीच्या रूपाने रोवले जाते. या विवेकबुद्धीस सुपर अहंभाव ( Super-ego ) असे फ्रॉइड म्हणतो. फ्रॉइडच्या

मताने आर्थिक उत्पादनसंस्था ही आधुनिक युगात मुख्य सामाजिक संस्था बनलेली आहे. कामनेची किंवा वासनेची पूर्ती करण्याची प्रवृत्ती बाजूला सारून कामगार वर्गास श्रम केल्याशिवाय अर्थोत्पादन करणे शक्य नाही. अर्थोत्पादनाकरिता, त्याच्या विभाजनाकरिता कामपूर्तीचे नियंत्रण करणारे सामाजिक नियम अपरिहार्य ठरतात व हे नियम अंमलात आणणारी राज्यसंस्थाही अपरिहार्य ठरते.

स्वातंत्र्य हे अंतिम मानवी मूल्य म्हणून लोकशाही समाजवादाने स्वीकारले आहे. परंतु फ्रॉइडच्या मते, स्वातंत्र्याचा नकार ही संस्कृतीची अपरिहार्य अशी कारकशक्ती आहे. ती मानवी मनात सुपर अहंभाव वा विवेकबुद्धी या रूपाने वास करते व मनाच्या बाहेर समाजघटना व राज्यसंस्था या रूपाने व्यक्तींचे दमन व दंडन करीत राहते. याचे उत्कृष्ट उदाहरण समाजवादी क्रांती झालेल्या राष्ट्रांमध्ये सापडते. तेथे व्यक्तिस्वातंत्र्य अभावानेच तळपते. तेथील कामगारवर्ग स्वातंत्र्य गमावून बसला आहे. प्रगत व समृद्ध पश्चिमी राष्ट्रांमध्येसुद्धा राज्यसत्ता बलिष्ठ बनली आहे व व्यक्ती बंधनात सापडली आहे. तेथे सर्व वर्गांना आर्थिक स्वास्थ्य जरी कमीजास्त प्रमाणात लाभलेले असले, तरी श्रमिक वर्गांना कष्टाचेच जीवन जगावे लागत आहे. तेथे यांत्रिक प्रगतीचे कायम समृद्धीचे युग डोकावत असले, तरी प्रबल राज्यसत्तेच्या धाकाने ते पुन्हा पुन्हा मागे सरत आहे. म्हणूनच प्रगत व समृद्ध पश्चिमी राष्ट्रांत आणि तथाकथित समाजवादी क्रांती झालेल्या राष्ट्रांत निरपवाद स्वातंत्र्य आणि आर्थिक समता या ध्येयाकडे जाणारा निरंतरचा क्रांतिवाद व बंडसातत्यवाद वाढत आहे. माओ त्से तुंगचा निरंतर क्रांतिवाद व कामूचा बंडसातत्यवाद आता जगाला सतत अस्वस्थ करीत आहे. माओ त्से तुंगच्या मते समाजात सतत समतोल कधीच राहात नसतो; समतोल थोडा वेळ टिकतो व नंतर समाजाचा तोल बिघडून असमतोल निर्माण होतो. हे सम व विषम तोलांचे द्वंद्व हा समाजवस्तूचा स्वाभाविक नियम आहे. याच नियमाच्या आधारे माओ त्से तुंग निरंतर क्रांतिवाद सिद्ध करतो.

समाजवाद व तात्त्विक अराजकवाद हे युटोपियन असले, तरी ते मानवी समाजाचे अंतिम, नैतिक आदर्श आहेत. नैतिक आदर्शाकडे आकर्षित होऊन धावणारा माणूस शुद्ध नैतिक जीवन जगणारा असेल, तरच तो खऱ्या अर्थाने क्रांतिकारक ठरतो. क्रांतिपूर्वकाळातील क्रांतीच्या नेत्यांमध्ये आणि अनुयायांमध्ये खरीखुरी नैतिक प्रेरणा असली, तरच ते क्रांती घडवून आणतात; परंतु असे थोडेच

असतात. त्यांना सुखदुःखाची पर्वा नसते. त्यांच्या ठिकाणी तपश्चर्येचा अग्नी धगधगत असतो, पेटत असतो. इतर सामान्य अनुयायी त्यांच्या संसर्गाने पेट घेत असतात. अंतिम स्वार्थत्याग व आत्मबलिदान करण्यास ते सज्ज होतात. क्रांतिकार्य ही एक आध्यात्मिक साधना आहे. परंतु या क्रांतियुगातील क्रांतिकारक माणसे सत्ता काबीज केल्यावर ही आध्यात्मिक साधना विसरतात; सत्तेच्या व संपत्तीच्या मोहिनीला वश होतात. कारण अध्यात्मयोग हे क्रांतिवादाचे अधिष्ठान आहे, हे त्यांना माहीत नाही. महात्मा गांधींशिवाय किंवा एम्. एन्. रॉयशिवाय किंवा योगी अरविंद घोषांशिवाय हे आध्यात्मिक योगाचे तत्त्वज्ञान क्रांतिवाद्यांस कळलेले नाही, आकलन झालेले नाही. त्याचे आकलन व त्याचा दूरगामी गंभीर अर्थ महात्मा गांधी, एम्. एन्. रॉय व अरविंद घोष यांनाच कळला आहे. या तिघांचे विश्वविषयक तत्त्वज्ञान भिन्न आहे, हे जरी खरे असले; तरी सत्ता व संपत्तीची मालकी यांपासून अलिप्त राहून नैतिक जीवन जगणारा व अनंत सत्याचा शोध करीत राहणारा साधक व सिद्ध यांचा वर्ग समाजाचा शिक्षक म्हणून समाजास कायम आवश्यक आहे, या बाबतीत त्यांचे विचार समान आहेत. तात्पर्य, क्रांतिवाद्यांना त्यागाचे जीवन जगण्याची म्हणजे अध्यात्मयोगाची प्रेरणा जर लाभली, तरच क्रांतियुग विजयी होत राहील.

नैतिक स्वातंत्र्य ज्यांना जीवनात अनुभवण्याची शक्ती व तत्परता आहे, तेच क्रांतियुगाला विजयाच्या मार्गाने नेऊ शकतील. सत्ताधाऱ्यांचा छळ सोसताना, बंधनागारात दीर्घकाल जीवन जगताना व सत्ताधाऱ्यांनी प्रपंच उद्ध्वस्त केला असताना, नैतिक विवेक जागृत ठेवणारी निष्ठा म्हणजे नैतिक स्वातंत्र्य होय. अवलोकितेश्वर या बोधिसत्त्वाची प्रतिज्ञा अशी आहे– " जोपर्यंत जग दुःखात आहे, तोपर्यंत मी मुक्त होऊ इच्छित नाही " सत्ता आणि विषयभोगाबद्दल आसक्ती ही आत्म्याची बंधने. ही नाकारणे म्हणजे आत्मस्वातंत्र्य होय. शुद्ध नैतिक जीवन जगायचे म्हणजे सत्ता आणि इंद्रियविषय यांचा भोग नाकारायचा आणि सर्व मानवांना स्वातंत्र्याच्या विश्वात जगता यावे म्हणून सतत प्रयत्न करावयाचा. त्यागाचे जीवन हे एक अंतिम मूल्य आहे. तो आदर्श आहे. जीवनातील निर्वाण किंवा मोक्ष हे त्याचे स्वरूप आहे. हा निर्वाणाचा अनुभव जे घेतात, तेच क्रांतीचे नेते होऊ शकतात. हा अनुभव म्हणजेच अध्यात्मयोग होय. सत्ता आणि संपत्तीचा मोह हा क्रांतियुगाचा धोका आहे. या धोक्यात समाजवादी

क्रांती सापडली आहे. ज्या समाजस्थितीत कामगारवर्ग हा संपत्तीच्या उत्पादनाची क्रिया ही क्रीडा आहे असे अनुभवतो; त्यात जबरदस्ती, दैन्य वा थकवा नाही असे अनुभवतो; त्या समाजस्थितीत क्रांतियुगाची प्रभा उदयाला आली, असे म्हणता येईल. ही प्रभासुद्धा क्षणिक ठरण्याची शक्यता असते. जगाच्या अंतापर्यंत तिला धोका असतो. म्हणून नैतिक स्वातंत्र्यात जगणारा म्हणजे अध्यात्मयोगाची साधना करणारा क्रांतिकारकवर्ग कायम आवश्यक ठरतो.

विशेषतः ज्या देशांमध्ये जनता गरीब आहे, त्या देशांत अशा क्रांतिकारक नेत्यांची अधिकच गरज आहे.

संदर्भ : "वैदिक संस्कृतीचा विकास" १९७२, पृष्ठ ४७९ ते ४९९

# ७

# विज्ञानांची मराठी परिभाषा

सर्व भारतीय विद्वान व विशेषतः मराठी भाषिक विद्वान यांना वैज्ञानिक विषयांवर लिहिताना निरुत्साहित करणारी मुख्य अडचण म्हणजेच आवश्यक अशा वैज्ञानिक संज्ञांची उणीव ही होय. चांगल्या चांगल्या तज्ज्ञांना वैज्ञानिक संज्ञांच्या उणिवेमुळे देशी भाषांमध्ये लिहिण्याची इच्छा असूनही लेखणी उचलण्यास उत्साह वाटत नाही. त्याकरिता अलीकडे ३०-३५ वर्षांमध्ये तंत्र व विज्ञान विषयांस आवश्यक अशा परिभाषा व संज्ञाकोशांच्या निर्मितीचे अनेक प्रयत्न करण्यात आले आहेत व त्या दिशेने प्रगतीही पुष्कळ झाली आहे. त्या प्रयत्नांचे सातत्यही राखण्यात येत आहे. केंद्र सरकार, प्रादेशिक सरकारे, विद्यापीठे व खाजगी व्यक्ती व संस्था यांचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु ह्या प्रयत्नांमध्ये अजून एकसूत्रता येत नाही.

निरनिराळ्या विद्वानांनी निरनिराळ्या प्रकारच्या संज्ञा एकाच कल्पनेच्या अभिव्यक्तीकरिता सुचविल्या आहेत. संज्ञानिर्मितीच्या धोरणाच्या बाबतीतही मतभेद वा दिशाभेद दिसतात. उदाहरणार्थ; पहिला व सर्वांत जुना विद्वत्पक्ष असे म्हणतो की, संज्ञा वा परिभाषा यांची निर्मिती त्या भाषेच्या प्रकृतीशी सुसंगत पाहिजे. आंतरराष्ट्रीय पश्चिमी संज्ञा व परिभाषा या लॅटिन व ग्रीक भाषांच्या छायेखाली तयार झाल्या आहेत व पश्चिमी भाषांच्या प्रकृतीशी त्यांचे सुसंवादित्व त्यामुळे अबाधित राहते. भारतीय भाषांच्या प्रकृतीशी त्या विसदृश आहेत. म्हणून आंतरराष्ट्रीय संज्ञांचा वा परिभोषांचा स्वीकार न करता भारतीय भाषांच्या

प्रकृतीशी जुळतील, अशा नव्या संज्ञा व परिभाषा तयार करणे योग्य होय. या पक्षात एक आत्यंतिक भाषाशुद्धीवादी पंथ आहे. ह्या पंथाने भारतीय भाषांमध्ये गेली सहाशे वर्षे रूढ होत गेलेले फार्सी अरबी शब्दही काढून टाकण्याचा खटाटोप गेली ५० वर्षे चालविला आहे. कै. डॉ. रघुवीर इत्यादी मंडळींनी याच धोरणाने प्रचंड परिभाषा कोश संस्कृत भाषेच्या आधारे निर्मिले आहेत. त्यासच अनुसरून प्रथमतः महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयाने प्रशासनिक कार्यवाहीकरिता "पदनाम कोश"सारखे संस्कृतनिष्ठ कोश निर्माण केले.

परंतु अलीकडे या भाषाशुद्धीवादी पक्षाला मागे टाकून दुसरा पक्ष पुढे आला आहे. त्या पक्षाचे म्हणणे असे की, तंत्र व विज्ञान यांसंबंधी संज्ञा व परिभाषा तयार करताना एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. ती ही की, आपल्या भाषा व साहित्य हे अजून परावलंबी व अनुकरणात्मक अवस्थेत आहे. त्यात तंत्र व विज्ञान यांची मांडणी कधीच न झाल्यामुळे आपल्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना नजीकच्याच नव्हे, तर दूरच्या काळापर्यंत पश्चिमी भाषांमधील तंत्र व विज्ञान यांच्यावरच अवलंबून राहावे लागणार आहे. अशा स्थितीत आंतरराष्ट्रीय पश्चिमी संज्ञा व परिभाषा यांचा त्याग करून नवीन संस्कृतनिष्ठ संज्ञा व परिभाषा रूढ करू लागल्याने विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा तंत्र व विज्ञान यांच्या मूलस्थानाशी, उगमाशी व ज्ञानभांडागाराशी संबंधच तुटेल व त्यामुळे तंत्र व विज्ञान यांची देशी भाषांमध्ये अभिव्यक्ती होण्याची आशाच दुरावेल. अधिक प्रयत्नशील विद्यार्थी व शिक्षक यांना दुबार श्रम पडतील. कारण त्यांना देशी व पश्चिमी अशा भाषांवर सारखेच परिश्रम करण्याची पाळी येईल. तसे होऊ नये, म्हणून पश्चिमी संज्ञा व परिभाषा यांचा त्याग करू नये; परंतु सामान्य कल्पनांचे वाचक असे नवीन संस्कृतनिष्ठ शब्द स्वीकारावे. रसायनशास्त्रातील १०३ मूलद्रव्यांच्या मूळ संज्ञा ठेवणे जरूर आहे. कारण त्या मूलद्रव्यांची हजारो प्रकारची संयुगे रसायनशास्त्रात येतात. उदाहरणार्थ; ऑक्सिजन हे मूलद्रव्य धरले, तर त्या मूलद्रव्याची विद्युत्संयोगाने किंवा इतर मूलद्रव्यांच्या संयोगाने पाच-पंचवीस प्रकारची संयुगे तयार होतात; तसेच त्या मूलद्रव्याचेही रूपांतर होते. या सर्वांना रघुवीर पद्धतीचे नवीन संस्करण लागू केले, तर मराठी किंवा देशी भाषेतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे किंवा शिकविणाऱ्या शिक्षकांचे

अध्ययनाचे काम दुबार वाढते. त्यापेक्षा मूलद्रव्यांच्या संज्ञा जशाच्या तशा पश्चिमी स्वरूपातच ठेवून स्वीकारणे, सध्याच्या अविकसित अवस्थेत व्यवहार-दृष्ट्या योग्य ठरते. परंतु हे करताना संस्कृत व मराठी पर्यायशब्द देऊन स्पष्टी-करण केल्याने देशी भाषांचीही वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती चालू ठेवणे शक्य असते. मूलद्रव्यांमधील अनेक द्रव्ये गॅस या स्वरूपात असतात. त्यांचे सामान्य-रूप 'गॅस' होय. गॅसला 'वायू' हा पर्याय प्रस्तुत कोशात दिला आहे. संस्कृतमधील 'वायू' शब्दाचा अर्थ व रसायनशास्त्राच्या 'वायू' शब्दाचा अर्थ यांच्यात फरक असला, तरी दोन्ही अर्थ काही अंशी मिळतेजुळते आहेत. प्रस्तुत कोश हा मध्यममार्गी कोश आहे. उदा०; 'इलेक्ट्रॉन' हा शब्द तसाच ठेवला आहे. परंतु व्याख्या करताना 'ऋगविद्युत्‌उच्चयी कण' असा संस्कृत पर्याय सुचविला आहे. संस्कृतच्या आधारे तयार केलेले शब्द हे विदेशी संज्ञा व परि-भाषा यांच्या अर्थाशी जमणाऱ्या अर्थाचे असले, तर हेही संग्रहीत करण्याचा प्रयत्न या कोशात केला आहे. परंतु ज्या संस्कृतवर आधारलेल्या शब्दांना तसा अर्थ येत नाही, आला तर फार ओढाताण करूनच येतो, असे शब्द डॉ. रघुवीरसारख्या पंडितांनी शुद्धीकरणाच्या आवेशाने तयार करून स्वीकारले आहेत. अशा तऱ्हेचे अर्थ या कोशात क्वचित आले, तरी त्यांना महत्त्व दिलेले नाही. 'पॅरलल' याला समांतर, 'पॅरलल कनेक्शन' याला एकसरी संबंध, 'पॅसिव्हेटिंग' याला निष्क्रिय करणे असे अन्वर्थक शब्द या कोशात दिले आहेत. काही ठिकाणी नवीन अर्थाचे संस्कृत शब्दही स्वीकारले आहेत.

शब्द, संज्ञा किंवा परिभाषा यांची निर्मिती ही प्रत्यक्ष व्यवहारात किंवा शास्त्रीय संशोधनाच्या संदर्भात जेव्हा होते, तेव्हा त्यांना खराखुरा अर्थ प्राप्त होतो. अशा पद्धतीस अन्वर्थक शब्दोत्पत्तीची नैसर्गिक पद्धती असे म्हणता येते. पश्चिमी भाषांमधील तंत्र व विज्ञान यांतील शब्दांना अर्थपूर्णता या नैसर्गिक पद्धतीने निर्माण झाली आहे. वाक्याने विचार व्यक्त करण्याकरिता जेव्हा जेव्हा नवीन शब्दांची गरज लागते, तेव्हा जो शब्द उत्पन्न होतो तोच अर्थपूर्ण ठरतो. अनुभव, प्रयोग, विचार व विचारविनिमय करीत असता माणसाला विचार व्यक्त करण्याकरिता, वस्तुस्थितीचे निदर्शन करण्याकरिता काहीएक विधान करावेसे वाटते व तो जे विधान करतो, त्यास वाक्य म्हणतात. संदर्भावाचून

शब्दाला अर्थ नसतो. म्हणून असे एक सर्वसाधारण विधान केले जाते की, अलीकडे भारतीय वा देशी भाषांमध्ये विज्ञान व तंत्रविषयक प्रतिपादन करण्याच्या संदर्भात कधीही न वापरलेले जे हजारो शब्द भारतीय समित्या अथवा भाषा-संचालनालये निर्माण करीत आहेत, ते शब्द नैसर्गिक पद्धतीच्या विरुद्ध, कृत्रिम पद्धतीने निर्माण केलेले असल्यामुळे ते कोशबद्ध स्थितीमध्ये अर्थवान नसतात. असे कृत्रिम कोश केवळ निरर्थक शब्दांना अर्थवान बनविण्याची संधी प्राप्त करून देतात, एवढेच म्हणता येईल. जगातील सर्व जुन्या साक्षर भाषांमध्ये त्यांचे व्याकरण व त्यांचे कोश तयार झाले आहेत. व्याकरण ज्याप्रमाणे प्रचलित भाषेचे नियम व अपवाद यांचे संकलन करते, त्याचप्रमाणे सर्व कोश भाषेतील प्रचलित अर्थयुक्त शब्दांचे संकलन करतो. परंतु अलीकडे देशी भाषांमध्ये तयार केलेले व केले जाणारे कोश हे खरे वाच्यार्थाने कोशच नव्हेत. त्यांना कोश अशी संज्ञा लाक्षणिक अर्थानेच देता येते.

अगोदर कोश व नंतर भाषा असा उलटा क्रम भारतीयांना स्वीकारावा लागत आहे. कारण भारतीय भाषांमध्ये तंत्र व विज्ञान यांच्या वाढीला अवसर देणे प्राप्त व अपरिहार्य झाले आहे. हे कोश निर्माण करताना शुद्धीकरणाचा व संस्कृतीकरणाचा जो अट्टाहास दिसतो, तो मात्र अशास्त्रीय होय असे म्हणावे लागते. कारण जगातील कोणतीही समृद्ध भाषा अन्य परकीय भाषेतील शब्दांचा प्रचंड संग्रह करूनच समृद्ध बनली आहे, असा जगातील सर्व भाषांचा इतिहास निर्णय देतो. जे पदार्थ आणि ज्या कल्पना आपल्यापाशी नाहीत, ते पदार्थ व त्या कल्पना स्वीकारताना त्या पदार्थांचे व कल्पनांचे वाचक शब्दही नैसर्गिकपणे व्यावहारिक जग आत्मसात करीत असते. म्हणूनच त्या व्यावहारिक जगाची भाषा व संस्कृती समृद्ध होत जाते. म्हणून भाषाशुद्धीकरणाचा प्रयोग हा अनैसर्गिक, दुराग्रही व भाषिक व सांस्कृतिक प्रगतीला प्रचंड अडचणी निर्माण करणारा ठरतो.

परंतु विज्ञान व तंत्रविषयक देशी साहित्य निर्माण करीत असता परदेशी शब्दांची गर्दी होऊन देशी भाषांची प्रकृती बिघडते; म्हणून देशी भाषांच्या विकासास प्रकृतीशी जमणारी शब्दसमृद्धीच नव्या रीतीने केली पाहिजे, असा एक समंजसपणाचा आक्षेप घेतला जातो. यावरही असे उत्तर देता येते की, भाषांची प्रकृती ही एक प्रवाही स्थिती आहे, स्थिर व साचेबंद स्थिती नाही.

म्हणून अगणित परकीय शब्द आत्मसात करणाऱ्या महत्त्वाच्या जागतिक भाषांची प्रकृती अधिक सशक्त व अर्थवैचित्र्याने उज्ज्वल व समृद्ध झाली आहे. त्यांची प्रकृती अशा उच्चस्तरावरील आदान-प्रदानाने विकास पावली आहे. अनुकरणामुळे नव्या शैली समाविष्ट झाल्या, शब्दांचे अनेकविध पर्याय उपलब्ध झाले. गेल्या दोनशे वर्षांत अधिक समृद्ध साहित्यांच्या व भाषांच्या सान्निध्यात आलेल्या भारतीय देशी भाषा यांची गद्यपद्यपद्धती अनेक प्रकारांनी बदलली व त्या उच्चतर विचारांच्या अभिव्यक्तीस समर्थ बनल्या, अशी आधुनिक भारतीय भाषांचा इतिहास साक्ष देत आहे. भारतीय अतिप्राचीन संस्कृत भाषा हीसुद्धा भारताबाहेरून आलेली असली, तरी ती येथे स्थिरावत असताना तिनेही ऑस्ट्रिक, द्रविड इत्यादी जुन्या भारतीय भाषांपासून फार मोठे ऋण स्वीकारले आहे. याची दखल जैमिनीच्या पूर्व मीमांसेमध्ये आर्यम्लेंछ अधिकरणात मोकळ्या मनाने घेतली आहे. या अधिकरणाचे विवरण करीत असता कुमारिल भट्टाने या ऋणाचा तपशीलवार परिचय देऊन असे म्हटले आहे की, हे परकीय शब्द संस्कृत व्याकरणाच्या व्युत्पत्तीचे नियम लावून सिद्ध करू नये. ते ज्या अर्थी असतील, त्याच अर्थी धार्मिक विधीमध्येसुद्धा वापरणे युक्त आहे, दोषावह नाही.

तात्पर्य असे की, पश्चिमी विज्ञान व तंत्र यांच्या संज्ञा व परिभाषा स्वभाषेत उचलून घेऊन आत्मसात करण्यात अवमान करू नये. त्याबरोबर देशी भाषा किंवा संस्कृतमधील पर्यायही अन्वर्थक रूपाने घेता आल्यास त्यांच्या बरोबरीने वापरावे. आंतरराष्ट्रीय किंवा इंग्रजी संज्ञा वा परिभाषा तशाच ठेवल्याने विज्ञान व तंत्र यांचे अर्जन करणे अधिक सुलभ होईल. विज्ञान व तंत्र यांचा दैनंदिन अतिवेगशाली विकास पश्चिमी भाषांमध्ये चालू आहे. असा वेग व विकास साधण्याइतकी गती भारतीय साहित्याला अजून यावयाची आहे. त्यास अजून अवधी आहे. आपण सध्या मंद अशा अनुकरणावस्थेत आहोत. अशा स्थितीत आपल्या ज्ञानार्जनाचा सांधा मजबूत कायम ठेवण्याकरिता शब्दांची उचल चालू ठेवणे, अत्यंत हितावह आहे. नव्या संज्ञा व परिभाषा निर्माण करण्याचे प्रयत्नही जरूर करावेत; पण त्यात शुद्धीकरणाचा अशुद्ध हेतू असू नये. अशा प्रयत्नाच्या मुळाशी दोन उद्दिष्टे आहेत. एक, निरनिराळ्या ज्ञानक्षेत्रांतील व्यक्तींना देशी भाषांमध्ये विषय प्रतिपादन करण्याच्या वेळी अन्वर्थक शब्दांची वारंवार अडचण

भासते. कारण वैज्ञानिक व तंत्रज्ञ पंडित स्वभाषाभिज्ञ असतातच असे नाही. दुसरे असे की, संज्ञा व परिभाषा यांच्यात सुसूत्रता व मेळ साधावा. त्याच कल्पनांचे व पदार्थांचे वाचक विविध पर्याय वापरल्यास विचाराचा व अर्थाचा जो गोंधळ होतो, तो त्यामुळे टाळता येईल.

संदर्भ : 'वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा', १९६९, या ग्रंथाची प्रस्तावना, पृष्ठे ३ ते ६.

# ८

# महाराष्ट्रातील धर्मसुधारणेचे आंदोलन

भारत संपूर्ण अर्थाने राजकीय पारतंत्र्यात ज्ञात इतिहासात दोन वेळा सापडला : (१) मुसलमानी आमदानीत व (२) ब्रिटिश आमदानीत. मुसलमानी आमदानीत संतांचा विश्वव्यापक, नीतिनिष्ठ व भक्तिप्रधान भागवत धर्म भारतभर पसरला व त्याने प्रभावित झालेला हिंदू समाज सर्वांगीण इस्लामी आक्रमणाखाली धार्मिक दृष्टीने तगून राहिला. संतांनी परकीय राजकीय सत्तेने पराभूत झालेल्या समाजाचा धार्मिक पराभव होऊ दिला नाही, हे जरी खरे असले; तरी हिंदू समाजाच्या सामाजिक गतिशीलतेला सामर्थ्य मात्र एकोणिसाव्या शतकापर्यंत प्राप्त झाले नाही. सामाजिक फुटीरपणा वाढत गेला. अंध रूढींच्या अगाध अंधारात हिंदू समाज शेकडो वर्षे चाचपडत राहिला. मराठे व शीख यांनी राजकीय बंधमुक्तीचा यशस्वी प्रयत्न केला; तरी सामाजिक गतिशीलतेला प्रेरणा मिळू शकली नाही. त्यामुळे सबंध भारत पुन्हा पश्चिमी साम्राज्यशाही आक्रमणाखाली पराभूत झाला. पश्चिमी साम्राज्यशाहीच्या पाठीशी वैज्ञानिक व औद्योगिक क्रांतीच्या अधिष्ठानावर निर्माण झालेली, सतत प्रगतिशील अशी, आधुनिक बुद्धिवादी संस्कृती होती.

या संस्कृतीचे मुख्य साधन व वाहन आधुनिक शिक्षणपद्धती हे होय. इंग्रजी शिक्षणपद्धतीने परंपरागत भारतीय संस्कृतीच्या जीवनमूल्यांची समीक्षा करणारी नवी सुशिक्षितांची पिढी निर्माण झाली. ब्रिटिश राज्याची भारतात स्थापना झाली व नव्या शिक्षणपद्धतीचा पाया घातला गेला. त्यामुळे भारतीयांची अंधश्रद्धेत

गुरफटलेली व अगतिकतेत सापडलेली विवेचक बुद्धी मुक्त झाली. ब्रिटिश राज्याच्या स्थापनेच्या अगोदर ब्रिटिशांचा व इतर युरोपियनांचा संपर्क सतत वाढत होता. त्यांच्या औद्योगिक क्रांतीचे वारेही भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यांवर येऊन आदळत होते, तरी त्याचे वैशिष्ट्य मात्र येथील राज्यकर्त्यांना व किनाऱ्यालगतच्या जनतेला जाणवले नाही; इतक्या भयंकर सुस्तीने येथील नेत्यांची व जनतेची मने सुस्त व मूढ झाली होती. ब्रिटिशांच्या राज्यस्थापनेनंतरच आधुनिक शिक्षणाच्या द्वारे प्रबोधनाची प्रभात येथे उजाडली. आधुनिक विद्या, वाङ्मय व कला यांच्या शिक्षणाचा लाभ काही थोड्या भारतीयांना झाल्याबरोबरच त्यांच्यातील प्रतिभाशाली व संवेदनशील अशा अल्प शिक्षितांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून गेला. विद्युत्-संचाराने यंत्र थरारावे, त्याप्रमाणे यांची मने नवविचारांनी थरारू लागली. बुद्धीला व विचाराला अगदी विलक्षण असे नवे अधिष्ठान प्राप्त झाले. जीवनाचा अर्थ करण्याची रीतच बदलून गेली. समाजाला बसटून टाकणारी अनेक सामर्थ्ये या नव्या अधिष्ठानामध्ये होती. सामाजिक, धार्मिक संस्था बदलण्यास व तशा नव्या उभारण्यास आवश्यक असलेली आधुनिक दृष्टी लाभली. केवळ कर्णगोचर असे परंपरागत धार्मिक साहित्य व दृष्टिगोचर होणारे नवे औद्योगिक युग यांच्यातील अंतर्विरोध या शिक्षणामुळे स्पष्ट झाला.

कर्णगोचर ज्ञानाचा आधार अंधश्रद्धा होती. ती श्रद्धा प्रत्यक्ष प्रत्ययावर आधारलेल्या विचारांशी कशी विसंगत आहे, याची मीमांसा सुरू झाली.

नवविचारांचा व भारतीय प्रबोधनाचा पहिला प्रेषित पुरुष बंगालमध्ये अठराव्या शतकाच्या अखेरीस उदयास आला. तो म्हणजे राजा राममोहन रॉय हा होय. कारण बंगाल्यात आधुनिक शिक्षणाचा पाया महाराष्ट्रापेक्षा बराच अगोदर घातला गेला होता. महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आधुनिक जीवनदृष्टी देणारे प्रबोधनाचे दोन मोठे उद्गाते पुढे आले. ते म्हणजे लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख व जोतिबा फुले हे होत. या वेळी हिंदी मनुष्याचा परंपरागत जीवनक्रम हा संपूर्णपणे सनातन रूढींच्या बंधनात बंदिस्त होता. धार्मिक आणि सामाजिक या दोन कल्पनांत भेद दाखवणारी सीमारेषा सापडत नव्हती. जन्मापासून मरणापर्यंतचे महत्त्वाचे व्यवहार धर्मरूढींच्या मर्यादेतच बद्ध होते. या सकाळपासून त्या सकाळपर्यंतचे कार्यक्रमही धर्मग्रंथांनी, परंपरागत रूढींनी

ठरवून दिलेलेच असतात. स्नान, पान, भोजन, उपजीविकेचे व्यवहार, विवाह-पद्धती, समाजातील भिन्न भिन्न, उच्चनीच स्तरांवरील वा समान स्तरांवरील जातिजमातीचे आचारविचार, विवाहपद्धती, उपासनापद्धती, अंत्यक्रिया इत्यादी सर्व मानवी क्रिया सनातन रूढीने डोळ्यावर ढापण लावलेल्या घाण्याच्या बैला-प्रमाणे एकाच चक्रात चालत जात. भक्ष्याभक्ष्य, पेयापेय, स्पृश्यास्पृश्य इत्यादी निर्बंध विवेक व विचार न करता परंपरेप्रमाणे चालत असत. कोणाबरोबर जेवावे व काय जेवावे, झोपताना डोके कोणीकडे करावे व पाय कोणत्या दिशेस असावेत, प्रवास केव्हा करावा, कोणत्या समयी व कोणत्या दिशेस प्रवासास निघावे किंवा निघू नये, हजामत कोणत्या वारी व तिथीस वर्ज्य वा विहित इत्यादी गोष्टी धर्म सांगत असे. जांभई, शिंक इत्यादी स्वाभाविक क्रियांच्या बाबतीतही धर्माने सांगितलेले आचार पाळत असत. प्रत्येक जातीचे, उपजातीचे व कुळांचे आचार ठरलेले असत. बारीकसारीक रूढींचा भंग होऊ नये म्हणून पितर, देव, यक्ष, राक्षस, पिशाच्च सर्व ठिकाणी बंदोबस्ताकरिता हजर असत. प्रत्येक महिन्याचे, ऋतूचे व काही तिथ्यांचे वा पक्षांचे निरनिराळे आचार आणि व्रते पाळली जात. नवस, व्रते, उद्यापने, श्राद्ध, तीर्थोत्सव, यात्रा यांची महती अपूर्व असे. घरात कोणी आजारी पडले, नातेवाइकांवर वा आपणावर काही आपत्ती आली, आपले जनावर अकस्मात मेले, धंद्यात अपयश आले, गृहदाह, व्रतभंग, आचारातील घोटाळा, जातिभेदविषयक नियमांच्या पालनातील प्रमाद, विटाळ-चांडाळ इत्यादी कारणांनी देवता, पितर इत्यादिकांचा प्रकोप झाला, असे मानून शांती करीत. त्या वेळचा हिंदू समाज चोवीस तास व बारा महिने देवता, पितर, राक्षस, भुते, पिशाच्चे इत्यादिकांच्या कडक पाहऱ्यात असे. जादूटोण्याची त्याला सारखी भीती असे. घर, विहीर, दरवाजा, चूल, भिंती, आढे, ओसाड जागा, नदी, तलाव, वृक्ष, शेताचा बांध, पर्वत, आकाश व पाताळ यांत दाही दिशांस, तीनही काळ या अदृश्य शक्तींचा भरणा व प्रताप त्या माणसास दिसत असे. त्याचे मन या अलौकिक शक्तीच्या भयाने पूर्णपणे व्यापलेले होते. कुलाचार, ग्रामाचार, देवतासंबंधी कर्तव्ये यासंबंधी अनेक प्रमाद घडत असत व त्याकरिता प्रायश्चित्त व दंड भोगण्यास तो तयार असे. त्याचा स्वतःचा अंमल मनावर जितका होता, त्यापेक्षा या काल्पनिक, स्वप्नमय व भ्रांतिकृत शक्तींचा अधिक असे; तो त्या भुताटकीच्या विश्वात जगत असे !

आधुनिक शिक्षणाने व सुधारलेल्या इंग्रजी राज्याने या भ्रामक विश्वाला भूकंपाचा हादरा देण्यात मुख्यतः आधुनिक संस्कृतीचे व सुशिक्षितांचे प्रतिनिधी पुढारीपणा करीत होते. पाश्चात्त्य विद्येने तीन नवीन मूलभूत मूल्ये या देशात प्रथमतः आणली. बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सर्व मानवाची राष्ट्रनिरपेक्ष व वंश-भेदनिरपेक्ष नैसर्गिक समता ही ती तीन मूल्ये होत. बुद्धिवादामुळे जुन्या परंपरेतील गुणदोषांचा विवेक करणारी दृष्टी लाभली आणि वैज्ञानिक दृष्टीने आचारविचारपद्धती सुधारण्याची आणि विश्वरचनेचा परंपरागत अर्थ तपासण्याची प्रेरणा मिळाली. व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचाराने जुन्या समाजव्यवस्थेतील व्यक्तींच्या आत्मविकासावरील बंधनांचा उच्छेद करणारी स्फूर्ती मिळाली. मानवाच्या मूलभूत समतेच्या कल्पनेमुळे जगातील इतर राष्ट्रांच्या संस्कृतीबद्दल असलेला पूर्वग्रह नष्ट झाला व सर्व संस्कृतींचा सारभूत अंश ग्रहण करण्याइतकी उदारता-पूर्ण सारासार बुद्धी जागृत झाली. या त्रिविध मूल्यांमुळे ऐहिकताप्रधान विचारसरणी उत्पन्न झाली. त्यामुळे इहलोकातील जीवनक्रमाचा ऐहिक मानवी हिताच्या कसोटीवर बुद्धिवादी विचार सुरू झाला आणि पारलौकिक हिताहिताचा संबंध केवळ शुद्ध व व्यापक अशा नैतिक तत्त्वांशीच जोडला गेला. धर्मग्रंथांमधील व रूढींमधील अंधश्रद्धेवर आधारलेले आचारविचारांचे नियमन म्हणजे खरा धर्म नव्हे, अशी जाणीवही दृढ होऊ लागली.

या नवीन मूल्यांच्या निकषावर हिंदुधर्मसंस्थेचे आणि जगातील अन्य धर्म-संस्थांचे परिशीलन व समीक्षण करणाऱ्या काही थोड्या विवक्षित महाराष्ट्रीय सुशिक्षितांनी धर्मपरिवर्तनाचा पाया घातला. या धर्मपरिवर्तनवादाचे दोन प्रवाह भारतात व महाराष्ट्रात वाहू लागले. एक प्रवाह म्हणजे विश्वधर्मविषयक विचार-सरणीचा व दुसरा प्रवाह म्हणजे हिंदुधर्मसुधारणेच्या मूलभूत सिद्धान्ताची मांडणी करणारी विचारसरणी. या दोन्ही विचारसरणी एकमेकींशी गुंतलेल्या व काही बाबतींत एकरूप होत्या. धर्मसंस्थांच्या गाभ्यामध्ये बुद्धिवादाचा प्रकाश टाकून एकमेकांहून भिन्न असलेल्या, स्पर्धाशील असलेल्या आणि प्रसंगी युध्य-मान होणाऱ्या विविध धर्मनिष्ठ समाजसंस्थांमध्ये म्हणजे हिंदू समाज, ख्रिश्चन समाज, मुसलमान समाज इत्यादी समाजसंस्थांमध्ये परिवर्तन केल्याशिवाय मानवी समाजांमधील अनिष्ट विग्रह संपणार नाही व मानवी समतेकडे जगाचा प्रवास होणार नाही, हे राजा राममोहन रॉय यांच्या ध्यानात आले. त्याकरिता

विश्वधर्माची कल्पना त्यांनी मांडली व तदनुसार आंदोलन प्रथम भारतात—बंगालमध्ये प्रारंभले. त्यानंतर त्या आंदोलनाचे लोण कलकत्त्याहून मुंबईला पोचले. राजा राममोहन रॉय यांनी 'विश्वधर्म' या शब्दाला पर्यायी शब्द 'सार्वत्रिक धर्म' हा वापरला. राजा राममोहन रॉय यांचे विश्वधर्माचे विचार वेद व विशेषत प्राचीन उपनिषदे यांच्यावर प्रथमतः आधारलेले होते हे जरी खरे असले, तरी त्यांना वेदोपनिषदांत गवसलेली मूलभूत तत्त्वे जगातील इतर धर्मग्रंथांतही दिसली. त्यांनी कुराण, बायबल इत्यादी जगातील इतर पवित्र ग्रंथांचेही अध्ययन केले होते. जगातील सर्व विकसित धर्मांचा गाभा शुद्ध नैतिक तत्त्वे होत व त्यांचा परिपालक एकच परमेश्वर आहे. मानव समाजातील धार्मिक भेदांवर आधारलेले भेद हे केवळ भ्रममूलक आहेत; त्याचप्रमाणे मूळ नैतिक तत्त्वांशी विरोधी असलेले आचार व कायदे हे मूलभूत धर्मतत्त्वांच्या व ईश्वराच्या विरोधी आहेत; म्हणून ते आचार किंवा रूढी नष्ट केल्या पाहिजेत, अशी राजा राममोहन रॉय यांनी विश्वधर्मविषयक विचारसरणी मांडली. हिंदुधर्माचे अधिष्ठानही हाच विश्वधर्म होय, असे प्रतिपादून त्यांनी मूर्तिपूजा, बालविवाह, सतीची चाल, जातींमधील उच्चनीच भेद यांच्यावर हल्ला सुरू केला.

हे विश्वधर्मविषयक आंदोलन भारताच्या इतिहासातच नव्हे; तर जागतिक इतिहासातही अभूतपूर्व असे मानले जाते. महाराष्ट्रातील पहिल्या दोन महान् समाजसुधारक व धर्मसुधारक व्यक्तींनीही आंदोलनाचे स्वागत केले. लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख व जोतिबा फुले ह्या त्या दोन व्यक्ती होत. लोकहितवादींची विद्वत्ता फार मोठी होती. संस्कृत व इंग्लिश या दोन्ही भाषांतील साहित्याचे त्यांनी सखोल अध्ययन केले होते. धर्म, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानवशास्त्र इत्यादी विषयांवर स्वतंत्र निबंध व स्फुट लेख त्यांनी लिहिले. चरित्रे, प्रादेशिक इतिहास, अर्थशास्त्र, भाषांतरे, अनुवाद इत्यादी विपुल लेखन त्यांनी केले. धर्मसुधारणा व सामाजिक सुधारणा याच्या आंदोलनाला आवश्यक अशी वैचारिक लेखनात्मक बैठक निर्माण केली. ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज व सत्यशोधक समाज यांच्या पाठीशी ते उभे राहिले. नव्या सामाजिक शिक्षणास आवश्यक अशा—वृत्तपत्रे, ग्रंथालये इत्यादी संस्थांना उत्तेजन त्यांनी दिले. परंपरेविरुद्ध फार मोठे बंड उभारण्याचा जीवनभर प्रयत्न केला.

हिंदुसमाजसंस्था धर्मग्रंथांवर उभारली गेली. त्या धर्मग्रंथाचे प्रणेते दिव्य दृष्टीचे लोक होते, किंवा वेद हे अपौरुषेय अथवा ईश्वरोक्त आहेत या श्रद्धेवर प्रहार करण्याकरिता समाजनेता व धर्मनेता जो ब्राह्मणवर्ग, त्याच्या विद्या कशा अपूर्ण आहेत, सद्यः कालीन समाजप्रगतीला कशा विरोधी आहेत, हे चिकित्सक दृष्टीने दाखवून दिले. धर्मग्रंथ हे स्वयंभू किंवा ईश्वरकृत नसून ते मनुष्यकृत आहेत, हे मानल्याशिवाय समाजसुधारणा व धर्मसुधारणा अशक्य आहे, असा विचार मांडताना ते म्हणतात, "एकट्या ऋषीने, आपल्या अकलेने लिहिलेल्या शास्त्रापेक्षा चार मते पाहून जे शास्त्र आपण तयार करू, ते सर्वांपेक्षा उत्तम होईल यात संशय नाही. शे-दोनशे लोकांनी याप्रमाणे नाव धारण करून वेगळी फळी पाडावी. मग आपल्यामध्ये हा धर्म चांगला असे पाहून पुष्कळ लोक येतील. हिंदुधर्मात सांप्रत ज्यास अडचणी पडतील ते सर्व...या शुद्ध धर्मात मिळतील. मग आपली मंडळी प्रबल झाली म्हणजे जे पाहिजे ते कार्य करता येईल. असे केल्यावाचून सांप्रत काळी हिंदुधर्म भ्रष्ट झाला, याचे हातून आम्ही सुटणार नाही. हा धर्म सुधारला पाहिजे." (शतपत्रे, पत्र क्र. ६४). "परंपरागत धर्माचे वेड माजून आम्हा भारतीयांचा अधःपात झाला आहे. आम्ही आर्यावर्तातील लोक पूर्वी फार प्रगत झालो होतो; परंतु कालांतराने निद्रावश झालो. आमच्या धर्म-समजुतीला विकृत वळण लागले, लोकभ्रमांवर आधारलेले क्रियाकांड वाढत गेले आणि अखेरीस आमचा पूर्ण नैतिक अधःपात झाला," असे त्यांनी निर्भयपणे सांगितले. लोकहितवादी म्हणतात, "आमच्या आर्यावर्तावरील लोक जे पूर्वी सर्व जगावर गाजले होते ते अगदीच निद्रावश झाले. या निद्रेत त्यांचे सर्व तेज, त्यांचे सर्व कर्तव्य आणि त्यांच्या सर्व महत्त्वाकांक्षा याही झोपल्या गेल्या. राज्य-व्यवस्था, शोध आणि विद्यावृद्धी याविषयींची काळजी यांचा नाटके जणू काय उत्सर्ग करून, नाच, तमाशे, भोजन, नाटके, आणि वेश्याच्छंद यांचे तंगातच सर्व ऐपतदार व तदनुषंगिक लोक दरोबस्त दंग होऊन गेले. तशात त्यांच्या कृत्यांची नावाजणी करणारे अनुद्योगी व परोपजीवी असे आजवी लोक यांनी तर त्यांस त्यांच्या छंदात व फंदात अधिकाधिक गाडून टाकले आणि अशा या अज्ञान-प्रसाराने एतद्देशियामध्ये अनेक निंदा व तिरस्करणीय चालीरीतींचे मनस्वी प्राबल्य माजले."

"धर्माचे वेड तर विलक्षण माजून त्याखाली अनेक अनन्वित कृत्ये वेळाशक

गोवून, त्याला हे धर्मवेडे लोक बेधडक अनुसरून त्यातच आपली, आपल्या कुलाची आणि आपल्या देशाची धन्यता मानू लागले. सारांश, खरा पुरुषार्थ आणि खरे तप ही जाणण्याविषयी येथून तेथवर सर्वत्र अज्ञानपणाचे अभ्र पसरले व सर्वांस भुग्ळ पडून दिशाभूल झाली." ( राजस्थानचा इतिहास, पृष्ठ ८ ). पुराणे हे बाष्कळ ग्रंथ आहेत, असे विधान करून ते म्हणतात, 'नीती, सदाचार, धर्म आणि भक्ती यांजवर अगदी माती टाकून स्थलांचे, नद्यांचे व महिन्यांचे वगैरे भाराभर वर्णन करण्याने सदाचरणावरील सुबुद्धी आणि त्यांचे महत्त्व अगदी उडवून दिले हे फार अनिष्ट झाले." ( स्वाध्याय पृष्ठ ११२ व ११३ ) "अज्ञान फार वाढले व त्यास साधन मुख्य पुराणे आणि माहात्म्ये लिहावयाची हाच काही दिवसांपर्यंत पंडितांचा रोजगार होता. तेव्हा त्यांनी मनास येईल ते लिहिले. कोणी कावेरीमाहात्म्य, कोणी करवीरमाहात्म्य, कोणी शालिवाहनचरित्र, कोणी नाशिकमाहात्म्य, कोणी अग्निपुराण, कोणी गणपतीपुराण अशी लिहिली. प्रत्येकात त्यांचा हेतू इतकाच होता, की एखाद्या देवाचे किंवा एखाद्या नदीचे वर्णन करून ईश्वर त्यात आणून ठेवून, ब्राह्मणास पैसा मिळण्याची तजवीज पाहावी." ( शतपत्रे, पत्र क्र. ९३ ).

लोकहितवादींनी 'धर्मसुधारणा' या लेखात धर्मसुधारणेची कलमे मांडली आहेत. या लेखात विश्वधर्माच्या अधिष्ठानावर आधारलेल्या व हिंदुसमाजास उपयुक्त, अशा मुद्द्यांची मांडणी केली आहे. त्यांचा सारांश असा : (१) ईश्वराची मानसिक पूजा, ( २ ) आपला जीव तसा दुसऱ्याचा जीव, ( ३ ) ईश्वरोपासना स्वभाषेत म्हणजे ज्या भाषेचा अर्थ समजेल त्या भाषेतच करावी, ( ४ ) आचारस्वातंत्र्य व विचारप्रदर्शनाचे स्वातंत्र्य, ( ५ ) स्त्रीपुरुषांचे अधिकार धर्मात व व्यवहारात समान असावेत व स्त्रियांस प्रौढविवाहाची व पुनर्विवाहाची मोकळीक असावी, ( ६ ) रूढी व इतर आचार यांपेक्षा नीती ही प्रमुख असावी, आचारधर्म गौण धरावेत, ( ७ ) कोणत्याही जातीच्या, धर्माच्या वा राष्ट्राच्या मनुष्यास तुच्छ मानू नये, दुःखितास सुख, रोग्यास औषध, मूर्खास ज्ञान व दरिद्री जनांस द्रव्य शक्त्यनुसार देण्यास तत्पर असावे, ( ८ ) सत्यनिष्ठा, ( ९ ) विद्येमध्ये सत्याचा शोध करण्यास आळस करू नये व विद्या वा ज्ञान संपादन करण्यास सर्वांस समान संधी असावी.

हिंदू समाजात साधू, बैरागी, बुवा, साक्षात्कारी महंत यांचे फारच प्रस्थ

माजलेले असते. ते खरे साधूच नव्हते, असा इशारा लोकहितवादींनी दिलेला आहे. धर्मशील साधू म्हणजे काय याविषयी ते म्हणतात. "आम्हांस असे साधू पाहिजेत की सर्व ज्ञातीत व सर्व देशात जे जे अनर्थ, घात करणारे आहेत ते काढणारे, जगात सद्गती देणारे, नीतीचा व सदुद्योगाचा ठसा दाखविणारे." ( निबंधसग्रह—संपा. प्रियोळकर पृ. ४५७ )

देवळे बांधणे, तीर्थयात्रा करणे, दाने देणे यात संपत्तीचा विनियोग पुष्कळ लोक करतात व त्यात धार्मिकता आहे असे मानतात. या प्रकारच्या धर्मादायाला लोकहितवादींचा विरोध आहे. " जिवंत लोकांस सुखी करण्याचे सोडून यात्रा कराव्या हे उचित नाही व याणे काही हित होत नाही." यांसंबंधी त्यांचे स्पष्टीकरण असे — 'आमचे श्रीमंत लोक येथून उठून काशीस जातात आणि शेकडो रुपये धर्मास बरोबर नेतात व देवळे बांधतात. परतु या रुपयांनी जर एखादा कापड किंवा कापूस किंवा काच करण्याची यंत्रे आणून कारखाना घातला, तर हजारो माणसांना रोजगार उत्पन्न होऊन खावयास मिळेल, सुख होईल, नंतर काशीयात्रेपेक्षा ते रुपये सार्थकी गेले असे म्हणावे की नाही ?" ( शतपत्रे, पत्र क्र. ८२ )

लोकहितवादींचे समाजचिंतन व धर्मचिंतन ज्या साहित्यात ग्रंथित केले आहे, ते साहित्य आधुनिक मराठी साहित्याचे एक उत्कृष्ट प्रारंभस्थान आहे. लोकहितवादींच्या काळी अत्यंत प्रखर विचारांचे दुसरे विश्वधर्मी म्हणजे ज्योतिबा फुले होत. ज्योतिबा फुले जातिबद्ध व उच्चनीच भावाने भरलेल्या समाजरचनेच्या विरुद्ध प्रत्यक्ष बंडाचा उठाव करण्यास सिद्ध झाले होते. त्यांनी आधुनिक युगाला आवाहन देऊन प्रथमतः ब्राह्मणांच्या धार्मिक सत्तेविरुद्ध युद्ध पुकारले. सामाजिक जन्मसिद्ध उच्चनीच भाव ईश्वरी संकेताने व माणसाच्या पूर्वकर्माने निर्माण झालेला आहे; अशा हिंदुसमाजात कायम घर करून राहिलेल्या श्रद्धेला त्यांनी जबरदस्त धक्का दिला. जातिभेदाविरुद्ध प्रयत्न करणे व अस्पृश्य समाजाची अस्पृश्यता नष्ट करणे हे महापाप आहे. अशी समजूत होती, ही खोलपणे सहस्रावधी वर्षे रुजलेली भीती घालविणारी जबरदस्त प्रेरणा जोतिबा फुले यांना मिळाली. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचा प्रारंभ जोतिबांनी केला या चळवळीला पहिले नाव सत्यशोधक चळवळ असे होते. हे सत्य म्हणजे मानवी जीवनाचे नैतिक सत्य होय. त्यातूनच मानवाच्या सामाजिक मुक्ततेचा सिद्धांत

निघतो. सत्यशोधक चळवळीला व्यापक अशा बुद्धिवादी तत्त्वज्ञानाचा आधार होता. नवीन ध्येये त्या बुद्धिवादाने हेरली होती. नवीन ध्येयांचा प्रत्यय आल्याशिवाय, नवीन प्रकारच्या सामाजिक उद्दिष्टांचा अर्थ समजल्याशिवाय परंपरागत सामाजिक संस्था नष्ट करण्याची प्रवृत्ती निर्माण होऊ शकत नाही. केवळ विनाशाकरिता विनाश करण्याची प्रवृत्ती हे विध्वंसक अतएव विकृत मनोवृत्तीचे लक्षण आहे. ज्योतिबा यांनी अनेक पुस्तके व निबंध लिहिले. सत्यशोधक समाज स्थापून त्यांनी सामाजिक आंदोलनाचा प्रयत्न केला. ते आंदोलन शेवटी संकुचित अशा ब्राह्मणेतर चळवळीत रूपांतर पावले; त्यातील वैचारिक शक्ती कमजोर झाली, त्यामुळे नवा विचार खालपर्यंत रुजला नाही. ज्या जातिभेदाविरुद्ध ज्योतिबांचे बंड होते, तो जातिभेद नष्ट करण्याचे धैर्य त्यांच्या अनुयायांमध्ये निपजले नाही; रुजले नाही. जातिभेदाच्या रूढी, बंधनांच्या व स्पृश्यास्पृश्य भेदांच्या रूढी बहुजनसमाजात तशाच कायम राहिल्या. मूर्तिपूजा, बालविवाह, स्त्रियांचे कुटुंबातील दुय्यम स्थान, नवस, तीर्थयात्रा, विटाळचांडाळाच्या कल्पना इत्यादी सर्व काही परंपरागत रूढीबंधनांचे जंजाळ तसेच कायम राहिले. याचे कारण आधुनिक मौलिक मानवी हक्कांचा विचार बहुजनसमाजापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न शिथिल झाला.

समाजातील बहुसंख्य जनतेचे सामाजिक शोषण बंद करून सर्व मानवांना मुक्त करणारा विचार म्हणजेच मानवी हक्कांचा विचार होय. 'गुलामगिरी' व 'सार्वजनिक सत्यधर्म' ही दोन पुस्तके ज्योतिबांची मूलभूत पुस्तके होत. 'गुलामगिरी'मधील विचार हे मुख्यतः विध्वंसक आहेत. या विध्वंसक विचारातून समाजरचना कशा प्रकारची निर्माण करावी, या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या विधायक विचारात म्हणजेच 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात मिळते. पहिल्या पुस्तकातील सत्याचा अर्धा भागच मान्य केला, तर धोकादायक ठरतो. आता भारतातील यादवी युद्धाचा अधिक धोका आहे. त्याला 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकातील विधायक सत्याची जोड देणे आवश्यक आहे. नव्या सामाजिक रचनेची तत्त्वे यात सांगितली आहेत. स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व ही ती तत्त्वे होत. भारतीय लोकशाही क्रांतीची हीच तत्त्वे होत. लोकहितवादींनी विश्वधर्माच्या तत्त्वानुसार हिंदुधर्मामध्ये सुधारणा कशी करावी सांगितले आहे. जोतिबांनी विश्वकुटुंबवादाचा पुरस्कार करून

जगातील हिंदुधर्म, इस्लाम, ख्रिश्चनधर्म इत्यादी धर्मसंस्था नव्या मानवी जगाच्या स्वास्थ्याला व प्रगतीला निरुपयोगी व विघातक आहेत म्हणून नवा सत्य-धर्म प्रतिपादिला. जगातील सर्व धर्मसंस्था गैरसमजावर व अंधश्रद्धेवर उभारल्या आहेत. त्यांच्यामध्ये जे जे काही सांगितले, ते सत्य असे आपण म्हणता कामा नये, असे ते म्हणतात. हिंदुधर्मापेक्षा ख्रिश्चन धर्म व इस्लाम धर्म हे जातिभेद मानीत नाहीत; म्हणून ते अधिक उदार आहेत असेही ते ठासून सांगतात. परंतु तेही धर्म संकुचित वृत्तीचेच आहेत व बुद्धिवादाच्या निकषावर टिकणारे नाहीत, ते मानवामानवांमध्ये फूट पाडणारे आहेत, म्हणून त्यांचेही विसर्जन व्हावयास पाहिजे, त्याशिवाय मानवी समतेची स्थापना होणार नाही, अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. सगळेच धर्मग्रंथ म्हणजे वेद, स्मृती, पुराणे, बायबल, कुराण इत्यादी मानवप्रणीत असल्यामुळे त्यांचा संपूर्ण सत्य म्हणून स्वीकार करणे अयोग्य होय, असे ते मानत. राजा राममोहन रॉय, लोकहितवादी, ब्राह्मसमाजी व प्रार्थना-समाजी विचारवंत यांच्या मते जगातील प्रसिद्ध धर्मग्रंथांमध्ये एक सर्वसामान्य ईश्वराच्या अस्तित्वाचे सत्य प्रतिपादिलेले आहे; म्हणून सर्व धर्मांचा समन्वय करणे जरूर आहे, असा विचार त्यांनी सांगितला. धर्मग्रंथांना बाजूला ठेवा; त्यांत असत्यही पुष्कळ आहे; म्हणूनही त्यातील एकेश्वराच्या अस्तित्वाचे सत्य गृहीत धरून समन्वय करण्याचा प्रयत्न करू नये, असा दृष्टिकोण जोतिबांनी सांगितला. जोतिबांचे हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. त्याकरिता त्यांनी ईश्वर, अल्ला, गॉड, ब्रह्म इत्यादी ईश्वरवाचक रूढ शब्द बाजूला टाकून विश्वनिर्माण-कर्त्यास, ‘ निर्मिक ’ हा नवीन शब्द वापरला आहे. याचे कारण जगातील सर्व ईश्वरवाचक रूढ शब्दांच्या पाठीमागे आराधना, भक्ती किंवा पूजा करण्याचे निरनिराळे कर्मकांड आहे, ते कर्मकांड व्यर्थ असून मानवांच्यामध्ये सामाजिक फूट पाडणारे आहे, असे त्यांचे मत होते. मानवांची सेवा आणि मानवी सम-तेचे व स्वातंत्र्याचे रक्षण ही खरी ईश्वराची पूजा होय, असे ते म्हणतात.

मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावर विश्वकुटुंब कसे निर्माण होईल व त्याकरिता कशा प्रकारची वैचारिक भूमिका व कशा प्रकारचा वर्तनक्रम स्वीकारला पाहिजे, यासंबंधी ‘ सार्वजनिक सत्यधर्म ’ या पुस्तकात त्यांनी ३३ कलमी नियम मांडले आहेत. त्यांचा सारांश असा : आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने मनुष्यास जन्मतःच स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले आहे आणि त्यास आपापसांत

सारख्या हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ केले आहे. स्त्री आणि पुरुष यांचे हक्क समान आहेत. स्त्रियांस व पुरुषांस एकंदर सर्व मानवी हक्कांच्याविषयी पाहिजे तशी मते बोलून दाखविण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास निर्माणकर्त्याने स्वतंत्रता दिली आहे. हे स्वातंत्र्य एकमेकांस बाधक होणार नाही, अशी मात्र खबरदारी घेतलीच पाहिजे. त्यास सत्यवर्तन म्हणतात. एखादा मानव अथवा काही मानवांची टोळी दुसऱ्या व्यक्तीच्या टोळीवर जबरदस्ती करू शकत नाही. जबरदस्ती न करणे हा सत्यवर्तनाचा भाग आहे. सर्व मानव स्त्रीपुरुषांस धर्मस्वातंत्र्य आणि राजकीय स्वातंत्र्य निर्माणकर्त्याने दिले आहे, म्हणून एकाने दुसऱ्याचे नुकसान न करणे व मूलभूत हक्क समजून इतरांस पीडा न देणे, हा सत्यवर्तनाचा भाग आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर निर्माण झालेल्या प्रत्येक धर्मपुस्तकात आरंभापासून शेवटपर्यंत सांगितलेले सर्व सार्वजनिक सत्य होय, असे म्हटले आहे. परंतु हा हेकटपणा आहे. या धर्मग्रंथांनी भिन्नभिन्न मानवी समाजांत हेवा व द्वेष निर्माण करण्याचे काम चालविले आहे. पृथ्वीचा निर्माणकर्ता एकच आहे, तो अनेक देशांतील लोकांमध्ये वैरभाव निर्माण करणारे देशाभिमानाचे व धर्माभिमानाचे खूळ कसा माजवील ? एकाच देशातील नदी तेवढी पवित्र कशी होऊ शकेल ? सर्व मानवी प्राणी समान आहेत म्हणून काही लोकच पिढीजाद पवित्र व श्रेष्ठ कसे असू शकतील ? आर्य व अनार्य यांपैकी जे कोणी भेदाभेद न मानता जगाच्या कल्याणासाठी कर्म करीत असतात, तेच मानास व दानास पात्र होत. सर्व स्त्री-पुरुषांनी या भूखंडावर गावाचे, प्रांताचे वा देशाचे भेद न मानता व धर्मभेद न मानता आपले एक कुटुंब समजून एकजुटीने एकमेकांशी सत्यवर्तन करून राहावे. यामुळेच निर्माणकर्त्याला आनंद होणार आहे.

जोतिबा फुले यांनी सामाजिक सुधारणेचा विशिष्ट कार्यक्रम आखून त्याचा प्रसार सुरू केला. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील सर्व सुधारकांच्या पंथांना समान असा होता. विधवा-पुनर्विवाह, प्रौढ कुमारी विवाह, विधवा केशवपनबंदी, बालहत्या प्रतिबंध करून गर्भार झालेल्या विधवा व कुमारी यांच्या बालकांचे व अनाथांचे संरक्षण व पालन करणाऱ्या संस्था काढणे, भिन्न जातींत रोटीव्यवहार म्हणजे सहभोजन, अस्पृश्यतानिवारण इत्यादी तपशील या कार्यक्रमात समाविष्ट होतात.

हिंदुधर्मग्रंथांच्या आधारे समाजसुधारणेचे प्रयत्नही या काळी होत होते.

प्रौढ विवाह व विधवा विवाह याला अनुकूल किंवा इतर अनेक सामाजिक सुधारणांना अनुकूल अशी धर्मशास्त्रवचने पुष्कळ सापडतात. त्यांच्या आधारे आम्ही धर्मसुधारणा करीत आहोत, अशी भूमिका घेणारे सुधारकही सुधारक पंथात होते. या भूमिकेला विरोधीही धर्मशास्त्रवचने पुष्कळच सापडतात. सुधारक व सनातनी यांच्यात त्या काळी वादविवादाच्या सभा भरत. परस्परांच्या विचारांचे खंडण व मंडन करणारे वादविवाद वृत्तपत्रांत वा पुस्तक-पुस्तिकांच्या द्वारे प्रसिद्ध होत. विधवाविवाहांचे, प्रौढविवाहांचे, जातीजातींत सहभोजनांचे समारंभ घडवून आणले जात. बंगाल व महाराष्ट्र या प्रदेशातील शिक्षित व पांढरपेशा समाजात अशा प्रकारचे आंदोलन सुरू झाले. सनातनी वर्ग बहुसंख्य असल्यामुळे सुधारकांवर बहिष्कार पडू लागले. त्यात कच्च्या दिलाचे सुधाकर माघार घेत. धर्मशास्त्रवचनांच्या आधारे समाजसुधारण्याच्या प्रयत्नात राममोहन रॉय, विद्यासागर इत्यादी मंडळींनी प्रथम पुढाकार घेतला. त्याचे लोण महाराष्ट्रातही पोहोचले. महाराष्ट्रात शंकराचार्यांचा धर्मपीठ म्हणून फार मोठा अधिकार पांढरपेशा वर्गात मानला जात होता. परंपरागत धर्मपीठे समाजसुधारणेच्या विरुद्ध होती. त्यांचे फतवे किंवा धर्माज्ञा समाजसुधारकांच्या विरुद्ध निघत.

समाजसुधारणेत धर्मशास्त्रवचने अनुकूल जशी सापडतात, तशी प्रतिकूलही पुष्कळ आहेत. त्यांचे एकदोन नमुने पुढीलप्रमाणे आहेत :

त्रिंशद्वर्षः षोडशाब्दां भार्यां विंदेत नग्निकाम्।

(महाभारत, अनुशासन पर्व ४४–१४)

त्रिणि वर्षाणु दीक्षेत कुमारिर्ऋतुती सती।
चतुर्थे त्वथ संप्राप्ते स्वयं भर्तारमाव्रजेत्॥

(किता ४४–१६)

"तीस वर्षांच्या पुरुषाने सोळा वर्षांची भार्या करावी, ऋतू प्राप्त झाल्यावर तीन वर्षेपर्यंत कन्येने वाट पाहून चौथ्या वर्षी स्वतः वर वरावा."

माताचैव पिताचैव ज्येष्ठभ्राता तथैव च।
त्रयस्ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम्॥

(अष्टाविंशतिस्मृतिसंग्रह)

"बाराव्या वर्षी कन्या ऋतुमती होते. त्याच्या अगोदर लग्न न झाल्यास मातापिता व ज्येष्ठ भ्राता नरकात जातात."

नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते

( नारदस्मृति )

" पती नष्ट, मृत, संन्यासी, नपुंसक किंवा पतित झाला असल्यास स्त्रीने दुसरा पती करावा. "

न विवाहविधावुक्तं विधवावेदनं पुनः ॥

( मनु. ९–६५ )

" विवाहशास्त्रात विधवा विवाह सांगितलेला नाही."

परंतु अत्यंत मौलिक दृष्टीने विचार करणाऱ्या काही सुधारक पंडितांना हा मार्ग योग्य वाटत नव्हता. धर्मशास्त्रांच्या आधारे समाजसुधारणा करणे कठीण आहे. कारण त्यांच्यात परस्परविरोध आढळतो, असे ज्या पंडितांच्या लक्षात आले; त्यांनी धर्मशास्त्रांचा आधार मिळाला तरच ठीक आहे; न मिळाल्यास धर्मशास्त्र-प्रवचनांच्या आधारावाचून अडू नये व विवेकबुद्धीच्या आधारे धर्मसुधारणेचा प्रयत्न जारी राखावा, असे ठरविले व याकरिता स्वतंत्र संघटना निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्रातील अगदी पहिली संघटना म्हणजे ' परमहंस सभा ' होय. इ. स. १८४० साली परमहंस सभेची स्थापना झाली. दादोबा पांडुरंग, राम बाळकृष्ण, मोरोबा विनोबा, आत्माराम पांडुरंग, तुकाराम तात्या, बाळा भाऊ शिंत्रे, सखारामशास्त्री, लक्ष्मणशास्त्री हळबे, भिकोबा लक्ष्मण, सखाराम लक्ष्मण चव्हाण यांनी यासंबंधी पुढाकार घेतला. या सभेचे अध्यक्ष रामकृष्ण बाळकृष्ण जयकर हे होते. या मंडळींना पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी प्रोत्साहन दिले. ईश्वरचंद्रांची आस्था, विद्वत्ता, सत्यनिष्ठा, विचारगांभीर्य व पावित्र्य यांचा खोल परिणाम या मंडळींच्या मनावर झाला. सर्व धर्मांचे सार एकच आहे, शुद्ध परमेश्वरनिष्ठा हृदयात बाळगून मानवांनी परस्पर स्नेहभावाने वागावे, हेच ते सार होय; अशा परमार्थबुद्धीला मुख्य स्थानापन्न करून, केवळ तदर्थ साधनभूत ज्या क्रिया असतील, त्यांचाच अवलंब करावा आणि इतर बाह्याचार हे सोंग आहे— तो खरा धर्म नव्हे, असे मानावे; हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी धर्मभेद वरपांगी आहेत, म्हणून धार्मिक भेदभाव विसरावा. प्रसिद्ध असलेले धर्मग्रंथ मनुष्यकृत आहेत ईश्वरकृत नाहीत, म्हणून त्यांचा आग्रह सोडावा; अशा तऱ्हेच्या विचारांचा प्रचार गुप्तपणे परमहंस सभेचे सदस्य करू लागले. श्री. दादोबा

पांडुरंगांनी परमहंसिक ब्राह्मधर्म या नावाचे एक ओवीबद्ध छोटे प्रकरण तयार केले. त्यात (१) ईश्वरभक्ती व भूतदया (२) आचार, (३) उपनयन, (४) विवाह, (५) उत्तरक्रिया, (६) भक्ष्याभक्ष्य, (७) शुद्धाशुद्ध, पापपुण्य, (८) धार्मिक ग्रंथ व महद्वाक्य, (९) धर्मबंड, (१०) दांभिक आचार इत्यादी प्रकरणे आहेत. परमहंस सभा किंवा परमहंस मंडळी केवळ मुंबईपुरतीच नव्हती. तिच्या शाखा पुणे, अहमदनगर, सातारा, बेळगाव, रत्नागिरी इत्यादी ठिकाणी पसरल्या होत्या. एकंदर सभासदांची संख्या हजारापर्यंत गेली होती. परंतु ती संख्या पांढरपेशा समाजात तीव्र प्रतिक्रिया उत्पन्न होऊन घटत गेली व शेवटी ह्या सभेचा अंत झाला. याच सभेच्या तत्त्वावर आधारलेली वेदसमाज नामक संस्था इ. स. १८६५ साली पुन्हा मुंबई व मद्रास येथे स्थापन झाली. परंतु ती फार दिवस चालली नाही.

इ. स. १८६४ साली कलकत्त्याचे ब्राह्मसमाजाच्या एका शाखेचे महान धर्मोपदेशक केशवचंद्र सेन यांचे मुंबई येथे डॉ. भाऊ दाजी यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. धर्मसुधारणेच्या चळवळीला पुन्हा प्रेरणा मिळाली. इ. स. १८६७ मार्च तारीख ३१ रोजी प्रार्थनासमाजाची स्थापना झाली. परमहंस सभेचे व वेदसमाजाचे पुरस्कर्ते प्रार्थनासमाजास येऊन मिळाले. आत्माराम पांडुरंग, परमानंद, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बाळ मंगेश वागळे, महादेव गोविंद रानडे, मोरोबा विनोबा, भास्कर हरी भागवत, वासुदेव बाबाजी नवरंगे इत्यादी सुशिक्षित विद्वान मंडळींनी जाहीरपणे प्रार्थनासमाजाचे नेतृत्व पत्करले. प्रथम भिकोबा लक्ष्मण चव्हाण यांनी प्रार्थना व उपदेश करण्यास सुरुवात केली. सनातनी मंडळींच्या आणि ख्रिस्ती लोकांच्या वृत्तपत्रांत प्रार्थनासमाजावर टीकेचा भडिमार सुरू झाला. ख्रिस्ती लोकांच्या प्रचारात दुटप्पीपणा होता; हे ख्रिस्ती लोकांच्या 'ज्ञानोदय' नामक वृत्तपत्रातील लेखांवरून दिसून येते. 'ज्ञानप्रकाश' व 'केसरी' या वृत्तपत्रांमध्येही प्रार्थनासमाजावर वारंवार टीकालेख प्रसिद्ध होत असत. या टीकांतील महत्त्वाचे मुद्दे असे होते : (१) प्रार्थनासमाजाची मते व आचरण केवळ युरोपियन पाद्री लोकांचे अनुकरण आहे. इंग्रजी शिकलेल्या हिंदूंची स्वधर्मावरून श्रद्धा उडते व ख्रिस्ती व मुसलमानी धर्मही ते स्वीकारीत नाहीत, म्हणून त्यांची मने रिकामी पडतात. रिकामी पडलेली मने भरून टाकण्याकरिता प्रार्थनासमाज ही तोड काढली आहे. या पंथाचा मूळ जो पाया, तोच निरर्थक

होय. ( २ ) मूर्तिपूजेचा दुष्टावा का हेही आम्हास समजत नाही. केवळ इंग्रज जसे बोलतात, तसे ते बोलतात इतकेच म्हणणे भाग आहे. ( ३ ) मूर्तीची गंधादिकांनी पूजा करणे व जगद्कर्ता अदृश्य जो ईश्वर त्याची शुद्धभावे स्तुती व प्रार्थना करून उपकार मानणे हे एकच आहे. प्रार्थनासमाजाने एक वेड सोडले व दुसरे वेड उचलले. प्रार्थना करणे हे ख्रिस्ती लोकांचे वेड आहे.

बंगालमध्ये आदिब्रह्मसमाज स्थापन झाल्यानंतर बहुत वर्षांनी ( जवळजवळ ४० वर्षांनी ) प्रार्थनासमाजाची मुंबईत स्थापना झाली. दोन्हीही समाजांचे मूलभूत सिद्धांत एकच होते; प्रार्थनासमाज हे नाव तेवढे निराळे. ब्राह्मसमाजाची मूर्तिपूजेवर श्रद्धा नव्हती; परंतु मूर्तिपूजेचा कडवा विरोधही ते करू शकत नव्हते. याचे कारण बंगाली समाजात मूर्तिपूजेचे प्रस्थ फार होते. महाराष्ट्रात वारकरी समाजात संप्रदायाच्या प्रभावाने मूर्तिपूजा हे भक्तीचे दुय्यम साधनच मानले गेले. हिंदुधर्मातच एकंदरीत तत्त्वतः मूर्तिपूजा हे भक्तीचे दुय्यम साधन मानलेले आहे, हे जरी खरे असले; तरी मूर्तिपूजेचा आग्रह बंगाली समाजात तीव्र व दृढ झाला होता. महाराष्ट्रात तसे नव्हते. येथे मूर्तिपूजा हे वैकल्पिक साधन म्हणून सर्वमान्य झाले. त्यामुळे प्रार्थनासमाज मूर्तिपूजेला विरोध करण्यास उघडपणे धजावत होता. महाराष्ट्रातील प्रार्थनासमाजाला भांडारकर व रानडे यांच्यासारख्या अखिल भारतीय कीर्तीच्या विद्वान तत्त्ववेत्त्यांचे नेतृत्व लाभले. गाढ विद्वत्ता, आधुनिक जीवनदृष्टी, औदार्य व शुद्ध चारित्र्य यांमुळे हे दोघे अखिल भारतात वंदय झाले. रानडे हे अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, कायदा, संस्कृती व इतिहास या विषयांत निष्णात पंडित होते; आणि भांडारकर हे धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास, संस्कृत व प्राकृत साहित्य आणि संस्कृती यांच्यामध्ये प्रगाढ विद्वत्ता लाभलेले ऋषितुल्य पुरुष होते. प्रार्थनासमाजाचे धर्मविषयक तत्त्वज्ञान विस्ताराने व्याख्यान द्वारा व निबंधद्वारा या दोघांनी अधिकारपूर्ण रीतीने मांडले. नवयुगधर्मप्रवर्तकांच्या मालिकेत हे दोघे प्रमुख होते. त्यांच्या जोडीला एकोणिसाव्या शतकातील मुंबई प्रांतातील अनेक कर्तबगार लोकांचा प्रार्थनासमाजात समावेश झाला होता. आधुनिक भारताचे ते प्रबोधनकार होते. आत्माराम पांडुरंग, मामा परमानंद, वासुदेव बाबाजी नवरंगे, रामचंद्र विष्णू माडगावकर, बाळ मंगेश वागळे, भास्कर हरी भागवत, वामन आबाजी मोडक, दामोदरदास गोवर्धनदास, लालशंकर मियाशंकर, सदाशिव पांडुरंग केळकर, शंकर पांडुरंग पंडित, श्रीधर रामकृष्ण भांडारकर,

प्रभाकर रामकृष्ण भांडारकर, नारायण गणेश चंदावरकर, भोलानाथ साराभाई, विठ्ठल रामजी शिंदे, गोपीनाथ सदाशिव हाटे, बाळकृष्ण निळाजी पितळे, वासुदेव बापूजी कानिटकर, नानाजी वासलेकर, बाळकृष्ण मोरोबा धोत्रे, आनंदराव हरिशंकर, बाळकृष्ण गोविंदजी भाटिवडेकर इत्यादी कितीतरी मंडळी या नवयुग-धर्मस्थापनेच्या कार्याला हातभार लावण्यास सरसावली होती.

ब्राह्मसमाजाचा व प्रार्थनासमाजाचा ध्येयवाद एकच होता. या आदर्श वादाचे पुढील श्लोकात सम्यक् सूत्रीकरण केले आहे—

सुविशालमिदं विश्वं पवित्रं ब्रह्ममंदिरम् ।
चेतः सुनिर्मलं तीर्थं सत्यं शास्त्रमनश्वरम् ।
विश्वासो धर्ममूलं हि प्रीतिः परमसाधनम् ।
स्वार्थनाशस्तु वैराग्यं ब्राह्मैरेवं प्रकीर्त्यते ॥

अर्थ : हे खूप विशाल विश्व ब्रह्माचे पवित्र मंदिर, शुद्धचित्त हेच पुण्य क्षेत्र, सत्य हेच शाश्वत धर्मशास्त्र, श्रद्धा हेच धर्ममूल, प्रेम हेच परमसाधन व स्वार्थनाश हेच वैराग्य होय, असे ब्रह्मसमाजी सांगतात.

या समाजाच्या अनेक शाखा पंढरपूर, नाशिक, सातारा, अहमदनगर, पुणे, अहमदाबाद, बडोदे, सुरत, इंदूर, बंगलोर इत्यादी लहानमोठ्या शहरांत स्थापन झाल्या. धर्मप्रचाराचे कार्य करीत असताना, समाजसेवेकरताही अनेक संस्था प्रार्थनासमाजाने चालविल्या. गरीब स्त्रीपुरुषांकरिता रात्रीच्या शाळा काढल्या. स्त्रीशिक्षणाकरिता ‘ आर्य महिला समाज ’ स्थापन केले. बालहत्या-प्रतिबंधक गृहे, अनाथबालकाश्रम, पुस्तकालये व वाचनालये काढली.

ब्राह्मसमाज किंवा प्रार्थनासमाज हे विश्वधर्मी असले, तरी त्यांच्यातील बहुतेक सदस्य हिंदुधर्मीय समाजातील असल्यामुळे त्यांच्या धार्मिक व नैतिक प्रेरणेचा मुख्य स्रोत उपनिषदे व संतसाहित्यातूनच निघत होता.

महाराष्ट्राच्या धर्मसुधारणेच्या आंदोलनाला प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज यांनी तात्त्विक अधिष्ठान दिले. त्याचा अर्थ असा : मनुष्याच्या शुद्ध नैतिक जीवनाला ईश्वराचे अधिष्ठान आवश्यक आहे. कारण ईश्वराच्या प्रार्थनेने मनुष्याच्या हृदयातील नैतिक निष्ठा दृढ होते. ईश्वराचे ज्ञान होण्याकरिता धर्म-ग्रंथ किंवा गुरू यांची अपरिहार्यपणे आवश्यकता नाही. मूळ धर्मग्रंथांचे प्रणेते हेही मनुष्यच होते; ऋषी, प्रेषित, साधू किंवा संत यांना ईश्वराचा प्रत्यय आला

याचे कारण, विश्वरचनेचा चमत्कार त्यांना प्रत्ययास आला आणि सर्व मानवांबद्दल व प्राणिमात्रांबद्दल गंभीर सहानुभूती त्यांच्या हृदयात प्रकट झाली हे होय. शुद्ध नैतिक जाणीव व विश्वरचनेच्या चमत्काराची अनुभूती हीच ईश्वराच्या जाणिवेला प्रकट करते, असा ह्या तात्त्विक भूमिकेचा आशय आहे. दुष्ट चालीरीती, गुलामगिरी आणि स्त्रीपुरुषांतील विषमता नष्ट करण्याचे सामर्थ्य, अशी तात्त्विक भूमिका दृढ झाल्यामुळेच प्राप्त होते. सामाजिक सुधारणा हे त्याचे प्रत्यक्ष प्रत्यंतर होय, अशी प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज यांची भूमिका होती.

या भूमिकेच्या विरुद्ध असा समाजसुधारकांचा भिन्न दृष्टिकोण त्याच वेळी पुढे आला. कै. गोपाळ गणेश आगरकर यांनी तो प्रथम मांडला. कुशाग्र बुद्धिमत्ता व ध्येयवादी जीवन जगण्याची ओढ त्यांना होती. घरच्या गरिबीमुळे व ध्येयवादी त्यागवृत्तीमुळे निरंतर कष्टाचेच जीवन आगरकरांना जगावे लागले. खडतर जीवन व व्याधिग्रस्त शरीर असतानाही त्यांचे मन कधी पिचले नाही. त्यांनी मिल्ल व स्पेन्सर यांचे तत्त्वज्ञानविषयक विचार आत्मसात केले. रूसो, व्हॉल्टेर, दिद्रो यांच्या ग्रंथांचे वाचन व चिंतन केले. आगरकर यांनी मानवी इतिहासाचे परिशीलन करून धर्म, राजकारण, समाजरचना व कायदा यात सतत बदल होत असतो तो बदल इष्ट दिशेने घडून आणण्याकरिता बुद्धिवादाचा अवलंब करावा लागतो, असा सिद्धांत निश्चित केला. धर्मतत्त्व व धर्मसंस्था ह्या दोहोंनाही बुद्धिवादाचा निकष लावला, तरच त्यांच्या गतीचे व स्थितीचे यथार्थ ज्ञान होते. म्हणून बुद्धिवादाचा निकष लावून धर्मांची व हिंदुधर्माचीही सुंदर समीक्षा आगरकरांनी केली. आगरकर हे अत्यंत समर्थ असे मराठी गद्याचे लेखक होते. केसरी पत्राचे ते प्रथम संपादक होते. १८८७ सालापासून मतभेदामुळे त्यांचा 'केसरी'शी संबंध तुटला व १८८८ मध्ये मोठ्या धडाडीने 'सुधारक' साप्ताहिक त्यांनी सुरू केले. "इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार," या ब्रीदाला अनुसरून त्यांनी सुधारक चालविला. महाराष्ट्रातील मूर्तिभंजकांच्या परंपरेतील आगरकर हे श्रेष्ठ मूर्तिभंजक होते. सामाजिक छळ, दम्याचा विकार आणि दारिद्य या मरणांतिक शत्रूंना त्यांनी अखेरपर्यंत तोंड दिले. बौद्धिक प्रामाणिकपणा व निष्कलंक चारित्र्य या गुणांची आगरकर हे मंगलमूर्ती होते.

धर्मसंस्थेबद्दल ते म्हणतात : "मानवी समाजाला धर्मसंस्थेची यापुढे गरज नाही. कारण धर्मसंस्थेचा मूळ आरंभ अज्ञान व भीती यांतून झालेला आहे.

धर्मविषयक कल्पना या माणसाच्या वस्तुस्थितीच्या अज्ञानातून आणि परिस्थितीतील अज्ञात संकटाच्या भीतीतून झालेली आहे. मनुष्यजातीचे ज्ञान जसजसे विकसित होत गेले, तसतसा धर्मकल्पनांत परिवर्तन व विकास होत गेला आहे. एकेश्वरवाद ही धर्मकल्पनांच्या विकासाची अंतिम पायरी आहे. मानवजातीने आता या एकेश्वरवादाच्या अंतिम अवस्थेतून आत्मविकासाकरिता व समाजविकासाकरिता बाहेर पडले पाहिजे." असा विचार 'सुधारक' साप्ताहिकात आगरकरांनी प्रथम मांडला. 'धर्मकल्पना आली कोठून?', 'देवता', 'देवतोत्पत्ती', 'मूर्तिपूजेचा उद्भव', 'मूर्तिपूजेचा प्रकार', 'देवतोत्पत्तीविषयी शेवटचे चार शब्द' या लेखांमध्ये धर्मपरिवर्तन व धर्मविकास यासंबंधीची मीमांसा त्यांनी मांडली. शेवटच्या लेखाचा उपसंहार करताना ते म्हणतात, "मनुष्याच्या सर्व जातींत अशा प्रकारच्या एका जातीच्या कल्पनांचा प्रादुर्भाव होण्यास सर्वसामान्य असे काहीतरी कारण असावे असे अनुमान करणे प्रशस्त आहे. हे कारण मनुष्याची विशेष प्रकारची शारीरिक व मानसिक रचना होय, दुसरे काही नाही. वेद, कुराण, बायबल वगैरे सर्व प्रकारच्या धर्मपुस्तकांत आणि मनू, महंमद, ख्रिस्त, कन्फ्यूशिअस वगैरे सर्व देशांतील धर्मकर्त्यांच्या किंवा धर्मसंस्थापकांच्या डोक्यात ज्या कल्पना आल्या, त्या मनुष्याच्या अशा प्रकारच्या प्रवृत्तीमुळे आल्या आणि म्हणूनच त्यांत इतके साम्य आहे. यासारखीच पुराणांची अवस्था आहे. आकाशातून देव येथे कधी आले नाहीत व येथून परत कधी गेले नाहीत. आम्हीच त्यांना येथल्या येथे निर्माण करतो, त्यांच्या गुणांचे पोवाडे गातो आणि चाहील तेव्हा त्यास नाहीसे करतो. जो जो बुद्धीचा विकास होत जाऊन कार्यकारणांचा संबंध चांगला कळू लागतो, तो तो प्राथमिक व पौराणिक कल्पना मिथ्या भासू लागून भूत-पिशाच्च, देव-दानव वगैरे शुद्ध कल्पनेने उत्पन्न केलेल्या शक्तींची असत्यता प्रत्ययास येते; पूजेस व प्रार्थनेस ओहोटी लागते आणि काही वेळ सर्व ब्रह्मांडास उत्पन्न करून त्याचे परिपालन व नाश करणाऱ्या अशा एका परमात्म्याच्या कल्पनेचा उदय होतो. पण पुढे वेदान्त-विचारांच्या कुंडात पेटलेल्या अग्नीत हे द्वैतही खाक होऊन जाते. आणि 'अहं ब्रह्मास्मि' एवढा अनिर्वचनीय विचार मागे राहतो. व्यक्तींच्या व राष्ट्रांच्या धर्मविचारांचा हा कळस आहे. येथपर्यंत ज्याची मजल आली, त्याला सर्व धर्म तुच्छ आहेत." अशा प्रकारे आगरकरांनी धर्माधिष्ठित समाजसुधारणेचा विचार

अमान्य करून मानवी स्वातंत्र्य व समता या मूल्यांवर आधारलेला सामाजिक सुधारणेचा विचार विस्ताराने मांडला. या सामाजिक सुधारणेत राजकीय सुधारणाही त्यांनी अंतर्भूत केली होती.

आगरकरांच्या सामाजिक सुधारणांच्या विचारसरणीची प्रेरक शक्ती एका दृष्टीने जबरदस्त ठरली व दुसऱ्या दृष्टीने निर्बल ठरली. आगरकरांच्या उदया-पासून मराठी साहित्याचे नवे युग निर्माण झाले. कविता, कादंबरी व नाटक यांना नवा सामाजिक आशय आगरकरांच्यामुळे प्राप्त झाला. नवा सामाजिक आशय ज्या साहित्याला प्राप्त झाला, ते अग्रस्थानी विराजमान होऊ लागले. तीच परंपरा आतापर्यंत चालू आहे. परंतु प्रत्यक्ष सामाजिक परिवर्तन करण्यात आगरकरांच्या विचाराला आवश्यक तेवढे यश मिळाले नाही.

हजारो वर्षांचे हिंदुसमाजाचे रूढिनिष्ठ, चैतन्यशून्य, दगडासारखे अगतिकत्व मोडण्यास हे आंदोलन असमर्थ ठरले. सत्यशोधक चळवळीचे पुढे ब्राह्मणेतर चळवळीत रूपांतर झाले. सुशिक्षित पांढरपेशा समाज फारसा बदलला नाही किंवा हालला नाही. खेड्यांतील व शहरांतील बहुजनसमाजाला या आंदोलनाची दादही लागली नाही. याचे कारण तो निरक्षरतेच्या अंधकारात निद्रावश झाला होता. जोतिबा फुले यांची सत्यशोधक चळवळ ग्रामीण बहुजनसमाजाला अंध-श्रद्धेच्या तंद्रीतून जागृत करण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु १८९० मध्ये जोतिबा फुले निवर्तले व त्यांच्या चळवळीची ज्योतही त्यांच्याबरोबरच मालवली. ही एकोणिसाव्या शतकाच्या अखेरची परिस्थिती होय.

कोल्हापूर येथे श्रीछत्रपती शाहू महाराजांची कारकीर्द विसाव्या शतकाच्या प्रारंभी चमकू लागली. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत सत्यशोधक चळवळीची ज्योत पुन्हा पेटू लागली. शाहू महाराजांना जातिभेद नको होता, परंतु गुणकर्मा-वर आधारलेली चातुर्वर्ण्य व्यवस्था पुनरुज्जीवित करावयाची होती. जोतिबा फुल्यांच्या, वेदशास्त्रे वा कोणतेही धर्मग्रंथ प्रमाण न मानणाऱ्या विश्वधर्मापेक्षा वेदनिष्ठ आर्यसमाजाचा हिंदू समाजाला आधुनिक सामाजिक सुधारणेच्या द्वारे पुनरुज्जीवित करण्याचा व जातिभेदरहित अशा केवळ गुणकर्मावर आधारलेल्या चातुर्वर्ण्याच्या तत्त्वावर हिंदू समाजाची पुनर्घटना करण्याचा विचार व कार्यक्रम अधिक पसंत होता. या कलियुगात ब्राह्मण व शूद्र असे दोनच वर्ण अस्तित्वात आहेत; क्षत्रिय व वैश्य हे वर्ण कलियुगात नाहीत, अशी दक्षिण भारतात व महा-

राष्ट्रात समजूत होती. या समजुतीप्रमाणे ब्राह्मण पुरोहित ब्राह्मणेतरांच्या घरी वेदोक्त कर्म करण्यास विरोध करत. पुन्हा चातुर्वर्ण्य स्थापण्याकरिता गुणधर्मांनी क्षत्रिय व वैश्य असलेल्यांच्या घरी ब्राह्मणांनी वेदोक्तकर्मे चालू करावी, वेदमंत्रांनी ब्राह्मणेतरांच्या घरची उपनयन, विवाह, अंत्यकर्म, पूजा, प्रतिष्ठा, उत्सवसमारंभ ब्राह्मणांनी पार पाडावेत, याकरिता वेदोक्ताचे आंदोलन श्री छत्रपती शाहू महाराजांनी सुरू केले. संकेश्वर येथील शंकराचार्यांच्या पीठाची जहागिरी मोठ्या प्रमाणात कोल्हापूर संस्थानच्या हद्दीत होती. संकेश्वर येथील शंकराचार्यपीठास करवीरपीठ म्हणतात. या पीठाच्या आचार्यांनी वेदोक्तास मान्यता द्यावी, असा प्रयत्न शाहूमहाराजांनी केला. त्याकरिता त्यांनी वेदोक्तास मान्यता देणारे श्री. कुर्तकोटी यांची त्या पीठावर स्थापना केली. आर्यसमाजाची एक शाखाही कोल्हापूर येथे निर्माण झाली. परंतु पुण्यातील व एकंदर महाराष्ट्रातील ब्राह्मणजातीय पुरोहितांचा व पंडितांचा वर्ग व पुण्यातील लो. टिळकांसारखे नेते किंवा सुशिक्षित ब्राह्मण पुढारी या वेदोक्ताच्या विरोधी होते. वाई येथे वैदिक ब्राह्मणांचा मोठा वर्गही वेदोक्ताच्या विरोधी होता. त्यामुळे शाहूमहाराजांची ही वेदोक्त चळवळ मूळ धरीना. त्यामुळे भास्करराव जाधवांच्या वैचारिक नेतृत्वाखाली सत्यशोधक चळवळ प्रबळ झाली व वाढली. या चळवळीत बहुजनसमाजातील सुशिक्षित लोक सामील झाले व या चळवळीचा परिघ वाढला. त्यात जैन, मुसलमान यांच्यातील प्रतिष्ठित मंडळीही सामील झाली. भास्करराव जाधव यांना पोथीप्रामाण्य मान्य नव्हते. परंतु या चळवळीच्या कार्यक्रमात हिंदुधर्म सुधारणेचाही कार्यक्रम अंतर्भूत झाला होता. मार्टिन ल्यूथरने ज्याप्रमाणे पुरोहित वर्चस्वाविरुद्ध आंदोलन केले, तसेच हे आंदोलन आहे असे भास्करराव जाधव म्हणत. ब्राह्मणेतर पुरोहितवर्ग वेदोक्त संस्कार करण्याकरिता तयार करण्याचा प्रयत्न झाला. त्याकरिता क्षात्र जगद्‌गुरूचे पीठही तयार करण्यात आले. परंतु या हिंदुधर्मसुधारणेच्या कार्यक्रमापेक्षा बहुजनसमाजाच्या ब्राह्मणविरोधी जागृतीलाही अधिक महत्त्व आले. ब्राह्मण, गुजराती व मारवाडी सावकार यांच्या जबरदस्त सावकारी पिळवणुकीने चिडलेले ग्रामीण शेतकरी व उदीमधंद्याचे लोक या चळवळीत सामील झाले. ब्राह्मणांच्या हाती राजकीय चळवळीचे नेतृत्व होते व सरकारी नोकरवर्गात ब्राह्मणवर्गाचाच वाजवीपेक्षा अधिक भरणा झालेला होता. ब्राह्मण सरकारी नोकरांमुळे सावकारी पिळवणूक अखंडपणे चालू होती, सावकारी

कर्जाचा बोजा वाढत जाई व कर्ज न फिटल्यामुळे शेतजमिनी सावकारांच्या घशात पडत. ब्राह्मणांचे राजकीय नेतृत्व व ब्राह्मणांनी व वाण्यांनी चालविलेले आर्थिक शोषण यांच्याविरुद्ध सत्यशोधक चळवळीला उग्र स्वरूप प्राप्त झाले. ती ब्राह्मणेतर चळवळ बनली त्यामुळे जोतिबा फुल्यांचा स्वातंत्र्य, समता व मानवी बंधुत्व याच्यावर आधारलेला विश्वधर्म दृष्टिआड झाला. परंतु या ब्राह्मणेतर चळवळीबरोबर धर्मसुधारणेच्या चळवळीने महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजातही १९२० नंतर पुन्हा मान वर काढली.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत ही चळवळ दडपली गेली होती. परंपरागत समाजरचनेचे समर्थन व प्राचीन संस्कृतीतील शाश्वत अध्यात्मवादाचा पुनरुद्धार करणारी प्रवृत्ती या सुमारास फार बळावली. स्वामी विवेकानंद यांनी भारतीय संस्कृतीच्या, भारतीय वेदांताच्या व अध्यात्मवादी रहस्याच्या उदात्ततेचे उत्कृष्ट व भव्य समर्थन केले; त्यामुळे विवेकानंदांना दिगंत कीर्ती लाभली. स्वामी रामतीर्थ, योगी अरविंद घोष, लो. टिळक, राधाकृष्णन् इत्यादिकांनी भगवद्गीता व उपनिषदे यांच्या आधारे दैदीप्यमान असे प्रबंध व निबंध प्रसिद्ध केले. विवेकानंदादी तत्त्वज्ञ समाजसुधारणेच्या विरुद्ध नव्हते; परंतु त्यांच्या अध्यात्मवादाच्या नव्या मांडणीमुळे हिंदुधर्मावर अधिष्ठित असलेल्या सामाजिक रूढी व जातिभेद यांचे समर्थन करणारे निबंध व प्रबंधही प्रसिद्ध होऊ लागले. विधवाविवाह, जातिभेदनिरास, प्रौढविवाह इत्यादिकांना उत्तेजन देणाऱ्या संस्थांची व सुधारकांची अवहेलनाही सुरू झाली. नास्तिक्य, व्यभिचार, सुरापान आणि मांसाहार या पापांनी सुधारक पछाडले आहेत, असाही आरोप निंदकांनी सुरू केला. भ्रष्टाचाराचे अनेक प्रकारचे आरोप सुधारकांवर होऊ लागले. किंबहुना समाजसुधारणेच्या प्रवृत्तीच्या मुळाशी या पापाचाराची वासनाच आहे असाही प्रचार होऊ लागला. या प्रतिक्रियेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य महादेव शिवराम गोळे यांनी १८९८ मध्ये लिहून प्रसिद्ध केलेले 'हिंदुधर्म आणि सुधारणा' हे पुस्तक (पृ. ४०७) होय श्री विद्याधर पंडित या टोपण नावाखाली त्यांनी हे पुस्तक लिहिले. हा मराठी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथ म्हणून त्या वेळेस ठरविला गेला होता. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ग्रंथकार प्रा. गोळे म्हणतात की, "जुन्या धर्मास व रूढीस जेवढे उदात्त व उत्कृष्ट स्वरूप देण्याचा प्रयत्न करवेल तेवढा या ग्रंथात विद्याधराने केला आहे. सुधारकांचीही

सुधारणा झालीच पाहिजे; सुधारक युरोपीय तत्त्ववेत्त्यांची मते सामाजिक संस्थांस लावून त्यांचे गुण नाकारतात. स्वधर्माच्या तत्त्वांचे पुष्कळसे अज्ञान व परदेशीय तत्त्ववेत्त्यांच्या विचाराचे पुष्कळसे ज्ञान अशी ही स्थिती, या आमच्या देशात राजकीय कारणांमुळे उत्पन्न झाली आहे. इंग्रजी शिक्षणाचे सामाजिक दुष्परिणाम होऊन सुधारणावाद उत्पन्न झाला आहे. या ग्रंथात जातिभेद व त्यातील उच्च-नीचभाव हे मानवी सद्‌गुणास अत्यंत पोषक व विकासवादाशी सुसंगत आहेत, असे समर्थन केले आहे; आणि स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही तत्त्वे अव्यवहार्य व विकासवादविरोधी आहेत म्हणून त्याज्य ठरविली आहेत; बालविवाह, विधवा-विवाह-निषेध इत्यादी चाली कौटुंबिक स्थैर्यास कशा कारण झाल्या आहेत, याचे प्रगल्भपणे विवरण केले आहे.

१९२० सालानंतर ही सुधारणाविरोधी प्रतिक्रिया विराम पावू लागली. महाराष्ट्रातील ब्राह्मण संस्कृत पंडितांमध्ये धर्मसुधारणेचा व समाजसुधारणेचा पुरस्कार करणारे काही पंडित उदयाला आले व त्यांनी तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी मंडळ स्थापिले. वाई येथील ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती, मुंबईतील भारतरत्न पां. वा. काणे व नागपूर येथील विद्वद्रत्न कै. के. ल. दप्तरी हे तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी मंडळाचे अग्रणी होत. हिंदुधर्मग्रंथांचेच आलोकन करून धार्मिक व सामाजिक सुधारणा कशा इष्ट आहेत, याचे समर्थन या मंडळींनी सुरू केले व सर्व हिंदूंना समान असे वेदोक्त कर्मकांड सक्षेपाने सुरू केले. स्वामी केवलानंद यांनी असा विचार मांडला : वेद व स्मृती यांचा अर्थ करण्याच्या मीमांसापद्धती व ऐतिहासिक पद्धती अशा दोन पद्धती आहेत. सर्व वेद व सर्व स्मृतिग्रंथ यांच्यामध्ये परस्पर-विरोध नाही. विरोध दिसतो तो पूर्वमीमांसाशास्त्राच्या आधारे निरसन करता येतो; सर्व धर्मशास्त्रग्रंथांच्यामध्ये एकवाक्यता आहे; असा मीमांसापद्धतीचा आशय आहे. परतु ही पद्धती बरोबर नाही; वेद व स्मृतिग्रंथ हे भिन्न भिन्न देशकालपरिस्थितीमध्ये उत्पन्न झाले असून, त्या त्या देशकालपरिस्थितीप्रमाणे ऋषिमुनींनी किंवा तज्ज्ञांनी धर्मपरिवर्तन केले असल्यामुळे वेद व इतर धर्मशास्त्रे यांच्यामध्ये परस्परविरोध आढळतो व त्यांचा समन्वय होऊ शकत नाही. म्हणून मीमांसापद्धती टाकून ऐतिहासिक पद्धतीने धर्मग्रंथांचा अर्थ करावा." स्वामी केवलानंदांनी ऐतिहासिक पद्धती स्वीकारून जातिभेद ही संस्था व स्मृत्युक्त किंवा रूढिप्राप्त स्त्रीपुरुषसंबंधांचे नियम सद्यःपरिस्थितीत समाजकल्याणाच्या अनुरोधाने

बदलले पाहिजेत, असा सिद्धांत मांडला. श्री. पां. वा. काणे यांनी इंग्लिशमध्ये अनेक खंडात्मक धर्मशास्त्राचा इतिहास विस्ताराने लिहून या ऐतिहासिक पद्धतीचे समर्थन केले. या ग्रंथास आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली आहे.

विद्वद्रत्न कै. के. ल. दप्तरी यांनी अधिक खोल जाऊन 'धर्मरहस्य' व 'धर्मविवादस्वरूप' ह्या दोन ग्रंथांत धर्ममीमांसा मांडली आहे. धर्माचे चोदना-लक्षण व निःश्रेयस लक्षण अशी दोन स्वरूपे त्यांनी सांगितली. विद्वान, शीलसंपन्न, त्यागी व निष्कामबुद्धीचे समाजनेते म्हणजे ऋषी, समाजहिताकरिता जे धर्मनियम सांगतात ते धर्मनियम म्हणजे चोदनालक्षण धर्म होय. चोदना म्हणजे आज्ञा. या आज्ञा काळ बदला किंवा मन्वंतर झाले म्हणजे बदलतात. शीलसंपन्न साधू लोक समाजाची धारणा होण्याकरिता व समाजाची अवनती टाळण्याकरता वेळो-वेळी एकत्र येऊन प्राचीन काळी विचारविनिमय करीत व जुने धर्म बदलून नवे धर्मनियम सादर करीत. हे साधू म्हणजेच ऋषी होत. मनू म्हणजे त्या ऋषींनी सांगितलेल्या नियमांना धरून समाजाचे प्रशासन चालवणारा समाजशास्ता होय. प्राचीनकाळी भारतात सप्तर्षिसंस्था व मनुसंस्था होती. काळ पालटला म्हणजे मन्वंतर होई. असे अनेक मनू झाले व अनेक सप्तर्षी झाले. या सप्तर्षिसंस्थेने वारंवार विवाहपद्धती बदलली व चातुर्वर्ण्य व्यवस्था गुणकर्मानुसार पुनःपुन्हा स्थापन केली. मनुसंस्था व सप्तर्षिसंस्था बंद पडल्यावरच जातिभेदसंस्था अस्तित्वात आली व दृढ झाली. असा हा मन्वंतराचा, सप्तर्षिसंस्थेचा आणि धर्म-परिवर्तनाचा इतिहास धर्मग्रंथांच्या आधारे वरील दोन ग्रंथांत विशद करून सांगितला आहे. 'चोदनालक्षणधर्माचे' स्वरूप व इतिहास सांगण्याच्या अगोदर श्री. दप्तरी यांनी निःश्रेयसलक्षणधर्म म्हणजे काय याचे प्रतिपादन केले आहे. ते म्हणतात : एकंदरीत अतिशय उच्चतर सुखाची प्राप्ती ज्यापासून होते, ते कर्म म्हणजे निःश्रेयस लक्षणधर्म होय; चोदनालक्षणधर्म कोणते व कोणते नाहीत याचे गमक प्रमाण निःश्रेयसलक्षधर्म होय. श्री. दप्तरी यांनी ईश्वरविषयक व परलोक-विषयक चर्चा धर्मविषयक निर्णयाच्या प्रसंगी टाळावी असे म्हटले आहे. कारण ईश्वराचे वा परलोकाचे ज्ञान होण्याचे कोणतेही साधन मानवास उपलब्ध नाही. इहलोकी मानवसमाजाची ज्याच्या योगाने धारणा व उत्कर्ष होतो, त्यानेच परलोकी हित वा कल्याण होते, असे गृहीत कृत्य स्वीकारूनच धर्मचिंतन करावे, असा श्री. दप्तरी यांचा आशय आहे. ईश्वरविषयक विचार वगळल्यास प्रार्थनासमाज

व सत्यशोधक समाज यांच्या धर्मचिंतनाशी सुसंगत असलेलाच हा धर्मविचार आहे.

गेल्या दीडशे वर्षांतील धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या आंदोलनामुळे सामाजिक व धार्मिक सुधारणेचे पाऊल पुढे पडत आहे. कायद्याच्या क्षेत्रावर त्याचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो. कायद्याने सतीची व बालविवाहाची चाल बंद पाडली. कायद्याने विधवाविवाह मान्य झाला. घटस्फोटाचा हक्क स्त्री-पुरुषांना कायद्याने प्राप्त झाला. हिंदू, बौद्ध व जैन यांची आंतरजातीय लग्ने कायदेशीर ठरली. कायद्याने स्त्रियांना संपत्तीचा वारसाहक्क पुरुषांसमान मिळाला. कायद्याने अस्पृश्यता नष्ट झाली व सर्व जाती व धर्म यांचे सहभोजन समाजमान्य झाले. दीडशे वर्षांपूर्वीच्या हिंदू समाजाच्या रूढी व कायदे व विद्यमान हिंदू समाजाच्या रूढी व कायदे यांच्यात जमीनअस्मानाइतकी तफावत पडली याचे श्रेय भारतातील व महाराष्ट्रातील धर्मपरिवर्तनाच्या आंदोलनाला आहे.

संदर्भ : "अस्मिता महाराष्ट्राची" १९७१, पृष्ठे ५३३ ते ५५१

# १

# आधुनिक मराठी वाङ्मयाची पार्श्वभूमी

भारतीय संस्कृतीने मध्ययुगातून नवयुगात प्रवेश ब्रिटिशांच्या राज्यस्थापनेनंतर केला. ब्रिटिश राज्याच्या स्थापनेनंतर लगेच पाश्चात्त्य विद्येचेही शिक्षण सुरू झाले. बंगालमध्ये व मुंबई शहरात ब्रिटिशांचे राज्य अठराव्या शतकाच्या अखेरीस स्थिर झाले. त्यामुळे तेथे पाश्चात्त्य विद्याविभूषितांची पिढी प्रथम निर्माण झाली. मराठी राज्याचा अंत एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी इ. स. १८१८ मध्ये झाला. मराठी राज्य अस्ताला गेल्यावर १८५७ च्या बंडापूर्वीच पाश्चात्त्य बौद्धिक शिक्षणाचा प्रभाव महाराष्ट्राला जाणवू लागला. पाश्चात्त्य विद्यांचे शिक्षण घेतलेल्या माणसांची महाराष्ट्रातील पहिलीच पिढी, अनेक युगांच्या दीर्घकालीन निद्रेतून जागृती यावी त्याप्रमाणे चकित होऊन भोवताली पाहू लागली. अनेकांनी प्राप्त परिस्थितीचे धैर्याने स्वागतच केले. तळमळीने व आतुर जिज्ञासेने स्वतःच्या सांस्कृतिक जीवनाच्या दुःस्थितीवर, राजकीय पतनावर व विजयी पाश्चात्त्य संस्कृतीवर नवशिक्षितांची दृष्टी फिरू लागली.

लोकहितवादी देशमुख, कृष्णशास्त्री चिपळूणकर, जोतिराव फुले, न्या. मू. रानडे, न्या. मू. तेलंग, डॉ. भांडारकर इत्यादी मंडळी क्रमाने उदयाला आली. भारतीय धार्मिक संस्कृती व समाजव्यवस्था जीर्णावस्थेला पोचली आहे, तिच्यातील चैतन्य मंदावले आहे, असा प्रत्यय या समालोचकांना आला. सगळेच तपासले पाहिजे व सगळेच बदलले पाहिजे, अशी भावना झालेले अनेक विचारवंत, सामाजिक व धार्मिक सुधारक महाराष्ट्रात पुढे आले. पाश्चात्त्य शिक्षणामुळे

व पाश्चात्त्य संस्कृतीच्या संघर्षामुळे समीक्षापर दृष्टिकोण लाभला. परंपरा, रूढी व धर्मग्रंथ यांचे दैवी प्रामाण्य स्वीकारणाऱ्या श्रद्धायुगाचा अंत त्यामुळे समीप आला. समीक्षाप्रधान युग अवतरले. हे नवयुग प्रथम बंगालमध्ये प्रभावी होऊ लागले. नंतर बंगालमधील नवयुगाने महाराष्ट्रातील नवचेतनेला साथ दिली.

महाराष्ट्रातील नवचेतनेला एका बलवत्तर व हृदयविदारक ऐतिहासिक घटनेमुळे एक अधिक विशिष्ट अर्थ आला. ही घटना कट्यारीप्रमाणे हृदयात सलू लागली. ज्यांचे मन सामर्थ्यशाली होते, त्यांच्या हृदयात या सलणाऱ्या कट्यारीमुळे उद्भूत झालेली वेदना विचारशक्तीचा पुरवठा करू लागली. पहिल्या पिढीचा अभिमान हृदयात भरलेल्या या वेदनेने खंडित झाला होता. कारण मराठी राज्याचा पराभव झाल्यामुळेच ब्रिटिश राज्य भारतात स्थिरावू लागले होते. या पराभवाच्या जाणिवेची व्यथा समालोचनास प्रवृत्त करती झाली. भारतीय जीवनाचा व इतिहासाचा अभ्यास करून काय निष्कर्ष निघतो, हे ही पिढी पाहू लागली. मोठीच प्रतिक्रिया निर्माण झाली. भूतकाळाचा अर्थ लावून आता पुढे गेले पाहिजे, सर्वच सुधारले पाहिजे, पाश्चात्त्यांचे अनुकरण केले पाहिजे, अशी एक प्रतिक्रिया होती. दुसरी भूतकाळाचे समर्थन करणारी प्रतिक्रिया होती.

या नव्या प्रतिक्रियेतून आधुनिक महाराष्ट्र तयार झाला. मती व कृती किंवा मनन व आचरण यांना नवेच रूप आले. नव्या प्रकारच्या मननाने आधुनिक वाङ्मयाची चळवळ निर्माण झाली व नव्या प्रकारच्या आचरणाने धार्मिक, राजकीय व 'सामाजिक चळवळ निर्माण झाली. विचार व क्रिया यांचा या चळवळीत घनिष्ठ संबंध राहिला. याचा अर्थ असा नव्हे की, नुसती नवी कृती करणारी माणसे व केवळ नवे वाङ्मय निर्माण करणारी माणसे त्यात नव्हती. केवळ कृतिपर आणि केवळ वाङ्मयपर अशी माणसे समाजात पुष्कळ असतात. मती व कृती यांचा ज्यांनी उत्कृष्ट मिलाफ साधला आहे, अशी माणसे अत्यंत थोडी व निवडकच असतात. हेच नव्या युगाचे बलशाली प्रवर्तक होत. इतिहास कित्येक वेळा असेही दाखवितो की, त्या त्या युगाचा किंवा कालखंडाचा प्रतिनिधिभूत द्रष्टा, कवी, वाङ्मयकार, तत्त्ववेत्ता, कलाकार, लोकनेता व क्रांतिकारक एकच असतो. तसे अनेक असले, तरी त्यांच्यात तरतमभाव पुष्कळच असतो ते युग किंवा कालखंड विशिष्ट प्रकारच्या सामाजिक शक्तींचे निदर्शक असले, तरी काही थोड्या व्यक्तींतच त्या सामाजिक शक्तीचा प्रभाव उन्नत स्वरूपात प्रकट

झालेला असतो. म्हणून व्यक्तिनामांनी विशिष्ट कालखंडाचा किंवा विशिष्ट युगाचा केलेला निर्देश शास्त्रदृष्ट्या युक्त ठरतो.

महाराष्ट्रातील वाङ्मयीन चळवळ आणि राजकीय, सामाजिक व धार्मिक चळवळ या एकरूप झालेल्या किंवा एकमेकांत गुंतलेल्या अशाच दिसतात. त्यांच्या एकमेकांच्यावर क्रिया-प्रतिक्रिया सतत होत असलेल्या दृग्गोचर होतात. कित्येक वेळा राजकीय, सामाजिक व धार्मिक चळवळीचे स्वरूप वैचारिक अतएव वाङ्मयीनच प्रामुख्याने दिसते. निदान विचार हा त्याचा महत्त्वाचा भाग दिसतो व विचाराचा प्रसार करण्याचे पर्यवसान आचार असे दिसते.

लोकहितवादी गोपाळराव देशमुख व जोतिराव फुले हे दोघे धार्मिक व सामाजिक सुधारणेचा विचार प्रवृत्त करणारे त्या नवयुगाचे पहिले पुरुष होत. लोकहितवादींचा विचार व फुले यांचा आचार सामर्थ्यशाली होता. अवनत व दलितवर्गाची प्रक्षुब्ध जाणीव व मूलगामी सामाजिक परिवर्तनाची आकांक्षा यांचे भारतातील पहिले प्रतीक फुले होत. मध्यमवर्गीय सुधारणेची चळवळ लोकहितवादींच्या वैचारिक लेखनापासून सुरू झाली. धार्मिक व सामाजिक सुधारणांच्या विचारांचा विकास ब्राह्मसमाजाच्या महाराष्ट्रातील शाखेने केला. न्या. मू. रानडे, डॉ. भांडारकर इत्यादिकांच्या प्रयत्नांनी या चळवळीला रूप आले. या चळवळीमुळे ज्या क्रिया व प्रतिक्रिया उत्पन्न झाल्या त्यांतच महाराष्ट्रातील आधुनिक वाङ्मयाची चळवळ वाढीस लागली.

नवे राजकीय, सामाजिक व धार्मिक विचार व नवीन वाङ्मयीन चळवळ यांना निर्णायक रूप येण्यास महाराष्ट्रात चिपळूणकर, आगरकर व टिळक या तीन व्यक्ती सर्वांत अधिक कारणीभूत झाल्या. महाराष्ट्रातील वैचारिक व वाङ्मयीन चळवळींची दिशा या तीन व्यक्तींच्यामुळेच निश्चित झाली. लो. टिळकांच्या योगाने तर सर्व भारतातील गेल्या शतकातील राजकीय चळवळीला एक विशिष्ट वळण लागले व तेच शेवटपर्यंत टिकले; म्हणून चिपळूणकरांचे, आगरकरांचे व टिळकांचे पृथक् वैशिष्ट्य काय होते हे संक्षेपाने दिग्दर्शित करणे, वाङ्मयीन इतिहासाचा अर्थ ठरविण्यास अत्यंत उपयुक्त होईल.

आधुनिक मराठीच्या गद्याचा आकार चिपळूणकरांनी निर्माण केला. विचार-भाषेचे अभिजात गद्य मराठीत पूर्वी नव्हते. नव्या प्रकारच्या विचाराला नव्या प्रकारची भाषा लागते. ब्रिटिश राजवटीच्या पूर्वी मराठीला जे वळण होते, ते पद्य

व काव्य यांनाच उपयुक्त होते. त्यातील शैली, वाक्प्रचार व आविष्करणाच्या तऱ्हा वैचारिक गद्याला अनुकूल नव्हत्या. तेव्हा गद्य बाल्यावस्थेत होते. घरगुती व सार्वजनिक व्यवहारांची व देवघेवींची भाषा, एवढेच गद्याचे स्वरूप होते. ते तुटपुंजे गद्य शुद्ध विचार व्यक्त करण्यास समर्थ नव्हते. विविध, तारतम्ययुक्त व गुंतागुंतीच्या कल्पनांचे तार्किक सांधे जुळविणारे गद्य विचारभाषेस लागते, तसे ते नव्हते. विचार व्यक्त करणारे विद्येचे गद्य मराठीत व इतर प्रादेशिक भाषांमध्ये ब्रिटिश अमदानीपर्यंत लिहिले गेले नव्हते. संस्कृत हीच तोपर्यंत विद्यांची विचार-भाषा होती. वेदान्त आणि पौराणिक कथा यांच्याभोवती लोकभाषांचे भ्रमर भ्रमत होते आणि हे भ्रमर पारलौकिक कथांच्या व पारमार्थिक भावनांच्या मधुपानातच गुंगले होते. त्यामुळे विचारभाषा ही पदवी भारतीयांच्या लोकभाषांना लाभू शकली नाही. बौद्धिक व वैज्ञानिक विचारांचा पुरवठा करणारे विषय म्हणजे तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, साहित्यशास्त्र, वैद्यक, अर्थशास्त्र, गणित, ज्योतिष इत्यादी विषय संस्कृतमधून लोकभाषांच्या मध्ये कधी चांगले अवतरले नाहीत व तसा विशेष प्रयत्नही कधी झाला नाही. त्या दरिद्री राहिल्या.

लोकभाषांना विचारभाषा ही पदवी ब्रिटिश राज्य स्थापन झाल्यानंतर यावयास लागली. गद्य हाच आकार विचारभाषेला अत्यंत अनुरूप असतो. पद्याची किंवा छंदाची बंधने विचाराच्या अनिरुद्ध संचाराला व सर्वांगीण आविष्काराला पदोपदी अडथळा आणीत असतात. पद्य हे भावुकतेचे एक अंग आहे. भावुक आकर्षणाची फिकीर शुद्ध विचाराला नसते. पद्यात्मता विचाराच्या वास्तविक कार्याच्या दृष्टीने बाह्यात् बाब ठरते. बौद्धिक संगती साधण्याच्या उद्देशाने शब्द, वाक्यखंड, वाक्य आणि वाक्यमालिका यांचा विस्तार करणारी भाषा म्हणजेच गद्य होय. गद्य हे विद्यांचे आकलन करून देण्याचे मुख्य साधन होय. पद्यापेक्षा गद्याचे कार्यक्षेत्र विविध व विस्तृत असते. मननपरतेशी व मानवी सफल कृतींशी गद्य अत्यंत निगडित असते.

चर्चा करण्यास पद्य असमर्थ असते. मनाला रंजनापेक्षा विवेचकतेची अधिक गरज आहे. पद्याच्या योगाने साधकबाधक विवेचन व प्रमाणांची योग्य छाननी करण्यास अडचणी येतात. पद्य हे विवेचनात अडखळते व कोलमडून पडते. विवेचनाची ताकद न सांभाळता आल्यामुळे ते क्षीण व निस्तेजही बनते. बौद्धिक विचारांच्या उत्तुंग शिखरावर चढत असता ते दमते. तसे गद्याचे नाही. ते कोठेही

अनिर्बंध विहार करू शकते. हेगेल म्हणतो की, गद्य हे पद्यापेक्षा उच्चतर अवस्थेस पोहोचलेले भाषेचे रूप होय. बौद्धिक संस्कृतीची सफल साधना गद्या-मुळेच घडू शकते.

विचारसंपन्न अशा पाश्चात्त्य गद्याचा आदर्श पुढे ठेवून मराठी गद्याचा अवतार होऊ लागला. निबंध हा गद्याचा एक सुंदर प्रकार होय. निबंधात विचारांच्या गुणोत्कर्षाबरोबरच कवितेचेही काही सौंदर्यगुण उतरू शकतात. नियत-कालिके, मासिके व इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद अशा रूपाने मराठीतील पहिले आधुनिक गद्य निर्माण होऊ लागले. इंग्रजीमधील निबंधवाङ्मयातील सुप्रसिद्ध निबंधांच्या तोडीचे निबंध निर्माण होण्यास पन्नास वर्षे उलटून जावी लागली.

इ. स. १८७४ साली महाराष्ट्रात कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे पहिले थोर निबंधकार झळकू लागले. तोपर्यंत मराठी भाषा परप्रत्ययी होती. मराठी भाषेचे निजरूप विचारसमर्थ आहे, अशी ग्वाही तत्पूर्वीचे वाङ्मय देऊ शकत नव्हते. मराठी सरस्वती आरोग्यसंपन्न, तरतरीत, मदनमञ्जरी, सुंदर चिरीदार कुंकुमाने शोभणारी, महाराष्ट्राच्या नव्या प्रपंचास उचलून धरण्यास समर्थ व दक्ष युवती आहे, असे निबंधमालाकारांच्या लेखणीनेच प्रथम दाखवून दिले. त्यांनी इंग्रजी भाषेची चांगली सेवा केली होती. मराठीस अनुरूप अशी नवी घडण कोणती, हे त्यांना नीट दिसले.

इंग्रजी भाषेची वाक्यरचना विचारक्रमाला धरून, वैचारिक तत्त्वांना अनुसरून विकास पावलेली आहे. तिचे स्वतःचे एक वेगळे तर्कशास्त्र आहे. तो रचनाक्रम जशाच्या तसा मराठीने आत्मसात करणे असंभवनीय होते. मराठीचे व्याकरण व तिचा स्वभावधर्म न बिघडविता इंग्रजी रचना अंगीकारणे जरूर होते. इंग्रजी रचना अंगीकारण्याचा ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केला, त्यांना पूर्ण अपयश आले; कारण त्यामुळे वाक्य बोजड व हेंगाडे बनते.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी मराठी भाषेच्या स्वभावास अनुरूप अशीच मोठी वाक्यरचना शोधून काढली. गुंतागुंतीची वाक्यरचना हे प्रगल्भ, संपन्न व सूक्ष्म विचारांचे एक महत्त्वाचे साधन आहे. अशा वाक्यरचनेबद्दल अनादर असणे, हे बुद्धिदौर्बल्याचे लक्षण आहे. भाषेत मोठा विचार निर्माण व्हावा अशी आशा अशा दुर्बळांच्या योगाने दुरावते. निबंधमालाकारांनी मोठ्या वाक्यांची रचना करण्यात यश मिळविल्यामुळे मराठीला स्वतःचे वैचारिक राज्य निर्माण

करण्याची योग्यता आली. म्हणूनच " मराठी भाषेचे शिवाजी " ही पदवी त्यांनी स्वतःच स्वीकारली. त्यांचा हा अभिमान यथार्थ ठरला. अशा मराठी भाषेच्या साधनांमुळेच पाश्चात्त्य विद्येचे वज्र हस्तगत करता येईल, अशी आशा आता सफल होणे शक्य आहे. ज्ञानाचे असे मोठे साधन निर्माण झाल्यामुळेच राष्ट्र निर्माण करता आले.

'आमच्या देशाची स्थिती' या निबंधात निबंधमालाकार म्हणतात : " मनुष्याची किंवा राष्ट्राची सुधारणा करावयाची म्हटली म्हणजे तिचा पाया आत्मस्थितीचे पूर्ण ज्ञान हा होय. " " देशस्थिती सुधारण्याचा राजमार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणे हा होय. " देशाभिमान, पाश्चात्त्य विद्येबद्दल आकर्षण, इतिहासाच्या महत्त्वाची जाणीव आणि स्वभाषेच्या अभिवृद्धीची कळवळ यांचे पोषण निबंधमालेने प्रथम केले. विशेषतः ग्रंथकर्तृत्वाची आकांक्षा त्यांच्या लेखनाने प्रदीप्त झाली. ते मोठ्या खेदाने एके ठिकाणी म्हणतात : " आमच्या देशातील लोकांस अद्याप ग्रंथकर्तृत्वाची मर्मे चांगलीशी कळू लागली नाहीत. वाग्देवीची उपासना...बिकट आहे. " निबंध, चरित्र व टीकायांच्या लेखनाचे सामर्थ्य मराठीत आहे, हे सिद्ध करणारे नमुने प्रथम निबंधमालेत सापडतात.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी विचारसाधन बनेल अशी मराठी भाषा निर्माण केली; मराठी भाषा सकस परंतु पडीक भूमीप्रमाणे आहे, ती कसली तर फलसमृद्ध होईल, असा विश्वास निर्माण केला. त्यांनी विचारभाषा निर्माण केली खरी, परंतु तेवढ्याने समृद्ध विचार निर्माण होत नसतो. समृद्ध विचाराचे जीवित विचारस्वातंत्र्याच्याच वातावरणात राहू शकते. विचारस्वातंत्र्याला अनुकूल असलेली अशी समाजसंस्था उत्पन्न झाल्याशिवाय विचारस्वातंत्र्याचे वातावरण खेळत नसते. रूढीनिष्ठ समाजसंस्था विचारस्वातंत्र्यास मारून टाकते. अशा प्रकारची दृढभावना मालाकारांच्या ठिकाणी नव्हती. अशा प्रकारची भावना हेच बुद्धिवादाचे मूळ होय. बुद्धिवादाचा पुरस्कार करणारी व्यक्ती महाराष्ट्रात यानंतर पुढे आली. नुसते भाषेचे शरीर काय उपयोगी ? विचारस्वातंत्र्य हा तिचा आत्मा होय. मराठी भाषेत विचारस्वातंत्र्याचे तत्त्व प्रिन्सिपॉल कै. गो. ग. आगरकर यांनी ओतले. सामाजिक परिवर्तनाच्या व सुधारणेच्या उत्कंठेने प्रेरित होऊन त्यांनी अंधश्रद्धेवर, विषम व अन्यायी रूढींवर वैचारिक आघात सुरू केले. आगरकर हे पाश्चात्त्य उदारमतवादाचे पहिले मोठे भारतीय प्रतिनिधी होत.

समाज बदलण्याची वासना क्षुब्ध करणारे, व्यापक मानवी सहानुभूतीने तळमळणारे आणि समतापूर्ण व रम्योदात्त ध्येयसृष्टीकडे आशापूर्ण नेत्राने पाहणारे मराठी वाङ्मय निर्माण होण्याची वैचारिक पार्श्वभूमी आगरकरांनी रचली. या पार्श्वभूमीवर प्रखर वैचारिक तेजाने तळपणारी आगरकर ही व्यक्ती उभी राहिलेली दिसते. जीवननिष्ठ नवे साहित्य निर्माण करण्याचा काळ आगरकरांच्या नंतर आला. त्या काळाचे कर्तृत्व आगरकरांकडे जाते. दारिद्र्य, धिक्कार व सामाजिक बहिष्कार यांच्या योगाने त्यांच्या आयुष्याचा उन्हाळा झाला होता. त्यातच शांत राहून आपले सर्व आयुष्य आगरकरांनी समाप्त केले. या जीवन-यज्ञातून जे स्फूर्तीचे तेज निर्माण झाले, त्यामुळे मराठी सारस्वताच्या वृक्षास आधुनिक वाङ्मयाच्या टवटवीत शाखा फुटल्या.

सामाजिक प्रश्नांचा अभिप्राय उलगडून दाखविणारे नाटक, ऐहिक मानवी जीवनात व निसर्गात सौंदर्य पाहणारे व पारलौकिक कल्पनांना पाठमोरे झालेले काव्य आणि ऐहिक मानवी प्रपंचातील सुखदुःखांचा संग्राम चित्रित करणारी रूढी व सुधारणा यांच्या द्वंद्वांचा अर्थ उलगडून दाखविणारी सामाजिक कादंबरी मराठी सारस्वतात विस्तार पावू लागली. आगरकरांनी नवे विचार शिकविले म्हणूनच प्रतिभेला नवा प्रत्यय येऊ लागला. नाहीतर ती वांझ राहिली असती. 'अनिवार्य विचारकलहात सामील व्हा व गतानुगतिक वृत्तींचा त्याग करा' असा आगरकरांचा संदेश होता. आगरकर म्हणतात की, "बांधवहो, विचारकलहाला तुम्ही इतके कशासाठी भिता? दुष्टाचारांचे निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञान-वृद्धी, सत्यशोधन व भूतदयेचा विचार इत्यादी मनुष्यांच्या सुखाची वृद्धी करणाऱ्या गोष्टी विचारकलहाखेरीज होत नाहीत. आजपर्यंत या देशात हा कलह माजावा तितका कधीच न माजल्यामुळे व बहुधा आमचे लोक गतानुगतिकच असल्यामुळे हे भरतखंड इतकी शतके अनेक प्रकारच्या विपत्तींत खितपत पडले आहे."

सामाजिक विषमतेवरही आगरकरांनी जोराचे प्रहार केले आहेत, "ज्या देशात ही असमता वाढत जाऊ लागेल...त्या देशाच्या ऱ्हासास आरंभ झाला असे समजावे", असा सिद्धांत सांगून पुढे ते समतेची व्याख्या सांगतात: "विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे जे सांप्रतकाळी प्रत्येक देशात तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात, ते कायमचे नव्हेत. हळूहळू प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम ही समप्रमाणाने करावी लागून साऱ्यांच्या सुखोपभोगाची

इयत्ता सारखी होत जाणार आहे व जो जो ती तशी होत जाईल, तो तो खरी उन्नती होऊ लागली, असे म्हणता येऊ शकेल."

कै. आगरकरांनी पाश्चात्त्य देशातील मानवतावादाचे विचार प्रथम मराठी भाषेत व्यक्त केले. समाजसुधारणेच्या चळवळीला आवश्यक असलेला ध्येयवाद त्यांनी दिला. त्यामुळे वर्णभेद व जातिभेद हिंदू समाजसंस्थेतून नष्ट करण्याच्या विचाराला तात्त्विक उपपत्तीचा आधार मिळाला व स्त्रियांचे समाजातील अधिकार वाढविले पाहिजेत याला तात्त्विक पाठबळ निर्माण केले. या सर्व व्यापक विचारांच्या मुळाशी भारत राष्ट्राबद्दलची भावना हा स्थायी भाव होता, असे अत्यंत जवळून पृथक्करण केल्यास कळून येते. राष्ट्र व धर्म यांच्या मर्यादेत न मावणारा त्या वेळचा सर्व पुरोगामी विचार जरी होता, तरी त्याच्या मुळाशी सूक्ष्म निरीक्षणांती हाच स्थायीभाव सापडतो. राजा राममोहन रॉय यांच्या आत्म्याचे पोषण करणाऱ्या विचारांच्या अंतर्भागी औपनिषद् ब्रह्मविचाराची बैठक होती. न्या. मू. रानडे यांच्या अंतःकरणाच्या तळाशी संतवाङ्मय बसले होते. चिपळूणकर तर उघड उघड सनातनी राष्ट्रवादाचे पहिले उपासक होते. आगरकरांच्याही बाबतीत यासंबंधी शंका घेतल्यास निर्णायक प्रमाण सापडू शकते. आगरकर "सुधारक काढण्याचा हेतु" या निबंधात म्हणतात :

"येथे एवढेच सांगितले पाहिजे की, मूळ प्रकृती म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडता या पाश्चिमात्त्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत, त्यांचा आम्ही योग्य रीतीने अंगीकार करत गेलो, तरच आमचा निभाव लागणार आहे." "भारतीय आर्यत्वाच्या वृक्षाला खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचे भरपूर पाणी द्यावयाचे. असे केले तरच त्याचे पूर्व स्वरूप नष्ट न होता त्यापासून नूतन शाखावृत वृक्ष अस्तित्वात येईल." "इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार" या प्रसिद्ध निबंधात आगरकर म्हणतात की, "हिंदुधर्मविचारांत आणि सामाजिक आचारांत जेवढे काही खरोखर निर्दोष व हितावह आहे, त्याला कशाचीही भीती नाही. मनु आणि पराशर यांच्या आधाराशिवाय हे अढळ राहणार आहे. पण जे काही सदोष व अहित-कारक आहे, निदान सध्याचे स्थितीत ज्याच्या अपकारिकत्वाबद्दल संशय नाही, ते सारे पाश्चात्त्य ज्ञानकुंडात जळून खाक होणार!" हे त्यांचे उद्गार त्यांच्या अंतर्मनातील राष्ट्रीय परंपरेने निर्माण केलेल्या उन्नत अहंकाराची खूण आहे.

जोतिबा फुले विश्वव्यापी मानवतावादाचे महाराष्ट्रातील अग्रदूत होत. त्यांच्यासुद्धा अंतर्मनातून या उन्नत अहंकाराने पुरा पाय काढला नव्हता. त्यांच्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीत वेदोक्त संस्कारांचे कर्मकांड चालविणारे पुरोहित त्यांनी तयार केले होते.

राष्ट्रीयत्वाची जोपासना व वाढ करण्याचा हेतू यामुळे बळावला. फुले, रानडे, भांडारकर वा आगरकर यांच्या धार्मिक व सामाजिक सुधारणेचे जबरदस्त प्रतिकार करणारे नेतृत्व राजकीय व राष्ट्रवादी विचाराच्या नेत्यांना यामुळेच प्राप्त झाले. चिपळूणकर व टिळक हे या विरोधक प्रवृत्तीचे अध्वर्यू होत. फारच मोठा वैचारिक संग्राम यांच्या योगाने निर्माण झाला. भूतकाळाचे व परंपरेचे समर्थन करणाऱ्या चळवळींचे स्फुरण वा उत्तेजन यांच्यापासून प्राप्त झाले. याचा अर्थ असा नव्हे की, हे विचारनेते सामाजिक व धार्मिक परंपरागत अंधश्रद्धेचे कट्टर समर्थक होते. चिपळूणकरांनी पाश्चात्त्य विद्यांची भांडारे मोकळी करावी व लोकभ्रमांचा उच्छेद करावा, असे मोठ्या पल्लेदार व ओजस्वी भाषेने प्रतिपादिले; टिळकांनी समाजसुधारणेच्या चळवळीला पुढे ढकला एवढेच सांगितले. त्यांच्या समाजसुधारणाविषयक विचारांचा योग्य तपशील मात्र कोठेच सापडत नाही. चातुर्वर्ण्याची टिळकांनीच तरफदारी केली आहे. जातिभेदाचाही क्वचित पाठपुरावा केला आहे. परंतु भारतीय अध्यात्मवादाला त्यांनी नवे वळण दिले. आधुनिक व्यापक मानवधर्म गीतारहस्याच्या योगाने भारतीय अध्यात्माच्या गाभ्यात थोर विचारकौशल्याने व गंभीर पांडित्याने समाविष्ट केला. आजच्या मानवी संस्कृतीची दृष्टी परलोकाकडून वळली असून हेच जग सुधारून मानवी वस्ती बिनधोक बनावी अशा भावनेने भरली आहे. टिळकांच्या गीतारहस्याने कर्मयोगाचे प्रतिपादन करून या भावनेला पाठबळ दिले आहे. टिळकांनी केलेल्या संन्यासयोगाच्या निषेधात याच जगात माणसाने नैतिक जीवन जगण्यात साफल्य मानावे, ही मनीषा दडलेली दिसते.

पहिल्या तीन पिढींतील सामाजिक समता स्थापन करण्याच्या ध्येयाची धार्मिक व सामाजिक सुधारणेची चळवळ अधिक तपशिलांत शिरून रुजवण्याचे कार्य चालू परिस्थितीत महाराष्ट्रातील तीन मोठ्या संस्कृत पंडितांनी केले. ते म्हणजे गुरुवर्य स्वामी केवलानंद सरस्वती, श्रेष्ठ धर्मशास्त्रेतिहासकार डॉ. पांडुरंग वामन काणे व भारतीय ज्योतिषशास्त्राचे महापंडित डॉ. के. ल. दप्तरी हे होत. अव्वल

दर्जाची भारतीय धार्मिक व सामाजिक संस्थांची व विचारांची मीमांसा, हिंदुधर्माच्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचे विवरण आणि मूलभूत तत्त्वांचा बुद्धिवादी परामर्श डॉ. दप्तरी यांनी आपल्या 'धर्मरहस्य', 'धर्मविवादस्वरूप' व 'उपनिषदांचे भाष्य' या पुस्तकांत घेतला आहे. परलोकवाद व हिंदुधर्मग्रंथांचे शब्दप्रामाण्य यांस अमान्य करून केवळ समाजसुधारणेचे तत्त्व म्हणूनच त्यांनी धर्मकल्पनेचा स्वीकार केला आहे. ही चळवळ महाराष्ट्रत सर्वसामान्य जनतेत प्रत्यक्ष फैलावलेली नसली तरी तिचे वैचारिक मूल्य व बुद्धिवादी दृष्टिकोण अत्यंत मोलाचा आहे. या मंडळींनी 'धर्मनिर्णयमंडळ' नावाची संस्थाही सुधारणेच्या चळवळीकरिता स्थापिली आहे. हिंदूंचे लहानसहान धार्मिक विधी व सामाजिक चालीरीती यांनाही अधिक सुटसुटीत व नव्या जमान्यास अनुकूल असे वळण लावण्याचा ही संस्था प्रयत्न करीत आहे. न्या. मू. रानडे यांनी निर्माण केलेल्या सामाजिक परिषदेचाही पुनरुद्धार करण्यास ही संस्था मदत करीत आहे.

भारतातील नवयुगाचे जन्मदाते राजा राजमोहन रॉय, भारताच्या आधुनिक युगाचे मतप्रदर्शक व नव्या उदारमतवादी राजकीय चळवळीचे उत्पादक न्या. मू. रानडे, राष्ट्रीय अभिमानाचे मंत्रद्रष्टे कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, बुद्धिवादी आणि सामाजिक स्वातंत्र्याचा ध्येयवाद निर्माण करणारे आगरकर किंवा परकीय राज्याच्या विरोधी असंतोष पेटविणारे लो. टिळक या सर्वांच्या अंतर्मनात आणि जाणिवेत ओतप्रोत भरलेला मूलभूत भाव म्हणजे पाश्चात्त्य समाजाने येथे स्थापन केलेल्या वर्चस्वाची दुःखद चिंता होय. ही मने सामर्थ्यशाली होती. हे सामर्थ्य राजकारणाकडे अधिक वळले.

भारतीय राष्ट्रीयत्वाचा जन्म सांस्कृतिक पूर्वपरंपरेच्या अधिष्ठानावर झाला, हे आधुनिक भारताचे पहिले व मुख्य लक्षण होय. भारतीय राष्ट्रीयत्वाची मनोभूमिका पुष्ट करावयाची आणि राष्ट्रीय राजकारणाच्या चळवळीचा उठाव करावयाचा या मुख्य उद्दिष्टाने प्रेरित होऊन इ. स. १८८१ मध्ये चिपळूणकरांनी टिळक-आगरकरांच्या सहकार्याने 'केसरी' वृत्तपत्र सुरू केले. 'केसरी' हे प्रतीक उन्नत अहंकाराने अभिनिविष्ट अशा राष्ट्रीय राजकारणाचे उत्कृष्ट द्योतक आहे. भारताच्या राजकीय चळवळीच्या प्रारंभी हे प्रतीक मोठ्या दीर्घदर्शी प्रज्ञाशाली प्रतिभेतून प्रकट झाले. आता हाच केसरी भारतीय संघराज्याच्या ध्वजावर व संघराज्याच्या अधिकृत मुद्रेवर चतुर्मुख असा आरूढ होऊन आपणास भारतीय

राष्ट्रीयत्वाच्या सामर्थ्याचे दर्शन देऊ लागला आहे. हा योगायोग नाही. हे अंतर्मनाचे तर्कशास्त्र कळत वा नकळत सुसंगतपणे माणसाच्या हातून कृती घडवीत असते. आता हा केसरी जागृत होऊन चारी दिशांवर दृष्टिक्षेप करीत भारताच्या सर्वांगीण रक्षणाकरिता सिद्ध झाला आहे. शास्त्रीबुवांच्या मुखाने हा निद्रित असतानाच सांगत आहे : " मी निजलेला आहे, हे पाहून माझ्या संस्कृतीचा, परंपरेचा व अभिमानाचा कोणी वैरी तर आजूबाजूस फिरकत नाही ना, असला तर एका गर्जनेसरिसा त्यास गर्भगळित करीन. "

आगरकरांनी सात वर्षांतच केसरी सोडला, कारण समाजकारणाला डावलून राजकारणाला पट्टाभिषेक करण्याचा केसरीच्या संपादक-मंडळाचा आग्रह त्यांना मानवेना. आगरकर केसरीतून निघाले व त्यांनी समाजसुधारणेला प्राथम्य देऊन आपले ' सुधारक ' साप्ताहिक ( इ. स. १८८८ ) सुरू केले. आगरकर केसरीतून निघाले ही घटना वरवर दिसण्यास वैयक्तिक व साधी दिसत असली, तरी भारताच्या ऐतिहासिक परिणतीचा फार मोठा अर्थ तिच्यात भरला होता. भारतातील स्वराज्यप्राप्तीपर्यंतच्या समग्र सामाजिक चळवळीची दिशा व स्वभाव काय राहणार, याची ही घटना सूचक आहे.

लो. टिळक इ. स. १८९० साली केसरीचे मुख्य संपादक झाले. टिळकांच्या केसरीने भारताच्या सर्व सामाजिक चळवळीचे मुख्य लक्ष्य राजकीय स्वातंत्र्य हेच केले. राष्ट्रातील समंजस व ध्येयवादी अंतःकरणांची तीक्ष्ण राजकीय शस्त्रे निर्माण करणारे कारागीर टिळक बनले. त्यांनी धार्मिक, शैक्षणिक, बौद्धिक, वाङ्मयीन, आर्थिक सुधारणांविषयक सर्व सामाजिक यत्नांना दुय्यम ठरविले. त्यांच्या काळात अशा प्रकारचे यत्न करणाऱ्या ज्या ज्या लहानमोठ्या व्यक्ती पुढे आल्या, त्यांना त्यांनी राष्ट्रीय राजकारणाच्या पुढे दुसऱ्या दर्जाचे स्थान दिले. सगळी राष्ट्रीय जाणीवच राजकीय करून सोडली. त्यामुळे परकीय राज्याच्या अंताशिवाय कोणतेही महान यत्न सफल व संपूर्ण होणार नाहीत, अशी भावना सुशिक्षित मनाच्या तळात ठाव धरून बसली. आधुनिक युगातील राज्य उभारण्यास आवश्यक असलेला सामाजिक पाया व एकाकार संस्कृती यांची जरुरी असते. आधुनिक राज्यसंस्था उभारण्यास हिंदी समाजरचना व परंपरागत संस्कृती प्रतिकूलच आहे, याही मूलभूत मुद्द्याचा टिळकांच्या परकीय राज्यविरोधावर एकाग्र झालेल्या ध्येयवादाला विसर पडला. याच राष्ट्रवादी राजकारणाने एकत्रित उग्र रूप

धारण केले; त्याचे प्रत्यक्ष महान प्रतिनिधी वीर सावरकर होत. वीर सावरकर प्रतिभाशाली महान कवी आहेत. परंतु स्वातंत्र्यस्थापनेकरिता आत्यंतिक बलिदान करण्यास प्रवृत्त करणाऱ्या साहसी, रणधीर, अद्‌भुत कल्पनारम्य ध्येयवादाचे ते प्रवक्ते व प्रवर्तक झाले. त्यांची लेखणी तीक्ष्ण भवानी तलवारच आहे. त्यांनी स्वतः आगीच्या वर्षावात धीरपणाने लढणारी भारतीय अंतःकरणे आपल्या वाणीने आणि लेखणीने निर्मिली. स्वतःच ध्येयानुरूप वर्तन केले व करविले. टिळकांच्या राष्ट्रवादी राजकारणाच्या आत्यंतिक उग्रवादाचे दुसरे महान प्रतिनिधी म्हणजे 'काळ'कर्ते कै. शि. म. परांजपे हे होत. परांजपे हे महाराष्ट्रातील अभिजात व असामान्य वक्ते होते. त्यांनी काव्यगुणांनी संपन्न व संस्कृत साहित्यशास्त्रात प्राधान्य पावलेल्या आलंकारिक शैलीने भूषित असे, सनातनी राष्ट्रवादास पोषक लेख व निबंध लिहिले.

टिळकांनंतर गांधीयुग अवतरले. त्याचा भारतावर व विशेषतः महाराष्ट्रावर खोल प्रभाव पडला. टिळकांचे राजकीय अनुयायी व गांधींची राजकीय पद्धती यांचा काही काळ संघर्ष झाला. त्यात मराठीचे वाङ्मयसम्राट कै. न. चिं. केळकर यांचे वाङ्मययश विकास पावले. गांधींची राजकीय पद्धतीच अखेर यशस्वी ठरली, याबद्दल प्रामाणिक इतिहासकारांत मतभेद होणार नाही. कारण ते एक प्रत्यक्ष सत्य आहे. या प्रमेयाची ऐतिहासिक मीमांसा करताना त्या प्रमेयाला गांधींच्या राजकीय पद्धतीच्या बाहेरच्या अनेक पूरक किंवा बलवत्तर कारणांचाही विचार करावा लागेल, हे खरे आहे. परंतु येथे एक महत्त्वाची गोष्ट नजरेआड होता कामा नये. ती अशी : गांधी हे ब्रिटिशविरोधी अहिंसक सत्याग्रही राजकारणाचे एकमेवाद्वितीय नेते बनले. त्यांनी भारतीय राजकारणात प्रथम प्रवेश केला, तेव्हा त्यांचा मुख्य हेतू त्यागी व रचनात्मक कार्य करणारे कार्यकर्ते तयार करणे, हा होता. त्यांनी साबरमतीस आश्रम स्थापला. पाश्चात्त्य संस्कृतीच्या संसर्गाने झालेल्या नैतिक अधःपतनापासून भारताचा पुनरुद्धार करण्याचा हेतू धरून तो आश्रम त्यांनी स्थापला. भारतीय ग्रामसंस्थेची प्राचीन आदर्शाप्रमाणे पुनर्घटना करणे हे त्यांचे अंतिम लक्ष्य होते. अस्पृश्यतानिवारण व स्त्रीजीवनाचा विकास ही त्यांची सामाजिक सुधारणेची ध्येये होती. हिंदुमुसलमानांमध्ये जिवंत बंधुत्व निर्माण करणे, हा त्यांच्या राजकीय स्वातंत्र्याच्या पूर्वतयारीच्या कार्यक्रमाचा मूलभूत भाग व मुख्य अट होती. ब्रिटिशसत्तानिर्मूलनाच्या राजकरणाची चळवळ

जसजशी फोफावत चालली, तसतसे हे सर्व दुय्यम ठरत चालले व मागे पडले. समाजसेवेचे अखंड व्रत घेतलेल्या कार्यकर्त्यांचे आश्रम देशव्यापी करण्याची आकांक्षा राजकारणाच्या व्यापाखाली बुडून गेली. हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचा उद्देश स्वप्नवत ठरला. याचे मुख्य कारण टिळकांनी निर्माण केलेले भारतीय मनावरील राष्ट्रीय राजकारणाचे वर्चस्व होय.

आता स्वराज्यस्थापनेनंतर गांधींच्या ध्येयवादाचा प्रभाव पुनः निराळ्या स्वरूपात प्रकट झाला आहे. या काळाचे शुभ वर्तमान आधुनिक संत विनोबा यांच्याद्वारे भारतात पसरत आहे. क्रांतीची शक्ती सामाजिक उत्पाताच्या अवस्थांमधून जाण्याची गरज नाही असा या शुभ वर्तमानाचा अभिप्राय आहे. हे वर्तमान ज्या वाणीतून प्रसरण पावत आहे ती संतवाङ्मयाच्या उपासनेने पावन, प्रसन्न व शांतिमय झाली आहे. या शुभ वर्तमानातून निर्माण झालेली भूदानयज्ञाची चळवळ सामान्य जनतेला विशेषतः भूमिहीन शेतकामगारांना चेतवीत आहे. भूमीच्या स्वामींचे हृदयपरिवर्तन करून भारतातील भूमीवरील मालकी हक्काचा त्याग करावयास लावण्याची प्रतिज्ञा या चळवळीच्या नेत्यांनी केली आहे. निर्वाणीचे साधन कोणते, यासंबंधी निर्णयही या नेत्यांनी केला आहे. ते म्हणजे सत्याग्रहाचे साधन होय. सामुदायिक सत्याग्रह, हे सत्याग्रहाचे परिणत रूप होय. सत्याग्रह सामुदायिक रूप जेव्हा घेतो तेव्हा त्यास निःशस्त्र प्रतिकाराचे रूप येते. निःशस्त्र प्रतिकार ही एक प्रकारची जबरदस्तीच होय. ती एक प्रकारची राजकीय शक्ती असून इंद्रजिताच्या पुराणप्रसिद्ध शक्तीप्रमाणे ती प्रचंड आघात करू शकते. नेत्याच्या कक्षाबाहेर गेली तर ती प्रस्थापित राजसत्तेला न जुमानण्याइतकी प्रभावी होते. मग तेथे हृदयपरिवर्तनाचा प्रश्नच शिल्लक राहात नसतो. भूदानयज्ञाची सार्वजनिक सत्याग्रहात परिणती झाली तर त्याचे भवितव्य असेच ठरेल. याचा अर्थ असाच होईल की टिळकांनी निर्माण केलेला राजकीय ध्येयवाद गांधींना पचवून विनोबांनाही पचविण्यास समर्थ झाला.

परंतु हा राजकीय ध्येयवादाचा सर्वश्रेष्ठ प्रभाव केवळ भारतापुरता मर्यादित नाही. हा विश्वव्यापी आहे. सगळी राष्ट्रे त्याने व्यापिली आहेत. हा राजकीय ध्येयवाद सत्तेच्या राजकारणात सर्वत्र पर्यवसित झाला आहे. समताप्रधान व स्वातंत्र्यपूर्ण मानवी समाजाची रचना हा सर्वांत वरिष्ठ असा आजच्या माणसाचा ध्येयवाद आहे. परंतु त्याकरिता सत्तेच्या राजकारणाशिवाय दुसरा मार्गच आजच्या

माणसांना सापडत नाही. दुसरा मार्ग दिसतो पण सापडत नाही. सेवा आणि रचनात्मक कार्यक्रम हाच एक वस्तुतः शांतिमय क्रांतीचा रुंद, दूरगामी आणि आत्यंतिक हिताला पोचविणारा मार्ग आहे. त्याची साधना कष्टाची आहे व सद्यःफलदायी नाही म्हणून महत्त्वाची ध्येयवादी माणसे त्याचे अनुकरण करीत नाहीत. रचनात्मक कार्यक्रमाची परिणामकारकता सर्वात अधिक आहे.

ज्या धार्मिक, सामाजिक व राजकीय चळवळींमध्ये महाराष्ट्राचे आधुनिक वाङ्मय जन्मले व वाढत गेले, त्याचा संक्षिप्त परामर्श आतापर्यंत घेतला. या धार्मिक, सामाजिक व राजकीय प्रवृत्तींच्या मधूनच बोधवाङ्मय व भाववाङ्मय यांची मुख्य प्रेरणा प्रसरण पावली. या प्रवृत्तींच्या बाहेर राहून त्या वाङ्मयाकडे विलगपणे पाहिले तर त्याचा संदर्भच सुटून जाईल. त्या प्रवृत्तींचे अंतरंग या वाङ्मयात सामावले आहे. या धार्मिक, सामाजिक व राजकीय प्रवृत्तींची समग्र ऐतिहासिक मीमांसा भारतीय राष्ट्रीयत्वाच्या पार्श्वभूमीत आचार्य शं. द. जावडेकर यांनी 'आधुनिक भारत' या ग्रंथात केली आहे. हा ग्रंथ तात्त्विक इतिहासाचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

संदर्भ : 'मराठी साहित्य संमेलन-अध्यक्षीय भाषणे', खंड २, पृष्ठे ३०४ ते ३१४.

# १०

# ' दास कॅपिटल 'ची जन्मकथा

युरोपात इ. स. १८४८ साली लोकशाही व समाजवादी शक्तींनी राजकीय क्रांतीचे अनेक राष्ट्रांत उठाव केले. या १८४८ पासून सुरू झालेल्या आधुनिक कालखंडातील जगाच्या वादळी जीवनाचा अर्थ समजण्याकरिता कार्ल मार्क्सची विचारसरणी समजावून घेणे आवश्यक आहे. समग्र मानवी इतिहासातील सर्वांत मोठ्या जनता-आंदोलनाचे मुख्य स्फूर्तिस्थान मार्क्सच होय. टॉमस पेन, रूसो व व्हॉल्तेर ह्यांनी नुसता प्रारंभ केला. हे आंदोलन राष्ट्रीय, वंशीय व खंडात्मक मर्यादांना न जुमानता भूगोलाला वेढीत आहे. वर्तमानकाळी एकंदर मानवी समाजाचे स्थित्यंतर होऊन जी नवीन घडण तयार होत आहे, तिच्यावरील मार्क्सवादाचा प्रभाव स्पष्ट दिसत आहे.

मार्क्सची अशी धारणा होती की, क्रांतिकारक वर्गसंग्रामाचा एक मुख्य विभाग वैचारिक आघाडी होय. ही वैचारिक आघाडी ढासळली, तर पराभव अटळ ठरतो. दूर पल्ल्याची वैचारिक कणखर हत्यारे बाळगणाऱ्या वर्गसंघटना वा पक्षच विजयी आक्रमणे करू शकतात. केवळ ध्येयवादी अशा नैतिक भावनांच्या बळावर फार वेळ तग धरता येत नाही. ध्येयांना जीवन देणारी शक्ती विचारातच असते. नैतिक भावनांना चेतविणारी कामगार जीवनाची करुणास्पद चित्रणे व काव्यमय टीका यांच्यापेक्षा वस्तुस्थितीच्या चिंतनातून जागृत होणारा विचार कार्ल मार्क्स अधिक पसंत करतो. अग्रगामी क्रांतिवीरांचा गंभीर सामाजिक अनुभव सर्जनशील असतो. उत्कृष्ट ललित साहित्याची शूर प्रेरणा तेथेच तयार

होत असते. मार्क्स असा अनुभव घेणारा क्रांतिवीर होता आणि महाकाव्ये व कादंबऱ्या वाचण्याचा त्याला खूप शौक होता हे जरी खरे होते; तरी तर्कशुद्ध विचारनिष्ठ साहित्यच चिरप्रेरक ठरते, असे त्याचे ठाम मत होते. सर्जनशील अनुभवाला त्याने वाचा फुटू दिली नाही; परंतु त्या अनुभवाच्या प्रेरणेने जन्मभर त्याने सर्वस्व पणाला लावून काम केले.

इ. स. १८४८ मध्ये युरोपात हंगेरी, दक्षिण जर्मनी व पॅरिस येथे क्रांती होऊन लगेच त्या क्रांतीचा शेवटही झाला व प्रतिक्रांती स्थिरावली. नेपोलिअनने हुकूमशाही स्थापन केली तोपर्यंत क्रांती नजीकच आहे, असा त्याचा विश्वास होता. नंतरच क्रांती दुरावत चालली, असे त्याला वाटू लागले. इ. स. १८५० साली मार्क्सचा एक मित्र एकॅरिअस याने वृत्तपत्रात एक लेख प्रसिद्ध केला, तो त्याला फार आवडला. तो वाचून मार्क्सने त्याला लिहिले की, "कामगार-क्रांतीच्या आघाडीवरील खंदकात लढत चालली असता, अगोदरच वैचारिक विजय मिळवून आगामी कामगार राज्याची द्वाही फिरवावी लागते; त्यांपैकीच हा तुझा विजय होय."

इ. स. १८४२ पासून म्हणजे वयाच्या चोविसाव्या वर्षापासून क्रांतीचा विचारवंत नेता या नात्याने कार्ल मार्क्सने अखंड लेखनसाधना केली. वृत्तकार, संपादक, समाजवादी परिषदांचा अध्यक्ष व लेखक या नात्याने फार मोठे वैचारिक साहित्य त्याने प्रसिद्ध केले. 'पवित्र कुटुंब', 'जर्मन ध्येयवाद', 'कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा', 'अर्थशास्त्राची समीक्षा' इत्यादी कॅपिटल-पूर्वीची त्याची पुस्तके होत. इ. स. १८४८ मध्ये जागतिक कामगार वर्गाची संग्रामघोषणा म्हणून मान्य झालेला कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. वैचारिक सकस गाभा असलेला हा छोटा निबंध धार्मिक नसलेल्या साहित्यात सर्वांत प्रभावशाली ठरला आहे.

मार्क्सची साहित्यशैली सूक्ष्म, भेदक व उपरोधक युक्तिवादाने जुनी श्रद्धास्थाने ढासळून टाकते. सारगर्भ विचार व्यक्त करण्याचे उत्कृष्ट साधन म्हणून ललित अलंकारही तो वापरतो. सूत्रमय, गंभीर व वस्तुस्थितीच्या अवलोकनावर आधारित अशा सिद्धांतांचे प्रसन्न रीतीने समर्थन करून जीवनाच्या व दिक्कालाच्या विशाल प्रदेशावर संशयाचे धुके नष्ट करणारा बुद्धीचा प्रकाश त्याची शैली पसरविते आणि इतिहासाची रहस्ये उलगडून आश्चर्यचकित करते. इतिहास-

क्रमाने अस्तित्वात येणाऱ्या वास्तव घटनांची मानवी भव्योदात्त ध्येयांशी निगडित असलेली कार्यकारणभाव-मालिका बुद्धिवादानेच उलगडून अद्‌भुतरम्य भावनांना आवाहन देते व अंतिम ध्येयांच्या संग्रामास उद्युक्त करते. मार्क्सच्या शैलीत तारक संदेश देणाऱ्या भविष्यवादी धर्मसंस्थापक प्रेषितांचा धीरोदात्त आत्म विश्वास आहे. 'दुसऱ्यांदा जन्मलेला क्रुद्ध मोझेस' असाच त्याचा उल्लेख एका पश्चिमी पंडिताने केला आहे.

इ. स. १८४९ सालापासून युरोपचे क्रांतीचे वातावरण थंडावले व क्रांतिकारक ध्येयवाद्यांना व त्यांच्या संघटनांना सहन न करणारी व सहन न होणारी राज्ये स्थिरावली. मार्क्सला जर्मनीतून हद्दपार केले, तो पॅरिसला आला. पॅरिसमधून हद्दपार केले, तो बेल्जमला आला. अखेरीस बेल्जमही सोडून ४ ऑगस्ट १८४९ ला थोड्या महिन्यांकरिता तो इंग्लंडमध्ये रहावयास आला. परंतु अखेरपर्यंत म्हणजे. इ. स. १८८३ मध्ये त्याचा मृत्यू झाला, तोपर्यंत लंडनमध्येच त्याला रहावे लागले. प्रथम युरोपातील निर्वासित क्रांतिकारकांचे थवेच्या थवे इंग्लंड-मध्ये आश्रयार्थ आले व तेथूनच युरोपातील क्रांतिकारकांशी व गुप्त संघटनांशी ते दळणवळण ठेवू लागले. त्यांच्यातील क्रांतीचा आवेश जिरून त्यांची मने निराशेने घेरली जाऊ लागली. आपसातल्या मतभेदांना व भांडाभांडीला मधूनमधून ऊत येऊ लागला. त्यांतील बरेच क्रांतिकारक समाजवादी होते. भावनाप्रधान समाज-वादाची चर्चा करताना मार्क्सला त्यांच्या उथळपणाची चीड येई. मार्क्सला बुद्धीची रग फार होती. शरणचिठ्ठी देणाऱ्या बौद्धिक दासांशीच त्याचे जमे. त्यामुळे जवळ आलेले लवकरच दुरावलेही जात. युरोपच्या सर्वच विचारवंत क्रांतिकारकां-मध्ये त्याचा दबदबा होता; परंतु फार थोडे मित्र भक्त म्हणूनच त्याच्याजवळ टिकाव धरू शकले. इ. स. १८४८ सालची युरोपियन क्रांती फसली असली, तरी ती पुन्हा नजीकच्या काळात लवकरच डोके वर काढील, असा त्याचा भविष्यवाद होता; तो पण खोटा ठरला. त्याचा विपरीत परिणाम संघटनेवरही झाला. युरोपात त्या वेळी दूरगामी ध्येयवादाचे मोठमोठे क्रांतिकारक जे होते, त्यांच्याशी त्याचे जवळचे संबंध आले होते. उदा०, तात्त्विक अराजकवादाचा रशियन महान द्रष्टा बॅकुनिन होय. त्याला मार्क्सची इतिहासाची आर्थिक उपपत्ती फार महत्त्वाची वाटली. त्यामुळे तो प्रथम मार्क्सकडे आकर्षित झाला. परंतु त्याची प्रशंसा करतानाही प्रूधाँला स्वातंत्र्याची फार कदर आहे मार्क्सला नाही. तो आहे जर्मन

व ज्यू, नवशिखान्त हुकूमशहा ! असे तो म्हणे. दीर्घ परिचयानंतर त्याला उबग आली, मार्क्स व एंगेल्स यांचे स्वभावदोष बॅकुनिनला असह्य झाले.

लंडनमध्ये आल्यापासून मार्क्सने कॅपिटल-रचनेचा संकल्प केला. अध्ययन, चिंतन, मनन व लेखन सतत अठरा वर्षे करून कॅपिटलच्या तीन भागांची तयारी केली. बौद्धिक अहंकाराने निर्मिलेला अलगपणा या कामी उपयोगी पडला. इंग्लंडमध्ये दुसरा मार्गच उरला नव्हता. औद्योगिक क्रांती येथे स्थिरावलेली, विकसित झालेल्या भांडवलशाही समाजव्यवस्थेच्या आर्थिक व राजकीय शक्तींची विशाळ वाढ येथे चाललेली. ती त्याला जवळून निरीक्षण करून अभ्यासावयास सापडली. कॅपिटलच्या रचनेस आवश्यक असा प्रत्यक्ष जिवंत नमुनाच बनलेले ब्रिटिश राष्ट्रच त्याच्या निरीक्षणाखाली आले. त्याची अर्थशास्त्रीय गृहीतकृत्ये ( हायपॉथेसिस ) व जनरलायझेशन्स इंग्लिश साहित्याच्या आधारावरच प्रामुख्याने त्याला कल्पिता आली. सामाजिक व ऐतिहासिक तपशीलवार संशोधनाचे भाग म्हणजे कॅपिटलची उत्तम व अत्यंत मौलिक प्रकरणे होत. 'इकॉनॉमिस्ट' नियतकालिकातील आर्थिक विवेचनाचे स्तंभ, वारंवार प्रसिद्ध होणाऱ्या सरकारी नील-पुस्तकांमधील संख्याशास्त्रीय विवरणे व आर्थिक इतिहास आणि ब्रिटिश म्युझियममधील वाचनगृहात उपलब्ध होणारी पुस्तके हा सर्व आधारभूत लेखसंभार लंडनमध्ये राहूनच त्याला प्राप्त झाला. या लेखसंभागाचा योग्य वैज्ञानिक उपयोग करणारा पहिला पंडित मार्क्सच होय.

बत्तिसाव्या वर्षीच सार्वजनिक चळवळीला रामराम ठोकलेला, सर्व वेळ केवळ तात्त्विक लेखनाच्या कामात व्यतीत करणारा व अलिप्त जीवन जगणारा पंडित तो बनला, असाही मिथ्या ग्रह व्हावा अशा दर्जाचे बौद्धिक कार्य तो करीत राहिला. वस्तुतः संघटना व आंदोलन यांतून त्याची कधीच सुटका झाली नाही. २८ सप्टेंबर १८६४ मध्ये पहिले इंटरनॅशनल त्याच्या सल्ल्याने स्थापन झाले. इंटरनॅशनलचे मुख्य बौद्धिक नेतृत्व त्याच्याकडेच राहिले. लंडनमधील निवासाच्या कालखंडात त्याचे विचार पुष्कळ परिपक्व झाले. युरोपमधील क्रांतीची लाट ओसरली, तरी गरीब, मध्यमवर्ग व कामगारवर्ग यांचा असंतोष शमला नव्हता. ध्येयवाद्यांच्या छोट्या गुप्त गटांमध्ये कामगार क्रांतीचा विचार धगधगत होता. खूप निरीक्षण करून त्याचे असे मत झाले की, शुद्ध कामगार क्रांती वेगळी होऊ शकणार नाही; नवीनच उदयाला आलेला कामगारवर्ग मागासलेला व विस्कळित

असल्यामुळे तो चिरडला जाईल. मध्यमवर्गाशी सहकार्य करूनच लोकशाही क्रांती करणे शक्य आहे. गुप्त संघटनांपेक्षा उघड संघटना कराव्यात, त्यामुळे कामगारवर्गाला राजकीय शिक्षण मिळेल व त्याची शक्ती वाढेल. ' सबुरीने चला ' असे मत होते, तरी तो म्हणे की, भांडवलशाही क्रांतीच्या भव्य यशाने निराश होण्याचे कारण नाही. या भांडवलशाहीच्या विजयाच्या पोटीच तिचा विनाश करणारा गर्भ वाढत आहे. इतिहासाचा प्रवाह अपरिहार्य रीतीने कामगारक्रांतीचाच मार्ग वेगाने आक्रमीत आहे. धीर धरून त्या इतिहासक्रमाचे साथीदार बना; असा विचारनिष्ठ आदेश देण्याकरिता कॅपिटलची रचना मार्क्स करीत होता.

शेवटची काही वर्षे सोडल्यास मार्क्सला फार हलाखीत दिवस काढावे लागले. गृहस्थिती फारच खालावलेली होती, तरी कॅपिटलकरिता विद्याव्यासंग अखंड चालू होता. ८ सप्टेंबर १८५२ रोजी मार्क्स एंगेल्सला लिहितो : " माझी बायको आजारी, छोट्या जेनीची तब्येत बिघडलेली, बाळ लिंचेन मज्जातंतूच्या तापाने पछाडलेला. डॉक्टरच्या मदतीची जरूरी आहे. पण डॉक्टरला बोलावले तर फीला पैसे कोठून आणायचे ही पंचाईत. गेले आठ दहा दिवस पाव व बटाटे यांवरच आम्ही भागवीत आहोत. तेही यापुढे मिळतील की नाही याची शंका आहे. ' न्यूयॉर्क ट्रिब्यून 'ला पाठविलेल्या वृत्तलेखाबद्दल थोडे पैसे येतात खरे; परंतु येथील वृत्तपत्रे विकत घेतल्याशिवाय वृत्तलेख तरी कसे लिहिणार ? घरमालकीण भाडे थकल्यामुळे हाकलून देईल, तर बरे होईल; म्हणजे साचलेल्या भाड्याचा बोजा कमी होईल. बेकरी, डेअरी, किराणा दुकान, भाजी दुकान व खाटीक या सर्वांचेच देणे थकले आहे. काही कामगारांकडून उसनवारी केली नसती, तर उपाशीच मेलो असतो. " मार्क्सला चार मुले झाली. दोन मुली, दोन मुलगे. सर्व मुले सुरेख होती. पत्नी एका जीवाभावाने नांदत सर्व यातना सोसत होती. ती फार समंजस, ध्येयवादी, धीराची व विलक्षण सुंदर बाई होती. कित्येक वेळा दुपारचीही भ्रांत पडे. उपासमारीमुळे पति-पत्नी व मुलेबाळे सारखी आजारी पडत. इ. स. १८५० ते १८५५ या पाच वर्षांच्या अवधीत दोन मुलगे व एक मुलगी मृत्युवश झाली. लाडका एडगर वारला, तेव्हा मार्क्सचे शूर हृदय अत्यंत विव्हल झाले. पुत्रशोकाला या जगात इलाज नसतो. गलिच्छ वस्तीत कौलारू घराच्या दोन खोल्यांत संसार थाटलेला होता. छोटी मुलगी एक वर्षाची होऊन

वारली, तेव्हा तिच्या दफनाकरिताही पैसे नव्हते. कित्येकदा कोट व पादत्राणे फाटलेली, त्यामुळे बाहेर पडणे अशक्य; म्हणून बिछान्यात बसूनच विद्याव्यासंग करावा लागे.

कौलारू घराच्या माळ्यातील खबदाडीसारख्या खोलीत बसून मार्क्स देशो-देशींच्या कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेई व चर्चा करी. त्याला एंगेल्ससारखा जीवाला जीव देणारा भक्त व मित्र मिळाला म्हणूनच जगता आले. एंगेल्स हा त्याच्या तोडीचा विचारवंत व लेखक होता. मँचेस्टर येथे त्याच्या वडिलांच्या व्यापारी पेढीत काम करून मिळालेल्या उत्पन्नाचा काही भाग तो आपल्या मित्राकडे मधून मधून पोचता करी. व्यापारही खालावत चालला, म्हणून मार्क्सकरिता तो व्यापारात अधिक लक्ष घाली. मार्क्सने आरंभिलेला महाग्रंथ पूर्ण व्हावयास पाहिजे, असा त्याचा आग्रह होता. एंगेल्स हा उत्कृष्ट लेखक असल्यामुळे त्याचा फार वेळ व्यापारासारख्या फालतू कामात जात असलेला पाहून मार्क्सलाही खूप खेद वाटे. एंगेल्सप्रमाणेच दुसरे काही चाहते इकडून तिकडून पैसे मिळवून मार्क्सची पुस्तके प्रकाशित व्हावी, याकरिता प्रयत्न करीत.

इ. स. १८५१ साली जर्मन सरकारने मार्क्सला एका सशस्त्र क्रांतीच्या खटल्यात खोटे पुरावे तयार करून गोवले होते. हा खटला दीर्घ काळ चालला होता. याच सुमारास त्याची पत्नी आपल्या अमेरिकन मैत्रिणीला पत्रात लिहिते, "येथे रात्रंदिवस सशस्त्र क्रांतीच्या खटल्यातील पोलिसांनी बनविलेली बनावट कागदपत्रे खोटी ठरविण्याचे किचकट काम मार्क्सवर पडले आहे. या सशस्त्र क्रांतीचा प्रमुख सूत्रधार म्हणून ठरविल्यामुळे आमच्यावरच सगळी जबाबदारी पडली आहे. फ्रान्स व जर्मनीकडे जाणारा-येणारा आमचा पत्रव्यवहार पोलीस जप्त करीत आहेत. त्यामुळे आमचा पत्रव्यवहार योग्य ठिकाणी पोचविण्याची जबाबदारीही आमच्यावर पडली आहे. यासंबंधीची लेखनाची मदत तीन जण करीत आहेत. मीही बोटे दुखू लागेपर्यंत लिहिण्याची मदत करीत आहे. खटल्याच्या खर्चाकरिता एक एक पैसा जुळवावा लागत आहे. या छोट्या जागेत माझी तीन तरतरीत मुले गातात, शिळा वाजवितात, कामात व्यत्यय येतो, कार्ल त्यांच्यावर चिडून ओरडतो. कसले हे जीवन ! "

मार्क्सने न्यायालयात विजय मिळविला. दीर्घ काळ काम केल्याने खूप थकवा आला; शरीराची चौकट पोलादी होती, तरी ती ढिली झाली.

दारिद्र्य व प्रदीर्घ विद्याव्यासंग यांच्यामुळे यकृत बिघडले. इतके असूनही ब्रिटिश म्युझियममध्ये सकाळी ९ पासून संध्याकाळी ७ पर्यंत जेठा मारून त्याने व्यासंग चालूच ठेवला.

मार्क्सने हे दारिद्र्य जाणूनबुजून पत्करले होते. जर्मनीमध्ये असतानाच त्याच्या प्रखर बुद्धिमत्तेचे तेज राज्यकर्त्यांना दीपवीत होते. प्रिन्स बिस्मार्कने त्याचे मन वळवून त्याच्या बुद्धिमत्तेचा राष्ट्ररचनेस उपयोग करावा म्हणून दोनदा प्रयत्न केला. लंडनमध्ये एक अज्ञात व्यक्ती बिस्मार्कने संदेश देऊन पाठविली. संदेशात म्हटले होते की, "तुझ्या थोर बुद्धिमत्तेचा जर्मन राष्ट्राच्या प्रगतीकरिता फार उपयोग होणार आहे, माझे हे निमंत्रण स्वीकारावे!" मार्क्सने त्या संदेशाकडे पूर्ण दुर्लक्ष केले व या संदर्भात एंगेल्सला सांगितले की, "बिस्मार्क स्वतःवरून दुसऱ्याची परीक्षा करतो."

कॅपिटलच्या लेखनास इ. स. १८४९ पासून प्रारंभ झाला. अठरा वर्षे काम चालले. मार्च १८६६ ला लेखन पूर्ण झाले. एक वर्ष मुद्रणप्रत तयार करावयास लागले. त्यामुळे ३ सप्टेंबर १८६६ रोजी जिनिव्हा येथे भरलेल्या पहिल्या इंटरनॅशनल कॉंग्रेसला मार्क्स उपस्थित राहू शकला नाही. अनुपस्थितीचे कारण सांगताना मार्क्सने असे म्हटले आहे की, "कॅपिटल (भाग १) पूर्ण होत आला आहे. माझ्या कॉंग्रेसमधील उपस्थितीपेक्षा हा ग्रंथ पूर्ण करण्याने कामगारांच्या ध्येयाची सेवा अधिक होणार आहे." मुद्रणप्रतीचे अखेरचे वाक्य समाप्त झाले, त्या दिवशी मार्क्सने मित्राला लिहिले, "इतक्या दीर्घकाळ प्रसूतिवेदना सोसल्यानंतर जन्मलेला छावा चाटून स्वच्छ करण्यात आगळा आनंद होत होता." मुद्रणप्रतीचा पुष्कळसा भाग नोव्हेंबर १८६६ मध्ये हांबुर्गचा प्रकाशक ऑटो मायसनेर या सभ्य गृहस्थाच्या स्वाधीन केला. १८६७ च्या एप्रिलमध्ये राहिलेली प्रत घेऊन तो स्वतः हांबुर्गला गेला. पहिली प्रुफे मिळे-पर्यंत जर्मनीत लाइपझिगलाच राहिला. कुगेलमन या मित्राचा पाहुणा म्हणून मोठ्या खुषीत दिवस घालविले. या वैराण भकास जीवनातील ते दिवस ओॲसिस (हिरवळीसारखेच) होते, असे तो म्हणतो. प्रुफे येत व ती लगेच तपासून परत पाठवी. १६ ऑगस्ट १८६७ रोजी पहाटे अडीच वाजता त्याने अखेरचे प्रूफ तपासून संपविले व लगेच एंगेल्सला पत्र लिहिले, : "हा ग्रंथ आताच संपविला. हे शक्य झाले याबद्दल मी तुझ्या एकट्याचे आभार मानतो. या तीन

भागांकरिता करावे लागलेले प्रचंड परिश्रम तू केलेल्या त्यागाशिवाय बहुतेक शक्य झाले नसते. आभारपूर्वक मी तुला आलिंगन देतो. माझ्या प्रियतम मित्रा, धन्यवाद ! ”

कॅपिटल ग्रंथ डार्विनला अर्पण करावा, अशी मार्क्सची फार इच्छा होती. त्याने डार्विनला पुस्तक पाठविले व त्याबरोबर पत्र पाठवून अर्पणाची संमती मागितली. आपणास अर्थशास्त्र हा विषय समजत नाही, असे म्हणून डार्विनने नकार दिला.

जर्मन भाषेत कॅपिटल प्रसिद्ध झाले. परंतु विद्वानांकडून अपेक्षेप्रमाणे त्याचे स्वागत झाले नाही. एंगेल्स व कुगेलमन या मित्रांनी पुस्तकास जास्तीत जास्त प्रसिद्धी मिळावी म्हणून वृत्तपत्रे व नियतकालिके यांत पुष्कळ जाहिरात केली व प्रस्तावनाही उद्धृत केली. मार्क्सला प्रसिद्धी मिळावी म्हणून एंगेल्सने त्याच्यावरील चरित्रलेखही प्रसिद्ध केला. मार्क्सला मात्र तो आवडला नाही. भावनोद्दीपक लेखनाने प्रसिद्धी मिळविण्याचा त्याला तिटकारा होता. त्याने एंगेल्सला लिहिले की, “ अशा लेखनाचा परिणाम चांगला होत नसतो. शास्त्रकाराची महती यामुळे खालावते. एका विश्वकोशाने पत्रद्वारा माझ्या चरित्र-टिपणीची मागणी केली होती. मी त्याचे साधे उत्तरही दिले नाही. ” प्रत्येकाची अभिरुची निराळी असते हेच खरे. जर्मन भौतिकवादी तत्त्वज्ञ फायरबाख याला त्याने पुस्तक पाठविले; त्याने आपले गंभीर मतभेद नोंदवूनही हा ग्रंथ युगप्रवर्तक आहे, असा अभिप्राय दिला आहे.

कॅपिटलचे पहिले भाषांतर रशियन भाषेत एका वर्षात प्रसिद्ध झाले. बॅकुनिनने रशियन भाषेत भाषांतर केले होते, परंतु ते गहाळ झाले. नवल असे की, झारच्या सरकारने प्रकाशनास परवानगी दिली ती देताना असे म्हटले की, हा समाजवादी ग्रंथ असला तरी शास्त्रीय आहे व फार थोड्यांनाच त्याचे आकलन होणार आहे, म्हणून प्रसिद्ध करण्यास हरकत नाही. इ. स. १८७५ मध्ये कॅपिटलचे फ्रेंच भाषांतर प्रसिद्ध झाले. मार्क्सची हयात संपल्यानंतर युरोपच्या सर्व प्रमुख भाषांमध्ये त्याची भाषांतरे प्रसिद्ध झाली.

संदर्भ : महाराष्ट्र टाइम्स, १३ ऑगस्ट १९६७.

# ११

# गांधीवाद

गांधीवाद म्हणून एक स्वतंत्र विचारपद्धती आहे.ती विचारपद्धती अध्यात्मवादावर आधारलेली आहे. किंबहुना तो विशिष्ट प्रकारचा अध्यात्मवाद आहे. गांधी वाद म्हणून काही नाही, ती एक जीवनपद्धती आहे, असे अनेक गांधीवादी म्हणत असले, किंवा गांधींनीही तसे म्हटले असले, तरी गांधींनी विपुल लेखनामध्ये प्रतिपादिलेली ती एक स्वतंत्र विचारसरणी आहे, हे लक्षात आल्याशिवाय रहात नाही. तिचा प्रभावही आधुनिक जगाच्या सामाजिक व राजकीय विचारसरणीवर पडल्याशिवाय राहिलेला नाही.

गांधी स्वतः मनाने पक्के हिंदू होते, तरी तत्त्वतः धर्मदृष्ट्या जगातील प्रसिद्ध धर्मामध्ये मूलभूत ऐक्य आहे, अशी त्यांची श्रद्धा होती आणि जगातील सर्व धर्मांना व्यापणारे रहस्य आपणास प्राप्त झाले आहे, अशी त्यांची भावना होती. सर्वच धर्मग्रंथांचे प्रामाण्य एका अर्थी त्यांनी मानले आहे. परंतु शब्दशः प्रामाण्य त्यांना मान्य नाही. त्यांच्या मते, सर्वच धर्मग्रंथ मानवप्रणीत—ऋषी, प्रेषित, संत — इत्यादिकांनी निर्मिलेले असल्यामुळे मानवाच्या स्वाभाविक मर्यादा व दोष धर्मग्रंथांमध्येही शिरलेले असतात. म्हणून गांधींनी धार्मिक ग्रंथांचे काही तात्त्विक निष्कर्ष काढले आहेत. ते काढीत असताना हिंदुधर्मातील विचारांची तात्त्विक पार्श्वभूमी त्यांनी स्पष्टपणे गृहीत धरली आहे. भारतातील संन्यासवादाचे सार्वभौम नैतिक सिद्धांत, हा त्यांच्या नैतिक विचारसरणीचा गाभा आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे पाच नैतिक नियम

त्यांच्या विचारसरणीचा पाया आहेत आणि उपनिषदे व गीता यांमधील ईश्वर-विषयक सिद्धांत त्या मूलभूत नैतिक नियमांचा त्यांनी आधार मानला आहे.

गांधीवाद हा धार्मिक मानवतावाद आहे. नीतिशास्त्र, समाजरचना व राजनीती यांस आधारभूत अशी नैतिक दृष्टी या मानवतावादामध्ये स्वीकारलेली दिसते. ईश्वरनिष्ठा ही मूलभूत आहे. ईश्वर म्हणजेच सत्य व सत्य म्हणजेच ईश्वर, असे गूढवादी समीकरण गांधींनी मांडले आहे. ईश्वर हेच सत्य हा उपनिषदांचा व अ... वेदांताचा सिद्धांत आहे. सृष्टीचे वैज्ञानिक पद्धतीने शोधलेले सत्य, असा या सत्याचा अर्थ नाहीं; उच्च नैतिक नियम असा या सत्याचा अर्थ दिसतो. 'सत्याचे प्रयोग' या शब्दावलीने सूचित केलेली वैज्ञानिक पद्धती ही आलंकारिक अर्थानेच घ्यावयाची आहे.

या संदर्भात असा मुद्दा उपस्थित होतो, की सत्यसंशोधनास अंत नसतो; कारण माणसास सत्य पूर्णपणे सापडत नसते, सर्वज्ञ कोणी नसतो म्हणून लोकशाहीत विचारस्वातंत्र्य व प्रचारस्वातंत्र्य हा मूलभूत मानवी हक्क मानला आहे. परंतु विचारांचा प्रचार स्वातंत्र्याचा हा मूलभूत हक्क संशोधनार्थ आवश्यक आहे. हा सिद्धांत गांधीजींनी कोठेही प्रतिपादिलेला आढळत नाही. याचे कारण असे दिसते की, गांधी बुद्धिवादापेक्षा आतल्या आवाजालाच प्राधान्य देत होते.

गांधी म्हणतात की, ईश्वर हा स्वतःसिद्ध, स्वयंप्रकाश व इंद्रियांच्या व बुद्धीच्या पलीकडचा असल्यामुळे, बुद्धिवादाच्या कसोट्या त्याला लागू पडत नाहीत. तो अनुभवसिद्ध आहे. हा अनुभव तपश्चर्येने व वैराग्याने ज्याचे अंतःकरण शुद्ध झाले आहे, त्यांना म्हणजे तुलसीदास, चैतन्य, रामदास, तुकाराम यांच्यासारख्या भक्तांना येतो. ईश्वर हा सर्वांचा अंतरात्मा आहे. जीवात्मा त्याचा अंश आहे. अहंकाराचा त्याग केला, स्वतःला शून्य केले की तोच रहातो. ईश्वर हाच सत्य असल्यामुळे अन्य जग मिथ्या आहे. सर्व प्राण्यांमध्ये एकच प्राण किंवा जीव आहे व तोच ईश्वर होय. विश्व ही त्याची लीला आहे. तो प्रकाश म्हणजे चैतन्य आहे व तोच अनंतानंद आहे.

ईश्वर सत्य आहे म्हणजे काय, तर तो दृश्य विश्वाचा सार्वभौम आहे. विश्वाच्या उत्पत्ति-स्थिति-संहाराची नियामक शक्ती आहे ही नियामक शक्ती ही नैतिक शक्ती आहे. आई, बाप, कन्या, पुत्र, बंधू, मित्र यांच्यातील प्रेम एकमेकांचे संरक्षण करते. कुटुंब, राष्ट्र, मानवजात, जीवसृष्टी व वस्तुमान यांना एकत्र करणारी शक्ती म्हणजे

प्रेम होय. परमेश्वर प्रेमरूप आहे. आस्तिक व नास्तिक हे सर्व सत्याचे उपासक बनतात, तेव्हा ते ईश्वरोपासकच बनतात. नास्तिक ईश्वर नाही, असे म्हणतो. परंतु सत्याचे परिपालन करतो, तेव्हा त्याला सत्याचेच आकर्षण असते, म्हणून तोसुद्धा एका अर्थी ईश्वराचे अस्तित्व मान्यच करतो. शत्रूवरही प्रेम केले, तर तो मित्र बनल्याशिवाय रहात नाही. कारण शत्रूच्या हृदयात परमेश्वराचे प्रकाश-प्रेम आहेच. शत्रू जर मित्र बनला नाही, तर आपल्या तपश्चर्येत काहीतरी उणीव आहे असे मानावे. ईश्वराने जगात पापाला अवसर दिला आहे. त्यातून भक्तीने उत्तीर्ण होता येते. भक्ती व प्रार्थना खरी असली पाहिजे. भक्ती ही नैतिक शक्तीची भक्ती असते. प्रार्थना उत्कट असल्यास व चित्त शुद्ध असल्यास परमेश्वराचा म्हणजे अंतरात्म्याचा आवाज ऐकू येतो व तो सत्याचा मार्ग दाखवितो. गांधींनी याच दृष्टीने आत्मचरित्राला 'सत्याचे प्रयोग' असे नाव दिले आहे. ईश्वररूप सत्य गवसण्याकरिता फार मोठे प्रयत्न करावे लागतात. त्याकरिता इंद्रियसंयम करावा लागतो; अहिंसेची दीक्षा घ्यावी लागते. कारण अहिंसा ही सत्याची साधन आहे संपूर्ण अहिंसा ही सत्याच्याच कलदार नाण्याची दुसरी बाजू आहे. अहिंसा म्हणजे प्रेम होय.

अहिंसा हा आपल्या मानववंशाचा जीवनधर्म आहे. मानवसमाजाचे अस्तित्व अहिंसेवर आधारलेले आहे. शरीर व हिंसा यांचा नित्य संबंध आहे; हा एक बंध आहे; या बंधातून मुक्त होण्याचा मार्ग अहिंसा हा होय. शरीर असेपर्यंत कमीत कमी हिंसा म्हणजे अहिंसा असा अर्थ करावा लागतो. शरीरावर जितकी आसक्ती, तितकी हिंसा अधिक. म्हणून शरीरावरची आसक्ती कमी केली पाहिजे. शरीरावरील आसक्ती कमी केल्याने म्हणजे तपश्चर्येने, संयमाने आत्मशक्ती वाढते. प्रकट होते. सर्वच प्राणिवर्ग अहिंस्य आहे. परंतु मानववंश श्रेष्ठ असल्यामुळे इतर प्राण्यांना वाचविण्याकरिता मानवाची हत्या होता कामा नये. मुंग्या, माकडे, कुत्री इत्यादी इतर प्राण्यांना अन्न देणे, हे युक्त नाही, असे गांधी म्हणतात. परंतु याच्या उलटही त्यांची अनेक विधाने सापडतात. मांसाहार वर्ज्य करावा, हे हिंदुधर्मातील अहिंसेचे उत्कृष्ट प्रत्यंतर आहे असे ते म्हणतात. गायीचा जीव वाचविण्याकरिता प्राणार्पण करणे याचीही ते प्रशंसा करतात. "गाय दयेचे काव्य आहे. तिची मी पूजा करतो. हिंदुधर्मातील गोपूजा, वृक्षपूजा हे अहिंसेचे प्रत्यंतर आहे," असे गांधी म्हणतात.

अहिंसेचा व सत्याचा हा सिद्धांत गांधींनी राजकीय व सामाजिक क्षेत्रांत मोठ्या निष्ठेने आणला. त्याला ते सत्याग्रह असे म्हणतात. शुद्ध साध्याकरिता शुद्ध साधनेच उपयोगी पडतात: शुद्ध साध्याकरिता अशुद्ध साधने वापरल्यास साध्यही अशुद्ध बनते; साध्य दूर जाते; सत्याग्रहच शुद्ध साधन होय. सत्याग्रह म्हणजे सत्याकरता अहिंसेच्या मार्गाने असत्याचा प्रतिकार करणे. ज्या व्यक्तींच्या ठिकाणी नैतिक दृष्ट्या अयोग्य व गर्ह्य परिस्थितींचा प्रतिकार करण्याची शक्ती असते, म्हणजे आत्मशक्ती प्रकट झालेली असते, तेच सत्याग्रहाचे अधिकारी होत. त्याची शरीरक्लेश सहन करण्याची शक्ती हा आत्मशक्तीचा एक भाग आहे. कित्येक वेळा शरीरक्लेश सहन करून प्रतिकार करणारा प्रतिपक्षावर जबरदस्तीही करू शकतो. त्याचा आग्रह अविवेकीही असू शकतो. त्याची सत्याची कल्पना चुकीचीही असू शकते. त्यात असत्यही भरलेले असण्याची शक्यता असते. म्हणून खऱ्या सत्याग्रह्याला नैतिक दृष्ट्या अयोग्य काय व योग्य काय हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी पत्करावी लागते आणि आपल्या प्रतिकाराच्या उद्देशात असत्य दिसल्यास माघार घेण्याची तयारीही असावी लागते. माघार घेण्याकरितासुद्धा धैर्य लागते. निःशस्त्र प्रतिकारसुद्धा हिंसात्मक म्हणजे जबरदस्ती करणारा असतो. त्यात अत्याचारही असतो. सत्य हे तत्त्वतः शत्रूलाही मान्य असावे लागते. कारण विवेकबुद्धीची देणगी मानवाला प्राप्त झालेली आहे.

मनुष्य ही ईश्वराने घडविलेली स्वतःची प्रतिमा आहे, हे ख्रिश्चन तत्त्व गांधींनी मान्य केले आहे. जीवात्मा हा परमेश्वराचा अंश आहे, याची जाणीव अस्पष्टपणे माणसाला असतेच, असा हिंदुधर्माचा सिद्धांत आहे. हा सिद्धांत व ख्रिश्चन सिद्धांत यांच्यामध्ये एक प्रकारची सुसंगती आहे. मानवाची सेवा हीच ईश्वराची पूजा होय, असा निष्कर्ष गांधींनी खिस्ती धर्माच्या चिंतनातून काढला आहे.

युद्ध वा मानवी हिंसेचे अनेक कायदेशीर व बेकायदेशीर प्रकार अहिंसेच्या तत्त्वाप्रमाणे बंद व्हावयास पाहिजेत, हे जरी खरे असले; तरी आजची जागतिक राजकीय परिस्थिती व सत्तेचे राजकारण लक्षात घेता, युद्धाच्या तयारीची संरक्षण संस्था वा सैनिकशक्तीची संस्था ही आजतरी अपरिहार्य आहे, असे गांधींनी मान्य केले आहे. परंतु मानव हा बुद्धियुक्त प्राणी असल्यामुळे मानवामानवांमधील हिंसा बंद करणे हे मानवी कर्तव्य आहे, असे ते मानतात. अहिंसा हा ढोंगी दुर्बलाचा सिद्धांत नाही. ढोंगी, भित्रा व शस्त्राने प्रतिकार करणारा शूर

मनुष्य यांच्यात सशस्त्र शूर गांधींनी पसंत केला आहे. सबलाची अहिंसा हीच खरी अहिंसा होय, असे त्यांनी वारंवार प्रतिपादिले आहे.

गांधींचा ब्रह्मचर्याचा सिद्धांत हा अहिंसेचाच उपसिद्धांत आहे. इंद्रियांवर, संभोगावर विजय मिळविल्याशिवाय निःस्वार्थता प्राप्त होत नाही. निःस्वार्थता असेल, तर अहिंसा साधते. स्त्री-पुरुषांचे मैथुन हे तत्त्वतः वर्ज्यच असले पाहिजे. प्रजोत्पादनाकरिता मैथुन आवश्यक आहे; परंतु तेही टाळणे शक्य असल्यास ते टाळावे. पुष्कळ वेळा पुरुषाने केलेला संभोग ही स्त्रीवर केलेली जबरदस्ती असते, अशी गांधींची समजूत आहे. या विरुद्धही गांधीजी एके ठिकाणी लिहितात की, स्त्रीपुरुषांचे लैंगिक आकर्षण हे महनीय आहे. संतती सृष्टीमध्ये सतत आवश्यक आहे, कारण परमेश्वराच्या लीलेचा तो एक भाग आहे. सृष्टी ही परमेश्वराची लीला आहे. परंतु स्त्री-पुरुष संभोग ह्या अपवित्र क्रिया आहेत, अशाच प्रकारचा त्यांचा दृष्टिकोण आहे. त्यांची अशी चमत्कारिक समजूत दिसते की, स्त्री-पुरुष संभोगात मानवी सामर्थ्याचा अपव्यय होतो; मग तो संभोग विवाहित स्त्री-पुरुषांचा असो अथवा अविवाहितांचा असो. वैवाहिक संभोग ही पापावर घातलेली मर्यादा आहे. तेही पापच आहे. कारण त्याच्या योगाने मनुष्याचा शक्तिपात होतो, हा योगशास्त्रातील ब्रह्मचर्यविषयक सिद्धांत आहे. परंतु तो जीवविज्ञानाच्या दृष्टीने चुकीचा सिद्धांत आहे. कारण संभोगात होणारा वीर्यपात हा मर्यादित प्रमाणात होत असला, तर त्यामुळे शारीरिक किंवा मानसिक सामर्थ्य घटत नाहीं. उलट वाढते. गांधींचा याबद्दलचा दृष्टिकोण मानवी जीवविज्ञानदृष्ट्या नीट तपासला गेला नाही. एवढे मात्र खरे की, वैवाहिक संबंधातून कुटुंबसंस्था निर्माण होते. त्यामुळे आप्तसंबंध तयार होतो व मर्यादित आत्मप्रेम उत्कट होते. सर्व मानवच आप्त आहेत, असा गांधींचा दृष्टिकोण आहे. नैसर्गिक आप्तसंबंधाने मर्यादित होणारे प्रेम हे संन्यासाशिवाय कोणालाच शक्य नाही; म्हणून गांधी-सिद्धांत हा संन्याससिद्धांताचाच एक उपसिद्धांत आहे, असे मानावे लागते. ब्रह्मचर्य हे ईश्वरप्राप्त्यर्थ आवश्यक आहे, हाही गांधींचा विचार ह्या संन्यासमार्गाचाच भाग आहे.

सत्य व अहिंसा या दोन नैतिक तत्त्वांवर आधारलेला रस्किनच्या पुस्तकावरून सुचलेला गांधींचा सर्वोदयवाद हे सामाजिक, राजकीय व आर्थिक तत्त्वज्ञान आहे. समाजाचा आध्यात्मिक विकासवाद गांधींनी मांडला आहे; म्हणजे व्यक्तीप्रमाणे

सामाजिक व राजकीय प्रगती होत असते, असे सर्वोदयवादात गृहीत धरले आहे. आर्थिक समता मानवी ऐक्याच्या तत्त्वावर विकसित करणे, ही ऐतिहासिक प्रगतीची गरज आहे. सत्याग्रह हे त्याचे साधन आहे. दलित व पीडित वर्गाला समतेचा न्याय पहिल्यांदा मिळाला पाहिजे, याकरिता दलित व पीडित यांची सेवा केली पाहिजे व अन्यायाचा सत्याग्रहाने प्रतिकार हा सतत चालला पाहिजे. विकास व क्रांतीचे प्रयत्न निसर्गाप्रमाणे समाजातही चालणार. भूकंप, वादळी उलथापालथ ही निसर्गात चालते, तशी समाजातही चालणारच. प्रगतीला तिची कित्येक वेळा आवश्यकता असते. परंतु शांततापूर्ण मार्गाने सामाजिक विकास घडवून आणणे, यावर गांधींचा मुख्यतः भर आहे.

गांधी हे मूळचे वर्णाश्रमसंस्थेचे पुरस्कर्ते आहेत. त्यांनी जातिभेदाचेही समर्थन संयमाच्या तत्त्वानुसार केले आहे. स्वजातीमध्येच लग्न करणे व स्वजातीचेच अन्नग्रहण करणे यात लैंगिक व रसनेचा संयम आहे हे तत्त्व आहे, असे त्यांनी प्रतिपादिले आहे. परंतु १९३६ - ३७ च्या सुमारास गांधींनी वर्णाश्रमाचे आपले भाष्य बंद केले; साम्यवाद व समाजवाद यांचा नवीन पिढीमध्ये प्रसार होत आहे हे पाहून त्यांनी आध्यात्मवादावर आधारलेल्या आर्थिक व सामाजिक समतावादाचा पुरस्कार सुरू केला. सामाजिक उच्चनीचभाव व हिंदूंची अस्पृश्यतेची संस्था हे सर्वोदयवादाशी विरुद्ध आहेत, म्हणून उच्चनीचभाव व अस्पृश्यता नष्ट करणे, ही गोष्ट सामाजिक प्रगतीची गरज आहे, असा विचार गांधींनी मांडला आहे.

गांधीचे अर्थकारण म्हणजे विशिष्ट नैतिक ध्येयवादास अनुरूप आर्थिक व्यवहार कसे चालावेत, यासंबंधी भारताच्या व जगाच्या आर्थिक व्यवस्थेबद्दलचे गांधींचे आर्थिक धोरण. अर्थशास्त्र हे आर्थिक व्यवहारांचे नियम सांगणारे शास्त्र होय. तसे अर्थशास्त्र गांधींनी किंवा गांधीवाद्यांनी सांगितलेले नाही. कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाप्रमाणे मानवी आर्थिक व्यवहारांचे ऐतिहासिक नियम आहेत. त्याप्रमाणे अपरिहार्य ऐतिहासिक परिणतीने साम्यवादाकडे जाणारे समाजवादी अर्थशास्त्र निष्पन्न होते. गांधी असा ऐतिहासिक परिणतिक्रम गृहीत धरून आपले अर्थशास्त्र सांगत नाहीत.

गांधींच्या आर्थिक धोरणाची मूलभूत तीन सूत्रे आहेत : ( १ ) न संपणाऱ्या नैसर्गिक संपत्तीवर अधिक भर असलेली अर्थव्यवस्था चिरंतन असू शकते; अशी

अर्थव्यवस्था अंमलात आणली पाहिजे. निसर्गसंपत्तीचे दोन वर्ग. एक संपणारा म्हणजे सर्व खनिजे. उदा०, दगडी कोळसा, लोखंडादी धातू, खनिज तेले इत्यादी व दुसरा न संपणारा म्हणजे माती, दगड, लाकूड, वनस्पती, धान्ये, फळे, फुले, पाणी, प्रकाश, उष्णता, वायू, प्राणी जनावरे इत्यादी. ( २ ) शरीरश्रमाचे महत्त्व असलेली अर्थव्यवस्था कार्यवाहीत आली पाहिजे. कर्मेंद्रियांनी, विशेषतः हातापायांनी, मेका करण्यानेच मानव चांगला सशक्त, शरीराने व मनाने निरोगी व दीर्घायुषी राहू शकतो. ( ३ ) ज्या अर्थव्यवस्थेत श्रीमंत व गरीब हा भेद जाचक स्वरूपात राहील अशी अर्थव्यवस्था असता कामा नये. तत्त्वतः संपत्तीवर खाजगी मालकी कोणाचीच नसावी. शरीरश्रम करील, त्यालाच संपत्तीचा उपभोग घेण्याचा नैतिक दृष्ट्या हक्क आहे. श्रीमंत व गरीब या दोघांनाही असा हक्क आहे. परंतु आर्थिक सुबत्ता निर्माण करण्याची बुद्धिमत्ता व कुशलता ज्या व्यक्तींच्या ठिकाणी वास करते, त्यांना औद्योगिक नेतृत्व लाभू शकते; त्यांना यासंबंधात संपूर्ण स्वातंत्र्य व अवसर मिळाला पाहिजे. हा औद्योगिक नेता मात्र मोठ्या संपत्तीचा मालक न राहता, तो समाजातर्फे त्या संपत्तीचा विश्वस्त बनला पाहिजे. विश्वस्त म्हणून राहण्यास व स्वतःचा मालकी हक्क सोडण्यास तो नाराज असल्यास, कायद्याने व लोकशाही पद्धतीने मालकवर्गाचा मालकी हक्क रद्द केला पाहिजे.

एकोणिसाव्या शतकातील युरोपीय किंवा पश्चिमी क्रांतीत उत्पन्न झालेल्या सामाजिक अनिष्टांची प्रतिक्रिया म्हणून गांधींनी आपले निराळे आर्थिक धोरण, ती अनिष्टे टाळण्याकरिता प्रतिपादिले. औद्योगिक क्रांतीने शहरांची राक्षसी वाढ झाली, ग्रामीण जीवन विस्कळित झाले, हस्तव्यवसाय बुडाले, बेकारांची संख्या अनावरपणे वाढू लागली आणि भांडवलदारवर्ग मजुरांची पिळवणूक अधिकाधिक करू लागला; त्यामुळे श्रीमंत व गरीब हा भेद अत्यंत तीव्र झाला हस्तव्यवसाय सुटल्यामुळे माणसांचे आरोग्य बिघडू लागले. माणसांना आधिभौतिक भोग हेच मुख्य श्रेय वाटू लागले व समाधानी वृत्ती नष्ट होऊन माणूस यंत्रांचा दास झाला. औद्योगिक क्रांती झालेली राष्ट्रे मागासलेल्या राष्ट्रांवर साम्राज्य पसरवू लागली आणि मागासलेल्या राष्ट्रांची आर्थिक व सांस्कृतिक दुरवस्था वाढली, याची तीव्र जाणीव होऊन गांधींनी नवे आर्थिक धोरण सांगितले.

निसर्गातील जी संपत्ती माणसाला निरंतर प्रयत्न करून चिरंतन कालपर्यंत लाभेल, तिच्याच आधारावर उद्योग चालविले पाहिजेत. खनिज संपत्तीवर

आधारलेले आधुनिक यांत्रिक उद्योग [illegible] म्हणून अपरिहार्य असतील तेवढ्याच बाबतीत चालविणे हितावह होईल. परंतु मनुष्याच्या शरीरश्रमाची गरज संपली आहे, अशी परिस्थिती निर्माण होता कामा नये. ग्रामसंस्था कायम टिकेल, अशी अर्थव्यवस्था कुटिरोद्योगावरच टिकू शकेल. औद्योगिक क्रांतीमुळे शहरांची भरभराट वाढ होत आहे, ती थांबली पाहिजे. आधुनिक वैज्ञानिक शोधांवर आधारलेली आर्थिक क्रांती ही जगातील संपन्न राष्ट्रांची युद्धखोरी वाढवीत आहे. जगातील राष्ट्राराष्ट्रांमध्ये शांततेचे संबंध निर्माण करण्यास ही परिस्थिती प्रतिकूल आहे.

आजचे स्वतंत्र भारताचे अर्थकारण हे या गांधीवादी अर्थकारणापासून दूर गेले आहे. ते ग्रामराज्य स्थापण्यास अनुकूल नाही. पश्चिमी समाजवादी व समाजवादी नसलेली राष्ट्रे ज्या प्रकारची अर्थव्यवस्था वाढवीत आहेत व दृढ करीत आहेत, त्याच प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा पाया स्वतंत्र भारतातही निर्माण होत आहे.

संदर्भ : मराठी विश्वकोशासाठी लिहिलेला लेख.

# १२

# आधुनिक भारतीयांतील तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य

## पाश्चात्त्यांची नवदर्शनांची परंपरा

अबाधित सत्याला स्पर्श करणारी तत्त्वदर्शने अस्तित्वात आल्यानंतर ती दीर्घकाल विद्वमान्य झाल्याचा पुरावा इतिहास देतो. परस्परविरोधी असलेली अनेक तत्त्वदर्शने दर्शनयुगात उत्पन्न होतात. ही परस्परविरोधी असलेली तत्त्वदर्शने अनुभवाच्या आधारानेच उत्पन्न होतात. म्हणून त्यांचे विचारसौंदर्य व तार्किक संगती तत्त्वचिंतकांना आदरणीय वाटते. सर्वच तत्त्वदर्शने सारख्याच वैचारिक सामर्थ्याची नसली, तरी अंतर्गत तार्किक संगतीच्या बाबतीत त्यांचे सामर्थ्य सारखेच प्रशंसनीय असते. ही गोष्ट अर्थात एकाच वैचारिक युगातील तत्त्वदर्शनांना लागू पडते. एकाच वैचारिक युगातील तत्त्वदर्शने सारख्याच प्रमाणात श्रद्धेय किंवा स्वीकार्य झालेली नसतात. आदर व स्वीकार यांत फरक आहे. या ठिकाणी बौद्धिक दृष्टया मान्यता, एक विद्या-संप्रदाय म्हणून मान्यता अशा अर्थी हा शब्द वापरला आहे, श्रद्धेचा विषय होणे म्हणजे स्वीकार होय. प्राचीन काळीं तत्त्वदर्शनांचे प्रभावी युग दोनच देशात अवतरले. ते दोन देश म्हणजे भारतवर्ष व ग्रीस होत. वस्तुतः प्राचीन काळच्या प्रत्येक थोर संस्कृतीस तत्त्वदर्शनांचा लाभ झाला होता. परंतु भारतवर्ष व ग्रीस येथे तत्त्वदर्शनांना असामान्य महत्त्व प्राप्त होऊन त्यांची वैचित्र्यपूर्ण वाढ झाली, म्हणून इतर प्राचीन राष्ट्रांपेक्षा या राष्ट्रांचा उल्लेख दर्शनेतिहासात

वैशिष्ट्याने करावा लागतो.

ग्रीक तत्त्वदर्शनाच्या परंपरेचा वारसा आधुनिक पाश्चात्त्य राष्ट्रांकडे आला आहे. आधुनिक पाश्चात्त्य राष्ट्रांनी केवळ परंपरा जतन करून ठेविली नाही, तर त्या परंपरेत पुनःपुन्हा नवीन नवीन दर्शनाची भर घातली आहे. आधुनिक पाश्चात्त्य राष्ट्रांनी गेल्या साडेतीनशे वर्षांत अनेक नवीन दार्शनिक निर्माण केले. दर्शनांच्या नव्या शाखा उत्पन्न झाल्या. वैभवसंपन्न नवदर्शनांची परंपरा तेथे अजूनही भरभराटीस येत आहे.

## आधुनिक भारतीयांची कृतार्थता की जाड्य?

भारतवर्षात प्राचीन दर्शनांची परंपरा अजून जिवंत आहे. परंतु नवे दार्शनिक युग भारतवर्षात अजून आले नाही. गेल्या दीडशे वर्षांत भारतीय विश्वविद्यालयांतून पाश्चात्त्य व पौरस्त्य दर्शनांत पारंगत असे हजारो पदवीधर बाहेर पडले व शेकडो प्राध्यापक विश्वविद्यालयात व महाविद्यालयात अध्यापन करून गेले व अजूनही अध्यापन करीत आहेत. परंतु नव्या दार्शनिक युगाचा आरंभ होईल, याच्या निदर्शक प्रवृत्तींचा मागमूसही त्यात सापडत नाही. हे कृतार्थतेचे तरी लक्षण आहे किंवा जाड्याचे तरी लक्षण आहे; किंवा असे म्हणता येईल की, कृतार्थतेतून उत्पन्न झालेल्या जाड्याचे हे लक्षण आहे. कृतार्थतेने जिज्ञासा मरते व जिज्ञासा मेली म्हणजे विचार संपतो.

आधुनिक भारतीयांपाशी प्राचीन तत्त्वज्ञानाचा साठा आहे व अंतिम सत्य सापडल्याबद्दलची कृतार्थ वृत्ती आहे. आधुनिक भारतीयांनी नवे तत्त्वज्ञान निर्माण न केल्यामुळे किंवा जुन्या तत्त्वज्ञानाचीच, मुळापासून बदललेल्या कलात्मक व विद्यात्मक नवविस्ताराशी संवादी अशी रचना न केल्यामुळे, आधुनिक भारतीयांपाशी तत्त्वज्ञानाचे दारिद्रयच आहे, असे तात्त्विक दृष्ट्या म्हणावे लागते. कारण तत्त्वदर्शन म्हणजे सर्व सामाजिक अनुभवांचे व विचारांचे मंथन करून निघालेले बौद्धिक रहस्य असते. ज्या सामाजिक अनुभवांत व विचारसंपदेत भारतीय वेदान्त प्रकट झाला, त्यापेक्षा आजच्या सामाजिक अनुभवांचे व विचारसंपदेचे स्वरूप बदलून गेले आहे. म्हणून नव्या अनुभवांवर व विचारांवर आधारलेले तत्वदर्शन आधुनिक भारतीयांपाशी नसल्यामुळे आधुनिक भारतीय हे तत्त्वदर्शन्यशून्य आहेत, असा आरोप करण्यास हरकत वाटत नाही.

अनंताची अनुभूती कृतार्थता निर्माण करू शकते. भारतीय वेदान्तात हे सामर्थ्य आहे. परंतु अनुभवही अनंत प्रकारचा असतो. नव्या प्रकारचा अनुभव अनंताच्या अनुभूतीचे नवे स्वरूप नव्या तत्त्वदर्शनाच्या साहाय्याने प्रकट करू शकतो. आजच्या जगातील विशिष्ट अनुभूतीचा परामर्श घेऊन तयार होणाऱ्या भारतीय तत्त्वदर्शनाच्या अभावामुळे भारतीयांचे वैचारिक दौर्बल्य त्यांच्या भवितव्याबद्दल निराशा उत्पन्न करते. कारण, तत्त्वदर्शन म्हणजे उत्कर्षाची सीमा गाठू पाहणारा मानवी विचारांचा साहसी विक्रम होय.

## तत्त्वज्ञानाला आवश्यक पार्श्वभूमी

तत्त्वज्ञानाच्या उदयाची पार्श्वभूमी आधुनिक भारतीयांना लाभलेली नाही. ती लाभल्याशिवाय नव्या तत्त्वचिंतनाचा पायाच घातला जाणार नाही. तत्त्वज्ञानाच्या उदयाच्या पार्श्वभूमीचे चार घटक भाग असतात : ( १ ) विश्वाच्या व जीवनाच्या अज्ञात भागांवर प्रकाश टाकणाऱ्या विद्यांचा विस्तार सुरू असावा लागतो व या विद्यांच्या विस्ताराची गती वाढत असता त्यांच्या जोडीला कलांची, उद्योगांची, सामाजिक व्यवहारांची व संस्थांची त्या विद्यांच्या अनुरोधाने वाढ व्हावी लागते. विद्या व कला यांच्या बाबतींत भारतीय विद्यापीठे अनुकरणात्मक अवस्थेतच सध्या आहेत; पाश्चात्त्यांच्या विद्या व कला यांची उसनवारी अजून पुरी व्हावयाची आहे. त्या आत्मसात केल्याशिवाय त्यात भर किंवा प्रगतीचे पाऊल टाकण्याची पात्रता येणार नाही. अनुकरणात्मक अवस्थेतून उत्तीर्ण झाल्याशिवाय स्वतंत्रपणे पाश्चात्त्यांशी सहकार्य करता येणार नाही. जेव्हा स्वतःच्या खऱ्याखुऱ्या योग्यतेच्या दर्शक विद्या व कला भारतीयांच्या हातून विस्तार पावू लागतील, तेव्हाच सर्व विचारांच्या व अनुभवांच्या मुळाशी असलेल्या तथ्याचा अर्थ शोधण्याची प्रवृत्ती उत्पन्न होईल. ( २ ) जीवनाच्या यशाशी वा वैफल्याशी अंतिम प्रश्नाचा प्रत्यक्ष संबंध असतो, सामाजिक गरजांचा व तत्त्वदृष्टीचा निकटचा संबंध असतो, अशा प्रकारची तीव्र जाणीव आधुनिक भारतीयांत नाही. प्राचीन तत्त्वदर्शनाने सदासर्वकाळचे व सर्व प्रकारचे प्रश्न सुटतात, अशी विशेष विचार न करता दृढ झालेली श्रद्धा त्यांच्यात आहे. ती जाणिवेचे दार उघडू देत नाही. प्राचीन गंभीर दर्शनांची प्रशंसनीय अशी ही पोलादी पकड आहे. ‘ प्रशंसनीय ’ असे म्हणण्याचे कारण;

नवीन तत्त्वदर्शन जर उत्पन्न झाले, तर त्याची जबाबदारी किती मोठी असेल, याची कल्पना या पोलादी पकडीवरून येते. प्राचीन युगाने आपल्या मानसिक वैभवाच्या काळात शील, समाधी व प्रज्ञा यांच्या सामर्थ्यानिशी विश्वसत्याच्या अंतरंगात प्रवेश केला व त्याचे स्वरूप अनुभवाच्या क्षेत्रात तत्त्वदर्शनाच्या रूपाने आणून सोडले. त्यामुळे प्राचीन तत्त्वदर्शने इतकी प्रभावी झाली. आधुनिक भारतीयाला जेव्हा आधुनिक विद्या आणि कला यांच्या सहाय्याने नवयुगाची शक्ती वश होईल, तेव्हा जुन्या जगाने दिलेल्या वेदान्ताला निष्प्रभ करणारे तत्त्वदर्शन प्राप्त होईल. ( ३ ) तत्त्वज्ञान हे संपूर्ण वैचारिक स्वातंत्र्याचा अनुभव घेणाऱ्या विचारवंताचे कार्य असते. इतर विद्या विशिष्ट विचारांच्या गृहीतकृत्यांवर अवलंबून असतात. कारण त्यांचा विषय मर्यादित असतो, म्हणून त्या विचार-स्वातंत्र्यालाही मर्यादा पाळावी लागते. तत्त्वज्ञानात कोणत्याही सिद्धान्तावर वा तत्त्वावर आक्षेप घेण्यास पूर्ण मुभा असते. म्हणून परस्परविरोधी तत्त्वदर्शने एकाच काळीं विद्वानांमध्ये मान्यता पावू शकतात. अशा वैचारिक स्वातंत्र्य भोगणाऱ्या, स्वैर, प्रतापी व आत्मविश्वाससंपन्न विचारवंतांचा तुटवडा हे भारतीय विद्यापीठाचे महत्त्वाचे वैगुण्य आहे. लाचार, उदासीन अथवा पराधीन वृत्तीने दुबळा झालेला व विवंचनेत सापडलेला प्राध्यापक भूत व वर्तमान काळाला आकार देणारे वैचारिक स्वातंत्र्य उपभोगू शकत नाही. ( ४ ) आधुनिक भारतीयांस प्राचीन वेदान्ताने अंतिम-पूर्ण सत्याचे आणि मोक्षाचे आश्वासन दिले आहे. परंतु पूर्ण सत्य आणि मोक्ष मानवाच्या कक्षेत सापडण्याची शक्यता आधुनिक माणसास दिसत नाही. त्यामुळे तो खूप नम्र झाला आहे. ही नम्रता किंवा असामर्थ्याची जाणीव आधुनिक भारतीयांस येण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय नव्या तत्त्वज्ञानाच्या उभारणीची प्राथमिक तयारीदेखील करता येणार नाही. जितके जीवनाचे आणि विश्वाचे ज्ञान वाढत आहे, तितका संशयही खोलावत आहे. अंतिम सत्याच्या ज्ञानाची आशा त्यामुळे फार दुरावत चालली आहे. जुना धर्म व जुने तत्त्वज्ञान यांनी पूर्ण सत्य व पूर्ण कल्याण यांच्याबद्दलचे आश्वासन दिले असले, तरी ते आश्वासन खरे केले नाही; ही गोष्ट जगाचा नवा व जुना इतिहास खिन्नपणे निवेदन करीत आहे. सत्ययुग ही केवळ पुराण-कल्पना ठरली आहे. या गोष्टीची स्पष्ट जाणीव झालेला तत्त्वचिंतक भारतीयच नव्या दार्शनिक युगाची प्राथमिक तरतूद करू शकेल.

## प्राचीन दर्शनांमधील बौद्धिक रचना

आधुनिक भारतीयांना प्राचीन दर्शनाची जी अविच्छिन्न परंपरा लाभली आहे, तिचा पूर्ण उपयोग प्राथमिक तयारीकरिता केला पाहिजे. व्याकरण, मीमांसा व तर्क यांची प्रखर उपासना हा प्राचीन परंपरेचा महत्त्वाचा विशेष भाग आहे. प्राचीन दर्शने म्हणजे बौद्धिक रचना असलेल्या सुसंघटित तत्त्वपद्धती होत. व्याकरण, मीमांसा आणि तर्क यांच्या सहाय्याने मोजूनमापून, तपासून व तावूनसुलाखून विधानांची मांडणी करणे, हा त्या दर्शनांच्या पद्धतीचा मुख्य विषय आहे. हीच बौद्धिक शुचिता होय. ही परंपरागत बौद्धिक शुचिता संभाळून पाश्चात्त्य विचारसमृद्धीच्या विस्तृत कक्षांचा परामर्श घेतल्यानंतरच नव्या तत्त्वज्ञानाचा पाया घालता येईल.

इंग्रजी शिक्षण घेतलेल्या आधुनिक भारतीय सुशिक्षितांनी प्राचीन दर्शनांची इंग्रजीमध्ये मांडणी वा अनुवाद करण्यास सुरुवात केली आहे. ह्या प्राचीन मांडणीत किंवा अनुवादात एकदेशीपणा, अपुरेपणा, अव्यवस्था इत्यादी दोष सापडतात. या दोषांच्या कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण असे आहे की, संस्कृतमधील परिभाषा व पाश्चात्त्य परिभाषा यांचा मेळ घालणे फार कठीण जाते. दुसरे असे की, पाश्चात्त्य व पौरस्त्य दर्शनांत मूलगामी व खोल पांडित्य साध्य करणे एकाच माणसास दुर्घट असते. निदान अशा तऱ्हेने दोन्ही विचारपरंपरांत प्रखर पांडित्य मिळवलेला तत्त्वचिंतक आधुनिक भारतीयांत कोणीही झालेला नाही.

## भाषेचे लालित्य पण विचाररचनेतील शैथिल्य

डॉ. दासगुप्त व डॉ. राधाकृष्णन् यांनी प्राचीन दर्शनांवर व्यासंग करून इंग्रजीत विस्तृत प्रबंध लिहिले आहेत. त्यांपैकी डॉ. राधाकृष्णन् यांनी या विषयात विश्वकीर्ती मिळविली आहे. राधाकृष्णन् यांचा ‘ हिंदी तत्त्वज्ञानाचा इतिहास ’ पाश्चात्त्यांना हिंदी तत्त्वज्ञानाची ओळख पटविण्यास अधिक समर्थ आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात भाषेचे लालित्य लीलेने खेळविण्याची कुशलता त्यांच्या ठिकाणी अप्रतिम आहे; परंतु त्यांनी दार्शनिक विचारांचे तार्किक सांधे व्यवस्थित व जपून न उभारल्यामुळे विचाररचना शिथिल झाली आहे. उदा०; राधाकृष्णन् यांनी शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाची जी मांडणी केली आहे तीच पाहावी. शंकराचार्यांचे

तत्त्वज्ञान मांडण्यात विचारांची कसोटी लागते. तीत राधाकृष्णन् यांस यश लाभले नाही. वाण्याच्या दुकानात माल मांडून ठेवलेला असतो, त्याचप्रमाणे त्यांनी शांकर विचार मांडले आहेत. विचारांचा तार्किक क्रम शोधून शांकर तत्त्वज्ञान मांडले नाही. उदा०, माया–सिद्धांताचा परामर्श घेण्याच्या अगोदर सगुण आणि निर्गुण यांचा विचार मांडला. किंवा दुसरे असे की, 'दिक्, काल आणि कार्यकारण-भाव' या शब्दसमुच्चयाने पुरस्कृत केलेली कल्पनासरणी पाश्चात्त्य दर्शनात महत्त्व पावली आहे; शांकर तत्त्वज्ञानात असा शब्दसमुच्चय आढळत नाही. या शब्दसमुच्चयाचा पुरस्कार करून शांकर विचारसरणी राधाकृष्णन् यांनी एका परिच्छेदात ( Indian Philosophy, Vol. II, P. 527 ) मांडली आहे. दुसरे असे की, मायासिद्धांताचा पोटभाग.म्हणून दिक् , काल व कार्यकारणभाव यांचे तात्त्विक खंडन मांडले असते, तर ते सुसंगत ठरले असते.

अध्यात्मदर्शनाची मांडणी मोठ्या तत्त्वद्रष्ट्याच्या आत्मविश्वासाने करणारे योगी अरविंद घोष होत. त्यांनी 'दिव्य जीवन' ( The Life Divine ) या आपल्या महानिबंधात भारतीय अध्यात्मदर्शन नव्या स्वरूपात उभारले आहे. इतक्या विस्तृत स्वरूपात तत्त्वदर्शनांची मांडणी करणारा वर्तमानयुगातील हा पहिला भारतीय होय. गूढ, दिव्य व पारमार्थिक अनुभवाची संपूर्ण संपत्ती हस्तगत करणाऱ्या सिद्धाची भूमिका स्वीकारून हा निबंध योगी अरविंदांनी लिहिला आहे. अशी भूमिका आद्य शंकराचार्य देखील पतकरू शकले नाहीत. विकासवाद, आधुनिक भौतिकवाद, नवे मानसशास्त्र आणि पाश्चात्त्य तत्त्वदर्शनाची परिभाषा याचा सर्वांगीण पाठपुरावा करून या ग्रंथाची मांडणी केली आहे. परंतु त्यातील 'दिव्य विश्व' बौद्धिक विचारसरणीच्या आवाक्याबाहेरचे आहे. त्यात संवादी असा बौद्धिक विचार व्यक्त करता येत नाही. महाप्रयासानेच योगी अरविंदांच्या मननात मन एकरूप होऊ शकते. त्यामुळे विशाल अशी धार्मिक अनुभूती काव्या-नुभवाप्रमाणे स्पंदन पावू लागते. नव्या ज्ञानविज्ञानांचा संस्कार लाभलेला हिंदी धार्मिक मनुष्य स्वस्थानाप्रत पुन्हा पोचल्याचा आनंद अनुभवितो. कारण पाश्चात्त्यांच्या बौद्धिक संस्कृतीने जुन्या जगातील आध्यात्मिक व धार्मिक विचारांचे सत्त्व किंवा सत्यत्व लोपवून टाकले आहे, अशा जाणिवेने आधुनिक भारतीय पराभूत मनःस्थितीत सापडला आहे. या पराभूत भावनेचा खेद नष्ट झाल्याचे समाधान योगी अरविंदांच्या 'दिव्य जीवना'कडून मिळते, दडपलेली अध्यात्म-

वादी उत्तम अहंता पुन्हा मान वर करू लागते. राधाकृष्णन्, अरविंद, प्रा. रामभाऊ रानडे इत्यादी भारतीय तत्त्वज्ञ विभूती म्हणजे भारतवर्षाच्या आध्यात्मिक उत्तम अहंतेचे पुन्हा जागृत झालेले तेजोराशी! त्यांच्या वैचारिक संगतीत धार्मिक अनुभव जागृत होऊन भारताला खाली खेचणाऱ्या विनाशकारक व दुर्गतीला नेणाऱ्या अज्ञानमय शक्तींचा, पराभूत मनोवृत्तीचा, कष्टकारक व खेदजनक धैर्य खचवणारा अनुभव काही वेळ दबून राहतो. राधाकृष्णन्, रानडे व अरविंद हे भारतीयांच्या दर्शनाची बौद्धिक परंपरा पुन्हा सामर्थ्यशाली करण्याची हमी देऊ शकत नाहीत किंवा नव्या तत्त्वदर्शनाचा पाया रचण्यास आवश्यक असलेल्या बौद्धिक शुचितेचेही आश्वासन देऊ शकत नाहीत. योगी अरविंदांचे ‘ दिव्य जीवन ’ मोठ्या सुशिक्षितासही आकलन करण्यास कठीण आहे. यामुळे तो त्यांच्या गूढवादी व विलक्षण शैलीच्या तेजाने दिपून त्यांना लोटांगण घालतो; आणि हीन, ओबडधोबड व पौराणिक कल्पनांत गुंगून समाधान मानतो. योगी अरविंदांचे ‘ दिव्य जीवन ’ सामान्य माणसाच्या आटोक्याबाहेरचे आहे, विद्यापीठांच्या बौद्धिक शिस्तीच्या मर्यादेबाहेरचे आहे, तत्त्वदर्शनास आवश्यक अशा बौद्धिक बांधणीला व प्रश्नांना न जुमानता गंभीर व मूलगामी सिद्धान्ताची स्थापना बेदरकारपणे करणारे आहे. त्यामुळे ‘ दिव्य जीवन ’ हे या व्यावहारिक मानवी जीवनातून निवृत्त झालेल्या योग्याचे, सात्त्विक निद्रेने जन्म दिलेले भव्य व ‘ दिव्यस्वप्न ’ आहे, असा दार्शनिक निष्कर्ष निघतो.

जे तत्त्वज्ञान आजच्या सामाजिक अनुभवांचा अर्थ सांगेल, विज्ञानाच्या वाढीस उपकारक सिद्धांताचे दिग्दर्शन करील आणि जीवनातील अडचणींतून बाहेर काढणारा सामाजिक कर्मयोग दाखवील, तेच आजच्या भारतवर्षाचे तत्त्वज्ञान बनेल. तसे तत्त्वज्ञान भारतात उदय पावण्याची पूर्वतयारी कोठेही दिसत नाही. पाश्चात्त्य संस्कृतीने निर्माण केलेल्या एका नव्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडण्यास अनुकूल अशीच ही परिस्थिती आहे; ते म्हणजे मार्क्सवादाचे तत्त्वज्ञान होय. मध्यमवर्ग व सामान्य जनता दैनंदिन जीवनाच्या विवंचनेत सापडली आहे; या विवंचनेतून खात्रीने मुक्त करण्याचे आश्वासन देणारे हे तत्त्वज्ञान आहे. नवभारतीयांत खऱ्याखुऱ्या नवतत्त्वदृष्टीचा अभाव असल्यामुळे वा नवतत्त्वदर्शनाचे दारिद्र्य असल्यामुळे हे दारिद्र्याचे तत्त्वज्ञान झपाट्याने प्रसार पावत आहे! या तत्त्वज्ञानाची भूमिका बौद्धिक आहे; परंतु त्याचा स्वीकार

करण्याची पद्धती व प्रचारपद्धती श्रद्धामय आहे. नैसर्गिक भावनांना व्यापणारा व झोंबणारा विचार श्रद्धेला ताबडतोब जन्म देतो; म्हणून मार्क्सवाद विजयी होत आहे. त्यातील बौद्धिक दोषस्थळे आता उघडकीस आली आहेत; परंतु त्यातील आर्थिक समानता म्हणजे या विज्ञानयुगातील मंत्रमुग्ध करणारी जादू आहे. ही जादू अध्यात्मवादी योग्यांनाही निष्प्रभ करणारी आहे.

मार्क्सवादाच्या पुढे पाऊल टाकणारे तत्त्वदर्शन उत्पन्न होण्यास दोन प्रकारच्या आव्हानांस उत्तर द्यावे लागेल व ते उत्तर एकत्रित द्यावे लागेल. वर्तमानकालीन पाश्चात्त्य संस्कृतीचे आध्यात्मिक सामर्थ्य म्हणजे विशाल बौद्धिक शक्ती होय. बौद्धिक शक्ती हा आध्यात्मिक सामर्थ्याचा घटक न मानणे हे भ्याडपणाचे चिन्ह आहे. पाश्चात्त्य संस्कृतीच्या बौद्धिक सामर्थ्याचे आव्हान मान्य करणारे तत्त्वज्ञान उत्पन्न होण्यास आवश्यक अशी वैज्ञानिक दृष्टी हा एक मोठा सद्‌गुण आहे, असा अभिनिवेश बाळगणारी शिक्षणपद्धती भारतीय विद्यापीठात अस्तित्वात आली पाहिजे. दुसरे आव्हान म्हणजे मनुष्य व मानवी समाज बदलण्याची प्रक्रिया दर्शित करणारे तत्त्वज्ञान पाहिजे. आधुनिक भारतीयांमध्ये मान्यता पावलेला गूढ अध्यात्मवाद या दोन्ही आव्हानांस अपुरा आहे. जाणूनबुजून बौद्धिक अशा विचारप्रक्रियेस तो पाठमोरा होतो आणि ज्वलंत व खडतर सामाजिक प्रश्नांना काल्पनिक, अव्यवहार्य व विसंगत उत्तरे देतो. खऱ्याखुऱ्या तत्त्वज्ञानाच्या दारिद्र्याचे ते मुख्य गमक आहे.

* संदर्भ: नवभारत, जानेवारी १९५२, पृष्ठे ३९ ते ४३.

# १३

## धर्ममूल्याची चर्चा

काही लोकांचे असे म्हणणे आहे की, ईश्वर, आत्म्याचे अमरत्व व कर्मविपाकवाद यांसारख्या कल्पनांना मानवी जीवनात काही मूल्य आहे. सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, सर्वगुणसंपन्न, परमकल्याणमय ईश्वर बुद्धीने सिद्ध होवो वा न होवो; आत्म्याचे अमरत्व तर्कशुद्ध रीतीने पटविता येवो अथवा न येवो; किंवा व्यक्तीने केलेल्या कर्माचे फल केव्हातरी त्याच व्यक्तीला भोगावेच लागते, ही गोष्ट प्रमाणांनी शाबित होवो वा न होवो; ह्या कल्पनांचे अस्तित्व गृहीत धरल्याशिवाय मनुष्यास संसारात समाजधारणेसंबंधी कर्मे किंवा सत्कर्मे धीराने करता येत नाहीत, म्हणून त्यांचे अस्तित्व गृहीत धरलेच पाहिजे. ह्या मानवबुद्धीच्या पलीकडच्या वस्तूंच्या अस्तित्व-कल्पनेने मनुष्यास कर्माची व जीवनाची कृतार्थता वाटते, हेच त्या वस्तूंच्या कल्पनांचे मूल्य होय. समाजधारणेस किंवा समाजव्यवस्थेस ईश्वर, स्वर्ग, नरक, आत्मा, पारलौकिक जीवन इत्यादी वस्तूंच्या कल्पनेची आवश्यकता आहे.

या कल्पनेत अनेक दोष आहेत. पहिला दोष असा की, ईश्वरश्रद्धा व अमरत्व भावना या अलौकिक व पारलौकिक मूल्यांपेक्षा अगदी निराळ्या मूल्यांच्या म्हणजे केवळ ऐहिक मूल्यांच्या योगाने इतिहासातील फार मोठ्या घटना घडून आल्या आहेत व येत आहेत. कला, विद्या, त्याग, शौर्य, पराक्रम इत्यादी मानवी गुण पराकाष्ठेला पोचविण्याचे सामर्थ्य ऐहिक बुद्धिगम्य मूल्यांत आहे. फ्रेंच राज्यक्रांती ज्या वर्गांनी केली, त्यांच्या जीवनाला व पराक्रमाला स्वातंत्र्य, लोकसत्ता व

बंधुत्व इत्यादी सामाजिक मूल्यांचाच पाठिंबा होता. अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धात, लोकसत्ता व मानवी मूलभूत हक्कांची स्थापना या ध्येयाने अमेरिकेतील लोक लढले. स्पेनच्या अयशस्वी व प्रतिक्रांतिपर्यवसायी यादवी युद्धात लोकसत्ता, मानवी हक्क, आर्थिक गुलामगिरीचा नाश आणि समाजवाद या ध्येयांनी प्रेरित झालेल्या आंतरराष्ट्रीय शूरांनी धारातीर्थी देह ठेविले आहेत. हिंदुस्थानात फासावर गेलेले भगतसिंगासारखे लोक राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या ध्येयांनीच देहार्पण करून गेले. जीवन-मरणाचीच ज्या ठिकाणी कसोटी असते, त्या ठिकाणीसुद्धा अमरत्व व ईश्वर या भावनांचा नुसता स्पर्शही नसताना महान कार्ये सामान्य जनसुद्धा पार पाडतात, ही गोष्ट सामाजिक मानसशास्त्रास मान्य आहे. ईश्वरावर व अमरत्वावर श्रद्धा नसलेले मोठमोठे विज्ञानसंशोधक भौतिकशास्त्रांत अहोरात्र जीवापाड मेहनत करीत असतात. संशोधक माणसे केवळ ज्ञानलालसेने, व्यवसायप्रीतीने, उप-जीविकेचा धंदा म्हणून किंवा समाजप्रीतीने प्रेरित होऊन व जीव धोक्यात घालून धाडशी कृत्ये करीत असतात. आई मुलाकरिता खस्ता खाते, ती स्वर्गाकरिता किंवा ईश्वराकरिता नव्हे. तिचा जीव मुलाच्या जिवात मिळून गेलेला असतो; तिच्या भावना मुलाच्या हितालाच परमार्थ समजतात. केवळ माझे एका व्यक्तीचे काय भवितव्य आहे, याचीच चिंता ज्यांना असते; असे सामाजिक प्राणी फार थोडे असतात. सामाजिक क्रिया व्यापक अहंभावानेच घडत असतात. समाजात जन्माला आलेल्या मानवाचा अहंभाव सामाजिक इतिहासाच्या विशिष्ट युगा-नुरूप संकुचित किंवा व्यापक झालेला असतो. त्याच्या व्यापकतेची मर्यादा विशिष्ट ऐतिहासिक परिणतीवर अवलंबून असते. कुटुंबाच्या हिताकरिता उसंत न घेता खपणारी प्रजा समाजाच्या आरंभापासून आहे. तिला ईश्वर व अमरत्व नाही हे कळले, तरी ती तशीच खपेल. जमातीचा कायदा पारलौकिक भीतीवाचून मना-पासून पाळण्याची वृत्ती रानटी लोकांतही आढळते. धार्मिक ध्येयार्थ झटणाऱ्या व्यक्तीला स्वतःच्या पावित्र्याची व पारलौकिक जीवनाचीच फार काळजी असते व त्याकरिता तिची नीती असते. तिची ही भावना अत्यंत स्वार्थी असते. हा स्वार्थ अगदीच विकृत असतो. कारण तो केवळ भ्रामक कल्पनेवर आधारलेला असतो. समाजाची प्रगमनयुक्त धारणा, राष्ट्रवाद, समाजवाद, मानवाचा उत्कर्ष इत्यादी ऐहिक बुद्धिगम्य ध्येये समाजनिष्ठ आहेत, वैयक्तिक नाहीत. तेथे वैयक्तिक साध्य गौण ठरते. कारण त्या व्यापक ध्येयात वर्तमान व भावी अनंत व्यक्तींचे हित,

समाजस्थैर्य व समाजकल्याण साठविलेले असते. ऐहिक सामाजिक मूल्यांची तरफदारी करणारा भौतिकवाद, व्यक्तीच्या काल्पनिक पारलौकिक ध्येयांचा पुरस्कार करणाऱ्या अध्यात्मवादापेक्षा अधिक सत्य व श्रेष्ठ आहे. कारण ह्या भौतिकवादात समाजातील सर्व व्यक्तींच्या योगक्षेमाचा अंतर्भाव होतो. धार्मिक मूल्यांतील दुसरा दोष असा की, विशिष्ट देश कालमर्यादेत महत्त्व पावलेल्या विधिनिषेधांस, भावनांस, आचारांस, विचारांस किंवा संस्थांस धर्मवाद शाश्वत मूल्य अर्पण करतो; त्यांना शाश्वत अलौकिक शक्तीचा पाठिंबा निर्माण करतो. हाच परमेश्वरी आदेश किंवा संकेत आहे, असे सांगतो; हे ऋषीला वा महात्म्याला दिसलेले महान सत्य आहे, असे दाखवितो. त्याचा परिणाम असा होतो की, विशिष्ट परिस्थितीतच काही आचारविचारांना जे महत्त्व असते, ते परिस्थिती बदलल्यावर नष्ट होते आणि त्यांची अडगळ बनते. धर्ममूल्यामुळे ही अडगळ प्रगतीच्या मार्गात अडथळा उत्पन्न करते. अपौरुषेयता, ईश्वरसंकेत, कर्मविपाक इत्यादी शाश्वत मूल्येच परिवर्तन करण्यास अडथळा करून प्रगतीचे वैरी बनतात. हीच धार्मिक शाश्वत मूल्ये मानवाच्या अधोगतीची द्वारे बनतात, असे मानवेतिहास बजावून सांगत आहे. धर्मत्व किंवा पारलौकिक मूल्य असलेली विशिष्ट ध्येये, भावना, आचार व संस्था याच प्रगतीच्या शृंखला बनतात. मनुष्यानेच जन्माला घातलेला व राखलेला धर्म व ईश्वर मनुष्यावर कुरघोडी करतो. म्हणून बुद्धिवादावर आधारलेली व गरज संपताच बदलता येणारी ध्येये व मूल्ये यापुढे पाहिजेत.

धर्ममूल्यांचा तिसरा दोष असा की, धर्मसंस्थेवर सत्ताधारी वर्गाच्या लोकांचा प्रभाव पडतो व ते त्या धर्ममूल्यांचा व धार्मिक विचारसरणीचा उपयोग सामान्य जनतेला गुलामगिरीत व अज्ञानात ठेवण्याकडे करतात. ईश्वरवाद, अमरत्व, पापपुण्य व कर्मविपाक यांचा उपयोग आपला सामाजिक दर्जा, सत्ता व भोगसाधने कायम करण्याकडेच सत्ताधारी वर्गाने केला आहे, असे सगळ्याच धर्मांचा इतिहास सांगतो. जातिभेदातील विषम कायदे व अस्पृश्यतेची संस्था धर्ममूल्यांनीच हजारो वर्षे जगविली. ग्राम्य भौतिक स्वार्थ साधण्यास गूढ अध्यात्मवादाचा चांगला उपयोग होतो.

भौतिकवाद हा अनैतिक असतो व गूढ अध्यात्मवाद हा नैतिक असतो, असा मेळच चुकीचा आहे. गूढ अध्यात्मवादाच्या पोटी ग्राम्य व घृणित

भौतिकवाद सामावलेला असतो आणि विज्ञानशुद्ध भौतिकवादाच्या पोटात अत्यंत उच्च दर्जाचा अध्यात्मवाद साठविलेला असतो. मनुष्याची बौद्धिक व मानसिक उन्नती हाच मानवी जीवनातील अध्यात्मवाद होय. समाजातील सगळ्या घटकांचा नित्य योगक्षेम नीट चालविण्याची तरतूद केल्याशिवाय, विद्या व कला यांची द्वारे सगळ्या मानवांस पूर्णपणे उघडी केल्याशिवाय, प्रगतीची सगळी साधने सगळ्या समाज घटकांस प्राप्त होऊ शकतील, अशी व्यवस्था केल्याशिवाय समाजात श्रेष्ठ अध्यात्मवाद अवतरणारच नाही. आत्म्याचा म्हणजे मनुष्याच्या शक्तीचा विकास करणे, हाच मानवी जीवनातील अध्यात्मवाद होय व ह्या विकासाकरिता सृष्टीतील सगळ्या शक्तींचे साहाय्य विज्ञान व कला यांच्याद्वारे होणे, यास विज्ञानशुद्ध भौतिकवाद म्हणतात. सामाजिक उच्च ध्येयांची साधना म्हणजे अध्यात्मवाद होय.

विश्वाचा कार्यकारणभाव व विश्वाचे मूळ स्वरूप कसे आहे, या विषयाशी संबद्ध असलेले अध्यात्मवाद व भौतिकवाद असे दोन पक्ष तत्त्वज्ञानात प्रसिद्ध आहेत. त्याचा येथे परामर्श घेतला नाही. जीवनाशी संबद्ध जो अध्यात्मवाद व भौतिकवाद त्याचाच तेवढा येथे उलगडा केला. सृष्टीतील कार्यकारणभाव चेतन ज्ञानयुक्त शक्तीच्या संकल्पविकल्पयुक्त आत्म्याच्या आधीन आहे. विश्वातील सगळ्या घडामोडी एकमेवाद्वितीय, चेतन, विचारशील, सर्वशक्तिमान, सर्व-स्वामी, सर्वव्यापी परम-आत्म्याच्या इच्छामात्रेकरून घडतात, आत्म्याचाच आविर्भाव म्हणजे हे विश्व होय, हा तो अध्यात्मवाद होय. उपनिषदे, गीता, शंकराचार्य, इस्लाम, खिश्चनधर्म व हेगेलसारखे अध्यात्मवादी तत्त्ववेत्ते ह्यांचा हा अध्यात्मवाद आहे. आत्मव्यतिरिक्त वस्तुशक्तींच्या कार्यकारणभावाच्या नियमांनी हे बनले व बनत आहे, असे विज्ञानसिद्ध भौतिकवाद ( सायंटिफिक मटेरिॲलिझम ) सांगतो. या अध्यात्मवादाची व भौतिकवादाची सविस्तर चर्चा येथे अस्थानी ठरेल.

## विश्वाचे गूढ, धर्मसंस्था व विज्ञान

विश्वातील अनंत शक्तींचा विस्तार, सूक्ष्मता व गांभीर्य ही पाहिली, म्हणजे जिज्ञासूंच्या ठायी एक चमत्कृतिपूर्ण भावना उदय पावते; अनंताची संवेदना असे मॅक्स म्यूलर त्या भावनेला संबोधितो. ही अनंताची संवेदना हाच सर्व धर्मांचा

आधार होय, असे तो सांगतो. ह्या विचारात एक मोठा दोष आहे : ज्ञाताच्या पलीकडचे, सान्तापलीकडचे जे अनंत आहे, त्याचीच म्हणजे केवळ अव्यक्ताचीच शुद्ध भावना म्हणजे धर्मकल्पना नव्हे. धर्मकल्पनेत सान्त विश्वातील ज्ञात व अनुभूत अशा कल्पनांचे विपर्यस्त व विकृत भ्रांतिजाल धर्मसंस्थेने निर्माण केले आहे. स्वर्ग, नरक, ईश्वर, पुनर्जन्म, कर्मविपाक, न्यायाचा शेवटचा निवाडा इत्यादी कल्पना म्हणजे अव्यक्त शुद्ध अनंत नव्हे. ज्ञात विश्वाच्याच पोटी गर्भित अशा कल्पनांचा आरोप करून बनविलेले निराळे काल्पनिक विश्व म्हणजे धार्मिक तत्त्वे होत. जागृतीच्या विपर्यासाने जसे स्वप्न तयार होते, तशीच धर्मतत्त्वेसुद्धा तयार झाली आहेत.

भावपूर्ण, तरल, रम्य, उदात्त व उत्कंठापूर्ण अशा ज्या गंभीर चमत्कृतिरूप विश्वविषयक वृत्ती आत्म्याला भारून टाकतात, त्यांचा समाजसंस्थेचा अवयव बनलेल्या संस्थारूप धर्माशी संबंध कमी आहे. महासागरात जहाजावरून प्रवास करीत असणाऱ्या तत्त्वचिंतकाला महासागरात वीचींचे नृत्य चालू असता व अमर्याद विस्ताराचे अवलोकन करीत असता या वृत्तींचा अनुभव येतो. वालुकामय विशाल प्रदेशातील मुशाफराला रात्रीच्या प्रशांत समयी गगनमंडळातील तारांगणाचे अवलोकन करीत असता या वृत्तींचा अनुभव येतो. वृक्षवल्लीलताहीन, पशुपक्षीमनुष्यशून्य, शीतल, हिममय व उत्तुंग अशा हिमालयातील पर्वतराजींच्या परिसरात या वृत्तींचा साक्षात्कार होतो. आइनस्टाइनने म्हटले आहे की, "आश्चर्यपूर्ण विश्वच सगळ्यात सुंदर आहे, असा अनुभव येतो. खऱ्या कलेचे व विज्ञानाचे तेच उगमस्थान आहे. ज्याच्या ठायी या भावनेचा उदय होत नाही, ज्याला चमत्कृती व विस्मय वाटत नाही, त्याचे डोळे कायमचे मिटले, नव्हे तो मेला, असेच म्हटले पाहिजे. या दृष्टीने, केवळ याच दृष्टीने, मी धार्मिक आहे." आइनस्टाइनच्या या म्हणण्यात पुष्कळ तथ्य आहे. आइनस्टाइनप्रमाणे कांटलाही विश्वाबद्दल अशीच विस्मयवृत्ती अनुभवावयास आली होती. तो म्हणतो, "मस्तकावरील तारकामय अनंत आकाश आणि अंतःकरणात वसत असलेली नीतितत्त्वावरील अढळ श्रद्धा यांच्याकडे पाहून विस्मयाला पारावार राहात नाही." वसंत ऋतूतील कोमल पल्लवांनी व पुष्पांनी आच्छादलेली सृष्टी व शरदातील प्रसन्न जल, समृद्ध सस्य आणि नीलाकाश पाहून उदित होणाऱ्या कवीच्या अंतःकरणातील चमत्कृतींशी या वृत्तींचे साम्य आहे. या वृत्तींचा

धर्मातील भविष्ये, स्वर्गनरक, सर्वज्ञ व सर्वशक्तिमान संतांचे चमत्कार, अवतार व प्रेषित यांच्याशी काही संबंध नाही. अज्ञात, अचिन्त्य व अनंत विश्वापुढे नम्र होणे, एवढेच याचे फल व रहस्य आहे. या नम्रतेने विज्ञानाला जन्म दिला, धर्माला नव्हे. ही नम्रता जिज्ञासेला प्रसवते. ही नम्रता संशोधनवृत्तीला उत्साहित करते व मानवाला अपूर्णतेची जाणीव सारखी देऊन प्रगतीच्या व विकासाच्या अनंत विस्ताराची कल्पना जागृत ठेवते. धर्मसंस्थेने अशी विश्वविषयक नम्रता क्वचितच निर्माण केली आहे. धर्माने युगानुयुगे सर्वज्ञतेचा मक्ता स्वतःकडे घेतला आहे; सचेतन व अचेतन विश्वांवर आपले वर्चस्व आहे, अशी बतावणी आजपर्यंत धर्मच करीत आला आहे. धर्मानेच श्रद्धेच्या क्षुद्र टेस्ट ट्यूबमध्ये विश्वासंबंधी सगळे आश्चर्य व गूढ वितळून टाकले आहे. विश्वाचे गूढ सहज लीलेने उकलून दाखवितो, असा गर्व धर्मानेच आजपर्यंत वाहिला आहे. अज्ञाताबद्दल धर्माला आदर नाही; धर्माने लोकांवर वजन कसे मारावे, एवढ्याचीच फार काळजी घेतली आहे. सत्याची त्याला फारशी कदर नव्हती. उपनिषदांतील व दर्शनांतील काही विचार वगळल्यास लोकांवर वजन ठेवण्यापुरताच कुतः, कथं इत्यादी प्रश्नांचा धर्माने विचार केला आहे. काही धार्मिक तत्त्ववेत्ते यास अपवादच होत. क्षुद्र मानवाच्या सुकृत-दुष्कृताशी सगळ्या विश्वाचा संबंध जोडण्याचे काम धर्मानेच आजपर्यंत केले; कारण विशिष्ट हितसंबंध राखणे हेच ध्येय धर्मापुढे होते. विज्ञानाने ही भ्रांती उच्छिन्न केली. ज्योतिष, भूशास्त्र, जीवशास्त्र, मानसशास्त्र यांच्या योगाने ही भ्रांती उघडकीस आली.

विज्ञानाच्या प्रभेत वावरणाऱ्या मानवाच्या मनावर विज्ञानाच्या वर्तमान विकासाचा परिणाम असा होत आहे की, या विश्वात मानव अत्यंत क्षुद्र आहे. महासागराच्या सगळ्या तीरावर जितकी वाळू आहे, त्या वाळूत एका कणाचे जे महत्त्व आहे; तितकेच या विश्वात भूगोलास महत्त्व आहे. ( १ ) धर्मशास्त्राने जीवास सगळ्या विश्वाचा मध्यबिंदू कल्पिले आहे. जीवाच्या हिताहितावर व पापपुण्यावर सगळा सृष्टिव्यापार अवलंबून आहे, असे धर्मशास्त्राने मानले आहे. ( २ ) विश्वातील सगळ्या क्रियांच्या व घडामोडींच्या पाठीशी काहीतरी उद्देश व योजना आहे, अशी कल्पना धर्माने केली आहे. हा उद्देश बाळगणारा व योजना करणारा स्रष्टा आत्मा धर्माने गृहीत धरला आहे.

या धार्मिक विचारसरणीचा त्याग करून अगदी निराळीच विचारप्रणाली मानव

निर्माण करीत आहे. त्याच्या दृष्टीने हा भूगोल अणूंच्या व्यापाराने केव्हातरी निर्माण झाला आहे. त्यांवर जीव व मानव उत्पन्न झाला. हा मानव भोवतालच्या सृष्टीशी झगडत त्या सृष्टीला अधिकाधिक वश करून जगण्याचा प्रयत्न करीत आहे, या प्रयत्नात त्याला वाढते यश प्राप्त होत आहे. शास्त्रज्ञ मानव विश्वातील शक्तींच्या घडामोडी स्वतःच्या जीवनाचेच प्रतिबिंब ( ॲन्थ्रोपोमॉर्फिक ) होय असे मानण्याचे सोडून देऊ लागला आहे; आपणास पाहिजे तसे हे विश्व आहे, असे मानण्याची रानटी विचारपद्धती तो टाकून द्यावयास लागला आहे. ज्ञातापेक्षा अज्ञात अनंत पटीने महान आहे, हे ओळखून त्या अज्ञाताला ज्ञानाच्या मर्यादेत खेचून स्ववश करण्याचा कर्मयोगच शास्त्रज्ञ मानवास पसंत होत आहे. " मी पुण्य संपादन करण्याचा प्रयत्न करीत असताच पापाने मला घेरले आणि प्रकाशा-करिता धडपडत असता अंधाराने मला ग्रासले, " अशी उपनिषदांत वर्णिलेली तक्रार तो यापुढे करणार नाही. या पापांस व अंधकारास निवारण्याकरिता तो देवाचा धावा न करिता मानवाच्या कर्मकौशल्यावरच जास्त भर देऊ लागला आहे. समाजातील अन्याय, वैषम्य, निर्घृणता, कृपणता, दैन्य, उपासमार, अज्ञान इत्यादी दुर्गुणांबद्दल देवास किंवा दैवास जबाबदार न धरता समाजरचनेस तो जबाबदार धरू लागला आहे. ज्या प्रश्नांची उत्तरे मिळणे असंभवनीय आहे, त्या प्रश्नांची काल्पनिक उत्तरे देऊन धर्म आत्मवंचना करतो; अशी विज्ञाननिष्ठ मानव करणार नाही. हे प्रश्न सुटत नाहीत, असे म्हणून प्रश्नपत्रिका कोरी ठेवून पराभव व अल्पज्ञता करण्याइतकी ऋजुता त्याच्या मनाला प्राप्त झाली आहे. तो वातावरणावर ताबा प्राप्त करील, नवीन तारकांचा शोध लावील, अचेतन सृष्टीला सचेतन बनवील, रोगांचा संपूर्ण नाश करील, दीर्घायुष्य प्राप्त करील, सगळी पृथ्वी एखाद्या रेखीव व नवीन सुंदर शहरासारखी निर्वेध, निर्विघ्न व सुगम करील, मृत्यू म्हातारपणी झोपेसारखा जरूर व गोड वाटेल असे आरोग्य साधील. ज्ञानाचे क्षेत्र व्यापक होत आहे, त्यामुळे अस्ताव्यस्त व मिथ्याभूत पौराणिक कल्पनांनी तो फसवणूक करून घेणार नाही. या विश्वाच्या अंतर्यामी गूढ सचेतन देवतांचा व्यापार सुरू असतो, मृत्यूनंतर धार्मिक व आध्यात्मिक जीवास योग्यतेप्रमाणे स्थान व फळ प्राप्त होते, इत्यादी प्रकारच्या भ्रांतीच्या जाळ्यातून मुक्त होऊन मेल्यानंतर प्राप्त होणाऱ्या स्वर्गाला या भौतिक विश्वातील इंद्रियगम्य समाजात आणण्याचा प्रयत्न विज्ञानाच्या बळावर मानवाने करावा,

अशी परिस्थिती आज उत्पन्न झाली आहे. नवी समाजरचना निर्माण करण्याकरिता झगडा केव्हाच सुरू झाला आहे. धर्मक्षेत्रात लढत असता चंद्रसूर्यतारकांच्या पलीकडच्या स्वर्गाच्या साधनेकरिता सर्वस्वार्पण करण्याची तयारी मनुष्याने युगानुयुगे दाखविली आहे. भलत्याच खोट्या मार्गात फुकट जाणाऱ्या त्याच अगणित जीवनशक्तींना सत्यसृष्टींतील वास्तवानुसारी ध्येये सिद्ध करण्याची अगणित साधने सापडली आहेत व सापडत आहेत. या साधनांनी दृष्टीच्या टप्प्यात आलेले, चैतन्याने रसरसलेले, अचेतनात जीवन ओतणारे, विद्युत-संचय करणाऱ्या यंत्राप्रमाणे थरथरणारे, मध्यान्हीच्या सूर्याप्रमाणे दैदीप्यमान असलेले नवीन सामाजिक विश्व निर्माण करणे, हेच मानवशक्तीचे यापुढील साध्य आहे.

## धर्मापेक्षा श्रेष्ठ सामाजिक संस्था

आता धर्मसंस्थेपेक्षा उच्चतर अशा सामाजिक संस्था निर्माण होऊ लागल्या आहेत. धर्मसंस्थेने मानवसमाजार्थ पूर्वी जी कामगिरी बजावली, तीच कामगिरी अधिक कुशलतेने व उच्च भूमिकेत राहून पार पाडणारी साधने व संस्था समाजाने निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. पूर्वीच्या धर्मसंस्थेस माहीत नसलेल्या सामाजिक व्यवस्थेची गरज आता उत्पन्न झाली आहे. सर्व मानवांना सर्व विद्याकलांच्या शिक्षणाची तरतूद करणारी समाजव्यवस्था आता पाहिजे; समाजातील प्रत्येक घटकाचा योगक्षेम नीट चालविता येईल अशी, आणि यांत्रिक-औद्योगिक धंद्यांवर सामाजिक मालकी स्थापून निर्मिलेली आर्थिक पुनर्घटना पाहिजे. आर्थिक उत्पादनाच्या साधनांच्या खाजगी मालकीवर उत्पन्न झालेल्या सरंजामदारी व भांडवलदारी वर्गाचे ज्यात अस्तित्व नाही अशी समाजरचना पाहिजे; समाजवादी तत्त्वावर अधिष्ठित व लोकसत्तेच्या राज्यघटनेने युक्त समाजसंस्था पाहिजे.

वरील नूतन ध्येये आपल्या परंपरेचीच नवपरिणती आहे. व्यासांनी मानवव्यवहाराला, लोकव्यवस्थेला व समाजधारणेला मुख्यत्व देऊन शाश्वतनैतिक मूल्यांनाही सापेक्ष ठरविले; मानव्याला मध्यवर्ती स्थान दिले, वेदांपासून तो शंकराचार्यांपर्यंत तत्त्ववेत्त्यांनी सत्याच्या नित्यसमीक्षेचा व संशोधनाचा अग्नी जागृत ठेविला. हिंदुधर्माचा हा थोर वारसा भारतीयांना मिळालेला आहे. तो न सोडता, भूतकालात कधीही निर्माण करता आले नाही असे उच्च सामाजिक

जीवन निर्माण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. भूतकालातील परिस्थितीला उच्च ध्येय समजून जे वर्तमानकाळात प्रयत्न करतात, त्यांना भविष्यकाळ नसतो. नव्या काळात नवी ध्येये व नवी नवी साधने निर्माण करणारेच लोक थोर भवितव्याचे कर्ते बनतात. भूतकालीन विचारांची पायरी पायाखाली घातल्याशिवाय नवविचारांचे उच्चतर स्थान गाठता येत नसते.

संदर्भ : ‘ हिंदुधर्माची समीक्षा ’, दुसरी आवृत्ती १९४२, पृष्ठे २२३ ते २३४.

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १ | व्यक्तिमत्त्वांचा | व्यक्तिमत्त्वाचा |
| १४ | २९ | समाजाच्या | समाजाचे |
| १६ | ५ | ग्रीक | ग्रीस |
| १६ | ५-६ | इत्यादी कृषिप्रधान | इत्यादी देशांतील कृषिप्रधान |
| २३ | २८ | जीवनसृष्टीतील | जीवसृष्टीतील |
| २४ | २४ | सचित | सूचित |
| ३७ | ४ | काफ्युशस | कन्फ्यूशस |
| ३७ | १२ | बुद्धधर्माईतका | बुद्धधर्माइतका |
| ३८ | ५ | आर्याच्या | आर्यांच्या |
| ४४ | २२ | झरथुष्टी | झरथुष्ट्री |
| ४५ | २३ | नेतृत्याखाली | नेतृत्वाखाली |
| ४६ | २९ | गुलागिरीतून | गुलामगिरीतून |
| ५१ | १९ | नक्षत्रपुजांचा | नक्षत्रपुंजांचा |
| ५३ | १४ | अबुर्द | अर्बुद |
| ५५ | ७ | अतिशुद्रांच्या | अतिशूद्रांच्या |
| ५५ | २६ | क्षूद्रांच्या | शूद्रांच्या |
| ६० | २८ | अराजकवाद | अराजकतावाद |
| ६१ | १ | अराजकवाद | अराजकतावाद |
| ६२ | १५ | असते. | नसते. |
| ६२ | २८ | खरे आहे. | हे खरे आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६४ | १३ | प्रवृती | प्रवृत्ती |
| ६४ | १५ | ‘ निर्वाणतत्त्वे ’ | ‘ निर्वाणतत्त्व ’ |
| ६५ | २५ | अराजकवाद | अराजकतावाद |
| ७४ ते १११ | यथास्थळ | ज्योतिबाफुले | जोतिबा फुले |
| ७५ | १० | वियुत्-संचाराने | विद्युत्-संचाराने |
| ७९ | २७ | निंदा | निंद्य |
| ८१ | १६ | ग्रंथित | ग्रथित |
| ८१ | २५ | महापाप आहे. अशी समजूत होती, | महापाप आहे अशी समजूत होती. |
| ८२ | ११ | जातिभेदाच्या रूढी, बंधनांच्या | जातीभेदाच्या, स्त्री-बंधनाच्या |
| ८२ | २४ | भारतातील | भारताला |
| ८५ | १० | सुधाकर | सुधारक |
| ८५ | १६ | समाजसुधारणेत | समाजसुधारणेस |
| ८५ | २१ | चतुर्थे स्वथ | चतुर्थे त्वथ |
| ८९ | ९ | शास्त्रमनश्वरम् | शास्त्रमनश्वरम् |
| ८९ | १४ | ब्रह्मसमाजी | ब्राह्मसमाजी |
| ९१ | १७ | प्रवृत्तीमुळे | प्रकृतीमुळे |
| ९५ | ५ | झाला आहे. | झाला आहे. ” |
| ९५ | १६ | आलोकन | आलोडन |
| ९५ | २७ | अर्थ करावा. ” | अर्थ करावा. |
| ९६ | ९ | बदला | बदलला |
| ९६ | २४ | निःश्रेयसलक्षधर्म | निःश्रेयसलक्षणधर्म |
| १०७ | ६ | महाराष्ट्रत | महाराष्ट्रात |
| १०८ | २९ | एकत्रित | ऐकांतिक |
| १०९ | २९ | राजकरणाची | राजकारणाची |
| ११० | २० | कक्षाबाहेर | कक्ष्याबाहेर |
| १११ | ४ | अनुकरण | अनुसरण |
| १२१ | १२ | सर्वशा | सर्वज्ञ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२४ | २२ | आप्तसंबंधाने मर्यादित होणारे | आप्तसंबंधाने मर्यादित न होणारे |
| १२५ | १५ | आध्यात्मवादावर | अध्यात्मवादावर |
| १२५ | २० | अनुरून | अनुसरून |
| १२६ | ६ | मेका | काम |
| १२७ | ५ | भरमराठ | भरमसाठ |
| १२९ | २७ | तत्वदर्शन | तत्त्वदर्शन |
| १२९ | २८ | तत्त्वदर्शन्यशून्य | तत्त्वदर्शनशून्य |
| १३१ | १० | म्हणून त्या विचार | म्हणून त्यांत विचार— |
| १३१ | १७ | आकार | आव्हान |
| १४२ | १९ | अल्पज्ञता करण्याइतकी | अल्पज्ञता कबूल करण्याइतकी |

आणखी काही निबंध संग्रह

---

लोकहितवादींची शतपत्रे : सं. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

निबंधमालेतील तीन निबंध : सं. डॉ. निर्मलकुमार फडकुले

विजापूरकरांचे लेख : सं. मु. गो. देशपांडे

स्वातंत्र्यसूक्ते : शि. म. परांजपे

डॉ. केतकर, व्यक्ति आणि विकास : सं. श्री. के. क्षीरसागर

विचार शलाका : श्री. म. माटे

माझे चिंतन : पु. ग. सहस्रबुद्धे

वैयक्तिक आणि सामाजिक : पु. ग. सहस्रबुद्धे

आणि

रमेलचे निवडक लेख : सं. भा. ज. कविमंडन

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर कॉलनी, पुणे ३०